संत श्रीगुलाबराव महाराजांच्या शिष्य पंचायतनातील प्रमुख

श्री बाबाजीमहाराज पंडित विरचित

१..अभंग गाथा

२..गोविंदानंदसुधापुष्टि (ओवीबद्ध)

३..आत्मचरित्र (अभंग ११२४ )

श्रीमहाराजांचे सांप्रदायिक नांव स्कंददास असे आहे. त्यामुळे अभंगाचे शेवटी ङ्गस्कंददासफकिंवा ङ्गज्ञानेश्वरजासुतफअसे मुद्रांकन आढळते.

श्रीकृष्णजन्मोत्सव २३-८-१९७०

अनुक्रमणिका

अभंग गाथाविषय

१ मंगलाचरण २ रूपवर ३ नाममहिमा ४ गुरूमहिमा ५ संतपर ६ करूणापर ७ आत्मवृत्त ८ विनवणी ९ विरहपर १० भक्तिपर

११ वेदान्त १२ उपदेश १३ श्रीकृष्णलीला

१४ हंसदंपति आख्यान १५ पुरवणी १६ गोविंदानंदसुधापुष्टि ओव्या ८४

१७आत्मचरित्र अभंग २२४

..................................................

श्री बाबाजीमहाराज पंडित विरचित

## अभंग गाथा


गोविंदानंदसुधापुष्टि ओव्या ८४

आत्मचरित्र अभंग २२४

संत श्रीगुलाबराव महाराजांच्या शिष्य पंचायतनातील प्रमुख

श्री बाबाजीमहाराज पंडित विरचित

# अभंग गाथा







अभंग १०१५



# अभंग गाथा

## १. मंगलाचरण

(१)...

नमो (१)आदिनाथ संप्रदायपीठ । जाहला संतुष्ट मत्स्येंद्र तो ।।१।।

नमितां (२)मत्स्येंद्र प्रेमें ओसंडली । गोरक्ष माउली कनवाळू ।।२।।

नमितां (३)गोरक्ष अद्वयानंदास । परम संतोष चित्तीं वाटे ।।३।।

(४)अद्वयानंदाचे पायावरी डोई । ठेवितांचि आई गैनी सुखी ।।४।।

घालितांचि (५)गैनी पायीं लोटांगण । सदगदित पूर्ण निवृत्तिनाथ ।।५।।

साष्टांग प्रणाम (६)निवृत्तिचरणीं । ज्ञानेश्वरा मनीं प्रेम दाटे ।।६।।

वंदितांचि प्रेमें (७)आलंदीश पाय । (८)ज्ञानेशजा माय पिशी लोभें ।।७।।..

(२)...गणेश स्तवन

अध्यारोप योगें जग हें दाविता । नाभिजन्मा ताता तुम्ही जाणा ।।१।।

कृपेनें रक्षितां न्याया निजपेठें । स्वरूप गोमटें रमाकान्तु ।।२।।

विघ्नें निवारितां प्रभु गजानन । नसे दुजेपण तुझे ठायीं ।।३।।

ज्ञानेश्वरकन्यें तूंचि सरस्वती । प्रेरी माझी मति गुण गाया ।।४।।..

(३)...

सकल विद्येचा दाता गणपती । नसे दासाप्रती विघ्न बाधा ।।१।।

सुरासुरीं पूजा जया समर्पिली । विघ्नें निवारिली ज्याच्याआश्रयें ।।२।।

तोचि आम्हांलागीं होउनि साकार । संसारसागर पार करी ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये तुझियावांचोनी । गजास्य जननी नये दुजा ।।४।।..

(४)...

*असे जो कां वक्र हरिनाम-विखीं । तयालागीं शेखीं शुंडा धरी ।।१।।*

*आपुलिया भक्ता न हो विघ्नबाधा । कार्यार्थी सर्वदा रक्षितसे ।।२।।*

*माझिया भक्तातें सर्वदा अभय । याचिलागीं सोय मोदकाची ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्या सदा निजभक्ता । वारोनियां चिंता पाळीतसे ।।४।।..*

*(५)...शिव स्तुती*

*गारे गारे शूलपाणी । सोडा पाणी संसारा ।।१।।*

*आन नको रे साधन । पंचानन पूजिल्या ।।२।।*

*निवाराया भव भीती । वाहे हातीं त्रिशूल ।३।।*

*ज्ञानेश्वरकन्या ताता । राहे व्यथा स्मरतां ।।४।।..*

*:::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::*

# रूपपर अभंग

*:::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::*

*(६)...श्रीज्ञानेशजा वर्णन*

*पुण्यवृक्ष आजी फळलासे माझा । माय ज्ञानेशजा देखियेली ।।१।।*

*अरुण प्रभेची ओतोनियां मूस । रेखिले सुरस पादपद्म ।।२।।*

*कर्दळीच्या स्तंभासम जानुजंघा । मृदुल सुरंगा शोभताती ।।३।।*

*कटी पीतांबर उदरीं त्रिवळी । कुंकुमरेखा भाळीं शोभतसे ।।४।।*

*सरळ नासिक सुहास्य वदन । माथा कृष्णवर्ण वेणी शोभे ।।५।।*

***पांडुरंगनाथ सर्वांग सुंदर ।***

***हृदय मंदीर शोभवितु ।।६।।***

*(७)...*

*आटे द्वंद्वदुःख । तुझें पाहतां श्रीमुख ।।१।।*

*जिव्हे वाटे ते चाटावे । नासिक तें हुंगूं धांवे ।।२।।*

*कान टवकारोनी भले । शब्दगुण विसरले ।।३।।*

मन झालें तदाकार । खुंटे इंद्रिय व्यापार ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या पायीं । ब्रह्मानंद लोळे बाई ।।५।।
(८)...श्रीकृष्ण वर्णन - हिंदी
खूब बने हो नाथ । अब तुम ।।धृ.।।
मोर मुकुट शिर गले बनमाला । मुरलि बिराजे हाथ ।।१।।
भाल लगाये मृगमद तिलक । छबि नहि वर्णी जात ।।२।।
कुंडलकी तो अभिनव शोभा । खेलत ग्वालन साथ ।।३।।
स्कंददासप्रभु नयननसो यहि । ध्यान चहै दिनरात ।।४।।
(९)...आळंदी हेच वैकुंठ
उमापति जया ध्यात एक मनीं । बैसोनि श्मशानीं आवडीनें ।।१।।
तेचि हें स्वरूप नंदाचे आंगणीं । मोहित गौळणी प्रेमहास्यें ।।२।।
ज्ञाता ज्ञान ज्ञेय जेथ हारपलें । तें रूप सानुले आळंदीये ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या जननी माहेर । वैकुंठ साचार महीवरी ।।४।।
(१०).....हरिनामीं विश्वासला
वेदवेदांग निपुण । नाहीं प्रेम हरिनामीं ।।१।।
अठरा वर्णां धर्मगुरु । स्नान करुं स्पर्शतां ।।२।।
हरिनामीं विश्वासला । जाती भला चांडाळ ।।३।।
स्कंददास त्याचे पायीं । ठेवी डोई अखंड ।।४।।
(११)....आत्माराम भेटवी
ज्याचे वाचे हरिनाम । तो अधमहि तरे ।।१।।
त्याच्या जाऊं पायवणी । सुखधणी तेणेंचि ।।२।।
गुणी द्वादशमंडित । मुखोदगत पुराणें ।।३।।
परी नाहीं तो जिव्हाळा । हीन चांडाळाहुनि तो ।।४।।
स्कंददास म्हणे नाम । आत्माराम भेटवी ।।५।।
(१२)....मानिलेसे गौण आन सर्व
कृतयुगीं ज्ञान त्रेतीं मुख्य याग । पूजा अनुराग द्वापारीं तो ।।१।।

कलियुगीं मुख्य नामसंकीर्तन । मानिलेसे गौण आन सर्व ।।२।।
म्हणोनियां सर्व साधनांचा गोवा । सांडुनी आळवा कृष्णनाथा ।।३।।
मुख्य सांडोनियां गौण आराधितां । फलसिद्धि हातां नये कदा ।।४।।
ज्ञानेशजा माये सांगितली खूण ।
**निर्लज्ज होऊन गायी हरी ।।५।।**
(१३)....नाम अगाध अगाध
नामें उद्धरिलें । नाहीं मीति कीति गेले ।।१।।
नाम घेतां अजामिळ । नेला वैकुंठी तात्काळ ।।२।।
पहा नामें वाल्हा कोळी । सरता केला ऋषिमेळीं ।।३।।
नाम अगाध अगाध । स्कंददास केला शुद्ध ।।४।।
(१४)....साधन सोपें सर्वांहून
नाम साधन साधन । सोपें आहे सर्वांहून ।।१।।
परी व्हावी पुण्यजोडी । तेव्हां उपजे आवडी ।।२।।
डोळे लावुनी चालतां । नाहीं आघाताची चिंता ।।३।।
स्कंददास म्हणे हरी । आल्या आपदा निवारी ।।४।।
(१५)....विश्रांतीचे स्थान : नामचिंतन
न पाहेचि भाव । नामासाठीं घेतो धांव ।।१।।
अजामिळ गणिका भली । एक्या नामें मुक्त झाली ।।२।।
कलियुगीं ऐसे । आन साधनचि नसे ।।३।।
स्कंददास म्हणे संतीं । सांगितलीं हे विश्रांती ।।४।।
(१६)....विश्वासला जीवू
आम्हा पातक्याचा ठेवा । रामकृष्णहरि केशवा ।।१।।
नामें तारियेले बहू । तेथें विश्वासला जीवू ।।२।।
दुजे तयाविण नेणें । योगज्ञानादि साधनें ।।३।।
ज्ञानेशजा पायीं ब्रीद । नाम घेतां पापी शुद्ध ।।४।।

*(१७)....न तुळे नामासी महावाक्यबोध*

*वाचे हरिनाम घेई सर्वकाळ । साधनाचें बळ न लगे तया ॥१॥*

*नामाचा धारक तोचि जाणा संत । नाहीं भाग्यवंत तयासम ॥२॥*

***न तुळे नामासी महावाक्यबोध । महिमा अगाध हरिनामीं ॥३॥***

***स्कंददास म्हणे सोपें सर्वापरी । भाग्याची उजरी तया कळे ॥४॥***

*(१८)....देहभावाचा विसर*

*सांडोनिया भव-खोडी । करा जोडी हरीची ॥१॥*

***देहभावाचा विसर । नामसार जिव्हाग्रीं ॥२॥***

*नामकीर्तनीं हा लाभ । पद्मनाभ आकळे ॥३॥*

*स्कंददासी नामेविण । फोल आन साधनें ॥४॥*

*(१९)....स्कंददास विश्वासला*

*अनाचारिया कारण । वेद न करी पावन ॥१॥*

*तोचि म्हणे हरीहर । वेद त्याचा पैं किंकर ॥२॥*

*ऐसा नामाचा महिमा । बोलायाची नाहीं सीमा ॥३॥*

*स्कंददास विश्वासला । ज्ञानेशजा माय बोला ॥४॥*

*(२०)....नाम विश्रांतीचें स्थान*

*साधनाच्या कोटी । नये कामा देवभेटीं ॥१॥*

*चहुयुगीं उद्धरीलें । नामें पतित तारिले ॥२॥*

*नाहीं कोणी दोष बळी । नाम घेतां राहे जवळी ॥३॥*

*ज्ञानेशजा दिली खूण । नाम विश्रांतीचें स्थान ॥४॥*

*(२१)....हरिनाम गा रे वेळोवेळा*

*मंगळ मंगळ श्रीहरीचे नाम । स्मरतांचि काम सिद्ध सर्व ॥१॥*

*नवमी वैधृती सर्व कुमूहूर्ते । होती सुमुहूर्ते नामें एक्या ॥२॥*

*नको काळ वेळ नको योग तिथि । अखंड श्रीपति आळवावा ॥३॥*

*ज्ञानेश्वरकन्या वचन सोपेरे । हरिनाम गा..रे वेळोवेळा ॥४॥*

(२२)...वात्सल्य विश्वाचे

धन्य एक तो संसारी । विषय सांडुनियां दुरी ।
वाचे अखंड उच्चारी । व्रजनारी वल्लभ ।।१।।
दृढ धरुनियां कांस । नामीं ठेविती विश्वास ।
त्यांचा चुके भवपाश । नित्य वास वैकुंठी ।।२।।
बांधोनिया नाम-होडी । होती विश्वाचे नावाडी ।
कृपें भव पैलथडी । नेती कोडी जीवांच्या ।।३।।
**ज्ञानेशजामाये पोटीं ।**
**विश्व-वात्सल्याची पेटी ।**
**म्हणोनियां आम्हांसाठीं ।**
**झाली गोमटी साकार ।।४।।**

(२३)....तुझ्या नामाचा महिमा

तुझ्या नामाचा महिमा । नेणें तूंहि मेघश्यामा ।।१।।
**तुझें नाम घेतां राहे ।**
**ऐसे कोण पाप आहे ।।२।।**
महापापी वाल्या कोळी । नामें नेला ऋषिमेळीं ।।३।।
ज्ञानेशजासुत म्हणे । एक्या नामें उद्धरणें ।।४।।

(२४)....नाममाला

पाप करिसी अमूप । कोठवरी साहूं ताप ।
माझे भक्त ते निष्पाप । नामजप सर्वदा ।।१।।
अजामीळ उद्धरिला । नामप्रताप आगळा ।
नाहीं पापा आतळला । नाममाला जपोनि ।।२।।
साच बोलणें आपुलें । असंभाव्य पाप केले ।
परि पाहिजे रक्षिले । नेतां काळें धरोनी ।।३।।
नामसुधा सेवुनियां । पाप आचरे पापिया ।

*ज्ञानेशजे परी पाया-। वेगळिया न करा ।।४।।*

*(२५)…. सर्व कर्मफळांची प्राप्ती*

*सर्व प्रायश्चित्त अशेष तपादी । आघव्या उपाधी मुनिकृत ।।१।।*

*जेणें जेणें भावे साधे बाळहित । तोचि तोचि देत माय खेळ ।।२।।*

*तैसे अज्ञमती वाटेल निष्कृती । प्रायश्चित्त रीती तीचि वेदीं ।।३।।*

***ज्ञानेशजा म्हणे कर्माचेही फळ ।***

***नामाचिया बळें होत असे ।।४।।***

*(२६)..**नाहीं भेणें कळिकाळा***

*अनंत जन्मींची पातकें समस्त । नसे प्रायश्चित्त तया लागीं ।।१।।*

*परि हरिनाम प्रताप आगळा । जाळीत सगळा पापराशी ।।२।।*

*पापभेदें जाण प्रायश्चित्त गोवा । एक नाम सर्वां भस्म करी ।।३।।*

***ज्ञानेशजा म्हणे आठवा गोपाळा ।***

***नाहीं कळिकाळा भेणें मग ।।४।।***

*(२७)…..नका शोधूं मतमतांतरे*

*जळाविण नोहे अग्नीची शांतता । तमा निवारिता मित्र एक ।।१।।*

*एक अमृतचि सांपडल्या जाणा । वाचवी मरणा पासोनिया ।।२।।*

*तैसे एक हरि नामचि समर्थ । कलिदोषाप्रत निवाराया ।।३।।*

*ज्ञानेशजा म्हणे हेचि रे स्वहित । नका शोधूं मत मतांतरे ।।४।।*

*(२८)…स्मरे माधवा घडी भरी*

*सहस्रगंगेच्या स्नानाचें जें फळ । शतकोटी वेळ पुष्करीं जे ।।१।।*

*एक वेळ वाचे हरिनाम येतां । लाभते तत्वतां सर्व फळ ।।२।।*

*नये नामसरी कोण्याही साधना । सायासही जाणा नसे कांहीं ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्या म्हणे रे गाढवा । स्मरे का माधवा घडी भरी ।।४।।*

*(२९)…पातक उरो नेदी*

*काय जाणलिया अग्नि दाह करी । आना सुखकारी होय काय।।१।।*

*जाणोनियां विष सेवन करिता । मरण अन्यथा नाहीं काय? ॥२॥*

*काय सुधा सांडी निजांगीचा गुण । सेविले जाणून नाहीं तरी ॥३॥*

*ज्ञानेशजा म्हणे तैसे हरीनाम । पातकाचे नाम उरो नेदी ॥४॥*

*(३०)........ रूप तेचि नाम*

*क्षण नारायण रूप ध्यातां मनीं । यमाची जाचणी चुकली त्या ॥१॥*

*सर्व सुरवर तयासी विमानीं । नेताती वाहोनी स्वर्गलोकीं ॥२॥*

***नामाचिया बळे सहज समाधी ।***

***संसार उपाधि निवटीत ॥१॥***

*ज्ञानेशजा म्हणे रूप तेंचि नाम । म्हणा रामकृष्ण वेळोवेळा ॥२॥*

*(३१)...ॐकार आणि नाम*

*निर्गुणवाचक असे ॐकार । सगुण साचार रामकृष्ण ॥१॥*

*सगुण निर्गुण दोन्ही हरिरूप । मायागुण लेप तेथ नसे ॥२॥*

*ॐकार उच्चारें सर्व कर्मारंभ । कर्महि स्वयंभ ब्रह्मरूप ॥३॥*

***ज्ञानेश्वरकन्या नाम तेचि ब्रह्म ।***

***गुज हे परम निवेदित ॥४॥***

*(३२)... असो नसो भाव करो का विनोद । परी नाम छंद लागलिया ॥१॥*

*तृणाचिये राशी होता अग्निसंग । नसे आन मार्ग भस्माविण ॥२॥*

*तैसा पापालागीं नुरेचि तैं थारा । एका राधावरा स्मरलिया ॥३॥*

***ज्ञानेश्वरकन्या म्हणे सर्व सांडा ।***

***जपा रे उघडा सप्ताक्षरी ॥४॥***

*(३३)... करी मन वाणी नाममय*

*पहा शोधोनियां सर्व शास्त्रराशी । संदेह मानसीं वाटे जरी ॥१॥*

*बालकाचे हितीं माउलीचे चित्त । तैसे जाण संत दिनालागीं ॥२॥*

*कलियुगीं सार एक हरिनाम । इतर साधन दुःखमूळ ॥३॥*

*ज्ञानेश्वरकन्यासुत हे जाणोनि । करी मन वाणी नाममय ॥४॥*

*(३४).... नित्य सुखद नाम*

*नाहीं भरंवसा केव्हां पडे देह । त्वरे धरी सोय हरिनामी ।।१।।*

*नामाचिया बळें कितिक तरले । राणिवे ते केले वैकुंठीच्या ।।२।।*

***जरी तुज वाटे व्हावे नित्य सुख ।***

***तरी नित्य घोक रामकृष्ण ।।३।।***

*नसे तयाविण साधन अन्यथा । जेणें रमाकान्ता आकळशी ।।४।।*

*आगम-निगम सार एक नाम । साधनीं संभ्रम करिसी कां ।।५।।*

*ज्ञानेश्वरकन्या म्हणे एक्या नामें । अयोध्या श्रीरामें उद्धरिली ।।६।।*

*आगम-शैवागम, पांचरात्र इ. देव आणि ईश्वरसाक्षात्कारी महापुरुषांनी उपदेशिलेली शास्त्रे.*

*निगम+वेद*

*(३५) .....हृदयिं वसे सुखकंद (पद)*

*रामकृष्ण गोविंद मुरारे । रामकृष्ण गोविंद ।।धृ०।।*

*प्रेमभरें हरिनामें गातां । हृदयिं वसे सुखकंद ।।१।।*

*आत्मारामीं रंगलि वाणीं । गोष्पद हा भवबंध ।।२।।*

***अंतर बाहेर व्यापुनि सकळा । उरि उरला व्रजचंद ।।३।।***

***स्कंदरास म्हणे नामस्मरणीं । सगुणचि परमानंद ।।४।।***

*(३६)*

***साच तुझे नामीं ऐसा असे गुण ।***

***येत नारायण धांवोनियां ।।१।।***

*परी काय करुं जडलें व्यसन । विषयाधीन मन सदा ।।२।।*

*देतां तीव्र दंड चुकेल अपाय । आणिक उपाय नसे दुजा ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये दंडाची याचना । करोनियां मना नाणसी कां ।।४।।*

.........................................................................................

## ४ महिमा आळंदीचा

**(३७)...... अगाध महिमा**

**अलंकापुरीचा अगाध महिमा ।**

**नित्य पुरुषोत्तमा वास जेथें ।।१।।**

**कल्पांतीहि तया नोहेचि विनाश ।**

**अखंड अविनाश ब्रह्मरूप ।।२।।**

**सच्चित्सुखगाभा वसे ज्ञानदेव ।**

**कळिकाळ भेव नाहीं तेथें ।।३।।**

**स्कंददास म्हणे क्षेत्रीचे ते जन ।**

**नये महिमान वर्णू वाचे ।।४।।**

(३८)....सर्व तीर्थांचें माहेर

तिहीं त्रिभुवनीं । नाहीं ऐसें तीर्थ कोणी ।।१।।

जेथें प्रत्यक्ष नांदत । बाप माझा दीनानाथ ।।२।।

एका नामाच्या गजरीं । चारी मुक्ति येती करीं ।।३।।

**स्कंददासीं अलंकापुर ।**

**सर्व तीर्थांचें माहेर ।।४।।**

(३९)

क्षेत्र आळंदी वैकुंठ । ब्रह्म प्रत्यक्ष प्रगट ।।१।।

ऐसा सांडोनिया ठाव । नका फिरुं गांवोगांव ।।२।।

टाकोनियां हिरा । काय वेचितसा गारा ।।३।।

स्कंददास म्हणे जारे ।

**दर्शनमात्रें चुकती फेरे ।।४।।**

(४०).... चैतन्याची दीप्ति

आळंदीची वाट चालता पाउली । दुरिते जळाली असंख्यात ।।१।।

चैतन्याची दीप्ति पाहतां ज्ञानाबाई । गर्भवासा नाहीं येणें पुन: ।।२।।

***इंद्रायणी स्नानें कायाही चिन्मय ।***

***देहासह होय ब्रह्मरूप ॥३॥***

*जाणतां नेणतां नाहीं भेद भाव । एकसरें जीव उद्धरती ॥४॥*

*स्कंददास म्हणे सुलभ हे वाट । पाविजे वैकुंठ हेळामात्रें ॥५॥*

*(४१)..... सर्व भाग्याची उजरी*

*सर्व भाग्याची उजरी । घेतां पदरज शिरीं ॥१॥*

*ऐसे ज्याचे महिमान । ठेले वेदासिही मौन ॥२॥*

*तो हा आळंदीचा राणा । एकसरे तारि जना ॥३॥*

*स्कंददास म्हणे राही । मना तयाचिये पायीं ॥४॥*

*(४२).... संतशिरोमणी*

*संतकृपेविण न लाहेचि सुख । करिता अनेक साधनेंही ॥१॥*

*परी कलियुगी दुर्लभ ते पाय । जाणुनियां सोय दाखविली ॥२॥*

*संतशिरोमणी आळंदीवल्लभ । सेवितां सुलभ सुखप्राप्ती ॥३॥*

*ज्ञानेशजा म्हणे त्यांची पायवाट । तोचि हा प्रगट सुरतरु ॥४॥*

.................................................................................................

# ५ श्रीगुरुस्तवन

.................................................................................................

*(४३) ....सुलभ उपाय*

*सुलभ उपाय सांगतों तुम्हांसी । जरी कां हितासी इच्छितसा ॥१॥*

*नका धुंडू वनें तीर्थादिक ठाव । श्रेयचि सावेव इहीं कर्मीं ॥२॥*

***एकेचि साधनें भेटत श्रीहरी ।***

***असतां अंतरीं गुरूपाय ॥३॥***

***ज्ञानेश्वरकन्या स्वयें हरीरूपें ।***

***शिष्य हृदयीं सापें प्रगटत ॥४॥***

(४४)....... आम्हातें बंधन

मायबापाविण जाहला अनाथ । तेणें भिक्षापंथ स्वीकारावा ।।१।।

**नाहीं जया कोणी दाविणार वाट ।**

**साधन बोभाट करो तोचि ।।२।।**

आम्हां मायबाप वळला कृपाळ । श्रीगुरू स्नेहाळ दीनबंधु ।।३।।

**स्कंददास म्हणे त्याच्या आज्ञेविण ।**

**आम्हातें बंधन आन क्रिया ।।४।।**

(४५)...सांडोनियां सर्व

**सदगुरुचे पायीं जडतांचि वृत्ती ।**

**नसे तयाप्रती उणें कांहीं ।।१।।**

सर्वही सफल तयाच्या कामना । एक गुरूराणा वळलिया ।।२।।

अनंत ब्रह्मांडें जयाच्या उदरीं । हृदयमंदिरीं कृपे ज्याच्या ।।३।।

ज्ञानेशजासुत **एक गुरू भावी ।**

**सांडोनियां गोवी येर सर्व ।।४।।**

(४६)...अहंपणाचे निंबलोण

उतराई उपकारा । नाहीं तुमच्या दातारा ।।१।।

सत्य मिथ्या वस्तु दोन्ही । माये तुझिये आंगणीं ।।२।।

उरे आंगीं अहंपण । त्याचे केले निंबलोण ।।३।।

ज्ञानेशजे आतां पायीं । मौनें ठेवियेली डोई ।।४।।

(४७)....गुरूचि अनंत रूपें भासे

देवप्राप्तिलागीं गुरूची आवडी । प्राप्ती परवडी प्रेम उणा ।।१।।

ऐसे जे बोलती जाणा ते चांडाळ । न व्हावा विटाळ कधीं त्यांचा ।।२।।

गुरू आणि देव दोघांचेही ठायीं । पराभक्ति आई सांगतसे ।।३।।

ज्ञानेशजासुत श्रुत्यर्थ सांगत । गुरूचि अनंतरूपें भासे ।।४।।

(४८)

उतराई उपकारा । नाहीं तुमच्या दातारा ।।१।।
सत्यमिथ्या वस्तु दोन्ही । माये तुझिया आंगणीं ।।२।।
उरे आंगीं अहंपण । त्याचें केलें निंबलोण ।।३।।
ज्ञानेशजे आतां पायीं । मौनें ठेवियेली डोई ।।४।।
(४९)....... देव परोक्ष व श्रीगुरू अपरोक्ष
आदिअंतीं देव परोक्ष साचार । सखा गुरूवर अपरोक्ष ।।१।।
देव निजमाये मोहित जीवासी । नाशित तयासी गुरूराणा ।।२।।
अविद्ये आश्रय असे नारायण । श्रीगुरूचरण मायाश्रयी ।।३।।
ज्ञानेजासुत म्हणे **गुरुहूनि ।**
**आन पद श्रेणी कनिष्ठचि ।।४।।**
(५०)
असो महापापी भ्रूणहत्याकारी । गुरूतल्पहारी हेम चोर ।।१।।
वाळीत करोत शास्त्रें तयालागीं । श्रुतिपथ (:....:...) म्हणोनियां ।।२।।
परी क्षणभरी प्रेमळ मानसे । ध्याता हृषीकेशे संतोषिजे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या म्हणे तो पावन । कुळा उद्धरण तयाचेनि ।।४।।
(५१)...अंतर कोमळ
करूणासागर कळों आले आम्हां । पतितपावन विश्वपते ।।१।।
निघोट पातकी विप्र अजामीळ । दुर्लभ ते स्थळ तया देसी ।।२।।
तुझिया नामानें पक्षी संबोधिला । तिये गणिकेला निज ठावो ।।३।।
नेणो कैसें तुझें अंतर कोमळ । करिसी सांभाळ माझाही तूं ।।४।।
ज्ञानेश्वरकन्ये पातकी मी जरी । तुझी नये सरी कोणालागीं ।।५।।
(५२)रागादि विंदान
पोटाचिया पोरा जरी मारी माय । प्रेमळ हृदय झांकोनिया ।।१।।
वरीवरी क्रोध अंतरी कल्याण । गोपिकारमण तैसा दासा ।।२।।
अज्ञानाचा स्पर्श नाहीं या केशवा । लोभादिक भावा आतुडेना ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या आमुच्या कल्याणा । रागादि विंदाना दावितसे ।।४।।

(५३) गुरू शिरोमणी

सकल सुखाचे गुरू अधिष्ठान । संसृतिमोचन कृपासिंधू ।।१।।

वेदपुराणादौ गायिला महिमा । नसेचि उपमा द्याया कोणि ।।२।।

त्वम-औपनिषदंपक्रम्हणोनियां श्रुती । शरण्य सांगती गुरूराणा ।।३।।

गुरू शिरोमणी पांडुरंगनाथ । त्यांचे पायीं चित्त जन्मोजन्मीं ।।४।।

(५४) .... पद - २

सच्चित्सुखघन पाहि ।।धृ०।।

त्यागुनिया वनिता-सुत-वित्ता । गुरूचरणीं नत होई ।।१।।

सच्चित्सुख ०००।।

ठेवी प्रेम दृढ पायीं ।

श्रीगुरूवांचुनि आन उपायचि संसृतिमोचन नाहीं ।।२।।

सच्चित०।।

जन्म जन्म मम आई ।

अलकावतिपतिनंदिनि तव पदसेवा मजला देई ।।३।। सच्चित०।।

..............................................................................

(५५).... दाविला उपाय

जरी तुझे चित्तीं सुखाची आवडी । तरि तूं सावडी संतरज ।।१।।

न लगे वा तुज संतातें शोधणें । मायबाप खुणें दावी पाय ।।२।।

**ज्ञानेशजे आम्हा दाविला उपाय ।**

**आळंदीश पाय जीवीं धरा ।।४।।**

(५६)....हा माझा विश्वास

संतांचे चरणीं हा माझा विश्वास । वाहतील सोस माझा सर्व ।।१।।

निज लेकुरातें उपेक्षिल माता । शंका ही सर्वथा चित्तीं नये ।।२।।

आतां भय चिंता सांडोनियां सर्व । संतपायीं भाव ठेविलासे ।।३।।

संतशिरोमणी ज्ञानेशजा माय । निर्भय हा ठाय जोडलासे ।।४।।

(५७)

भूतांची ही दया भांडवल संता । परी एक चित्ता ठावे असो ।।१।।

लोखंडें परिसीं येवोनि मेळावे । तेव्हां तेणें यावे सुवर्णत्वा ।।२।।

वाहाळवोहळी गंगेतें ठाकावे । मग तेचि व्हावे क्षणमात्रें ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या संतशिरोमणी ।

**जातां पायवणी तद्रूपता ।।४।।**

(५८)

एक नारायण वळला जयासी । उणे न तयासी तिन्ही लोकीं ।।१।।

हरीचे जे दास हरीचि सारखे । संकल्पेचि पिके सर्व सिद्धी ।।२।।

तथापि निष्काम प्रेमाच्या कावडी । वाहती आवडी हरिपायीं ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या निष्कंन प्रिय । सखा मायबाप दीनालागीं ।।४।।

(५९):. . संत सेवेचे फळ

संताचिया संगें आकळतो देव । वृद्धि पावे भाव दिसेंदिस ।।१।।

वाचे लागे छंद गोविंद नामाचा । चित्ता घडे साचा ध्यान योग ।।२।।

उपदेशें होय विवेका उदय । विरक्त्यादित्रय सहज साधे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या सांगे संत सेवा । प्रथम जाणावा सोपान हा ।।४।।

(६०)

जया जो असेल प्राणाहूनि प्रिय । वश झाल्या होय वश तोही ।।१।।

सर्वहि सिद्धींचा स्वामी रमानाथ । जया सिद्धिहेत भजती त्या ।।२।।

जीवें प्राणें जो कां स्त्रियेतें विकला । स्त्रियेसवें झाला तोहि वश ।।३।।

तैसे संत देवा प्राणाहूनि प्रिय । त्यांच्या सेवे होय देव वश ।।४।।

ज्ञानेशजा माय चरणमळा । सेवितां गोपाळ पुढें उभा ।।५।।

(६१)

संतचरणाचा रज । क्षणें नाशी पापपुण्य ।।१।।

संत चरणीचें पाणी । भेटवित चक्रपाणी ।।२।।

संत चरणाची सेवा । ठायीं आणी ब्रह्मभावा ।।३।।

संत शिरोमणी माझा । पांडुरंगनाथ भजा ।।४।।

(६२).. वाचे पडले मौन

सांडी हरिपायाहूनि । पंचप्राण ओवाळुनी ।।१।।

एक कृष्णनामाविण ।

**वाचे पडलेसे मौन ।।२।।**

**सृष्टीं हारपला भेद ।**

**भासे सर्वत्र गोविंद ।।३।।**

ऐशा वैष्णवांचे पायीं । सदा राहो माझी डोई ।।४।।(६३)

संतांचें हृदय लोण्याहुनि मऊ । निरसिती भवू कृपायोगें ।।१।।

स्वयें तरूनियां दुस्तर भवाब्धि । दीनांची उपाधि निवारिती ।।२।।

ठेवोनियां तीरीं हरिनामनौका । पाववी भावुका पैलतीरी ।।३।।

भक्तकामकल्पद्रुम नारायण । स्मरतांचि जाण धांवतसे ।।४।।

**ज्ञानेश्वरकन्या निष्काम दयालु ।**

**होय अळुमाळु दासप्रेमें ।।५।।**

(६४)...... संतांचे स्वरूप

**आम्ही संत म्हणू तया ।**

**अवघी देवावरी माया ।।१।।**

**इतरांची नाहीं आशा ।**

**वांचोनियां जगदीशा ।।२।।**

भोगमोक्षा हाणी लाथा । प्रेमें वासुदेव गातां ।।३।।

ज्ञानेश्वरकन्यासुत । ऐशा संता शरणागत ।।४।।

(६५)ज्ञाने**श्वरकन्या विशेष चेतन ।**

**देव तो निर्गुण संत ते सगुण ।**

***सगुण निर्गुण एकरूप ।।१।।***

*परब्रह्माचिये ठायीं भेदभाव । उपाधि सावेव दावितसे ।।२।।*

*तोचि **औपाधिक भेद** द्विधा जाण । विशेष,सामान्य-रूप असे ।।३।।*

*सामान्यस्वरूपें जगासी आधार । विशेष साचार निवर्तक ।।४।।*

*शुक्तिचिये ठायीं इदमंशाकार । साधक निर्धार रजत भ्रमा ।।५।।*

*विशेष धर्माची आलिया प्रतीती । रजत निवृत्ति होय तेव्हां ।।६।।*

*जगदध्यारोपा ईश्वर आधार । संत करुणाकर निवर्तक ।।७।।*

***ज्ञानेश्वरकन्या विशेष चेतन ।***

***उद्धरित जन हेळामात्रें ।।८।।***

*(६६)*

*वस्तुगुण वस्तुठायीं । नसतां मोल नये कांहीं ।।१।।*

*हिंगा दुर्गंधीचे मोल । नातरी कोण पुसे फोल ।।२।।*

*तैसें नाहीं संतपण । उघडी ते नागवण ।।३।।*

*स्कंददास म्हणें गुणें । मोल चढतसे सोनें ।।४।।*

*(६७) ...... दुर्जनाचा संग*

*शेणाचिया स्पर्शें भरतसे अंग । सोनियाचा डाग स्पर्श न लगे ।।१।।*

*तैसे **दुष्टसंगें मलीन अंतर ।***

***व्हावया उशीर न लगे कांहीं ।।२।।***

***म्हणोनियां संत संगति साधावी ।***

***तरीच लाधावी हरि प्राप्ती ।।३।।***

***स्कंददास म्हणे अपानाचा गंध ।***

***जाणावा संबंध दुर्जनाचा ।।४।।***

........................................................................................................

## ५. संतपर

........................................................................................................

(६८) ...... विनवणी

संत मायबाप कृपावंत । जोडोनिया विनवि दोन्ही हात ।

दावा मज अनाथांचा नाथ । ज्याची कीर्ति गातां तुम्ही नित्य ॥१॥

सांगा जाऊं मी कवणिया वाटे । नाहीं मज ठावा एकहि मार्ग नेटे ।

जातो तया मारगी गोटे काटे । **जेथें तेथें हा अहंभाव दाटे ॥२॥**

तोडा माझा एवढा हा भवबंध । दृष्टि दावा सगुण परमानंद ।

शुकादिका लागला ज्याचा छंद । तुम्हाविण शास्त्रांत पडला वाद ॥३॥

स्कंददास शरणागत पायीं ।

**तुम्हाविण आसरा दुजा नाहीं ।**

मायबापबहिण गुरू आई । ज्ञानेशजे तूंचि लोकी तिहीं ॥४॥

(६९)

तुम्हा संतजना करी विनवणी । मस्तक चरणीं ठेवूनिया ॥१॥

दीन दुर्बळाची करोनिया कींव । द्यावी मज ठेव हरिप्रेमा ॥२॥

घालोनियां भीड विनवावें देवा । नका या केशवा दूर करू॥३॥

स्कंददास म्हणे तुमचिया बोले । बहुतां तारिले दीनानाथें ॥४॥

(७०)

तुम्ही संतजन कृपेचे सागर । करा अंगीकार दुर्बळाचा ॥१॥

असती बहुत माझ्या आंगीं दोष । उघड मनास करुनी सांगा ॥२॥

कराल उपेक्षा राहोनि दुश्चित्त । भिता होय घात सर्वस्वेचि ॥३॥

स्कंददास म्हणे अनाथाची कींव । करोनी आठव द्यावा देवा ॥४॥

७१)

पिकलिया फळ सोडितसे देंठ । वारियाची भेट होता क्षणीं ॥१॥

नये तो जोडिता मागुते वृक्षासी । कारण ययासी योग्यता ती ॥२॥

तैसे **जया आंगीं बाणले वैराग्य ।**

**परमार्थी भाग्यवंत तोचि ॥३॥**

पुढल्या पाऊली मागील ती वाट । सांडावीच नीट जाणोनियां ।।४।।
स्कंददास म्हणे संग्रामीं मिळता । फजिती मागुता पाय घेता ।।५।।
(७२)
संताचे उच्छिष्ट लाधले जयासी । वंदिती तयासी ब्रह्मादिक ।।१।।
संतचरणरज प्रेमें घेतो शिरीं । त्याचे घरीं हरी पाणी वाहे ।।२।।
संताचा पोसणा तिहीं लोकीं वंद्य । कुळयाति निंद्य पावन ते ।।३।।
म्हणोनिायं संत पायीचा पायिक । फिके ब्रह्मसुख तयापुढें ।।४।।
स्कंददास म्हणे तुम्ही कृपा करा । मग सुखें घरा येईल हरी ।।५।।
(७३)
ज्याची मायबापें त्रिभुवनपति । तयासी विपत्ति अन्नाचीच ।।१।।
समर्थाची कांता हिंडे दारोदारीं । न मिळे भाकरी म्हणोनियां ।।२।।
राजयाचा पुत्र सेवकाची सत्ता । याहोनि कोणता नवलावो ।।३।।
स्कंददास म्हणे जगाच्या जीवना । काय नारायणा बोलो आतां ।।४।।
(७४)
घातलासे भार । तुम्हा पायीं म्या साचार ।।१।।
आतां मज सरते करा । माथां करा ठेवोनी ।।२।।
निरवावें देवापायीं । भाकोनि करुणा कांही ।।३।।
तुम्ही दीनाचे कैवारी । ग्वाही थोरी पुराणीं ।।४।।
स्कंददास कर जोडून । घाली संता लोटांगण ।।५।।
(७५) ...हरिनाम
गाढ वीर ते वैष्णव । देशधडी केला भव ।।१।।
धैर्यमेरु आरुढले । शांति निशाण खोविले ।।२।।
आंगीं वैराग्य कवच । भावबळ पद साच ।।३।।
प्राण गुणीं तो लाविला । हरिनाम बाण भला ।।४।।
स्कंददासप्रभु नाम । ऐकतांचि पळे यम ।।५।।

(७६)....संतनिंदा

उत्कंठित चित्त हृदि भेटवाया । तरी संत पायां मिठी घाली ।।१।।

नातरी तयासी दुरोनिया वंदा ।

**करुं नये निंदा स्वयें वाचा ।।२।।**

कोटी ब्रह्महत्या घडल्या तयासी । जो संतनिंदेसी प्रवर्तला ।।३।।

स्कंददासप्रभु संतांचा पाईक । कोण तेथ लेख इतराते ।।४।।

(७७)..... संतलक्षण

हेचिं संतांचे लक्षण । देवापायीं तनमन ।।१।।

पाळी निगम-मर्यादा । वाचे आळवी गोविंदा ।।२।।

**भोगासाठीं कोणा कष्ट ।**

**नेदी जाणोनी वैकुंठ ।।३।।**

माझी ज्ञानेशजा झाली । विश्वकोंभासी सावली ।।४।।

(७८)

आम्हां मायबाप सोयरे सांगाती । संतकृपामूर्ति आन नाही ।।१।।

**नसे कांहीं आम्हां आनासवें चाड ।**

**प्रेमरस गोड घेऊं नामीं ।।२।।**

**विश्वीं विश्वंभर व्यापोनी भरला ।**

पोशितो जगाला तोचि एक ।।३।।

स्कंददास म्हणे ज्याची आम्हां चाड । पुरवितो लाड तोचि सर्व ।।४।।

**(७९).... शुद्ध वाट**

**अमृत-पान-योग**

**स्वयें असोनियां कलंकरहित ।**

**इच्छितातो संत मानहानि ।।१।।**

**नसतेचि दोष दाऊनियां आंगीं ।**

**निंदेचेनि संगीं संतोषती ।।२।।**

***सांडोनियां शुद्ध संताची हे वाट ।***

***करी खटपट मानासाठी ।।३।।***

***साचपणें आंगी असतांही दोष ।***

***विदित लोकांस होऊं नेदी ।।४।।***

*स्कंददास म्हणे पुढें विटंबना ।*

*यमाची यातना साहणें लागे ।।५।।*

*(८०)*

*जलाचिया आंगी स्वाभाविक गुण । द्यावे जीवदान तृषितातें ।।१।।*

*परी नेदी सुख तृषितावांचुनी । नाहीं इच्छा मनीं म्हणोनियां ।।२।।*

*तैसे संतजन सर्वदा सादर । कराया उद्धार दीनजन ।।३।।*

*ज्ञानेजापायीं व्हावी अनन्यता । तरीच ये हातां मोक्षफळ ।।४।।*

*(८१)*

*पुत्र प्रेमाचिया पोटीं । माता साहे दोषकोटी ।।१।।*

*परी मागे रतिदान । तरी न करी सहन ।।२।।*

*तैसे जाणा संतजन । मना नाणिती दुर्गुण ।।३।।*

*परी* ***ज्ञानेशजा आई ।***

***आज्ञाभंगी दंड देई ।।४।।***

*(८२)......संत हे अवतारच*

*गंगा म्हणो नये जळ । वृक्ष नोहे तो पिंपळ ।।१।।*

*हिरा नोहे गारगोटी । नोहे पिशाच धूर्जटी ।।२।।*

*येरा मानवासमान । मानूं नये संतजन ।।३।।*

*माझी ज्ञानेशजा माय । नोहे त्रिगुणाचें कार्य ।।४।।*

*(८३).....संतसंग केव्हा करावा?*

*जंव नाहीं आंगीं बाणला विराग । तंव संतसंग करूं नये ।।१।।*

*जंव नेणें कैसी पाकाची निष्पत्ति । तंव आहे भीति अग्निसंगें ।।२।।*

खादलिया अन्न वाचवील प्राण । परी व्हावी जाण भूक आधीं ।।३।।

स्कंददास म्हणे पाविजे तो ठेवा । संत मनोभावा बोळगिल्या ।।४।।

(८४).... देवभक्त ऐक्य

भोगावया निज सुख । आपणचि देव भक्त ।।१।।

नसे येथें दुजा भाव । भक्त तोचि रमाधव ।।२।।

ऐसी असे चेंडुफळी । एक प्रेमाची नव्हाळी ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये आम्हां । अणु भिदा सांपडे ना ।।४।।

(८५)..... भक्तांची स्थिति

विषयचि ज्यांना भासे नारायण । नावडे धन जन माता पिता ।।१।।

वळली इंद्रियें विषयापासोनी । वाचा नामगुणीं पांगुळली ।।२।।

अखंड खेळत मागें पुढें हरी । संसार बोहरी करोनियां ।।३।।

**ज्ञानेश्वरकन्या प्रगटता ध्यानीं ।**

**विषयावांचोनि ब्रह्मसुख ।।४।।**

(८६)......संतसेवा हा दारवंठा

**संतसेवेविण ।**

**काय वेदान्त वाचोन ।।१।।**

शिकविले बोले बोल । तेचि वाटे त्या अमोल ।।२।।

लोहाराचा भाता । घडी भरे घडी रिता ।।३।।

स्कंददास म्हणे सेवा । दारवंठा अनुभवा ।।४।।

.............................................................................................

# ६. करुणा कल्लोळ

.............................................................................................

(८७)

तेरा वर्षे काळ कंठियेला वनीं । परी चक्रपाणी न सांडिती ।।१।। पांडव

नानापरी छळ करिताही पिता । परी कृष्णनाथा न सोडीच ।।२।। प्रह्लाद

त्रैलोक्याधिपती जोडुनिया सखा । जवळी न पैका विष खाया ।।३।।
ऐसिया दारिद्र्ये पिडीयेला भारि । परी नाहि हरी दूर केला ।।४।। सुदामा
स्कंददास म्हणे ज्ञानेशजे आई । ऐसे प्रेम देई मज लागीं ।।५।।
(८८)
आन समजावी परी । बाळ माते हाका मारी ।।१।।
भूमीं उदक कां थोडे । चातक पाहे मेघाकडे ।।२।।
कूर्मीचिया दृष्टिविण । नाहीं पिलिया जीवन ।।३।।
ज्ञानेशजे मीहि तैसा । पाहे कृपेचा कोंवसा ।।४।।
(८९)
नाहीं कोणी ठाव ऐसा । काळफासा चुकेल ।।१।।
येर सारे अमंगळे । चरणकमळें सोडोनी ।।२।।
आहे तुझे कृपेधीन । वायां आन साधनें ।।३।।
स्कंददास म्हणे काय । सांगा उपाय करू तो ।।४।।
(९०)
तूंचि करी माझ्या दु:खाचा शेवट । चालवेना वाट निजबळें ।।१।।
आकळेना मार्ग न होय साधन । आवरेना मन विषयलोभी ।।२।।
ऐशिया काचणीं जाऊं पाहे काळ । वाटे तळमळ म्हणोनियां ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये माझी विनवणी । तुजविण आणी कोण मना ।।४।।
(९१)
उदाराची राशी । म्हणोनि आलो पायापाशीं ।।१।।
**आतां अंगीकार करी ।**
**माझा म्हणोनी श्रीहरी ।।२।।**
दयेचा सागर । कीर्ति ऐकिली म्यां थोर ।।३।।
आतां धरोनी उदास । माझी न करी निरास ।।४।।
ज्ञानेशजे मायबाई । स्कंददासा ठेवी पायीं ।।५।।

*(९२)*

*कासया मी भार बाहूं जाणिवेचा । राणा उदाराचा कृपा त्याची ।।१।।*

*आज्ञेचा पायिक जाहलो निश्चिंत । नेदी जावो चित्त कोणीकडे ।।२।।*

*आपुला म्हणोनी घेतलें पदरीं । दीनाचा कैवारी मायबाप ।।३।।*

***ज्ञानेशजा माझी औदार्याची राशी ।***

***सर्वही तियेसी भार माझा ।।४।।***

*(९३)*

*अव्यंग बालक असता मातेसी । निश्चिंती आपैसी वाटे थोडी ।।१।।*

*असलिया व्यंग कटी खांदी वाहे । जोजार ते साहे सर्व त्याचा ।।२।।*

*तैशापरी आम्ही कमाईचे हीन । केलासी जाणोनी अंगीकार ।।३।।*

*ज्ञानेशजा माते सर्व माझी चिंता । न करी परता पायाहूनि ।।४।।*

*(९४)*

*दृढ इंद्रियाचे ओढी । मन नेघे पायीं गोडी ।।१।।*

*ऐसा झालो पराधीन । तुझे सुटोनी चिंतन ।।२।।*

*पूर्वसंचित दुस्तर । पळ राहो नेदी स्थिर ।।३।।*

*अंबे ज्ञानेशनंदिनी । माझी न करी सांडणी ।।४।।*

*(९५)*

***केव्हां आतां पुनः दाविसील डोळा ।***

***पाऊले दयाळा मजलागीं ।।१।।***

*अपराधी अन्यायी दुष्ट दुराचारी । प्रेमाचा अंतरीं ठाव नाहीं ।।२।।*

*विषयीं लंपट साधनीं आळस । चित्तीं मोहपाश अनिवार ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये आहे विसंबोनी । नेसी सांभाळोनी म्हणोनियां ।।४।।*

*(९६)*

*नाहीं मज थारा । तुजविण गा दातारा ।।१।।*

*बाळकाचा भार । नोहे मातेसी जोजार ।।२।।*

*तैशापरी देवा । माझा सांभाळ करावा ।।३।।*

*ज्ञानेशजासुता । पायीं ठेवा ज्ञाननाथा ।।४।।*

*(९७)*

*तुझा दास म्हणवोनी । पोट भरी चक्रपाणी ।।१।।*

*हे तो तुम्हासीच उणें । वागवितां ऐसें जिणें ।।२।।*

*तुम्हा समर्थाचे सेवे । राहोनिया हीन दैवें ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये करी । तुझ्या प्रेमार्थ चाकरी ।।४।।*

*(९८)*

*पोटचिया बाळा मागता स्तनासी । काय असे त्यासी काळवेळ ।।१।।*

*आळी देखोनियां घेत उचलोनी । प्रेमें बुझावोनी स्तन्य पाजी ।।२।।*

*जननीची ऐसी रीति दिसे जनीं । विपरीत करणी तुमची देवा ।।३।।*

*ज्ञानेजासुत म्हणे व्रजपाळा । बोबडिया बोला चित्त द्यावे ।।४।।*

***(९९)***

***जन्म जन्म संतभेटी । नाम ओठीं सर्वदा ।।१।।***

***द्यावे मज प्रेमदान । नको आन कांहींहि ।।२।।***

***नका करुं पायापरता । श्री अनंता दयाळो ।।३।।***

***ज्ञानेशजे सुत म्हणे । आम्हां देणें इतुकें ।।४।।***

*(१००)*:.. ***नसो विषयाचे भान***

*स्वीकारिसी याचि आशे । अखंडित नामपिसें ।।१।।*

*नको उरो देऊ उरी । राहो चित्त ज्ञानेश्वरीं ।।२।।*

*सर्व विश्व गुरुमय । भासो सृष्टि सुखमय ।।३।।*

***ज्ञानेश्वरजे तुझ्याविण ।***

***नसो विषयाचे भान ।।४।।***

*(१०१)*

*वायां गेलों आहे । परी तुझी वास पाहे ।।१।।*

तूं कनवाळू कृपाळू । माझा करी वो सांभाळु ।।२।।

अनाथाच्या नाथा । मायबापा कृपावंता ।।३।।

स्कंददासाची आर्ती । ज्ञानेशजे धरी चित्तीं ।।४।।

(१०२)

अनंत ब्रह्मांडें उदरीं । तुम्ही सामाविलीं हरि ।।१।।

भक्त अपराधाच्या कोटी । घातल्या त्वां निजपोटीं ।।२।।

तरि वाड पोट तुझे । माझे दोषाचे न ओझे ।।३।।

ज्ञानेशजे दयासिंधो । पोटीं घाली आर्तबंधो ।।४।।

(१०३)... **येतो काकुळती**

पायीं येतो काकुळती । माझी परीसा विनंती ।।१।।

आतां चित्तीं कुकल्पना । येवो नेदी नारायणा ।।२।।

माझा न चले उपाय । म्हणोनियां भाकी कींव ।।३।।

ज्ञानेशजे निजसत्ता । भवपार करी आतां ।।४।।

(१०४)

नावरसी निज पोरा । मज दोष देसी बरा ।।१।।

काय म्हणावें ययासीं । तुम्हा थोरां आम्ही दासी ।।२।।

न्याय मागो कोणापाशीं । समर्थ तूं एक होसी ।।३।।

ज्ञानेशजे तुझे मनीं । काय न येचि कळोनी ।।४।।

(१०५ : पद)

अंबे! दे मजला स्तनपान ।।धृ०।।

करिमुख षण्मुख याहुनि माते । बालक मी तंव सान ।।१।।

कडिये बैसुनि लेखित अवघे । ब्रह्मांड तृणसमान ।।२।।

त्वत्स्वरूप स्त्रीमात्र मी पाहीन । ऐसे हो कृपादान ।।३।।

स्कंददास म्हणे ओसंगा घेई । नातरी शिवाची आण ।।४।।

(१०६ पद)

शेवट गोड करा । प्रभुजी ।।धृ०।।

मम कोटी अन्याय न गणुनी । दुर्गती पथ वारा ।।१।।

मृत्युसमयीं यमदूताच्या । वोपी मज न करा ।।२।।

आठव देऊनि अंतरीं अपुला । माया मोह हरा ।।३।।

ज्ञानेश्वरजे स्कंददास हा । उनाड तनुज खरा ।।४।।

(१०७)

विद्याहीन बाळ न सोडी मातेसी । खेळे तिजपाशीं सर्वकाळ ।।१।।

तैसे माझें मन वसो तुझे पायीं । सांडुनि सर्वहि वायफळ ।।२।।

**तुज टाकोनियां वाटे समाधान ।**

**ऐसे विद्याधन नको मज ।।३।।**

तुजविण यावा सर्वांचा कंटाळा । ज्ञानेशजा लळा पाळावा हा ।।४।।

(१०८ पद)

ये मेरो निर्धार ।।धृ०।।

तुमहि ब्रह्मा तुमहि विष्णु । तुम कारण संहार ।।१।।

तुमहि गनेस तुमहि सरसई । तुम चिच्छक्ति अपार ।।२।।

तुमहि यदुवर तुमहि गोपी । तुमहि आलंदिविहार ।।३।।

ज्ञानेश्वरजे स्कंददासको । करहु भवमही पार ।।४।।

(१०९)

घडी घडी तुझा पडतो विसर । कोणता विचार करूं यासी ।।१।।

आठव विसर दोन्ही तुझे हातीं । उपाय श्रीपति न चले माझा ।।२।।

दयासिंधु तुम्ही येवूं द्यावी कींव । अंतरीचा भाव जाणोनियां ।।३।।

स्कंददास म्हणे न व्हावे निष्ठुर । पतन हे घोर दिसे पुढे ।।४।।

(११०)

नागविलो हिता । केलीं पापें न सांगता ।।१।।

करितो निवेदन । तरीं तुटते बंधन ।।२।।

तळमळे जीव । कांहीं न चले उपाय ।।३।।

केले होते गेले । तंव संनिधीहि भले ।।४।।

तुंवा सुचविले । मूढा मज नुमगले ।।५।।

ज्ञानेशजे करी । तुज उचित ज्यापरी ।।६।।

(१११)

वाटेल तो दंड करी । परी उपेक्षा नादरी ।।१।।

हेचि एक तुझ्या पायी । मागे ठेवोनियां डोई ।।२।।

तुझे पोटीचें लेकरुं । नको माते दूर धरुं ।।३।।

असे अखंड नेणता । परी सांभाळावे आतां ।।४।।

ज्ञानेशजे अंगीकारी । दीन पतित भिकारी ।।५।।

(११२)

कां हो केली सांडणी । मायबापा चक्रपाणी ।।१।।

जळ सांडी जळचरा । त्यासी कोण दुजा थारा ।।२।।

मायेविण जिणें । बाळकाचे दीनवाणें ।।३।।

ज्ञानेशजे मायबाई । तुम्हा सांगावे ते काई ।।४।।

(११३ पद)

माझी आस जडली तव पायीं ।।धृ०।।

विद्या वय शील नाहीं कोणी गुण । वश होतील फणिशाई ।।१।।

भाव पाहुनि धांव घेशि परीं । तोहि ठाव मज नाहीं ।।२।।

ऐसा साधनहीन बैसलों । संकोचुनि निजठायीं ।।३।।

ज्ञानेश्वरजासुत मी प्रभुजी । कुळ पाहुनियां येई ।।४।।

(११४)

नको पाहूं प्रेम । मी तो पातकी अधम ।।१।।

बाळ निज सुख भोगी । हाका मारी माते लागीं ।।२।।

**जो जो पुरविशी काम ।**

***तो तो वाटे तुझा प्रेम ।।३।।***

***दुःखकाळीं सर्व आटे ।***

***मनीं विषाद तो थाटे ।।४।।***

*(११५)*

*देतां मी टाकोन । यासी सांभाळील कोण ।।१।।*

*ऐसे विचारी वो माते । ज्ञानेशजे कृपावंते ।।२।।*

*माझा म्हणोनियां जीवें । कोणें मज संगोपावें ।।३।।*

*स्कंददास म्हणे केले । नको पाहूं वो स्नेहाळे ।।४।।*

*(११६)*

*कार्य साधाया पुरती । दावी वरी वरी प्रीती ।।१।।*

*अंतरीं तो अविश्वासी । सूतकी मी पापराशी ।।२।।*

*तुझ्या पडलों पदरीं । याची लाज असो हरि ।।३।।*

*करुं नयेचि वंचना । मजविषीं नारायणा ।।४।।*

*ज्ञानेशजे तुझी कीर्ती । चार सहा अठरा गाती ।।५।।*

*(११७)*

*कां गा ऐसा माझ्या लागला पाठीसी । नेदी या चित्तासी स्थीर राहो ।।*

*घडीभरी स्थिर करोनिया मन । नामाचें स्मरण करी जंव ।।२।।*

*तंव ते सुटोनी नामाचें चिंतन । विषयाचे ध्यान भासो लागे ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्या आहे मी दुर्बळ । आवरी हे खळ मन माझें ।।४।।*

*(११८)*

*विषयापासोनी पारूषेल चित्त । होऊनि आसक्त राहे पायीं ।।१।।*

*अनंत जन्मीचे विसरोनी दुःख । पाय तहानभूक सर्व माझी ।।२।।*

*ऐसे तें रुपडे दावी मज डोळा । गोपिकासी लळा नित्य ज्याचा ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये तोडी माझा बंध । लावोनियां छंद निज-नामीं ।।४।।*

*(११९)*

पातकी पातकी । श्रद्धाहीन मी सूतकी ।।१।।
नाहीं बोलाया वदन । करुं क्षमेचे याचन ।।२।।
आहे परी निलाजरा । राखा पायापें किंकरा ।।३।।
अंबे ज्ञानेशनंदिनी । नको करुं ब्रीद हानि ।।४।।

(१२०)

समर्थासी नातें जोडलियावरी । तया लोकाचारी भेव असे ।।१।।
तयासवें लागे समर्थासी बोल । दुर्गुणाचा मळ दिसलिया ।।२।।
म्हणोनी समय राखाया ब्रीदासी । सांभाळी तयासी सर्व भावे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये म्हणवितो दास । धरिता उदास योग्य नोहे ।।४।।

(१२१)

समर्थ म्हणोनी बाहतो गा तुज । नाहीं तरी काज काय होते ।।१।।
मायेचा नियंता वृत्तीचा चालक । वाहतसे धाक काळ तुझा ।।२।।
आम्हा ठायीं तंव सर्व विपरीत । अनाथाचा नाथ ब्रीद तुझे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये पाहे तुझी वास । न करी निरास मायबाई ।।४।।

(१२२)

अज्ञानी बालक नेणे हिताहिता । माय करी चिंता सर्व त्याची ।।१।।
भूमीचे उदक न सेवी चातक । पुरवी आळुक मेघ त्याची ।।२।।
तैसे आम्ही सर्व सांडोनी साधन । केलेसे प्रमाण तुज लागीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये करशी सांभाळ । कंठीतसे काळ विश्वासे या ।।४।।

(१२३)

दीनाचा दयाळु मनाचा मवाळु । भक्त प्रतिपाळु ब्रीद तुझे ।।१।।
आला शरणागत तारिला अभिमानें । देताती पुराणें साक्ष ऐसी ।।२।।
जाणेनियां थोरी विश्वासला जीव । करिसील कीव म्हणोनियां ।।३।।
ज्ञानेशजे नखशिखान्त अन्यायी । कृपावंत आई तूं गे माये ।।४।।

(१२४)आला तो तो उद्धरिला । नाहीं कोणी मोकलिला ।।१।।

होसी दीनाचा कैवारी । म्हणोनियां आलो द्वारीं ।।२।।
मज एका मोकलिता । नाशे लौकिक असता ।।३।।
सखे ज्ञानेशनंदिनी । करी साजे ते करणी ।।४।।
(१२५)
तुझा म्हणोनियां शेखीं । मात श्रुत झाली लोकीं ।।१।।
आतां आपुले राखावे । ब्रीद तुम्ही देवदेवें ।।२।।
मज एका मोकलिता । नाशे लौकिक असता ।।३।।
सखे ज्ञानेश्वर बाळे । मज सांभाळी स्नेहाळे ।।४।।
(१२६)
बहु केली विनवणी । नये मनीं तुमचिया ।।१।।
बळिवंत कर्मरेषा । हृषीकेशा तुजहुनी ।।२।।
आयिकला बडीवार । मिथ्या साचार हो पाहे ।।३।।
स्कंददास म्हणे करा । उद्धार दातारा ब्रीदाचा ।।४।।
(१२७)
बाळ केलिया अन्याय । जीवे मारुं नेणे माय ।।१।।
प्रेमें अथवा भयें । लावी सुपंथे ती स्वये ।।२।।
तैसे करा नारायणा । नका मोकलूं या दीना ।।३।।
सखे ज्ञानेशजे आई । अंकिताचे दोष साही ।।४।।
(१२८)
बहुतांच्या साठीं केलेसी धांवणें । माझिया कारणें कृपा नये ।।१।।
दयेचा सागर गेलासे सुकून । पडला मोडोन कल्पवृक्ष ।।२।।
भक्त कामधेनु सकळा फळली । माझिया आटली दैवगुणें ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये नको करुं मन । एवढे कठीण बाळावरी ।।४।।
(१२९)
बहु जिवित अस्थिर । नये धीर यासाठीं ।।१।।

*भक्ति केला व्यवसाय । दिसे अपाय मुद्दलीं ।।२।।*

*निजबळें अंगीकार । तोहि विचार दिसेना ।।३।।*

*सखे ज्ञानेशनंदिनी । नाहीं कोणी कमाई ।।४।।*

*(१३०)*

*नये माझी सेवा मना । कळो आलें नारायणा ।।१।।*

*तरीच हे घडोघडी । पायीं पडे मोहबेडी ।।२।।*

*माझें अनावर मन । वरी निर्मिता बंधन ।।३।।*

*ज्ञानेशजे मायबाई । बोल लागे तुझे पायीं ।।४।।*

*(१३१)*

*नाहीं चांगाचाचि केला प्रतिपाळ । पापी अजामिळ उद्धरिला ।।१।।*

*नाहीं भक्तिबळ पाहिलासी भाव । आली तुज कींव नाम घेतां ।।२।।*

*जड त्याही जळीं तारियेल्या शिळा । प्रताप आगळा नामाचा तो ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये झालीस कठीण । नेणो कोण दुर्गुण बळिया माझा ।।४।।*

*(१३२)*

***नाहीं तुझे पायीं प्रेम जया आंगीं ।***

***तयाचिया संगीं ठेवूं नको ।।१।।***

*बरा तयाहूनि पडतां निर्जनीं । तुझीया स्मरणीं आनंदानें ।।२।।*

*शुक्लपक्षीचिया चंद्रकलेसम । वाढवितां प्रेम संग देई ।।३।।*

*ज्ञानेशजे नेदी लक्ष विनवणी । ज्ञानेशजननी आण तुज ।।४।।*

*(१३३)*

*कासया ठेविला । देहीं आळस हा भला ।।१।।*

*घडीभरी नेदीं करुं । प्रेमें नामाचा गजरु ।।२।।*

*निद्रे नागविलें । कोणी उपाय न चले ।।३।।*

*ज्ञानेशजे मायबाई । माझे हिताहित पाही ।।४।।*

*(१३४)*

*पतित म्हणोनी आलो शरणागत । पावन पतित तुम्ही देवा ।।१।।*

*वैरियाहीं देसी निजपदठाव । ऐसी तुझी माव कळो आली ।।२।।*

*आळंदीच्या राया येतो काकुळती । तुजविण विश्रांती नाहीं नाहीं ।।३।।*

*ज्ञानेशजासुता द्यावा पदीं थार । ब्रीदाचा तोडर राखावया ।।४।।*

*(१३५)*

*बहु अपराधी । माझी आहे हीन बुद्धी ।।१।।*

*मज सांभाळा सांभाळा । कृपें आपुल्या स्नेहाळा ।।२।।*

*लाविलिया ळळा । आतां कापूं नये गळा ।।३।।*

*ज्ञानेशजे विनवणी । वारंवार हें चरणीं ।।४।।*

*(१३६)*

*लाविलिया सवे । आतां मियां कोठें जावें ।।१।।*

*भवसागरीं बुडता । कोण करील परता ।।२।।*

*जाणोनियां अवगुणी । मज नांगिकारी कोणी ।।३।।*

*ज्ञानेशजे गेलों वाया । तरी बोल लागे पायां ।।४।।*

*(१३७)*

*कांहीं करमेनासे झालें । कधीं देखेन पाउलें ।।१।।*

*मज गोड न लगे कांहि । झाली शरीराची लाहि ।।२।।*

*जातां वेगे धांव घाली । धरुनी पोटासी कोंभाळी ।।३।।*

*ज्ञानेशजे पायभेटी । जीव कासाविस पोटी ।।४।।*

*(१३८)*

*केल्यावरी अंगीकार । आतां कायसा विचार ।।१।।*

*आहे अवगुणी । हे कां तुम्ही नेणा मनीं ।।२।।*

*आतां राखावा लौकिक । घालोनियां प्रेमभीक ।।३।।*

*ज्ञानेशजे तुझी थोरी । गाती निगम ते चारी ।।४।।*

*(१३९)*

नलगे बाळका माते विनवावे । मज सांभाळावे म्हणोनिया ।।१।।
स्वभावे तियेचा वाहे प्रेमझरा । घालीत पाखरा वेळोवेळा ।।२।।
मातेचा स्वभाव सांडियेला तुम्ही । करतां विनवणी कृपा नये ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये तुझे मी नेणते । वाहतसे आर्ते दृष्टीचिया ।।४।।
(१४०)
वारंवार तेचि करी विनवणी । शेखी कंटाळवणी वाटे जरी ।।१।।
तरी मियां कैसें करावे जी सांगा । न येता उपेगा बोल माझे ।।२।।
नित्य नवी नवी रसिक वचनें । तुझ्या कृपेविणें न सुचती ।।३।।
ज्ञानेशजे माझी आरूषवचनें । निर्धनाचे लेणें लेई प्रेमें ।।४।।
(१४१)
**वचना पाठीमोरे होती ।**
**हे तो अधमाची रीती ।।१।।**
तैसे तुम्ही नव्हा जाणा । निश्चय हा नारायणा ।।२।।
पाळीसी वचन । अन्यथा हे नोहे जाण ।।३।।
काय करुं अधीर मन । चित्तीं नुपजे समाधान ।।४।।
ज्ञानेशजे उपजे धीर । ऐसा करी अंगीकार ।।५।।
(१४२)
दास म्हणवितो भोगावया भोग । कोण अंतरंग जाणे माझे ।।१।।
भाविक हे जन न पाहती दोष । कल्पोनियां वास तुझा तेथें ।।२।।
तयांचा विश्वास कराया जतन । तरी कृपादान करा कांहीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये ब्रीद सांभाळिले । जारा उद्धरिले तैसे करी ।।४।।
(१४३)
केली सोंगसंपादणी । त्यासी नेले उद्धरोनी ।।१।।
खळ कपटी दुर्जन । ठेवी वैकुंठी नेऊन ।।२।।
ऐसी तुझी ब्रीदावळी । नको सांडू ती ये वेळीं ।।३।।

ज्ञानेशजा असे खळ । कृपें करी तूं निर्मळ ।।४।।

(१४४)

दासां लागूं नये वारा । म्हणोनि आलासी आकारा ।।१।।

तरी कां लाविली समाधी । आम्हा लोटोनियां द्वंद्वीं ।।२।।

जाईल हा वायां । बडीवार ज्ञानराया ।।३।।

ज्ञानेशजासुत म्हणे । लौकिकासी सांभाळणें ।।४।।

(१४५)

शिकवले बोल बोलतसे शुक । अर्थासी ओळख नेणें कांहीं ।।१।।

साखरेची गोणी बैलाचियेपाठीं । चविची ते तुष्टी आंगीं नाहीं ।।२।।

नोहे माझे बोल खडकीं वर्षाव । अंतरीं ओलीव तीळ नाहीं ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये हें तो लाजिरवाणें । समर्थाचें तान्हे बिदीं खेळे ।।४।।

(१४६)

वैरियाही देतां ठाव । नाहीं पाहिलासी भाव ।।१।।

ऐसा कृपेचा कोंवसा । जनीं वनीं तुझा ठसा ।।२।।

आतां माझियाचि वेळे । काय झालें तें न कळे ।।३।।

ज्ञानेशजे माझे आई । वोरसोनि धांव घेई ।।४।।

(१४७)

आज्ञाभंगभयें । चित्त कासाविस होये ।।१।।

करी तैसें मना । येई कींव कळे जाणा ।।२।।

संकोचतो जीव । नेणें पाविजे तो ठाव ।।३।।

ज्ञानेशजे वाट । दावी तुज पावे नीट ।।४।।

(१४८)

कळोनिया नये । कोण चुकी घडताहे ।।१।।

तुम्ही धरियेले मौन । माझे तळमळे मन ।।२।।

लेंकुराचे हिता । कोपें न सांडे कीं माता ।।३।।

*ज्ञानेशजे दंड करी । उपेक्षा तों नव्हे बरी ।।४।।*

*(१४९)*

*लोखंडे परिसा करोनी घर्षण । न होतां सुवर्ण दोष काय ।।१।।*

*वोहळे गंगेतें मिळोनी पावन । नोहे तरि त्यान काय कीजे ।।२।।*

*तैसे तुझे नाम नुरे पापराशी । उदाराचे राशी तुम्ही देवा ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये ऐसेही असोनी । नवल न मनीं समाधान ।।४।।*

*(१५०)*

*राहिलोसें डोई । ठेवोनियां तुझे पायी ।।१।।*

*आतां माझे हिताहिता । तुम्ही पाहावें समर्था ।।२।।*

*अंतरीचा भाव । तुम्हा कळो येत सर्व ।।३।।*

*ज्ञानेशजासुत म्हणे । काय विनवूं वचनें ।।४।।*

*(१५१)*

*शंका भिती सारे करोनियां दूर । करा माझे स्थिर चित्त पायीं ।।१।।*

*आशंकित चित्त न वचे सलगी । नुमटती आंगीं प्रेमभाव ।।२।।*

*जवळी घेवोनी करी समाधान । देई आलिंगन प्रेमसुखें ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये उपजे धींवसा । माझीया मानसा ऐसे करी ।।४।।*

*(१५२)*

***न सुटे देहगेहाची आसक्ति । थारे ना चित्तीं ब्रह्मबोध ।।१।।***

***नामाचें चिंतन तेहि नोहे सदा । आलिया आपदा चिंती तुज ।।२।।***

***विषयाची गोडी जडली हृदया । विसरवी पाया वेळोवेळा ।।३।।***

***ज्ञानेश्वरकन्ये कोण्याही प्रकारें । चित्त पायीं थारे ऐसे करी ।।४।।***

*(१५३)*

*कधीं निवतील डोळे । तुझी पाहतां पाउलें ।।१।।*

*आशाभूत रात्रंदिन । वाट पाहती नयन ।।२।।*

*अहंकार दादुला । थोर नाचवितो मेला ।।३।।*

*ज्ञानेशजे मायबाई । मज माहेरासी नेई ॥४॥*

*(१५४)*

*नका पाहूं माझा भाव नारायणा । कपटी मी जाणा आंत वरी ॥१॥*

*विषयसेवनीं न करी आळस । रात्रीं न दिवस नेणें कोठे ॥२॥*

***वंचना तेवढी तुझिया भजनीं ।***

***क्षणहि न ध्यानीं ध्याई तुज ॥३॥***

*ज्ञानेशजे वाया गेलोचि मी आहे । परी थोडी पाहे आस तुझी ॥४॥*

*(१५५)*

*आक्रंदे बालक निजमायभेटीं । तैसे जगजेठी प्रेम देई ॥१॥*

*तान्हुल्याचे झटे लागतां पान्हावे । तैसे मज द्यावे प्रेम देवा ॥२॥*

*चुकतां पाडस पिशी कुरंगिनी । तैसा माझे मनीं देई प्रेमा ॥३॥*

*ज्ञानेश्वरकन्ये तुझे पायाविण । निघो पाहे प्राण ऐसे करी ॥४॥*

*(१५६)*

*अनंत अपराधी जाहले बालक । निज हातें विख देई माता ॥१॥*

*तैसा मीहि तुझा अनंत अन्यायी । परी नको आई दूर लोटूं ॥२॥*

*स्वाभाविक दोषा न पाहे सुजन । आहो आम्ही दीन मुळीचेचि ॥३॥*

*ज्ञानेशजे तूं तो पतितपावन । साजे विशेषण आम्हांसाठीं ॥४॥*

*(१५७)*

*जळो जळो जिणें । देवा माझे लाजिरवाणें ॥१॥*

*मुखीं म्हणवी तुझा भक्त । परी विषयीं आसक्त ॥२॥*

*न वारिता निजगोवा । दुज्या उपदेशी बरवा ॥३॥*

*ज्ञानेशजे तुजविण । कळो आला सारा शीण ॥४॥*

*(१५८)*

*नेणें मंत्र जप नेणें ध्यान योग । नाहीं प्रेमरंग सेवेमाजीं ॥१॥*

*नेणें धड कोणी एकादे साधन । माझिये हातून होय नव्हे ॥२॥*

*दिशाभूल चित्तीं राहिलो निवांत । करशील हित जाणोनियां ।।३।।*

*ज्ञानेशजे मी तो अनंत अन्यायी । अससी तूं आई क्षमावंत ।।४।।*

*(१५९)*

*काय पायापाशीं ठेवूं मी चोरोन । अंतः साक्षी पूर्ण ब्रह्मांडाचा ।।१।।*

*सदासर्वकाळ स्त्रियेचेचि ध्यान । नावडेचि आन मना कांहीं ।।२।।*

*पापाचें पर्वत जळती स्मरणें । गाताती पुराणें कीर्ति ऐसी ।।३।।*

*ज्ञानेशजे कैसे कर्म बळिवंत । घेतांहि उरत नाम तुझें ।।४।।*

*(१६०)*

***आठहि प्रहर संसाराची चिंता ।***

***तैसा न अनंता सोस तुझा ।।१।।***

***निंदा करावया उत्सुक हे वाचा ।***

***परी त्वन्नामाचा छंद नेघे ।।२।।***

*परस्त्री परधन आवडे या जीवा । परी नाहीं गोवा तुझे ठायीं ।।३।।*

*ज्ञानेशजे अवघा उपजे कंटाळा । ऐसा लावी लळा निजपायीं ।।४।।*

*(१६१)*

*पापाची मी राशी । परी आलों पायापाशीं ।।१।।*

*मज राखावें राखावें । निजब्रीद सांभाळावे ।।२।।*

*करुं नये तें मी केलें । परी पाहिजे पाळिलें ।।३।।*

*ज्ञानेशजे मायबाई । तूंचि थोर लोकीं तिहीं ।।४।।*

*(१६२)...... पद हिंदी*

*तुमबिन कौन अधार । प्रभुजी ।।धृ०।।*

*गज पशुके तुम बंध छुराये । करतहि नाम पुकार ।।१।।*

*पुत्रनाम अजामिल लेतहि । किन्हो भवभय पार ।।२।।*

*स्कंददासप्रभु चरण मिलावो । किरपाकर सिर धार ।।३।।*

*(१६३)*

पातकी पातकी । माझे शरीर सुतकी ।।१।।

सर्व पापांचा वसौटा । आलों तुमचिया पोटा ।।२।।

केली कुपुत्राची करणी । मातृभावा जागा तुम्ही ।।३।।

सखे ज्ञानेशनंदिनी । नको देऊं मोकलोनी ।।४।।

(१६४)

पायीं जडलों नेणतां । माझी असूं द्यावी चिंता ।।१।।

आम्ही पामर पामर । काय जाणो तुझा पार ।।२।।

आहे अपराधी । माझी करा शुद्ध बुद्धि ।।३।।

सखे ज्ञानेशजे आई । पावन ब्रीद तुझे पायीं ।।४।।

(१६५)

घडता संगती । कस्तुरी ते होय माती ।।१।।

गंगे मिळाले वोहळ । सर्व झाले गंगाजळ ।।२।।

तैसें संतसंगें किती । उद्धरिलें नाहीं मिति ।।३।।

ज्ञानेशनंदिनी । ब्रीद सांभाळावे जनीं ।।४।।

(१६६).....पद

प्रभुजी शोभे काय तुम्हा ।।धृ०।।

शरण मी येऊनि पायीं तुमच्या । मति अझुनि अधमा ।।१।।

पतितपावन ब्रीद मिरवितां । मज कां नाहीं प्रमा ।।२।।

मजसम नाही पतितहि कोणी । पावन तुझ्या समा ।।३।।

स्कंददास म्हणे मज निज हातें । देतां काय यमा ।।४।।

(१६७)....पद

माझी होईल कोण गति ।।धृ०।।

तुम्ही उपेक्षा केल्या मग मज । त्राता न त्रिजगतीं ।।१।।

हरापराधी तारी श्रीगुरू । सत्ता त्यावरती ।।२।।

गुर्वपराधी तारायासी । शक्त न त्रिमूर्ती ।।३।।

स्कंददास हा तुझा म्हणवितो । हो कां पापमती ।।४।।

(१६८).....पद

प्रभुजी नाहीं तुमचा दोष ।।धृ०।।

तुम्ही दयाळु परी दुष्कृतीनें । करूनीहि कंठशोष ।।२।।

परी मी अधमचि मानुनी वचना । नाहीं दिधला तोष ।।३।।

स्कंददास म्हणे तुमच्या **प्रेमा - । वांचुनि मन हे ओस ।।४।।**

(१६९)......पद

तूं प्रेमाची मूर्ति । प्रभुजी ।।धृ०।।

विश्वाचाही द्रोह करुनि । आम्ही तुझे म्हणती ।।१।।

त्यांचा पापा वारूनि देसी । निजपायीं सुगति ।।२।।

मींच असा कां अधम पातकी । न द्रवे तुमची मती ।।३।।

स्कंददास म्हणे सांडी करता । होईल अपकीर्ति ।।४।।

(१७०).....पद

अंबे होऊं नको निष्ठुर ।।धृ०।।

शतशः होती कुपुत्र अवनीं । न तशी माता क्रूर ।।१।।

सुपुत्र अवघे तुमचे मी परी । चांडाळाहूनि दूर ।।२।।

त्याग न करता प्रेमस्तन्ये । वारि वासना पूर ।।३।।

ज्ञानेश्वरजे तव सुत म्हणुनी । स्कंददास महशूर ।।४।।

(१७१)

धांवे धांवें धांवे त्वरे । वाहविलों महापुरें ।

कामक्रोधादि मकरे । एकसरें ग्रासिती ।।१।।

तुजविण कोणी नाहीं । नावाडी या लोकीं तिहीं ।

विलोकितो दिशा दाही । द्यावी बाही दयाळ ।।२।।

संतीं कीर्तीचा डांगोरा । पिटीला तो करा खरा ।

मज आपुल्या दातारा । पायीं थारा देऊनी ।।३।।

सखे ज्ञानेशनंदिनी । नको देऊं मोकलोनी ।

जीव गुंतला चरणीं । ते नयनीं दाखवी ।।४।।

(१७२)

आतां माझी दया । कोण्या उपाया देईल ।।१।।

नेणे कोण अंतराय । दृष्टीं पाय न येती ।।२।।

नाना बुद्धीचे तरंग । तेणें मार्ग न कळे ।।३।।

माते ज्ञानेशनंदिनी । दोष नाणी मनासी ।।४।।

(१७३) . . . हे जगन्नायका

करिसी पावन पापी जनासी ऐकुनी ही कीर्ति ।

द्वारि पातलो दयासागरा विश्वासुनि चित्तीं ।।धृ०।।

ऐकिले कानीं कीं त्वन्नामीं तरली गजगणिका ।

तसाचि द्विजवर अजामिळहि तो घेता नाम निका ।

नाम घेऊनि तरला नाहीं हें न घडे भाका ।

संत शिरोमणी वदला ऐसा तुमचा भक्त तुका ।।चाल।।

हे जगन्नायका भूसुर परिपालका ।

हे धरणिभारहर असुरवर्गहारका ।

हे गोपीमनरंजन मधुर मुरलीगायका ।।चाल।।

तव नामामिळ क्षणें निवारी पापजलदपंक्ति ।।द्वारि०।।१।।

तव नामामृत सेवन करितां फणिभूषण निवला ।

सुरमुनिवचना विश्वासुनि तो वाल्मिक उद्धरला ।

अघबककेशी पापमति तंव भक्तवृंद पिडिला ।

पौंड्रक तुमचा मत्सरि परि त्या ठाव पदीं दिधला ।।चाल।।

हे रमानिवासा निजजनवरदायका ।

हे भक्तकामकल्पद्रुम कंसांतका ।

हे षडरिहारका भवभयनिकृंतका ।।चाल।।

नामप्रतापें जे कां तरले भक्ता नाहिं भिती ।।द्वारि० २।।
नामें न जळे पातक ऐसें न शके जीव करुं ।
पुराणवचनें प्रभुजी वदला सत्यवती कुमरू ।
त्या नामाची करुनि आठव ।।
(अपूर्ण)
(१७४)
तुम्हां संतजना दीन विनवणी । मस्तक चरणीं ठेवोनियां ।।१।।
मज दुर्बळाची करुनियां कींव । द्यावी मज ठेव हरिप्रेमा ।।२।।
घालोनिया भीड विनवावे देवा । नका या केशवा दूर लोटा ।।३।।
स्कंददास खरा नष्ट दुराचारी । ..............................।।४।।
(१७५)
अति पापमति । तुम्ही पावन श्रीपति ।।१।।
अंगीकार करा । आपुला जाणुनी दातारा ।।२।।
नीच सेवेलागीं मज । ठेविलिया साधे काज ।।३।।
ज्ञानेशजे सखे बाई । भरंवसा तुझे पायीं ।।४।।
(१७६)
नाहीं निवेदिलीं मुखें । जीं पातकें घडलीं ।।१।।
केली समर्थें सूचना । नोहे मना उमज ।।२।।
आतां वाटे हुरहुर । कर्म दुस्तर बळिवंत ।।३।।
ज्ञानेशजे जननीये । नको सये रागवूं ।।४।।
(१७७)
कवणिया गुणें करावी त्वां कृपा । सख्या मायबापा आळंदीशा ।।१।।
धड नाहीं एक गुण कोणि आंगीं । करावी सलगी पायीं तुझ्या ।।२।।
संतमहंताचा उपजे मत्सर ।
**झाला बहुभार अहंतेचा ।।३।।**

ज्ञानेशजासूत येतो काकुळती । अनाथा तूं साथी म्हणोनियां ।।४।।

(१७८)

आपुलिया हातें पाहिला म्यां गोवा । सोडी तूं केशवा येथोनियां ।।१।।

स्त्रियापुत्रादिकीं गुंतलेसे चित्त । झालों भोगासक्त बहुसाल ।।२।।

करितांहि यत्न नोहेचि सुटका । नाहीं विषयसुखा विसर कधीं ।।३।।

आळंदीवल्लभा लावियेली आस । पाहे स्कंददास वास तुझी ।।४।।

(१७९)

बहु तारिलेसी दोषी । ठाव दिला पायापाशीं ।।१।।

मीच काय झालो भारी । ऐसा पातकी श्रीहरी ।।२।।

पुत्र झाला अवगुणी । माता न करी सांडणी ।।३।।

ज्ञानेशजे तूं पावन । काया करी निंबलोण ।।४।।

(१८०)

अधिकारेविण । नका करुं कृपादान ।।१।।

परी करा समाधान । एक वेचोनि वचन ।।२।।

मज द्यावी प्रेमभाक । निज करीन पायिक ।।३।।

ज्ञानेशजे कृपावंते । पाळी माउलीचे नाते ।।४।।

(१८१)

भरलिया वारे । वत्स धांवे सैरेवैरे ।।१।।

तैसे शब्द अभिमानें । तुच्छ करीत साधनें ।।२।।

**बोलासरिसे भाव ।**

**चित्तीं न येती सावेव ।।३।।**

तुझें करितां स्तवन । तानमानीं राहे मन ।।४।।

अंबे ज्ञानेश्वरबाळे । कोठवरी सांगूं चाळे ।।५।।

(१८२)

कधीं आतां मज धाडशील मूळ । चित्त हळहळ करीतसे ।।१।।

वाटुली पाहतां शिणले नयन । नोहे आस पूर्ण अझोनियां ।।२।।
काय माझा दोष आलासे कळोनी । जाहली म्हणोनी अवकृपा ।।३।।
स्कंददास म्हणे अज्ञानी बालक । नेदी माता विख मारावया ।।४।।
(१८३)
आजवरी नाहीं कळलें उचित । सांडोनियां नित वागलों मी ।।१।।
कळलें उचित मन नाहीं हातीं । काय कृपामूर्ति करुं येथ ।।२।।
दोहोंपरी ऐसी झाली नागवण । कांहीं करा दान कृपेचे ते ।।३।।
स्कंददास म्हणे तुमच्या परती । न दिसे विश्रांति मजलागीं ।।४।।
(१८४)
अज्ञान लेंकरुं । माता पाहे दूर करुं ।।१।।
तेणें जावें कोणापाशीं । कोण धरील पोटाशीं ।।२।।
वाहे विश्वास अंतरीं । पतिता तूं साहाकारी ।।३।।
ज्ञानेशजे मायबाई । माझे अपराध साही ।।४।।
(१८५)
आतां जावो पाहे वाया । आयुष्य हें देवराया ।।१।।
तुमचिया कृपेविण । दिसतसे किविलवाण ।।२।।
निरयाची करी जोडी । ढ विषयाचे बेडी ।।३।।
ज्ञानेशजे मायबाई । अंकिताचा भार साही ।।४।।
(१८६)
नेणो कोण्या गुणें होताती उद्विग्न । तुझे भक्तजन मजविषीं ।।१।।
पुसलिया तुझे सांगतो विचार । उदास अंतर परिसती ।।२।।
तेणें थोर चित्ता वाटतसे खंती । काय मी श्रीपती करुं येथे ।।३।।
स्कंददास म्हणे करावी फजिती । नेणो तुम्ही चित्तीं धरियेलें ।।४।।
(१८७)
आपुल्याच्या हितीं । चिंता माउलीचें चित्तीं ।।१।।

*न करी आळस । नानापरी पुरवी आस ।।२।।*

*होता शीणभाग । वारी वेचुनियां अंग ।।३।।*

*ज्ञानेशजे माये । सर्व जाणसी तूं स्वयें ।।४।।*

*(१८८)*

*कई सुटोनियां अहंतेची गांठी । पडेल दृढ मिठी पायीं तुझ्या ।।१।।*

*निर्लज्ज होवोनी नाचेन आंगणीं । करीन कैं वाणी नामघोष ।।२।।*

*तुझा एक प्रेम राहोनियां चित्तीं । कैं विषयासक्ति निवटेल ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये कई माझी दया । दाविशिल उपाया करोनियां ।।४।।*

*(१८९)*

*आम्ही लेंकुराच्या जाती । नका कोप धरुं चित्तीं ।।१।।*

*मागितल्याची करा क्षमा । मायबापा पुरुषोत्तमा ।।२।।*

*गर्भी अपत्याच्या लाथा । नाणी मनासी ते माता ।।३।।*

*तुझ्या जन्मलों उदरीं । याची लाज कांहीं धरी ।।४।।*

*सखे ज्ञानराजबाळे । मज आश्वासी स्नेहाळे ।।५।।*

*(१९०)*

*शरीरीं आळस दाटला बहुत । चिंतनीं तें चित्त नेघे गोडी ।।१।।*

*सांगा नारायणा काय करुं यासी । काय अदृष्टासी लिहीलेसे ।।२।।*

***विषयाची गोडी न सुटे चिंतन ।***

***आवरितां मन आवरेना ।।३।।***

*ज्ञानेश्वरकन्ये हाचि एक निश्चय । धरिली म्यां सोय तुझे नामीं ।।४।।*

*(१९१)*

*भजनीं विश्वास नाहीं दृढ निष्ठा । कैसे या अदृष्टा लिहिलेसे ।।१।।*

*तुझ्या कृपेपुढें कर्म बळिवंत । हें तो अनुचित दिसतसे ।।२।।*

*तुझिया भक्तांच्या बैसावे पंगती । ऐसें वाहे चितीं वायाविण ।।३।।*

*स्कंददास म्हणे पुरेल असोसी । आणाल मनासी तुम्ही जरी ।।४।।*

(१९२)

मायबापालागीं सर्वहि समान । अज्ञान सज्ञान बालकें तीं ।।१।।

तयामाजी थोर वाहे अज्ञचिंता । हितासी नेणता म्हणोनियां ।।२।।

तुम्ही तो सज्ञाना धरोनी पोटासी । करा दूरदेशी आम्हालागीं ।।३।।

स्कंददास म्हणे लौकिकाची लाज । धरुनियां काज करी माझे ।।४।।

(१९३)

पुरे ब्रह्मज्ञान शाब्दिक चावटी । व्यर्थ आटाआटी अहंतेची ।।१।।

सांवळे सुंदर रूप दावी डोळा । जीवीच्या जिव्हाळा संताचिया ।।२।।

कैसा प्रेमभरें देखिलासी तिहीं । गोपगोपिकाही नित्य नवा ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये ऐसा भाग्योदये । दावि जननीये निजकृपें ।।४।।

(१९४)

तूंचि इंद्रियांचा पती । म्हणोनि येतो काकुळती ।।१।।

मज नावरे वासना । कांहीं येऊं द्या करुणा ।।२।।

विश्वंभरा कमलापती । माझी दीनाची विनंती ।।३।।

ज्ञानेशजे मायबाई । माथां वाहियेला पायीं ।।४।।

(१९५)

म्हणवितो दास जनीं । परी नाहीं ते करणी ।।१।।

परी कोणावरी सत्ता । करुं तुझिया परता ।।२।।

तुझ्या येवोनी उदरीं । कोणे सांभाळावे हरी ।।३।।

ज्ञानेशजे तुजविण । कोण पाहूं मी शरण ।।४।।

(१९६)

**परउपकारीं झिजवेना अंग ।**

**निज सेवे जग लावितसे ।।१।।**

**स्वयें आणिकाचा न साहेचि शब्द ।**

**दुज्या मर्मभेद करुनि बोले ।।२।।**

***दुजियाचे गुण न दिसे डोळ्यासी ।***

***मानी आपणासी गुणराशी ॥३॥***

*ऐसियाचा तुज करणें उद्धार । ज्ञानेशजे भार घातलासे ॥४॥*

*(१९७)*

*आहे अपराधी । परी तुम्ही कृपानिधी ॥१॥*

*मज पाळावे पाळावे । कृपादृष्टि न्याहाळावे ॥२॥*

*देवोनियां धीर । माथां ठेवा कृपाकर ॥३॥*

*सखे ज्ञानेशनंदिनी । चित्त देई विनवणी ॥४॥*

*(१९८)*

*कां हो मज देवा केला परदेश । कवणाची आस करू आतां ॥१॥*

*विषय चिंतनीं जाती रात्रंदिन । तुमचे चरण नाठवती ॥२॥*

*येतो काकुळती परी न द्या धीर । झुरते अंतर याचिसाठीं ॥३॥*

*स्कंददास म्हणे पतितपावना । येऊं द्या करुणा कांहीं तरी ॥४॥*

*(१९९)*

*ठेविलीया संबंधासी । लाज साची असो द्या ॥१॥*

*कांहीं दिसो देतां उणें । लाजिरवाणें तुम्हांसी ॥२॥*

*जाता अव्हासव्हा । तुम्ही देवा सांभाळा ॥३॥*

*ज्ञानेशजे करी कृपा । मार्ग सोपा दाऊनी ॥४॥*

*(२००)*

*नाम घेतां कोणी नाहीं वायां गेला । ऐसा आयिकिला संतबोल ॥१॥*

*म्हणोनियां आलों तुझे पायापाशीं । आहे पापराशी जाणोनियां ॥२॥*

*भाकिताही कींव तुज नये द्रव । पाहसी सावेव भाव कैसा ॥३॥*

*ज्ञानेश्वरकन्ये अंतर बाहेर । कोळसा साचार एकरूप ॥४॥*

*(२०१)*

*भाव पाहोनियां करितां उद्धार । काय येथें थोरपण तुझे ॥१॥*

*पापी अजामिळ नेला पायापाशीं । पुराणीं कां ऐसी कीर्ति केली ।।२।।*

*नाहीं भाव तरी कोठुनि आणावा । तुम्हां तो कणवा नये कांहीं ।।३।।*

*स्कंददास म्हणे माझ्या विषीं हरी । वैषम्य अंतरीं धरियेलें ।।४।।*

*(२०२)*

*अनाथाचा नाथ म्हणोनि आपणा । करिता घोषणा वाऊगीच ।।१।।*

*तुमचिये द्वारीं केव्हाचे तिष्ठत । बैसलो तिष्ठत आम्ही देवा ।।२।।*

*समर्थासी तुम्ही धरोनी पोटासी । आम्हां दुर्बळासी मोकलिले ।।३।।*

*स्कंददास म्हणे न पुरता आस । कैसेनि विश्वास ठेवावा तो ।।४।।*

*(२०३)*

*नाहीं दंभमानासाठीं । करीत मी तोंडपिटी ।।१।।*

*नये दिसोनी बाहेर । तुम्ही जाणतां अंतर ।।२।।*

***असो अबद्धसुबद्ध ।***

***वाणीलागी लावी छंद ।।३।।***

*स्कंददास म्हणे करा । पायीं अंकित दातारा ।।४।।*

*(२०४)*

*वेडीवांकुडी ते सेवा । पायीं अर्पियेली देवा ।।१।।*

*नका पाहूं प्रेमभावा । नित्य जपतसे जीवा ।।२।।*

*कधीं येईल तो येवो । चित्तीं ऐसा प्रेमभावो ।।३।।*

***पडिला देहाचा विसर ।***

***चित्त पायीं झालें स्थिर ।।४।।***

***ज्ञानेशजा केव्हां डोळा ।***

***ऐसा दाविसी सोहळा ।।५।।***

*(२०५)*

*जाणे मी हें मनीं अभागी करंटा । लाथाळिले ताटा वोगरील्या ।।१।।*

*आतां करी दु:ख हातीचे सांडोनी । बाहतो जननी म्हणोनियां ।।२।।*

*रागें बाळ दूर सारोनी दे अन्न । जननी प्रेमानं पुढें ठेवी ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये मी तुझे तान्हुले । ठेविसी भुकेले नवल हें ।।४।।*

*(२०६)*

***सांडुनियां सर्व लौकिकाची चाड ।***

*गावे वाटे गोड नाम तुझें ।।१।।*

*परी नाहीं अंगीं ताल सुरा ठाव । तेणें लाजे जीव संकोचित ।।२।।*

*निज स्वैराचारें लोकां होय त्रास । ऐसेहि मनास वाटे केव्हां ।।३।।*

***ज्ञानेश्वरकन्ये ठेवी ऐशा स्थिति ।***

***वाढे पायीं प्रीति दिसेंदिस ।।४।।***

*(२०७)*

*अधिकारेंविण । आंगीं आले मोठेपण ।।१।।*

*त्याचाचि हा परिणाम । वाढविला भोग काम ।।२।।*

*आतां तुम्ही सांभाळावा । दास अखंड हा नवा ।।३।।*

*ज्ञानेशजे मायबाई । पायीं ठेवियली डोई ।।४।।*

*(२०८)*

***एकवेळ दावी डोळा ।***

***निजभक्तीचा सोहळा ।।१।।***

*मग मी नेघे मागुता । आण तुझी दीनानाथा ।।२।।*

*करीन मी रात्रंदीन । तुझ्या पायाचें चिंतन ।।३।।*

*सखे ज्ञानेशजे आई । विनवणी चित्त देई ।।४।।*

*(२०९)*

*लटिका भाव लटिकी सेवा । गोड देवा करावी ।।१।।*

*आपुल्याचा अंगीकार । नोहे भार आपणा ।।२।।*

*असे नेणते लेंकरुं । धरुनि करू चालवा ।।३।।*

*ज्ञानेशजे जन्म दिला । तैसा लळा पाळावा ।।४।।*

(२१०)

कोठवरी धीर धरुं नारायणा । माझे बोल मना न घ्या कांहीं ।।१।।

अन्यायी अपराधी आलों लोटांगणीं । न करा सांडणी आतां माझी ।।२।।

अंतरी बाहेरी वैरिये वेढिले । तेणें दुरावले पाय तुझे ।।३।।

स्कंददास म्हणे विश्वासलो भारी । धांवसी कैवारी म्हणोनियां ।।४।।

(२११)

मज पामराची कैसी लागेल दाद । ऋषि संतवृंद जवळी तुझ्या ।।१।।

नौबती माझारी तुतारीचा ध्वनी । कोण मना आणी तेथें माझा ।।२।।

नेणो कैशापरी पावेन तुजसी । चिंता ही मानसीं सर्वकाळ ।।३।।

स्कंददास म्हणे व्यर्थ जाते घडी । करावी तातडी मायबापा ।।४।।

(२१२)

मागें बहुतासी दाविली प्रतीती । माझिया संचिती काय झाले ।।१।।

नसतीचि आंगीं लावोनियां खोड । केला कईवाड ऐसा तुम्ही ।।२।।

पुराणीं गाइली तुझी ब्रीदावळी । दिली माझे वेळीं सांडोनियां ।।३।।

स्कंददास म्हणे दुर्बळाचा अंत । पहा कृपावंत म्हणोनियां ।।४।।

(२१३)

कर्म करुं तरी नेणें धर्माधर्म । विषयाचा काम अनिवार ।।१।।

योग करुं तरी नाहीं तें वैराग्य । नाहीं देह योग्य अभ्यासानें ।।२।।

ज्ञाने तुज वश करुं नारायणा । विषय वासना द्वैत दावी ।।३।।

भक्ति करुं तरी नाहीं तो जिव्हाळा । जैसा कां गोपाळा गोपिकांसी ।।४।।

ज्ञानेश्वरकन्ये परी पायीं चाड । पुरवावे कोड निजसत्ता ।।५।।

(२१४)

अहो आळंदींच्या राया । हेंचि पायां विनवणी ।।१।।

**लटिका भाव लटिकी सेवा ।**

**गोड देवा करुनि घ्या ।।२।।**

दिसेंदिस चित्तीं साचा । करा प्रेमाचा सुकाळ ॥३॥

ज्ञानेशजासुत म्हणे । नका उणें दाखवूं ॥४॥

(२१५)

भक्ताचेनि नांवे पशु आठवितां । पावले अनंता तया लागी ॥१॥

मजविषयीं कां करितां आळस । न येती मनास बोल माझे ॥२॥

संसारसागरीं वाहवितां पुरा । जाहला मातेरा जीविताचा ॥३॥

स्कंददास म्हणे नुपजेचि धीर । मलीन अंतर देखोनियां ॥४॥

(२१६)

मागे बहुतांचा केलासी सांभाळ । धांवोनियां आळ पुरविली ॥१॥

ऐकोनियां कीर्ति आलो पायापाशीं । संकट तुजसी घालावया ॥२॥

तुम्ही तो राहिला धरोनियां मौन । दिसतो कठीण मार्ग पुढें ॥३॥

स्कंददास म्हणे वोखटे संचित । तूंहि दयावंत कोपलासी ॥४॥

(२१७)

शपथ घेवोनी सांगतो विचार । झाला बहुभार महंतीचा ॥१॥

संत मायबाप द्यावे जीवदान । सोडवा येथून मजलागीं ॥२॥

पायीची पैजार शोभतसे पायीं । घेऊं नये डोई कदा काळीं ॥३॥

स्कंददास म्हणे विनंति पायाशीं । नका पतनासी पाहूं माझ्या ॥४॥

(२१८)प्रेमाचा सुकाळ

काय तुज मियां घातले सांकड । म्हणूनियां तोंड न दाखविसी ॥१॥

सुखें आम्ही वाहूं संचिताचा भार । कदा तुजवर न टाकोचि ॥२॥

इतुक्या पुरता होई गा कृपाळ । प्रेमाचा सुकाळ चित्तीं करी ॥३॥

स्कंददास म्हणे तुम्ही तो उदार । नका अधिकार पाहूं देवा ॥४॥

(२१९)

तोडोनियां भवगोडी । द्यावी सेवेची आवडी ॥१॥

करी संताचा पायिक । नको याविण आणिक ॥२॥

**नामामृतीं सक्त वाणी ।**

**रूप ठसावे तें मनीं ॥३॥**

माते ज्ञानेशजे बाळे । अंकिताचे पाळी लळे ॥४॥

(२२०)

कोळसिया कांहीं । अंतर्बाह्य भिन्न नाहीं ॥१॥

तैसी अंतर्बाह्य शुद्धि । नाहीं पायीं स्थिर बुद्धि ॥२॥

पतीत मी पापी । कामी वरी शीघ्र कोपी ॥३॥

सर्व अपराधांची मूस । ज्ञानेशजे स्कंददास ॥४॥

(२२१) पद

विषयविषाच्या क्षणिकसुखाच्या पडलो आवर्ती ।

दीनदयाळा परमकृपाळा धांव कृपामूर्ती ॥धृ०॥

सज्जनसंगीं नाहीं रमलों श्रमलों परकाजीं ।

मोहविवश होऊनियां मानी अपुला परका जी ।

यमनियमादिक करुनी दमिला नाहीं मन वाजी ।

क्षुधातृषार्ता पाहुनि आला कांही कणवा जी ।

कथापुराणीं हरिगुणगानीं मन नोहे राजी ।

भगवद्भावें नाहीं नमिल्या सज्जनजनराजी ॥ विषय०॥

लवलेश मनीं नाहीं मानिली पापभीति ।

निःशंकपणें रतलों स्त्रीसवें दिवसराती ।

थोर म्यां हानि केली मानुनी असत साथी ।

ऐशापरी हरि नरदेहाची झालीरे माती ॥१॥ विषय०॥

पंचभूतांच्या पिंडा पाळी दिनदुबळे छळुनी ।

कुटुंबभरणासाठीं केली दुर्जन मनधरणी ।

व्यसनीं शयनि भोजनि दिन हे गेले न स्मरणीं ।

नाहीं चिंता केली चित्तीं कोण गति मरणीं ।

**भोग भोगतां रोग लागला**

**भोगेच्छा ती तरणी ।**

*करणी ऐसी केली जैसी केली कोणि न या धरणीं ।।विषय०।।*

*(२२२)*

*वाटे तया सुखें देई गा दर्शन । करुं दे चिंतन तुझें मज ।।१।।*

*संकटीं कोणाचे सुखें जा धांवोनी । माझे नको हिरोनी नेऊं नामा ।।२।।*

*वाटे त्याचा सुखें वाढवी महिमा । मज देई प्रेमा एक तुझा ।।३।।*

*ज्ञानेशजे इच्छी आणिक हें नाम । तरी तुझी आण वाहातसे ।।४।।*

*(२२३)*

*लाज वाटे तुझा म्हणवितां मनीं । विपरीत करणी पाहोनियां ।।१।।*

*स्त्रियापुत्रावरी जितुकी आवडी । नाहीं तैसी गोडी तुझे पायीं ।।२।।*

*आत्मप्रेमाची ते काय सांगो मात । सर्वस्वें वसत देहावरी ।।३।।*

*स्कंददास म्हणे ऐसा हिनकट । परी झालों धीट पायीं तुझ्या ।।४।।*

*(२२४)*

*मुलाम्याचे नाणें लाजवी खऱ्यासी । वरपंग खासी करूनियां ।।१।।*

*पतिव्रतेहूनि वेश्येचा आचार । बाह्यात्कारी फार दिसतसे ।।२।।*

*तैसा वरीवरी नटोनि बहुत । जना भासवित साधु ऐसा ।।३।।*

*ज्ञानेशजे परी सर्व तुझ्यासाठीं । करी याची पोटीं धरी लाज ।।४।।*

*(२२५)*

**येथवरी आलो सोशित संकटें ।**

**नको लावूं वाटे परते मज ।।१।।**

*सांगितला मार्ग आकळेना बुद्धि । तो तूं कृपानिधि उघड करी ।।२।।*

*ठेविला विश्वास नको दवडूं दूरी । अहो दीन द्वारीं समर्थाचे ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये तुझा मी डिंगर । घातलासे भार पायावरी ।।४।।*

*(२२६)*

कांहीं तरि तुम्ही द्यावा देवा धीर । माझा अंगीकार करोनियां ।।१।।

ऐशा अभिलाषें धरिलें चरण । तुम्ही उदासीन दिसतसा ।।२।।

काय आतां मियां पोटचि भरुन । कंटाळावे दिन आयुष्याचे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये सांगावा विचार । पतिता आधार कोण पाहूं ।।४।।

(२२७)

अंतकाळासाठीं । करितसे आटाआटी ।।१।।

पुढें समय ठाकतां । विस्मरण होय चित्ता ।।२।

तेव्हां तुम्ही सांभाळावे । मज आपुल्या प्रभावे ।।३।।

स्कंददास म्हणे नका । जाऊं देऊं यमलोका ।।४।।

(२२८)

हो कां कैसी तरी । माझी क्रिया ती श्रीहरी ।।१।।

तुम्ही सेवेमाजी करा । जमा तियेसी दातारा ।।२।।

कृपेचा कोंवसा । चित्तीं दृढ भरंवसा ।।३।।

ज्ञानेशजे मायबाई । दोष अंकिताचे साही ।।४।।

(२२९)

आम्ही कवणाचा पहावा आधार । तुम्ही अंगीकार न केलिया ।।१।।

कोरड्या वचनें होतां समाधान । सांकडें तें कोण तुम्हां लागीं ।।२।।

सेवेची आवडी धरोनियां चित्तीं । येतो काकुळती मायबापा ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये पुरवी असोशी । निज पायापाशीं ठेवोनियां ।।४।।

(२३०)

पायीची पैजारा घेतां डोईवरी । कोणा दोष तरी सांगा येथे ।।१।।

नीच जाणोनिया दिलें मोठेपण । होतां अभिमान दोष कोणा ।।२।।

आतां तरी पुढें करोनी विचार । लावा अधिकार पाहुनि सेवे ।।३।।

स्कंददास म्हणे तुम्ही संतजन । मायबापाहून कृपावंत ।।४।।

(२३१)

ऐसे करा कृपादान । तुमच्या राहिन पायापें ।।१।।
भोगमोक्ष तोडा आस । प्रेमकास लावुनी ।।२।।
सर्वभूतीं भगवद्भाव । वाचे नांव अखंड ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये करा । माझ्या चुरा वासनेचा ।।४।।

(२३२)

भक्तिभावेविण । करी नैवेद्य अर्पण ।।१।।
घ्यावी दुर्बळाची सेवा । गोड करोनियां देवा ।।२।।
चाले वांकुडा पाऊली । चोज करीत माउली ।।३।।
ज्ञानेशजे तैशापरी । मज स्नेहाळे स्वीकारी ।।४।।

(२३३)

जगताचा भार घेऊनियां शिरीं । आतां कां श्रीहरी लपतसा ।।१।।
श्रुतिसंतमुखीं निज बडिवार । केला लोकीं फार बोजवारा ।।२।।
ऐकोनियां कीर्ति येतां पायापाशीं । आड आणितोसी नाना विघ्नें ।।३।।
ज्ञानेशजा माय असतां कृपाळ । किती टाळाटाळ कराल ती ।।४।।

(२३४)

**माझ्या योगें तुझी नोहे अपकीर्ति ।**
**सुखे हो फजिती ऐसी माझी ।।१।।**
**परी तुजलागीं न लागो कलंक ।**
**एवढीच भीक मागतसे ।।२।।**
**संबंधी सोयरे करोत वाळीत । बुडतिया हात देता तुम्ही ।।३।।**
**ज्ञानेश्वरकन्ये माझ्या जीवभावा । नको आन गोवा तुजविण ।।४।।**

(२३५)

मायबापा सर्व समान लेंकरें । हेंदरे बेंदरे न म्हणे ती ।।१।।
स्वयें म्हणवोनी जगाची जननी । दिसत करणी विपरीत ।।२।।
विरागी प्रेमळा धरोनी पोटासी । दूर मोकलिसी आम्हांलागी ।।३।।

ज्ञानेशजे थोर साहणें लागे झटे । अज्ञानाचे नेटे मायबापा ।।४।।

(२३६)

उदाराचा राणा ऐकोनियी कीर्ती । आलों द्वाराप्रती तुमचिया ।।१।।

धरियेली मनीं चरणाची आस । न करी निराश मायबापा ।।२।।

हृदयीं जडला दृढ स्नेहपाश । करीतो सेवेस अंतराय ।।३।।

ज्ञानेशजे सर्व तोडोनि संबंध । करी प्रेमबद्ध निजपायीं ।।४।।

ज्ञानेशजेमाये कवण्या उपायीं । जीव तुझे पायीं राहील हा ।।५।।

(२३७)

दृढ प्रेमपाशीं बांधितातित कोणी । तुज चक्रपाणी हृदयामाजीं ।।१।।

ज्ञानयोगें कोणी देती जीवभाव । सांडोनियां हाव विषयाची ।।२।।

सुस्वर गायनें नामसंकीर्तनीं । रिझविती कोणी तुजलागीं ।।३।।

मी तो मतिमंद नेणें कांहीं एक । आलो भेटी रंक समर्थाचे ।।४।।

ज्ञानेश्वरकन्ये तुझ्या दयेवरी । राहिलों अंतरीं विश्वासोनी ।।५।।

(२३८)

केली प्रतिज्ञेची हानी । शिक्षा केली मायबहिणी ।।१।।

ऐसाचि त्वां द्यावा दंड । थोर मातलों मी पुंड ।।२।।

परी नको दूर धरुं । तुझें अज्ञान लेंकरुं ।।३।।

ज्ञानेशजे त्यागाविण । वाटे तैसे शोधी मन ।।४।।

**(२३९)**

**आम्ही दिसो तैसे नसो ।**

**असो तैसे तों न दिसो ।।१।।**

**आम्हां मूळ ना शेवट ।**

**मार्ग आमुचा दुर्घट ।।२।।**

**आम्हां जाणो जातां कोणी ।**

**जिते न येती परतोनी ।।३।।**

**ज्ञानेशजा माय आम्हां ।**

**गिळोनियां पाजी पान्हा ॥४॥**

(२४०)

**नाहीं मी मागत सुखाचा संसार ।**

**पडेल विसर जेणें तुझा ॥१॥**

कैवल्याचा ठेवा त्याची नाहीं चाड । वाटो देई गोड नाम तुझें ॥२॥

नित्य नवी नवी उपजावी प्रीति । तुझी गुणकीर्ति ऐकोनियां ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये आलो दारापाशीं । वाढी भिकाऱ्याशीं प्रेम भीक ॥४॥

(२४१)

नेणो कंटाळला जीव । माझा पाहोनियां भाव ॥१॥

म्हणूनियां दूर केले । सेवेतुनिया आपुले ॥२॥

चाचुपांखेविण । पिलीयाचि गति कोण ॥३॥

तैसी माझी कोण गती । ज्ञानेशजे आणी चित्तीं ॥४॥

(२४२)

नेणो काय माझ्या लिहिलें अदृष्टीं । न व्हावींच भेटी पायीं तुझ्या ॥१॥

करुं जातां ध्यान उठती विक्षेप । फळा आले पाप जन्मान्तर ॥२॥

एकनिष्ठे करुं नामसंकीर्तन । वेढियेलें मज आळसानें ॥३॥

ज्ञानेशजे माये कोणेपरी आतां । होईन सरता तुझे पायीं ॥४॥

(२४३)

आतां बहु झालों दीन । तुमचिया कृपेविण ॥१॥

देवा घालोनि पांखर । करा माझा अंगीकार ॥२॥

माते नको निज तान्हे । दिसो देऊं केविलवाणें ॥३॥

सखे ज्ञानेशजे आई । कडे उचलोनी घेई ॥४॥

(२४४)

कैसा पाववीन भवसिंधु पार । वेढिलें अंतर कामक्रोधे ॥१॥

घडीभरि नोहे पायीं स्थिर चित्त । करिती आघात क्षणोक्षणीं ॥२॥

गेला तो दिवस नये परतोनी । वायाविण हानी आयुष्याची ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये करावी तांतडी । सांडोनियां अढी मायबापा ॥४॥

(२४५)

जाणुनिया अवगुणी । सांडी केली चक्रपाणी ॥१॥

हे तो तुम्हां अनुचित । म्हणविता कृपावंत ॥२॥

आम्ही झालों पराधीन । बळी प्रारब्धबंधन ॥३॥

ज्ञानेशजे दीना पाळी । कृपा कटाक्षे न्याहाळी ॥४॥

(२४६)

कपटिये तुझा घेऊनियां वेष । आचरलो दोष व्यभिचार ॥१॥

करूणा भाकिता पावले दयाळा । दोषा कानाडोळा करोनियां ॥२॥

सांभाळिसी ब्रीद पडो नेदी उणे । गाताती पुराणें पवाडे ते ॥३॥

ज्ञानेशजे नेणो कोण पाप उणें । मजपाशीं तेणें कृपा नये ॥४॥

(२४७)

ब्रीदाचा तोडर बांधला चरणीं । कदा मोक्षदानी उपेक्षीना ॥१॥

काय झाले नेणों माझिया कपाळा । नये कळवळा माझेविषीं ॥२॥

मज एकासाठीं सांडिता लौकिक । ब्रीदासी कलंक लागो पाहे ॥३॥

स्कंददास म्हणे आपुल्याचा शीण । मायबापावीण कोण वारी ॥४॥

(२४८)

कामक्रोधादींच्या पडलो बांधोडी । वेगें आतां काढी येथोनियां ॥१॥

परमार्थी हा तो संवचोर संग । टाळावा प्रसंग यांचा देवा ॥२॥

ययासवें थोर माझी नागवण । तुमचें चरण दुरावलें ॥३॥

स्कंददास म्हणे आपुलिया कृपा । ठेवा मायबापा चरणापें ॥४॥

(२४९)

ठाकोनियां येतां वाहाळवोहळ । नोहे गंगाजळ, दोष कोणा ॥१॥

परीसासी लोहें केलें संघट्टण । न होतां सुवर्ण, कोण दोषी ।।२।।
तैसे आम्ही तुझे धरोनी चरण । नसतां समाधान, बोल कोणा ।।३।।
स्कंददास म्हणे विचारा अंतरीं । तुम्ही सर्वापरी सत्ताधीश ।।४।।

(२५०)

क्षणोक्षणीं मज होसी पाचारितां । केविं झालें आतां विपरीत ।।१।।
कैसी नये तुज माझी आठवण । गेला विसरोन मायबापा ।।२।।
आजी कैसे केलें हृदय निष्ठुर । दीनाचा अव्हेर करीतसा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये आतां काय माझे । वाटतसे ओझें तुज लागीं ।।४।।

(२५१)

ऐकोनियां कीर्ति केला मियां धावा । विपरीत देवा दिसो आले ।।१।।
गायिलासे संतीं तुझा बडिवार । माझे तो अंतर साक्ष नेदी ।।२।।
अनुभवावीण न बैसे विश्वास । काय आम्ही यास करो आतां ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये करीन कागाळी । नाम नाहीं बळी म्हणोनियां ।।४।।

(२५२)

हरिनाम घ्याया वाटतसे लाज । प्रेमें करी काज बाईलेचे ।।१।।

**संसारीं फजिती होतां बेशरम ।**

**परमार्थी नेम न करवे ।।२।।**

धनासाठीं करी जनांचे आर्जव । हरिपायीं भाव धरवेना ।।३।।
स्कंददास म्हणे करितो मातेरा । नरदेह बरा पावोनियां ।।४।।

(२५३)

न करी मी सेवा । देऊनियां मनोभावा ।।१।।
नामीं न बैसे विश्वास । धुंडी नाना साधनास ।।२।।
मागें असंग विरक्त । होवोनियां गेले भक्त ।।३।।
स्कंददास म्हणे देवा । वायां त्यांचा करी हेवा ।।४।।

(२५४)

कैसेन मी पाया । आकळेन देवराया ॥१॥
अणुमात्र देहा त्रास । होतां जीव कासाविस ॥२॥
आपुलिया सुखासाठी । दुज्या दु:खामाजीं लोटी ॥३॥
ज्ञानेशजे बहु दूर । जीवब्रह्मैक्य विचार ॥४॥

(२५५)

कधीं माझें भाग्य येईल उदया । ठेवीन या पायावरी डोई ॥१॥
विसरोनी देहभावाचे चिंतन । करीन स्मरण नामाचेची ॥२॥
सर्वांभूतीं कधीं तुजसी पाहीन । संताचा होईन वाहणधर ॥३॥
ज्ञानेशजे माये तळमळ पोटीं । कधीं तुझ्यासाठीं उपजेल ॥४॥

(२५६)

कोणेपरी देवा पावेन तुजसी । विचार मानसीं येत सदा ॥१॥
सर्वांभूतीं सम असोनी दातारा । पाहे सर्वश्वरा भेदबुद्धी ॥२॥
**आपुलेचि काम कराया लाजत ।**
**करवी ते नित दुज्या हातीं ॥३॥**
**ज्ञानेशजे माये होतसे अवज्ञा ।**
**करोनियां आज्ञा घेतां सेवा ॥४॥**

(२५७)

दावा कोणी तरी । दुर्बळाचा सहाकारि ॥१॥
मज झाला परदेश । चित्त झुरे रात्रंदिस ॥२॥
संत विसावले । तींचि दाखवा पाऊलें ॥३॥
स्कंददास म्हणे देवा । करा अंकिताचा केवा ॥४॥

(२५८)

कळों आलें सार । माझा मीचि दावेदार ॥१॥
करोनियां गेलों । परी शेखीं अडकलों ॥२॥
नोहे माझेनि सुटका । धांव वैकुंठनायका ॥३॥

ज्ञानेशजे आतां मना । पाजी प्रेमामृत पान्हा ।।४।।

(२५९)

नाहीं तुज कोणी घालित सांकडे । पाहे मजकडे कृपादृष्टि ।।१।।

अंतर बाहेर करोनी निर्मळ । देई भावबळ मायबापा ।।२।।

इंद्रियांचे हातीं सांपडलों भारी । सोडवण करी तेथोनियां ।।३।।

ज्ञानेशजे माये नसतां तूं साह्य । साधनें अपाय होती सर्व ।।४।।

(२६०)

अगा पंढरीशा सख्या नारायणा । आहे विज्ञापना पायापाशीं ।।१।।

नावरे हें मन विषयीं गुंतले । सांडुनि पाउलें तुमचीं देवा ।।२।।

जन्ममरणाच्या भोगी परंपरा । चिळसी दातारा न घे कांहीं ।।३।।

ज्ञानेशजे माये शिणलों बहुत । नको पाहूं अंत आतां माझा ।।४।।

(२६१)

बेगीं आतां धांव घाली । मन चाले निज चाली ।।१।।

भिता नाडला परमार्थ । प्रिय झाले कान्ता पुत्र ।।२।।

दृढ विषयाचे बेडी । मन रिते नोहे घडी ।।३।।

स्कंददास म्हणे धरा । मज पदरीं दातारा ।।४।।

(२६२)

विश्वाचा जिव्हाळा पाळितोसी लळा । आम्हांसी गोपाळा कां हो दैन्य ।।१।।

गजेंद्राच्या हांके धांवोनियां आला । माझीया कपाळा काय झाले ।।२।।

अंबरिषासाठीं सोशी गर्भवास । माझिया हांकेस ओ न देसी ।।३।।

स्कंददास म्हणे दीन सहाकारि । ब्रीद चराचरीं तुझें देवा ।।४।।

(२६३)

आलो पायापाशीं । नका करुं दूरदेशी ।।१।।

अगा जगाच्या जीवना । मज सख्या नारायणा ।।२।।

साहे अंकिताचा भार । ऐसा तुझा बडिवार ।।३।।

स्कंददास म्हणे मन । केलें पायीं समर्पण ।।४।।

(२६४)

जाणोनियां माझे मलीन अंतर । करीतसा दूर पायाहूनी ।।१।।

भावाविण तुज आळवी बाहेरी । जगामाजीं थोरी वाढवाया ।।२।।

साच परी काय करुं मी उपाय । नसताचि साह्य तुम्ही देवा ।।३।।

स्कंददास म्हणे याचि साठीं जाणा । भाकितो करूणा वेळोवेळीं ।।४।।

(२६५)

थोर या मनासी लागलीसे चाड । नसती आवड महंतीची ।।१।।

उणे पुरे कोणी बोलिल्या न साहे । अंतरीं तो वाहे ज्ञानगर्व ।।२।।

आपणापरीस न देखेचि कोणी । गुरू भक्त ज्ञानी बुद्धियुक्त ।।३।।

स्कंददास म्हणे सोडवा दातारा ।

**होतसे मातेरा मनासंगे ।।४।।**

(२६६)

असो द्यावा माझा । आठव तो केशिराजा ।।१।।

आहे तुझे द्वारीं । पातकी मी दुराचारि ।।२।।

सांपडलो भारी । दंभमानाचिये करीं ।।३।।

धांवा सोडवण । आलों पायीं लोटांगण ।।४।।

स्कंददास म्हणे द्यावा । निजचरणीं विसावा ।।५।।

(२६७)

केव्हां तुज माझा येईल आठव । करिशील कींव कई माझी ।।१।।

केव्हां या देहाचा पडेल विसर । प्रेमीं हें अंतर बुडेल कैं ।।२।।

केव्हां या मनासी लागेल आवडी । तुझी भोग गोडी सुटोनियां ।।३।।

स्कंददास म्हणे सर्व तुम्हाधीन । आमुचा तो यत्न न चले येथे ।।४।।

(२६८)

करी समाधान देऊनियां भेटी । जाहलो हिंपुटी मायबापा ।।१।।

तुजविण आम्हा झाला परदेश । पाहातसे वाट क्षणोक्षणीं ॥२॥
इंद्रियांचा दृढ पडला आवांका । वैकुंठनायका धांव वेगीं ॥३॥
स्कंददास म्हणे जीव हा घाबरा । माझिया माहेरा पाहावया ॥४॥
(२६९)
माझा भार तुम्हावरी । सर्वस्वेंचि जाणा हरी ॥१॥
नाहीं कोणतेहि बळ । जेणें तुटे मायाजाळ ॥२॥
तळमळ पायासाठीं । तीहि नाहीं जगजेठी ॥३॥
ऐसा आहे हीणकस । द्वारीं तुझ्या स्कंददास ॥४॥
(२७०)
आतां नका करुं माझा । अव्हेर जी केशिराजा ॥१॥
तुझे दिसोनियां पाय । यमाहातीं जाऊं काय ॥२॥
माझ्या अन्यायाच्या कोटी । घाला मायबापा पोटी ॥३।
अगा कृपेचा कोंवसा । ठेवि पायी स्कंददासा ॥४॥
(२७१) पद
निष्ठुर कां अशि झालिस मजविषीं सखये कान्हाबाई ग ॥धृ०॥
पतितपावन ब्रीद तुझे जगीं । देत संतश्रुति ग्वाही ॥
भावाविणहि नाम स्मरतां । मेळविला द्विज पायीं ॥१॥
दुष्टें द्रौपदी सभे गांजिता । आठवले तुज पाही ग ॥
कानीं ऐकुनि धांवा धांवलीं । ऐसें ब्रीद तंव ठायीं ग ।२॥
कपटें करुनि काशिपति तंव । रुप धरुनियां राही ग ।
परि ते न गणुनी झालीस त्यासी । स्वरूपमुक्तिदायी ग ॥३॥
अंबरीषाचे गर्भवास हरी । स्वयें आपण साही ग ।
स्कंददासापुरती करूणा । काय उरली नाहीं ग ॥४॥
(२७२)
मातेविण तान्हे । दिसतसे केविलवाणें ॥१॥

हरिणी चुकली पाडसा । हिंडतसे दाही दिशा ॥२॥

तैसी झाली माझी गति । भेटीसाठीं वाटे खंती ॥३॥

स्कंददास वनमाळी । कृपाकटाक्षें न्याहाळी ॥४॥

(२७३)

बहु झालो गा पीडीत । म्हणोनि आलों शरणागत ।

तुझें पायीं हित । जाणोनियां दयाळा ॥१॥

रागद्वेषादि तस्कर । लुटताती वारंवार ॥

म्हणोनियां फार । काकुळती येतसो ॥२॥

माझे मलिन अंतर । क्षणभरी नोहे स्थीर ॥

सुचवा विचार । कोणेपरी आकळू ॥३॥

स्कंददास म्हणे देवा । विपरीत कर्म ठेवा ॥

साच मनोभावा । देवो न शके तुम्हासी ॥४॥

(२७४)

समर्थाचे पोटां । जन्मा आलो मी करंटा ॥१॥

जनीं झालीसे दुष्कीर्ति । तुझ्या नामाची फजिती ॥२॥

धाडोनियां मूळ । करा अंतर उजळ ॥३॥

स्कंददास म्हणे जीणे । वाटतसे लाजिरवाणे ॥४॥

(२७५)

कृति माझी खोटी । वाया करी तोंड पिटी ॥१॥

हें तो तुम्ही जाणा सर्व । फुका वागवितो गर्व ॥२॥

नाहीं झिजविले । अंग सेवेंत आपुले ॥३॥

स्कंददास म्हणे नाम । तेहि नेघे रात्रंदिन ॥४॥

(२७६)

काय माझी गति होणार न कळे । बैसले ती डोळे लावोनियां ॥१॥

वाढविला मान जगामाजीं थोरी । अंतर विकारी जैसे तैसे ॥२॥

सुटोनियां तुझ्या पायाचें चिंतन । दंभ अभिमान बळावले ।।३।।
स्कंददास म्हणे तुझ्या पायाविण ।
**वाटतसे शीण जाणिवेचा ।।४।।**
(२७७)
आलों भिक्षेकरी । प्रभू तुमचिया द्वारीं ।।१।।
द्यावी मज प्रेमभीक । आम्ही न मागो आणीक ।।२।।
पाडी देहाचा विसर । नाम मुखीं निरंतर ।।३।।
स्कंददास म्हणे करी । कींव दुर्बळाची हरी ।।४।।
(२७८)
आतां कोठवरी । भाव पाहतां श्रीहरी ।।१।।
आंत बाहेरी सरसा । जैसा डगळे कोळसा ।।२।।
साचपणा उण । जेविं दुर्जनाचें मन ।।३।।
स्कंददास म्हणे शुद्ध । जाणा अपानाचा गंध ।।४।।
(२७९)
विनवितां तुज न येसी धांवोनी । नायकसी कानीं बोल माझे ।।१।।
भाग्यहीन नाहीं अल्प पुण्य गांठीं । कैसी होय भेटी पायीं तुझ्या ।।२।।
नोहे मनाजोगी मज हातीं सेवा । तुझ्या प्रेमभावा तेहि नेणें ।।३।।
स्कंददास म्हणे दिसते निरास । ठेवोनि विश्वास तुझ्या पायीं ।।४।।
(२८०)
असेल तें मनीं करुं निवेदन । न करुं वंचन तुम्हापाशीं ।।१।।
खरें खोटें तुम्ही जाणतसा स्वयें । परी म्यां सांगावें हेंचि बरें ।।२।।
येईल ते मना करा माझे हित । विश्वसोनी चित्त ठेवी पायीं ।।३।।
स्कंददास म्हणे श्रुत असे कीर्ति । पतिताची आर्ती पुरविता ।।४।।
(२८१)
माझ्या अपराधाची सीमा । नाहीं नाहीं पुरुषोत्तमा ।।१।।

तुमचे कंटाळले कान । माझे ऐकतां गाऱ्हाणं ।।२।।

परी जाऊं कोणापाशीं । कोण धरील पोटाशीं ।।३।।

सखे ज्ञानेशनंदिनी । नको देऊं मोकलोनी ।।४।।

(२८२)

मायबापाविण जाहला अनाथ । तेणें भिक्षोपाय स्वीकारावा ।।१।।

**नाहीं जया कोणी दाविणार वाट ।**

**साधन बोभाट करो तोचि ।।२।।**

आम्हालागीं सोपा वळला दयाळ । श्रीगुरू स्नेहाळ दीन बंधु ।।३।।

स्कंददास म्हणे गुरूवाक्याविण । आम्हांसी बंधन आन सारे ।।४।।

(२८३)

होते पूर्व कांही बरवे संचित । पायीं अवचित झाली भेटी ।।१।।

इये जन्मीचे तो न वर्णवे वाचे । दिसताती ख्याचे दृष्टिपुढें ।।२।।

कल्पकोटी नव्हे निरय सुटका । ऐसा सांठा निका संपादिला ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये येईल मनासी । तरीच पायासी भेटी पुन: ।।४।।

(२८४)

आतां रिझवावे कोणे । तुज सुस्वर गायनें ।।१।।

तालसुरा नाहीं ठाव । माधुर्याचे नेणो नांव ।।२।।

आहो जैशा तैशा स्थिती । आम्हां स्वीकारा श्रीपती ।।३।।

अहो आळंदीच्या राया । स्कंददास विनवी पाया ।।४।।

(२८५)

आठवितो पाय तुझे नारायणा । लागावया मना प्रेम गोडी ।।१।।

परी दिसे तुम्ही धरिले उदास । नेणो कैसी आस पुरेल ती ।।२।।

अंकिताचा भार वाहता मस्तकीं । ऐसी ख्याती लोकीं तुझी देवा ।।३।।

स्कंददास म्हणे अगा सोयरीया । नको देवराया दूर धरुं ।।४।।

(२८६)

नाहीं नारायणें केली ऐसी कृपा । जेणें जन तापा वारुं शके ।।१।।
नाहीं संपादिला श्रीगुरूप्रसाद । जेणे करुं बोध तुम्हां लागीं ।।२।।
मजहून आन चतुर पंडित । मूढ मी पतित काय बोलूं ।।३।।
स्कंददास म्हणे आणिक मी नेणें । संतांची वचनें पाठ करी ।।४।।
(२८७)
नये माझी दया । तुम्हां आळंदीच्या राया ।।१।।
करोनियां अंगीकार । आतां पडला विसर ।।२।।
आहे पापराशी । हे तो विदित पायाशीं ।।३।।
स्कंददास म्हणे वीट । येतां माझी कोण वाट ।।४।।
(२८८)
ऐसा कोण काय । केला मियां जी अन्याय ।।१।।
स्वप्नींहि न डोळा दावा । निज पाउलें केशवा ।।२।।
वारंवार भाकी कींव । परी नयेचि आठव ।।३।।
ज्ञानेशजे दंड करी । दया ठेवुनी अंतरीं ।।४।।
(२८९)
नटाचिये परी । भावेविण ढोंग करी ।।१।।
भजन पूजन । आत्मचर्चा आणि ध्यान ।।२।।
जना दावावा पसारा । अंतरीं तो शुद्ध कोरा ।।३।।
ज्ञानेशजे हातीं धरी । वाहविलों भवपुरीं ।।४।।
(२९०)
तुझ्या पायासाठीं । असे आर्तभूत पोटीं ।।१।।
नाहीं जाणिला महिमा । आजवरी पुरूषोत्तमा ।।२।।
एकनिष्ठ करुं सेवा । हेचि आवडीसे जीवा ।।३।।
ज्ञानेशजे माझी आळी । पुरविशी कधीं काळीं ।।४।।
(२९१)

मज अज्ञानी लेंकुरा । मायबाप तूं सोयरा ।।१।।

वाचे आठवितो नांव । याचा असो द्या आठव ।।२।।

जरी चुकलो मी वाट । तरी होईल बोभाट ।।३।।

स्कंददास म्हणे बोल । तुम्हां सज्जन देतील ।।४।।

(२९२)

आतां माझा कैसा व्हावा गा उद्धार । न दिसे अंतर जरी बोला ।।१।।

कोण तुजहूनि पाहूं मी दुसरा । मायेच्या दातारा तिहीं लोकीं ।।२।।

सर्वाहि अधिक प्रिय पुत्रबंधु । लावता (पावतां) संबंधु तोहि तैसा ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये एक तुझा प्रेम । सांगती निष्काम श्रुतिसंत ।।४।।

(२९३)

माझे पाहोनियां नाना अपराध । आला जरी क्रोध तुज लागीं ।।१।।

तेणे द्यावा वाटे मज तीव्र दंड । तरी वारी बंड इंद्रियांचे ।।२।।

जरी वाटे तुज योग्य शाप देणें । करी या वासने निसंतान ।।३।।

अज्ञानी जाणोनी येत कळवळा । तरी द्या जिव्हाळा भक्तिप्रेम ।।४।।

ज्ञानेशजे तुज वाटे तैसे परी । तारी अथवा मारी निज हातें ।।५।।

(२९४)

धांव मायबापा आळंदीच्या राया । पिडीलों सखया भवतापे ।।१।।

आम्हां दीन दुःखिताचा रे कवणा । कोणालागीं यावा तुम्हाविण ।।२।।

समर्थे दिधला शिरावरी हात । श्रुत झाली मात लोकांमाजी ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये केले दूरदेशी । आतां कोणापाशीं तोंड वासूं ।।४।।

(२९५)

आधीं पाळोनियां लळा । आतां कांपिता कां गळा ।।१।।

होतो विसंबोनी पायीं । आजवरी मायबाई ।।२।।

आतां धरियेली अढी । केविं तुटे भवबेडी ।।३।।

ज्ञानेशजे उणे ब्रीदा । आम्ही भोगितो आपदा ।।४।।

(२९६)

पोटीचे बालक निघतां अवगुणी । न देती टाकोनी मायबाप ॥१॥

नाहीं एक कोणी गुण कर्म धड । परी करिती कोड नानापरी ॥२॥

तैशापरी आम्ही अवगुणांचे राशी । परी घाली पाठीशीं मायबापा ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये आहे गर्भगोळ । नाहीं आंगीं बळ उद्यमाचे ॥४॥

(२९७)

कळेना अंतरीं जाऊं कोण्या वाटे । फुटताती फाटे बुद्धिलागीं ॥१॥

कृपें तुम्ही कांहीं दाखवावा मार्ग । तो दिसे उबग धरियेला ॥२॥

ऐशा विवंचनें कासाविस जीव । प्राण देतां भेव शापाचें तें ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये येऊं दे करूणा । जातो आडराना तुजविण ॥४॥

(२९८)

दिसेल उचित तैसे तुम्ही करा । सुखें भोगूं फेरा संचिताचा ॥१॥

ेकाय समर्थांसी विनवावे रंकें । कोण त्याचे ऐके वचन तेथे ॥२॥

थोराचिया घरीं थोरासीच मान । कोण पुसे दीन याचकाते ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये ठेविला विश्वास । परी तो निरास होवो पाहे ॥४॥

(२९९)

मज दुर्बळाची नये तुज कींव । दिसो आला भाव खोटा माझा ॥१॥

आतां मज कोण करील जवळी । नाहीं कोणीं बळी तुजहूनि ॥२॥

तुझा एक चित्तीं होतां भरंवसा । निमो पाहे सहसा तोहि आंता ॥३॥

ज्ञानेशजे तुझा म्हणताती मज । याची ठेवी लाज कांहीं तरी ॥४॥

(३००)

आम्ही कवणाची करावी गा आस । जाहला उदास तूंचि जरी ॥१॥

आम्हा दुर्बळाची तूं एक माउली । पाहता वाटुली रात्रंदिन ॥२॥

मोक्ष वाटवधा विश्राम साउली । आम्हां ते लाधली दैवयोगें ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये आम्ही तुजविण । दिसतसो दीन मायबापा ॥४॥

**(३०१) मागणे**

**विषयाचे ठायीं नको माझी मती ।**

**सदा तुझी प्रीती चित्तीं राहो ।।१।।**

**कोण आणिकाचा नको मागे पांग ।**

**आवडे तो संग सज्जनाचा ।।२।।**

**मागें पुढें तूंचि आम्हां सांभाळिता ।**

**विश्वास हा चित्ता दृढ असो ।।३।।**

**ज्ञानेश्वरकन्ये नको या परती ।**

**दुजी कोण स्थिती उत्तम ती ।।४।।**

(३०२)

कोणते म्यां ऐसे केले गा पातक । जेणें तुज धाक उपजला ।।१।।

नामाचा प्रताप घालविलासे वाया । ऐसा कां बळिया पापी झालों ।।२।।

पुराणीं पवाडे गायिले बहुती । तरी काय होती मिथ्या सर्व ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये होईल फजिती । याची धरी चित्ती लाज कांहीं ।।४।।

(३०३)

आम्ही हीन म्हणोनि चालो भलत्या चालीं । समर्थें ब्रीदावळी सांडूं नये ।।१।।

लाडविल्या श्वान जवळी ये धांवोन । करितां ताडण दुरी जाय ।।२।।

**तैसें लाडवितां ठेवूं भाव पायीं ।**

**कष्ट होतां देहीं सांडूं सर्व ।।३।।**

ज्ञानेश्वरकन्ये आपुली पदवी । समर्थें पाळावी सर्वकाळ ।।४।।

(३०४)

कोठवरी धरूं धीर । तुझा नसतां आधार ।।१।।

कामक्रोधादींच्या लाटा । पाहतां भय वाटे पोटा ।।२।।

क्षणीं तळीं क्षणीं वरी । वाहावितो भवपुरीं ।।३।।

ज्ञानेशजे मायबाई । मज अपांगिता नाहीं ।।४।।

(३०५)

टाकियेला भार । तुमचिया पायावर ।।१।।

वाटे तहीं दावा । तुमची पाऊले केशवा ।।२।।

नाहीं प्रेमबळ । कोणेपरी घेऊं आळ ।।३।।

स्कंददास दीन । सर्व दुर्गुणाची खाण ।।४।।

(३०६)

आपुलिया बळें तरेन सहसा । ही तो नाहीं आशा अल्प मनीं ।।१।।

म्हणवुनि तुम्हा येतो काकुळती । आशाभूत चित्तीं होवोनियां ।।२।।

कराल तें होय ऐसें अंगीं बळ । नका टाळाटाळ करुं आतां ।।३।।

स्कंददास म्हणे न लावा उशीर । नाम दीनोद्धार साच करा ।।४।।

(३०७)

माझियाचि दैवे । डोळे लावियेले देवें ।।१।।

मागें बहुतां तारिले । श्रुतिसंती वर्णियेले ।।२।।

अजामिळ पापराशी । सरता केला पायापाशीं ।।३।।

स्कंददास म्हणे देवा । नाहीं सुकृताचा ठेवा ।।४।।

(३०८)

माझ्या अपराधा सीमा । नाहीं नाहीं पुरुषोत्तमा ।।१।।

तुमचें कंटाळलें कान । माझें ऐकतां गाऱ्हाणं ।।२।।

परी जाऊं कोणापाशीं । कोण धरील पोटाशी ।।३।।

सखे ज्ञानेशनंदिनीं । नको देऊं मोकलोनी ।।४।।

(३०९)

**तृण पाहतां हिरवें । पशु भांबावोनी धांवे ।।१।।**

**तैसे विषयाचे भेटीं ।**

**विवेकाची नुरे गोठी ।।२।।**

**आवरितां आवरेना ।**

मज भोगाची वासना ॥३॥

स्कंददास म्हणे स्थिर । पायीं नोहेचि अंतर ॥४॥

(३१०)

उदाराचा राणा म्हणविसी जनीं । पाळिलें निर्वाणीं भक्त बहु ॥१॥

कपाळ करंटा जन्मलो दातारा । तुझाहि आसरा नाहीं मज ॥२॥

येतां काकुळती नये कांहीं दया । मज अभागिया विषीं तुज ॥३॥

स्कंददास म्हणे परी विसंबोनी । आहे चक्रपाणी पायीं तुझ्या ॥४॥

(३११)●

जाणिवेचा शीण आला मज देवा ।

वाटतो बरवा भोळा भाव ॥१॥

भोळा भाव देई भोळा भाव देई ।

आन नको कांहीं प्रेमाविण ॥२॥

नामाच्या गजरें आनंदे नाचेन ।

नाहीं आठवण देहभावा ॥३॥

स्कंददास म्हणे दाखवावा डोळा ।

प्रेमाचा सोहळा ऐसा मज ॥४॥

(३१२) मागणे

माउलीचे परी पाजी प्रेम पान्हा ।

मज निज तान्हा मानोनिया ॥१॥

माउलीचे परी धांवे बोरसोनी ।

आपुलें मानोनी वत्स मज ॥२॥

कूर्मीचिये परी प्रेमपूर्ण दृष्टी ।

पाहोनी निवटी शीण भाग ॥३॥

स्कंददास म्हणे धरलीसे कास । नको माझी आस तोडूं देवा ॥४॥

(३१३)

*कांहो नारायणा जाहले उदास । धरावी म्यां कास कवणाची ।।१।।*

*भेटीसाठीं जीव होतो उतावीळ । जातो पळपळ वैरियाचा ।।२।।*

*ऐकोनियां कानीं तुझी ब्रीदावळी । घेतलीसे रळी पायापाशीं ।।३।।*

***स्कंददास म्हणे नसेचि आसरा ।***

***आणिक दुसरा तुजविण ।।४।।***

*(३१४)*

*विश्वाचा जिव्हाळा पाळितोसी लळा । आम्हांसी गोपाळा कां हो दैन्य ।।*

*गजेंद्राच्या हांके धांवोनियां आला । माझिया कपाळा काय झाले ।।२।।*

*अंबरीषासाठीं घेसी गर्भवास। माझिया हांकेस ओ न देसी ।।३।।*

*स्कंददास म्हणे दीन सहाकारि । ब्रीद चराचरीं तुझें देवा ।।४।।*

*(३१५)*

*प्रेमाचे आगळे भक्तीचे पुतळे । झालेती सगळे भक्त तुझे ।।१।।*

*तैसा नाहीं माझा प्रेमा तुझे पायीं । तरी मज कायीं दोष सांगे ।।२।।*

*कोठोनियां आणूं तैसा भक्तिभाव । नाहीं तूं सावेव दिला जरी ।।३।।*

*स्कंददास म्हणे प्रेमाविण सेवा । करोनियां देवा घ्यावी गोडी ।।४।।*

*(३१६)*

*बोलविली तैसी बोलिलों अक्षरें । सज्जनीं साचारें उपसाहावी ।।१।।*

*आपुलिया बळें नाहीं बोलवत । सखा कृपावंत वाचा त्याची ।।२।।*

*समर्थाची वाणी न म्हणावी मिथ्या । सर्वशक्तिमत्ता देवा ठायीं ।।३।।*

*स्कंददास म्हणे मूढ मी पामर । पायीची पैजार तुमचिया ।।४।।*

*(३१७)*

*कांहो नारायणा झांकलेती डोळे । विपरीत काळें मांडियेलें ।।१।।*

*बाहेरी दिसती पंडित सज्ञानी । अंतरीं करणी नसतीच ।।२।।*

*जनीं मिरविती एकपत्नीव्रती । प्रसंगीं भोगिती कन्या सुना ।।३।।*

*स्कंददास म्हणे घाला कांहीं आळा । यांचिया चांडाळा प्रवृत्तीसी ।।४।।*

(३१८)

संतांच्या वचनें करितां भजन । लाजतसे मन मनामाजी ।।१।।

नसोनियां भाव जीवीं तळमळ । आळवी गोपाळ नाना परी ।।२।।

ऐसे वाटोनियां न करी भजन । नेदी समाधान परी ते ही ।।३।।

स्कंददास म्हणे ऐसियांचि परी । चाललासे हरी काळ माझा ।।४।।

(३१९)

कोणालागीं आतां जाऊं मी शरण । कोण माझा शीण निवारील ।।१।।

कोणापुढें आतां पसरुं पदर । कोण अंगीकार करील नेणें ।।२।।

कोण मज पुढें दाखवील वाट । येतां माझा वीट तुजलागीं ।।३।।

स्कंददास म्हणे कोणावरी भार । घालावा साचार मिया आतां ।।४।।

(३२०)

**तुमची वचनें प्रेमाचिया वेली ।**

माझिया साऊली सुकती त्या ।।१।।

लाज वाटे मना उच्चारितां मुखें । भावेविण सुखे (कोरडें) बोभाइणें ।

आपुल्या वचना देऊनियां मान । करा भावपूर्ण चित्त माझें ।।३।।

**स्कंददास म्हणे बोलवा अक्षरें ।**

**चित्त प्रेमभरें भरोनियां ।।४।।**

(३२१)

आतां माझा कांहीं न चले उपाय । आठवितो पाय याचिसाठीं ।।१।।

कामक्रोधवैरी ठाकलेती आड । संसार काबाड वाहविती ।।२।।

आपुलिया बळें कराल उद्धार । भवसिंधुपार पावेन तैं ।।३।।

ज्ञानेशजे तुज येतो काकुळती ।

**नको नेत्रपाती लावूं माये ।।४।।**

(३२२)

करिसील कृपा तरी हा नवस । तुज रात्रंदिन आठवीन ।।१।।

*मग मी न पाहे मागिला पुढिला । सुखदु:ख घाला आन कांहीं ।।२।।*

*पुरवावी आस पतितपावना । येऊं दे करुणा कांहीं तरीं ।।३।।*

*स्कंददास म्हणे कीर्तनाची गोडी ।*

*आहे,* ***द्यावी जोडी प्रेमस्फूर्ति*** *।।४।।*

*(३२३)*

*कवणिये रीति वागावे न कळे । मार्ग न उजळे मजलागीं ।।१।।*

*दावा मज वाट पतित पावना । कृपासिंधुपणा साच करा ।।२।।*

*पडलों आवर्तीं विषयाचे गोवी । येथुनि सोडवी निजबळे ।।३।।*

*स्कंददास तुझा म्हणवितो दास ।*

***न धरी उदास मायबापा ।।४।।***

***(३२४)  असार वार्तालाप***

*सर्वभावें हीन असे नारायणा । नाहीं कोण्या गुणा ठाव आंगीं ।।१।।*

*पापाचें माहेर दुर्गुणा बिढार । कैसा अंगीकार होय नेणें ।।२।।*

***सज्जनीं वाळिला दुर्जनीं पाळिला ।***

***स्त्रियेचा अंकिला सर्वकाळ ।।३।।***

***स्कंददास म्हणे आठही प्रहर ।***

***जाताती असार वार्तालापीं ।।४।।***

*(३२५)*

*देवाचा करंटा हातीं चिंतामणी । परी न जाणोनी दूर लोटी ।।१।।*

*कावळियापुढें केला मुक्ताहार । डावलोनी ढोर खाया धांवे ।।२।।*

*पंचपक्वान्नाचें मिळालें भोजन । परी धांवे श्वान हाडासाठीं ।।३।।*

*स्कंददास म्हणे कैवल्याचा दानी । श्रीगुरू लाधोनी वायां गेलों ।।४।।*

*(३२६) पद*

*कळले कसे तुजचि असे ।।धृ०।।*

*शरण गुरूसि रिघुनि पाहि देव तुझ्या आंत असे ।।१।।*

नेति नेति म्हणुनि श्रुति शक्तिवृत्ति वारितसे ।

शब्द लक्ष्य साक्ष अशी देति संत जाणतसे ॥२॥

काम मनीं राम तरी असुनि जवळि तुज न दिसे ।

सोडि काम गाई नाम श्याम तुज भिन्न नसे ॥३॥

अंतरंग करि असंग संतसंगतींत वसे ।

स्कंददास विनवि मना सांडि सांडि विषयपिसे ॥४॥

(३२७)

कितीक करावी तुझी विनवणी । न घेसीच कानीं बोल माझें ॥१॥

क्षणीं क्षणीं तुझा पडतो विसर । आवेशे अंतर विषयावरी ॥२॥

नानापरी चित्तीं उठताती वृत्ति । काय लक्ष्मीपती करुं येथें ॥३॥

उदाराचा राणा ऐसी तुझी ख्याती । माझीच श्रीपति उपेक्षा कां ॥४॥

स्कंददास म्हणे निवारावा शीण । ज्ञानेशजे गुण न पाहतां ॥५॥

(३२८)

काय माता मारी । बाळा प्राण जायवरी ॥१॥

उनाड लेंकरुं । माता नेणें जीवे मारुं ॥२॥

नेणें लोहा दूर लोटूं । आल्या परीस संघटू ॥३॥

न गणोनी  हुंदाडा । धेनू वत्सा घेत पुढा ॥४॥

ज्ञानेशजे तैशा परी । माझा अव्हेर न करी ॥५॥

(३२९) पद

मन हें जडलेसें तव पायीं । धांव गे कृष्णाबाई ॥१॥

न सुचे मजला करुं कायी । सुचवा उपाय कांहीं ॥२॥

वाटते मज खंती बहु भेटी । झालों व्याकुळ पोटीं ॥३॥

वत्सालागीं रे जसी धेनू । ...... ॥४॥

(३३०)

नका आतां मज मोकलूं दातारा । नाहीं मज थारा तुजविण ॥१॥

नाहीं पुण्यलेश जोडला पदरीं । केलीसे सामुग्री नरकाची ।।२।।

अझुनी नुपजे विषयीं कंटाळा । इंद्रियांचा चाळा शांत नोहे ।।३।।

स्कंददास म्हणे आपुलिया सत्ता । उद्धरा पतिता मजलागीं ।।४।।

(३३१)

तुम्ही अंगीकारिलिया । करुं चिंता मी कासया ।।१।।

आतां आपुले पहावे । निजब्रीद सांभाळावे ।।२।।

दिधलीया वचनासीं । प्रतिपाळा हृषीकेशी ।।३।।

स्कंददास म्हणे ठेवा । मज पायापाशीं देवा ।।४।।

(३३२)

झालें साशंक हें मन । म्हणोनी दिली आठवण ।।१।।

अन्याय तो क्षमा करी । माय बालकाचे परीं ।।२।।

नको पाहूं माझें चित्त । आद्यवेचि शंकाग्रस्त ।।३।।

ज्ञानेशजे मायबाई । स्कंददास ठेवा पायीं ।।४।।

(३३३)

ये वो  ये वो पांडुरंगे । माझ्या जीवीचे जिवलगे ।।१।।

तुजविण परदेशी । नेई मज माहेरासी ।।२।।

**तुझें पाहतां श्रीमुख ।**

**हारपेल जन्मदुःख ।।३।।**

स्कंददास तुझे भेटी । कासाविस जगजेठी ।।४।।

(३३४)

कोणेपरी तुज पावेन दातारा । केविं पायीं थारा मिळे मज ।।१।।

फुकाचें तें नाम नये कधीं तोंडीं । सदा बडबडी जूनवार्ता ।।२।।

स्त्रियापुत्रांचे ते लागलेसे पिसे । विसर तो नसे निमिष ही ।।३।।

स्कंददास म्हणे केला अंगीकार । म्हणोनियां भार घातलासे ।।४।।

(३३५)

कवणिया गुणें धरिलासी कोप । होसी मायबाप जगाचा तूं ।।१।।
तूंच रुसलिया कोणापाशीं जावे । दुःख हें सांगावे शीण भाग ।।२।।
नावरती इंद्रियें धांवती सैराट । तुझे नामीं वीट येत तया ।।३।।
स्कंददास म्हणे कांहीं धीर देई । नका शेषशाई अंत पाहूं ।।४।।
(३३६)
नका पाहूं दोष गुण । नाहीं उण तयासी ।।१।।
नखशिख पापराशी । आहे दोषी आगळा ।।२।।
दाविलिया न वचे वाटा । ऐसा खोटा सर्वस्वीं ।।३।।
स्कंददास नष्ट खरा । परि न करा अव्हेर ।।४।।
(३३७)
अगा केशीराजा पतितपावना । येऊं दे करूणा कांहीं माझी ।।१।।
मज हीं इंद्रियें झालीं अनावर । न सुचे विचार काय करुं ।।२।।
आपुलिया बळें सांभाळावे मज । नाहीं तरी काज अंतरेल ।।३।।
स्कंददास म्हणे अहो पूतनारी । दीन साहाकारी तुम्ही देवा ।।४।।
(३३८)
कधीं तैसे सुख भोगीन मागुती । वाटतसे चित्तीं तळमळ ।।१।।
अमृताचा कुंभ सुदैवें लाधला । लाथें उलंडिला नेणोनिया ।।२।।
आसन्नमरणीं येतां धन्वन्तरी । दवडीला दुरी अकस्मात ।।३।।
स्कंददास म्हणे तैसी झाली परी । मायबाप हरी भेटोनियां ।।४।।
(३३९)
अगा केशीराजा पतित पावना । येऊं दे करुणा कांहीं माझी ।।१।।
हीन दीन पापी आलों पायापाशीं । नका दूरदेशी करुं मज ।।२।।
नको पाहूं माझे गुण दोष कांहीं । लवलेश नाहीं सदगुणाचा ।।३।।
स्कंददासतरू तुम्हीच लावोनी । स्वहस्तें करोनी तोडूं नये ।।४।।
(३४०)

आतां एकवेळ करोनियां क्षमा । द्यावा मेघःश्यामा प्रेमा मज ।।१।।
प्रेमें द्रवीभूत झालिया अंतर । सांडील समग्र निजदोष ।।२।।
मग तुम्ही सुखें राहावें येवोनि । हृदयीं भुवनीं माझ्या देवा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये येतो काकुळती । सूत्र तुझे हातीं म्हणोनियां ।।४।।

(३४१)

दावाल कां मज एकवेळ डोळां । भेटीचा सोहळा आपुलिया ।।१।।
कराल कां देवा ऐशी माझी स्थिति । एक तुझी प्रीति मनीं वसे ।।२।।
निवाराल काय कोणी माझा ताप । संत मायबाप दीनबंधु ।।३।।
ज्ञानेशजे काय धरशील हातीं । माझ्या जन्मपंक्ति चुकवाया ।।४।।

(३४२)

**कठीण हृदय न फुटे पाझर ।**
**नायके सादर गुण तुझे ।।१।।**
कां हो देवा ऐसी केली माझी गति । कांहो यमाहातीं देतां मज ।।२।।
वाढविला चित्तीं जाणीवाभिमान । ठेविला चोरोन भक्तिप्रेमा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये धरोनियां मौन । पाहसी पतन सुखें माझें ।।४।।

(३४३)

तुझिया कृपेचा पोसणा दातारा । कां हो गोपीवरा कींव नये ।।१।।
आठहि प्रहर जाती वायफळ । नेघे वाचा पळ नाम तुझें ।।२।।
पुढे कोण गति होईल न कळे । जीव तळमळे रात्रंदिन ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये न सुचे उपाय । कोणे परी पाय आकळावे ।।४।।

(३४४)

सांगितला मार्ग कळेना बुद्धीसी । कोण उपायासी करुं आतां ।।१।।
क्रियेमाजीं नित्य वाढतो संशय । योग्य हेचि होय किंवा नाहीं ।।२।।
कळे तैसे करी आज्ञेचें पालन । परी राहे मन संशयीत ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये उघड करोनी । दावावी जननी वाट मज ।।४।।

**(३४५)**

**कोण मज आतां धरोनी पोटासीं ।**

**हातें वदनासी कुरवाळील ॥१॥**

**श्रमल्या भागल्या कोण बुझावील ।**

**जरी न येशील धांवोनियां ॥२॥**

**कोण माझे दोष करील सहन ।**

**तूंचि कंटाळोन जासी जरी ॥३॥**

**ज्ञानेश्वरकन्ये तूंचि उपेक्षिता ।**

**कोण माझी चिंता वागवील ॥४॥**

(३४६)

कांहो केले देवा कठीण हृदय । होसी बापमाय जगाचा या ॥१॥

अनंत अपराधी असलाही सुत । तरी नेच्छी घात माय त्याचा ॥२॥

मायबापाहोनि होसी तूं कृपाळ । बोलताती बोल संत ऐसा ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये नको भरुं रागे । मातृप्रेमा जागे आपुलिया ॥४॥

(३४७)

कांहो मज एका टाकिले वाळित । तारिले पतित मागे किती ॥१॥

काय मीच एक पतित आगळा । वरिष्ठ सकळा पाप्यामाजीं ॥२॥

सांगा ऐसें कोण आचरिलों पाप । जेणें आला कोप माझा तुम्हा ॥३॥

ज्ञानेशजासुत विनवी गोपाळा । नका देऊं काळाहांतीं मज ॥४॥

(३४८)

केला तो नियम चालवी दातारा । कोण्याहि प्रकारा करोनियां ॥१॥

नेदी मी आपुल्या मनाचा विश्वास । सदा अहितास हित मानी ॥२॥

परी आहे तुझ्या प्रेमाचा भुकेला । ठाऊकें तुम्हांला खरें खोटें ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये समर्थ असता । उणे चाळविता पदा तुझ्या ॥४॥

(३४९)

आठहि प्रहर विषयाच्या हांवे । रानोमाळ धांवे चित्त माझें ।।१।।
करितो प्रतिज्ञा विकारी होऊनी । विकारी होऊनी मोडूं इच्छी ।।२।।
न कळे हें मन कवण्या अपायीं । गुंतवील आई मजलागीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये म्हणोनियां धांवा । करितो कणवा येऊं देई ।।४।।

(३५०) जाणीवेचा अहंकार

न कळे कासया म्हणताती ज्ञान । परी उगे मन भार वाहे ।।१।।
कांहींबाही मनीं येताती विचार । वाटताती थोर मज तेचि ।।२।।
जाणीव नेणीव तुम्हालागीं ठावे । मी तो सर्वभावें मूढबुद्धि ।।३।।
ज्ञानेशजे नको गुंतवूं मजसी । अहंकारापाशीं जाणिवेच्या ।।४।।

(३५१)

न  कळे आचार न कळे विचार । माझा सर्व भार तुजवरी ।।१।।
न कळे सगुण न कळे निर्गुण । घेतो एक क्षण नाम तुझे ।।२।।
नेणें संतसंग महावाक्यबोध । शुद्ध मतिमंद पाषाणचि ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये वाटतो आसरा । देसील पामरा हातभार ।।४।।

(३५२)

करोनियां अंगीकार । माझे मलीन अंतर ।।१।।
हे तो समर्थासी उणे । गाती पवाडे पुराणे ।।२।।
चोखाळोनी दावा वाट । पाय आकळीन नीट ।।३।।
कोणालागीं शरण जाऊं । कोण दावील उपावू ।।४।।
आळंदीशा तुम्हाविणें । ज्ञानेशजा सुत म्हणें ।।५।।

(३५३)

पतित मी थोर शरण आलों पायीं । राखी कृष्णाबाई लाज माझी ।।१।।
नेणें कर्मधर्म नेणें करुं सेवा । विषयाचा गोवा आठ प्रहर ।।२।।
प्रारब्ध गहन राहो नेदी स्थिर । चित्त घडीभर पायीं तुझ्या ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये येतो काकुळती । नको यमाहातीं देवो मज ।।४।।

(३५४)

आपुल्या दासाची सत्य व्हावी वाणी । याची चक्रपाणी ठेवा लाज ॥१॥

तुझिया दयेचा सज्जनीं डांगोरा । पिटीला गजरा करोनिया ॥२॥

सर्वांमुखीं देवा झाली तुझी कीर्ति । आतां अपकीर्ति होवो पाहे ॥३॥

ज्ञानेश्वरकन्यासुतचि एकटा । त्यागोनियां बट्टा लाविसी कां ॥४॥

(३५५)

नाहीं ताल नाहीं सूर । गातो खरसमान ॥१॥

तेणें मनीं वाटे लाज । कैसे काज होईल ॥२॥

नका पाहूं गुण दोष । निजदास जाणोनी ॥३॥

ज्ञानेशजे गुरुनाथा । हेंचि आतां विनवी ॥४॥

(३५६)

कोण माझा लाड पुरवील तरी । नये तुज जरी कींव माझी ॥१॥

काय थोरी त्याचा करिता उद्धार । केलें ऋणदार तुज जिहीं ॥२॥

मजसम पापी नेशील तारोनी । तरी संतवाणी साच मानूं ॥३॥

ज्ञानेश्वरकन्या वचन पाळाया । तरी व्रजराया पाय दावी ॥४॥

(३५७)

संत मायबाप दीनाचे आधारु । घेतील कैवारु माझाचि ते ॥१॥

लावतील दोष तुमचे पदरीं । होईल बोहरी त्वद् ब्रीदाची ॥२॥

आजवरी तुझी तिहीं लोकीं कीर्ति । उपेक्षा श्रीपति न करितां ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये माझ्या एकासाठीं । काय कीर्तिपाठी लाथ देसी ॥४॥

(३५८)

आजवरी तुवां माझा बडिवार । लोकापाशीं फार वाखाणिला ॥१॥

आतां माझे ठायीं दिसतां दुर्गुण । काय हो सज्जन म्हणतील ॥२॥

मोहे पुत्रदोषा घालोनि पलोडा । लाविला उघडा दुज्या दोष ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये हे तो अनुचित । गळी अपकीर्त पडो पाहे ॥४॥

(३५९)

म्हणाल कीं मियां अंतरीचा भाव । किमपि सावेव न जाणिला ।।१।।

कोणा ठावे तुझे कुटिल अंतर । अयोग्य उत्तर जननी हे ।।२।।

ङ्अंतर्यामीफतुज सांगतसे श्रुति । तरी केविं उक्ति योग्य होय ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये जैसा तैसा आतां । सांभाळ तत्त्वतां करी माये ।।४।।

(३६०)

**दुःखाचिया भरें चित्त हुरळता ।**

**विचार तत्त्वता हारपती ।।१।।**

**म्हणोनी सज्जनी दुःखितांचे दोष ।**

**तिळहि मनास आणूं नये ।।२।।**

एक मजलागीं तुझाचि आधार । तोहि तूं साचार तोडितेसी ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये तेणें दुःख फार । व्याकुळ अंतर दिननिशीं ।।४।।

(३६१)

म्हणसील मियां वचन सोपारें । बहुतप्रकारें शिकविलें ।।१।।

कंटाळला जीव नोहे तुज बोध । म्हणोनियां मुग्ध बैसली मी ।।२।।

ऐकतां वचन हांसतील संत । म्हणत नुचित मातृपदा ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये कां न दिला दंड । जरी तुज पुंड वाटलों मी ।।४।।

(३६२)

दंडहि दिधला बहुत प्रकारें । परी चित्त बारे स्थिर नोहे ।।१।।

काय करुं माझा सरला उपाय । सबब ही होय जरी तुझी ।।२।।

बाळपणीं दंड कोणी सांगितला । जननी चुकला मार्ग तुझा ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये देतां स्तनपान । कासया भांडण करितो मी ।।४।।

(३६३)

नामाते स्मरूनि पापें आचरितां । नामाचाचि ताता दोष होय ।।१।।

नामापराधिया होईल सुटका । ये रमानायका कृपा जरी ।।२।।

परी माझा तेथें दोष असे कोण । कां न प्रेमदान दिले माते ॥३॥
ज्ञानेश्वरकन्ये सर्वांचें कारण । तुझेचि चरण सत्य जाणे ॥४॥

(३६४)

सर्वाचें कारण तूंचि वो जननी । म्हणोनी चरणीं विनवितो ॥१॥
माझिया पातका तुम्हीच कारण । निवटावे पूर्ण नामबळें ॥२॥
**हृदयकमळीं ठेवावे चरण । भावें मी क्षाळीन नेत्रोदकें ॥३॥**
ज्ञानेशजे जातां संतकानीं वार्ता । देतील सर्वथा दोष तुम्हां ॥४॥

(३६५)

पुनः पुनः पापें आचरीतो तेचि । म्हणोनि नयेचि दृष्टिपुढें ॥१॥
ऐसें जरी द्याल उत्तर यावरी । दोष कोणावरी सांगा याचा ॥२॥
विषयांत सुख न वाटते मना । तरी कां चरणा विसरतो ॥३॥
ज्ञानेश्वरकन्ये आपुल्या ओसंगीं । घेतां दोषसंगीं जातो काह्या ॥४॥

(३६६)

तुवां उपेक्षिले दोषी नागविले । दुरी पुनः केले दोषी म्हणू ॥१॥
कोणापाशीं मागूं ययाची मी दाद । प्रसंग दुःखद ओढवला ॥२॥
बाळपणीं माता न बाहेचि चिंता । तस्कर निघतां कोप धरी ॥३॥
तरी तया बाळा कोण वो शरण । आळंदीनिधानकन्ये सांगे ॥४॥

(३७)

तुम्ही संत मायबाप कृपावंत । तारिले पतित नेणों कीति ॥१॥
समर्थे तुमचा गायिला महिमा । उबग कां मना मजविषयीं ॥२॥
वचनआधारें भांडीन तुम्हासी । मागेन पायासी न्याय याचा ॥३॥
ज्ञानेश्वरकन्ये आयिकी वचन । उत्तराकारण सज्ज होई ॥४॥

(३६८)

कोणते पातक आहे असे सांग । वाचे रमारंग घेतो उरें ॥१॥
न तावत्पापमस्ति हें वचन । आगम गर्जोन बोलतसे ॥२॥

मग कां उशीर याया दृष्टिपुढें । नामावळि गाढी जपतांहि ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये पापाचें कारण । विफळचि जाण न यावया ।।४।।
(३६९)
घडलीं पातकें हें तो नाहीं खोटें । क्षमा नेटोपाटे केली त्वांहि ।।१।।
क्षमा केल्यावरी पुन: आचरलों । अपात्र जाहलों विश्वासातें ।।२।।
आतां कोण्या तोंडें देऊं भरंवसा । विषाद मानसा फार वाटे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये ऐसाहि पातकी । परी तुझा लोकीं म्हणवितो ।।४।।
(३७०)
समर्थाचें मूल खेळता बिदीसी । उणें समर्थासी बोलणें हें ।।१।।
तेविं मी तुमचा म्हणवितो ताता । खाता यमलाथा उणें तुज ।।२।।
मग या वचनीं विश्वासेल कोण । सर्वही दूषण देतील कीं ।।३।।
ज्ञानेशजे नको आतां या उपरी । विषय-बिदीवरी खेळूं देऊं ।।४।।
(३७१)
नाहीं माझे मन एवढे सुस्थिर । तुज घडीभर आठवीन ।।१।।
मनाशीं विचार करुं जाता मन । पळे रानोरान आडवाटे ।।२।।
जेथें वाटे सुख तिकडे ते धांवे । बळें मुरडावें तरी कष्ट ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये दिसे विपरीत । नेणो उपेक्षित आहासी कीं ।।४।।
(३७२)
जे जे मियां दुष्टें आचरिलीं पापें । भीषण स्वरूपें दिसे डोळा ।।१।।
न सुचेचि कांहीं मजसी उपाय । जेणें तया होय परिमार्जन ।।२।।
भोगावे लागेल याची नाहीं भीति । परी वाटे चित्तीं भय दुजे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये जरी उपेक्षिसी । तरी कोणापाशीं ठाव मागूं ।।४।।
(३७३)
मागें बहुतांचा केलासे उद्धार । जाणोनियां भार घातला म्यां ।।१।।
ऐकोनियां कीर्ति ठेविला दिश्वास । अझोनियां आस न पुरेचि ।।२।।

काय नारायणा घडला अन्याय । तरी तुम्ही पाय लपविता ॥३॥
ज्ञानेश्वरकन्ये करीतसे रळी । करुणाकल्लोळी प्रगटावे ॥४॥

(३७४)

वैराग्यावांचोनि नोहे जरी कृपा । तुझी मायबापा आळंदीशा ॥१॥
काय करुं जरी नावरे इंद्रिय । अमित उपाय केलियाहि ॥२॥
**एक तुझा प्रेम उपजतां चित्तीं ।**
**वैराग्यसंपत्ति गळां पडे ॥३॥**
प्रेमदान तंव असे तुझे हातीं । सखें अलकावतीपतिकन्ये ॥४॥

(३७५)

खेळापासोनिया सोडवणें बाळा । तरी काय काळा देत माता ॥१॥
स्नेहें घालितांचि बाळामुखीं स्तन । देत तो टाकून सर्व कांही ॥२॥
तेविं तुम्ही केल्या एक प्रेमदान । आटेचि संपूर्ण दोषमूळ ॥३॥
ज्ञानेश्वरकन्ये जगत्रजननी । आन आशा मनीं नाहि नाहीं ॥४॥

(३७६)

सांगा रमाकान्ता काय येते हातीं । देतां यमाहातीं मजलागीं ॥१॥
काय यांत तुझी होय जगीं कीर्ति । पातकी श्रीपति मोकलिता ॥२॥
पापतृणाचे ते असंख्यात पर्वत । नामाग्नि जाळीत क्षणामाजी ॥३॥
ऐसा हा महिमा तुझियां नामाचा । पुराणीं तो साचा गायिलासे ॥४॥
असो दुराचारि भजता तुजसी । कीर्ति उद्धरिसी म्हणोनियां ॥५॥
ज्ञानेश्वरकन्ये घेतलें धरणें करि वो धांवणें वेगीं आतां ॥६॥

(३७७)

बहु अपराध साहिले सखये । परि तेचि होये पुनः पुनः ॥१॥
कोठवरी तरी करशील क्षमा । अपराधा सीमा नाहि माझ्या ॥२॥
क्षमा करि आतां सर्व माझे दोष । नको धरुं रोष दीनानाथा ॥३॥
ऐसें म्हणावया नाहीं मज तोंड । वाढलोसे पुंड थोर जगीं ॥४॥

ज्ञानेश्वरकन्ये देऊनिया दंड । करी मज भांड निजनामीं ॥५॥

(३७८)

काहो नारायणा नये माझी कींव । कोण तुम्ही माव मांडिली हे ॥१॥

क्षणभरीं नाहीं तुझें पायीं चित्त । उठती अनंत कामवृत्ति ॥२॥

ज्ञान अभिमानें पापें आचरिलों । शेखीं नागविलों भक्तिसुखा ॥३॥

स्वामीची ती आज्ञा सेवका प्रमाण । मोडिली मदानं पापिये म्यां ॥४॥

काय तुझें मनीं आले मजविषीं । कुडे हृषीकेशी मायबापा ॥५॥

ज्ञानेश्वरकन्ये रक्षण शिक्षण । करी उदासीन होऊं नको ॥६॥

(३७९)

अनादि वासना लागलीसे पाठीं । काय जगजेठी करूं तेथें ॥१॥

मेलिया मारणें तुम्ही उपेक्षिता । न शोभे अनंता तुम्हालागीं ॥२॥

मोकलूं नका जी सख्या चक्रपाणी । जाणता म्हणोनी मजलागीं ॥३॥

ज्ञानेशजे आम्ही दीन सर्वांपरी । घ्यावे कडेवरी उचलोनी ॥४॥

(३८०)

काहो परदेशी केले मायबापा । सांडियेली कृपा आज कैसी ॥१॥

अज्ञानें नेणोनी जाहले अन्याय । नको कोपूं माये दीनांवरी ॥२॥

आधींच विकारें जाहलों जर्जर । तूंहि घडीभर न दिससी ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये कोणेपरी काळ । कंठूं तूं स्नेहाळ मोकलितां ॥४॥

(३८१)

**तुज पाहावया भुकेले लोचन ।**

**तळमळे मन प्रेमासाठी ॥१॥**

**कधीं तो सोहळा भोगीन मी देवा ।**

**अनुभव जीवा गोपिकांच्या ॥२॥**

काय नारायणा दुर्बळाची आस । पुरवावयास कष्ट तुम्हा ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये माझी विनवणी । घेशील जननी केव्हां चित्तीं ॥४॥

(३८२)

***काय देवा आम्ही तुझे म्हणवोनी ।***

***अंतरीं अझोनी प्रेम नाहीं ।।१।।***

*लोकीं ऐसा बोलताती निका । भक्ति दंभ फुका मिरवितो ।।२।।*

*समर्थांचे पोर दिसे दीनवाणे । तरी ब्रीदा उणे समर्थाच्या ।।३।।*

*थोराचिया कुळीं जन्मोनी कां ऐसी । पुसती मजसी तुझी गति ।।४।।*

*ज्ञानेश्वरकन्ये ऐसा बोल जनीं । उरल्या जननी निका काय ।।५।।*

(३८३)

*कधीं ऐसा प्रेम देयाल मजसी । बैसेन पंक्तीसी तुमचिया ।।१।।*

*कधीं मज तुम्ही आपला म्हणोनी । निरवाल जनीं संतजन ।।२।।*

*कां हो माझी तुम्हा नये कांहीं कींव । कोण माझा जीव निववील ।।३।।*

*ज्ञानेशजासुत घेतो म्हणवुनी । पाहिजे सज्जनीं सांभाळिले ।।४।।*

(३८४)

*गुरूचिये ठायीं आलिया विकल्प । तरी भोगी कल्प रौरवातें ।।१।।*

*परी एक क्षण न राहे निर्मळ । विकल्पा वेगळं चित्त माझें ।।२।।*

*काय नारायणा होय माझी गति । नेणवे निश्चिती कांहीं मज ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये अपराध कोटी । परी घाली पोटीं अंबे सर्व ।।४।।*

(३८५)

*तुज पहावया उतावेळ मन । दिसतो कठीण मार्ग परी ।।१।।*

*आडवा ठाकिला मीपण पर्वत । करी गदाघात तयावरी ।।२।।*

*आपुलिया बळें नोल्लंघवे तया । कृपाकर द्या या दीनालागीं ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये राहोनी जवळीं । मारिता आरोळी ऐकसीना ।।४।।*

(३८६)

*कळो आले काय जाहलें कारण । नयेसी धांवोन अझोनिया ।।१।।*

*तुझिया प्रियेची न करिता सेवा । नये वासुदेवा कीव तुज ।।२।।*

*ती तंव माझिया अभाग्याचे हातीं । अल्पहि निगुती झाली नाही ।।३।।*
*वरी नाना रीति कापट्य करोनी । कठोर शब्दांनी दुखविलें ।।४।।*
*परी हे बापासी शोभे वागणूक । मातृप्रेमा देख वेगळाची ।।५।।*
*सर्व साहोनियां **ज्ञानेशजा माय ।***
***दाखविल पाय विश्वास हा ।।६।।***
*(३८७)*
*घडलिया दोषा कायसा उपाय । चित्तामाजीं होय पश्चात्ताप ।।१।।*
*आतां पुढें नोहे ऐसी पुन: चुकी । प्रतिज्ञा जाण कीं अंतरीची ।।२।।*
*तुम्ही आशीर्वाद द्यावा इतुकाचि । न यो प्रारब्धाची आडकाठी ।।३।।*
*तेथें माझ्या देवा न चले उपाय । संकल्प तो होय बळी तुझा ।।४।।*
*ज्ञानेश्वरकन्ये संचिता वांचोनी ।। चित्त आडरानी जावो नेदी ।।५।।*
*(३८८)*
***कोण वो करील तुजविण कीव ।***
***कोण प्रेमें खेंव देई मज ।।१।।***
***कोणवो पाजील मज प्रेम पान्हा ।***
***कुरवाळील तान्हा म्हणोनियां ।।२।।***
***कोणवो साहिल माझा जंवजार । तुजलाचि भार वाटे जरी ।।३।।***
***ज्ञानेश्वर कन्ये तूंचि कंटाळली । कोण वो जवळी करी मज ।।४।।***
***(३८९)***
*निवेदुनि तुम्हा न सांगा उपाय । तरी दोष काय मजवरी ।।१।।*
*आतां येथूनियां दावाल जी वाट । त्याची पंथें नीट जाऊं इच्छी ।।२।।*
*तरी मायबापा कृपें एकवेळा । क्षमा करी बाळा आपुलिया ।।३।।*
*ज्ञानेश्वरकन्ये लावी मज मार्गी ।*
***हृदयचौरंगीं बैसोनियां ।।४।।***
*(३९०)*

नाम स्मरतांचि आचरिलो दोष । तेणें तुम्हा रोष आला जरी ।।१।।
तरी नारायणा मागील आढावा । सकळ सांडावा मनांतुनि ।।२।।
मागील पातकें होवो नेदी पुढें । पडो जिव्हे कीडें चुकलिया ।।३।।
ज्ञानेशजा सुत विनवी दयाळा । दावी एकवेळा रूप दृष्टि ।।४।।
(३९१)
सांगितला मार्ग उमजेना चित्तीं । म्हणोनियां खंती वाटे जीवा ।।१।।
तरी मायबापा सांडोनियां कोप । लावा ज्ञानदीप चित्तीं माझ्या ।।२।।
घातल्या अंजन चोखाळत वाट । तैसा मार्ग स्पष्ट दावी मज ।।३।।
ज्ञानेशजें नित्य संशय अंतरीं । कृपें तो निवारी जननीये ।।४।।
(३९२)
उगा बडिवार वागविसी जनीं । धांवसी निर्वाणीं दासासाठी ।।१।।
तरी मीच काय केले ऐसें सांग । धरिलासी राग कवण्या गुणें ।।२।।
केव्हाचा मी तुज वाहतो अझोनी । न येसी धांवोनी मायबापा ।।३।।
ज्ञानेशजे काय पहासी निर्वाण । होतो फार शीण वियोगाचा ।।४।।
(३९३)
न कळे कोणता जाहला अन्याय । म्हणोनियां पाय दुरावलें ।।१।।
तयावरी केलें नामसंकीर्तन । दग्ध झालें पूर्ण पाप तेणें ।।२।।
तरी मग कां हो उशीर अझोनी । न दिसा लोचनीं नारायणा ।।३।।
ज्ञानेशजासुत म्हणतो सकळ । करावा सांभाळ आतां तुम्ही ।।४।।
(३९४)
नये भरंवसा माझिया मनाचा । पुरवावी इच्छा एवढी हे ।।१।।
**वियोगें हृदय होवोनियां चूर्ण ।**
**तुझें पायीं प्राण लीन व्हावा ।।२।।**
मग अपराध न होय निश्चिती । सुटल्या आसक्ती देहाची या ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये जाहलो व्याकुळ । वाटे केव्हां काळ कृपा होय ।।४।।

*(३९५)*

*वेडीवांकुडी ती सेवा । पायीं अर्पियेली देवा ।।१।।*

*नका पाहूं प्रेमभावा । सेवी जपोनियां जींवा ।।२।।*

*कधीं येईल तो येवो । जीवीं ऐसा प्रेमभावो ।।३।।*

***पडे देहाचा विसर ।***

***चित्त पायीं झालें स्थिर ।।४।।***

*ज्ञानेशजे केव्हां डोळा । ऐसा दाविसी सोहळा ।।५।।*

*(३९६)*

*आठविती मज केले अपराध । नव्हती तैं सुध विचाराची ।।१।।*

*आतां पश्चात्ताप होवोनिया काय । अंतरले पाय मायबाई ।।२।।*

***परी भरंवसा आहेसी दयाळ ।***

***करिसी सांभाळ शेवटीं तूं ।।३।।***

*ज्ञानेश्वरकन्ये दीन मी दुबळा । काय भक्तिबळा पाहातेसी ।।४।।*

*(३९७)*

*चित्तीं ऐसे वाटे कृपाळु होवोनी । दाविलें लोचनीं निजपाय ।।१।।*

*तरी समाधान राहोनी अंतरीं । करीन चाकरी प्रेमभावें ।।२।।*

*परी या मनाचा नये भरंवसा । न कळे वळसा केव्हां कैसा ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये जंव देहासक्ति । तंववरी उक्ति व्यर्थ साऱ्या ।।४।।*

*(३९८)*

*कैसे माझे दैव आडवे ठाकले । पाय अंतरले मायबापा ।।१।।*

*कोण मज आतां पंडित म्हणोनी । जवळी जननी बोलावील ।।२।।*

*कहि मी हे भाग्य लाहीन मागुता । तळमळ चित्ता हेचि वाटे ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये कधीं माझे कानीं । येतील साजणी गोड शब्द ।।४।।*

*(३९९)*

*कधीं मी भाग्याचा एवढा होईन । पोटाशीं धरुन बुझाविसी ।।१।।*

कधीं अंगाहूनि फिरवोनी  हात । वदन चुंबीत देखेन मी ।।२।।
कधीं माझ्या बाळा म्हणोनियां ओठीं । सोडोनियां गांठी देसी स्तन ।।३।।
ज्ञानेशजेकन्ये आम्हा तुजसम माता । असोनी अनर्था मम केवि ।।४।।
(४००)
आतां माझा कोण तुजविण वाली । त्वरें धांव घाली जगदीशा ।।१।।
मायलेकराची झाली ताटातुटी । करवावी भेटी मायबापा ।।२।।
अनंत अपराधी परी नाहीं कोणी । पोटाशीं धरोनी बुझविता ।।३।।
कृपाळु जाणोनी आलो येथवरी । नका करुं तरी आशा भंग ।।४।।
ज्ञानेश्वरकन्येसाठीं जीव पिसा । करा आळंदीशा दीनकाज ।।५।।
(४०१)
माझ्या मायबापा काहो दूरदेशी । टाकूनि मजसी गेला कोठें ।।१।।
वाट पाहतांचि जाताती दिवस । न पुरेचि आस अझोनियां ।।२।।
प्राणही न जाती मजला सोडोनी । बोभाईतो वनीं एकटाचि ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये त्वरें ये धांवोनी । षडरिपासोनी सोडवाया ।।४।।
(४०२) पद
माझी आस पुरवी व्रजराया ।।धृ०।।
दासी होऊनि सेवू इच्छी हरि तुमच्या पाया ।।१।।
व्रज युवतींचि फेडुनि विष्टा करिन पुनित काया ।।२।।
आन मी इच्छी साक्ष तरी प्रभु ज्ञानेश्वरतनया ।।३।।
(४०३)
लहानिया तोंडी घेतो मोठा घांस । ऐसेहि मनास केव्हां वाटे ।।१।।
परी तुझ्या कृपें काय एक नोहे । हेहि जीवेंभावें वाटे मज ।।२।।
राजकान्तेपाशीं शतावधि दासी । असती सेवेसी सादर त्या ।।३।।
त्रैलोक्याधिपति तयाची तूं राणी । नको काय कोणी दासी तुज ।।४।।
ज्ञानेशजे तेथें माझीच योजना । करी हे चरणा विनविते ।।५।।

(४०४)

भाग्यें जन्मा आला समर्थाचे कुळीं । काय उणे आळी घेतां सांगा ॥१॥

तोंडावाटे बोल निघतांचि क्षणीं । पूर्ति उभी पाणी जोडोनियां ॥२॥

आम्ही येऊनियां तुझिये उदरीं । नाहीं होत पुरी इच्छा माझी ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये मज तळमळ । तरी असे मळ तुम्हालागीं ॥४॥

(४०५)

तुझ्या सेवेची आवडी । भोगिली न नर्धघडी ॥१॥

सेवा केली तेव्हां दुष्टें । आंग चोरियेले नेटे ।२॥

आतां जीव तळमळे । सेवावया पादतळे ॥३॥

माय ज्ञानेशनंदिनी ।

**मेल्याहि न गोडी उणी ॥४॥**

(४०६)

नाहीं पुरविली आस । तुझी धरूनिया कास ॥१॥

झाली त्रिशंकुच्या वानी । गति माझी मोक्षदानी ॥२॥

नाहीं सासर माहेर । दोही ठायीं ओस घर ॥३॥

ज्ञानेशजे तुजविण । कोण निवारील शीण ॥४॥

(४०७)

जे जे असतील दोष कांहीं । देवा दोष माझे ठायीं ॥१॥

तुझा म्हणवितो तरी । कानाडोळा करा हरी ॥२॥

मूल मांडिये हागता । काय जीवें मारी माता ॥३॥

तैसे दोष पाहोनियां । जरी लोपवाल पाया ॥४॥

तरी झालाच कीं घात । काळ गिळाया धांवत ॥५॥

ज्ञानेशजे मी अन्यायीं । परि असो द्यावा पायीं ॥६॥

(४०८)

नाहीं अझोनिया धाली । भूक तैसीच राहिली ॥१॥

स्तन देऊनिया ओठी । सांडियले अर्ध पोटीं ॥२॥

जीव माझा कासाविस । कां गे निष्ठुर झालीस ॥३॥

ज्ञानेशजे पुन: देई । स्तनपान मायबाई ॥४॥

(४०९)

घडी जाता तुजविणा । तोष मना काळाच्या ॥१॥

आपुलिया हाते बाळा । देसी काळा स्वाधीन ॥२॥

आपंगिला कोण सांगे । तुवा मागे सांडिला ॥३॥

ज्ञानेशजे माझ्या विषीं । कां झालासी निष्ठुर ॥४॥

(४१०)

**तुझ्या सेवे आड जे जे नारायणा ।**

**ते ते कृपाघना निवटावे ॥१॥**

**संपत्तीच्या मदें तुझे नाम मुखीं ।**

**नये तरी राखे दरिद्रीच ॥२॥**

**मानाचिये आशे नामसंकीर्तनीं ।**

**लाज वाटे मनीं जरी देवा ॥३॥**

**तरी जनीं माझी करावी फजिती ।**

**पुन: नये चित्तीं मानवृत्ति ॥४॥**

**कुटुंबाच्या प्रेमें न घडे चिंतन ।**

**करी निसंतान तरी माझे ॥५॥**

**परी ज्ञानेशजासुता ठेवा पायीं । कोण्याही उपायीं करोनियां ॥६॥**

(४११) पद

माझे आई आई आई ॥धृ०॥

तव पद सेवा प्रेम सोहळा जन्म जन्म मज देई ॥१॥

याविण नलगे अपवर्गादि आन किमपि मज कांहीं ॥२॥

दुर्गुणी परी मी तुझा म्हणवितो उचलुनि कडिये घेई ॥३॥

अलकावतिपतिनंदिनी जननी कान्त योजि फणिशाई ।।४।।

(४१२)

तुम्ही साच कनवाळू । दास लळा प्रतिपाळू ।।१।।

न पाहतां दोषगुण । धरा पोटासी प्रेमान ।।२।।

घरधनी पुरवी लळे । श्वान काय सांडी चाळे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये साजे । धेनुवत्स न्याय गाजे ।।४।।

(४१३)

जरी तुज माझा आलसे कंटाळा । निज हस्ते गळा कापी तरी ।।१।।

कासया पाहिजे भूमिभारभूत । स्वार्थ परमार्थ दोन्ही नाहीं ।।२।।

**परी नको करुं आनाचा पांगिला ।**

चित्त देई बोला इतुकिया ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये जैसा जन्म दिला । पाहिजे तो केला सांभाळहि ।।४।।

(४१४)

मजविषीं कांहीं येऊं दे करुणा । वळवी या मना विषयांतुनि ।।१।।

तुजविण कांहीं न वाटावे गोड । पुरवी हे कोड मायबाई ।।२।।

**सर्व लोक टाको मजसी वाळित ।**

**राहो आरोळित नांव तुझे ।।३।।**

**ज्ञानेश्वरकन्ये कोण्याही उपायीं ।**

**करी निज पायीं स्थिर माते ।।४।।**

(४१५) पद

अंबे तूं माय माझी ।।धृ०।।

तुजवाचुनियां कोणाचीहि । मानि न इतरां जी ।।१।।

समर्थ तूं असतां मग कां करुं । इतरांची हाजी ।।२।।

ज्ञानेश्वरकन्ये ओसंगा । घेऊनि स्तन पाजी ।।३।।

(४१६) पद

अंबे येई त्वरें जननी ॥धृ०॥

बहुता दिवसापासुनि तुजला । बाहतो दिनवाणी ॥१॥

कामादिक रिपु गांजिती मजला । गातां तुज वाणी ॥२॥

विषयवनीं या एकट फिरतो । स्वरुपा नेणोनी ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये भवभीता । घे मज उचलोनी ॥४॥

(४१७)

कैसा करुं प्रेम कैसी भाकूं कीव । कांहींच सावेव नेणो आम्ही ॥१॥

बालभावें तुजसाठीं करी शोक । तरी मनीं देख थोर वाटे ॥२॥

थोरीवेच्या योगें नये पाणी डोळां । नोहे कधीं गळा सद्‌गदित ॥३॥

जडयंत्रासम तोंडाचिया वाटे । अभंगादि वाटे तैसे म्हणो ॥४॥

(४१८)

ज्ञानेश्वरकन्ये नाहीं कृपाबळ । मज कां ये वेळ उपेक्षिले ॥१॥

तोडोनियां त्याचे ममताबंधन । लावियेलें मन निजछंदी ॥२॥

मजविषीं कां न करिसी उपाय । तोडोनी आश्रय सर्व माझे ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये करावा अनन्य । जेणें लोकीं धन्य म्हणतील ॥४॥

(४१९)

तयाचा सर्वदा असो मज संग । मुखे रमारंग सदा गाय ॥१॥

तयाच्या पादुका धरीन मी शिरीं । हृदय कल्हारीं गुरुपाय ॥२॥

तयातेचि प्रेमें जाय लोटांगणीं । प्राण ओवाळोनी तयाहूनि ॥३॥

तोचि एक माझा जीवीचा जिव्हाळा । ज्ञानेश्वरबाळा चिंती सदा ॥४॥

(४२०)

पाषाण हृदय न फुटे पाझर । ऐकतां साचार गुण तुझें ॥१॥

तेणें वाटे काय करोनी भजन । जरी नोहे मन सद्‌गदित ॥२॥

का हो नारायणा जाहले उदास । कवणाची आस करावी म्यां ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये धरिलीसे अडी । म्हणोनी वांकडी दृष्टि केली ॥४॥

(४२१)

मायबाप दोन्ही । तूंचि मज मोक्षदानी ।।१।।

**सकळांची आशा ।**

**सांडियेली हृषीकेशा ।।२।।**

पडलों पदरीं । आतां नको करुं दुरी ।।३।।

ज्ञानेशनंदिनी । झांकी निज पल्लवानीं ।।४।।

(४२२)

कल्पूं नये तेचि कल्पी माझें मन । ध्यायीना सगुण मूर्ति तुझी ।।१।।

इंद्रियें सैराट धांवती विषयीं । तुज शेषशाई विसरोनी ।।२।।

कामादिक शत्रु झाले बळीवंत । क्षणहि उसंत नाहीं मज ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये न दिसेचि वाट । म्हणोनी बोभाट करीतसे ।।४।।

(४२३)

कोण्याही उपायीं नाहीं समाधान । सदाचि उदविग्न चित्त राहे ।।१।।

पळहि न सुटे अभिमान बेडी । तेणें प्रेमगोडी दुरावत ।।२।।

क्षणभरी वाचे गातां तुझें नांव । कृतार्थ सावेव वाटे तेणें ।।३।।

येरी रात्रंदिन भोगितो विषय । न म्हणे हृदय पुरें कधीं ।।४।।

ज्ञानेश्वरकन्ये का वो माझें चित्त । न होय आसक्त तुझें नामीं ।।५।।

(४२४)

न कळे कोणता घडला अन्याय । आला अंतराय सेवेमाजी ।।१।।

काय नावडली मजकरीं सेवा । म्हणोनियां देवा दूर केले ।।२।।

नाहीं नाम गान न करीं पूजन । कळेनाचि कोण गति होय ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये लोटूं नको दूर । नाहीं दुजा थार तुजविण ।।४।।

(४२५)

हृदयीं राहोनी प्रगट न होसी । थोरीवेते गासी जनीं माझ्या ।।१।।

न कळे जननी काय आरंभिले । वाईट चांगले तुम्ही जाणा ।।२।।

पित्तदोषें पीत भासतो सविता । तैसा दोष ताता तुम्हा लावी ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये सर्वस्वीं अन्यायी । नेणो मायबाई तुझी लीला ॥४॥

(४२६)

आचरिले दोष आठवितां मनीं । पोळे वो जननी चित्त माझें ॥१॥

वाटे कोणे रीति विनवूं तुम्हासी । तोंड बोलायासी नाहीं मज ॥२॥

इतुके असोनी निज थोरपणा । सांडसी न तान्हा मानोनिया ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये लाजोनियां पायीं । मन सखे बाई लीन तुझ्या ॥४॥

(४२७)

याचा मज आला आतां हा प्रत्यय । चिंतिता अपाय लेंकुराचा ॥१॥

आम्ही निरंतर याचितसो प्रेम । तुम्ही जनीं मान वाढविता ॥२॥

थोरीवेचा माज वाढलिया अंगीं । मग कां ओसंगी घ्याल तुम्ही ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये तुझ्या मातृपणा । कंटाळा शोभेना आपुल्याचा ॥४॥

(४२८)

लोकातें सांगसी मी याच्या हृदयीं । मज नसे कांहीं प्रत्ययचि ॥१॥

हृदयीं राहोनि कां वो चाळविसी । पळही न येसी दृष्टिपुढें ॥२॥

सदोदित चित्त धांवे भोगासाठीं । पाहसी ते दृष्टि स्वस्थपणें ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये जवळी असोनी । नेतसे धरोनी काळ मज ॥४॥

(४२९)

गोपाळा गोविंदा सांवळ्या सगुणा । विनंति चरणापाशीं एक ॥१॥

साधन विहिन पूर्ण पापखाणी । लटिका चरणीं विनटलों ॥२॥

आतां तुम्ही माझी राखावी पैं लाज । सिद्धि न्या सहज भाव खोटा ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये शरण जाणोनी । न लक्षी जननी दुर्गुणातें ॥४॥

(४३०)

पाहोनी दुर्गुणा लावशील डोळे । कोण वो स्नेहाळे सांभाळील ॥१॥

उपेक्षोनी जरी चालो देसी चाळे । कोण वो स्नेहाळे सांभाळील ॥२॥

पुढें कुंभीपाकीं टाकिलिया काळे । कोण वो स्नेहाळे सांभाळील ।३।।
ज्ञानेशजा तुवा सांडितां कृपाळे । कोण वो स्नेहाळे सांभाळील ।।४।।
(४३१)
अगा हे केशवा माधवा गोविंदा । लावी निजछंदा चित्त माझें ।।१।।
अगा नारायणा विष्णु मधुसूदना । सोडवी या मना विषयांतुनि ।।२।।
अगा त्रिविक्रमा वामना श्रीधरा ।
**जीव हा घाबरा तुजसाठीं ।।३।।**
अगा हृषीकेशा अगा पद्मनाथा । दावी पदप्रभा दृष्टि मज ।।४।।
अगा दामोदरा अगा संकर्षणा । ठेवूं दे चरणावरी माथा ।।५।।
अगा वासुदेवा अगा हे प्रद्युम्ना । सांभाळी या दीना मायबापा ।।६।।
अगा अनिरुद्धा अगा पुरुषोत्तमा । नेणे गा महिमा तुझा आम्ही ।।७।।
अगा अधोक्षजा अगा नारसिंहा । निर्दळी हे सदा वैरी माझे ।।८।।
अगा हे अच्युता अगा जनार्दना । चुकवी यातना गर्भवास ।।९।।
अगा हे उपेंद्रा हे हरी श्रीकृष्णा । ज्ञानेशजा तान्हा प्रतिपाळी ।।१०।।
(४३२)
अगा विश्वपते सख्या विश्वंभरा । मोकलूं दातारा नको मज ।।१।।
अगा गोपीकान्ता सगुणा उदारा । मोकलूं दातारा नको मज ।।२।।
अगा हे सुंदरा गोपीचित्तचोरा । मोकलूं दातारा नको मज ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यासुता प्रियकरा । मोकलूं दातारा नको मज ।।४।।
(४३३)
अगा केशीहंता गोकुलपालका । काढोनियां रंका देऊं नये ।।१।।
पांडवपालना गोकुलपालका । काढोनियां रंका देऊं नये ।।२।।
असुरमर्दना सज्जनरक्षका । काढोनियां रंका देऊं नये ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या पल्लव ग्राहका । काढोनियां रंका देऊं नये ।।४।।
(४३४)

*न घडे चिंतन न घडे कीर्तन । कैसे ते कल्याण व्हावे माझे ।।१।।*
*चिंतन करुं तो स्थिर नाहीं मन । कराया कीर्तन शक्ति नाहीं ।।२।।*
*काय नारायणा करावा उपाय । आतुडावे पाय कोणे परी ।।३।।*
*अभाग्याचे जैसे व्यर्थ मनोरथ । माझे देवा चित्त तैसे झुरे ।।४।।*
*ज्ञानेश्वरकन्ये तूं ब्रह्मकुमरी । राहे जिव्हेवरी सदा माझ्या ।।५।।*

*(४३५)*

*अखंडवदनीं गावे तुझे गुण । मनोभाव जाण हाचि माझा ।।१।।*
*परी नारायणा न सुचती बोल । येती तेही फोल अर्थाविणें ।।२।।*
*भाव तेहि मज लागती चोरावे । कोणे परी गावे तुजलागीं ।।३।।*
*न येसी सामोरा तरी नको येऊं । परी नको होऊं अनुदार ।।४।।*
*ज्ञानेश्वरकन्ये वाणी अधिष्ठुनी । पाजी वो जननी भावदुग्ध ।।५।।*

*(४३६)* ***भावाचा फुलौरा***

***वाणीचा प्रवाह वाहावा अखंड ।***
***न पडावा खंड पळभरी ।।१।।***
***अर्थें बोलापाठीं धावावे उदारा ।***
***भावाचा फुलौरा मतीमार्जीं ।।२।।***
***एवढी संपत्ति द्यावी झडकरी ।***
***आण नाहीं तरी सज्जनांची ।।३।।***
***ज्ञानेश्वरकन्ये पुरवी हे लळे ।***
***गावया स्नेहाळे तुजलागीं ।।४।।***

*(४३७)*

*थोर हें नवल वाटे नारायणा । घडूं नये जाणा तेचि झाले ।।१।।*
*श्रुतिसंत सारे म्हणती नामापुढें । जळताती गाढे पापगिरि ।।२।।*
*हाकारिता नामें धांवे नारायण । होऊं नेदी शीण निजदासा ।।३।।*
*ज्ञानेश्वरकन्ये कैसें माझे ठायीं । नामबळ आई शीण झाले ।।४।।*

(४३८)    भक्तिपदतीर्थामृताचे २१ पाठ

एकवीसवेळ केले पाठांतर । परी हें अंतर पालटेना ।।१।।

मनासी कळेना कोणत्या कारणें । नाहीं नारायणें कृपा केली ।।२।।

नेणो उणें पुरें झालें होय कांहीं । जाणोनी तुम्हीहि न सुचवा ।।३।।

ज्ञानेशजे सांग काय ऐसें झालें । जेणें दुरावले पाय तुझे ।।४।।

(४३९)

मीच काय एक पातकीं या जनीं । करिसी सांडणी म्हणोनियां ।।१।।

मागें किती तरी उद्धरिले पापी । काळही ज्या कापी पाहोनियां ।।२।।

माझेचि कां तुज पडले सांकडे । उगवेना कोडें मजलागीं ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये नाम बळिवंत । बोलताती संत मिथ्या काय ।।४।।

(४४०)

उदाराचा राणा म्हणविसी जनीं । माझी कां शिराणी पूर्ण नोहे ।।१।।

उगा वागविसी नांवाचा बडिवार । माझे कां अंतर बोस झालें ।।२।।

मागूं आलों पायीं तुम्हा प्रेमभीक । धाडितां विन्मुख काय आतां ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये सांभाळीं लौकिक । त्यागितां कलंक येवो पाहे ।।४।।

(४४१)

भावाचा भुकेला असंसी नारायणा । सांभाळसी दीना दासालागीं ।।१।।

नाहीं तुझे पायीं दृढ प्रेमभाव । अवगुणा ठाव चित्त माझे ।।२।।

एखाद्याचा प्रेम पाहोनियां त्यास । जरी झाला वश तुम्ही देवा ।।३।।

तरी पापी चित्त करिते मत्सर । कोणता विचार करुं येथें ।।४।।

ज्ञानेश्वरकन्ये कुटिल अंतर । तुझ्या पायावर वाहियेले ।।५।।

(४४२)

मन माझें उतावीळ । भक्तिबळ नसोनी ।।१।।

पळभरी नोहे स्थिर । सदा भर कामाचा ।।२।।

दारा,पुत्र,धन,मान । नसे आन चिंतन ।।३।।

नाहीं सज्जनांचा संग । सदा राग विषयीं ॥४॥

ज्ञानेशजे नाहीं सेवा । केली भावापासोनी ॥५॥

(४४३)

नित्य हरिदीनीं आपण जागता । निजतो अनंता आम्ही सुखें ॥१॥

लाज वाटे मनीं पाहोनी वर्तन । उगें दासपण मिरवितो ॥२॥

केला पण परी टिकला न क्षण । इंद्रियां अधीन झालो देवा ॥३॥

मायलेकापरी क्षमा करी दोष । नका धरुं रोष बालकासी ॥४॥

ज्ञानेश्वरकन्ये घालोनियां पोटीं । अपराध ओठीं स्तन घाली ॥५॥

**(४४४)**

**एवढे आयुष्य व्यर्थ गेले देवा ।**

**घडलीं न सेवा चरणाची ॥१॥**

**संसाराचें ओझें वाहतांचि मेलो ।**

**सर्वस्वीं मुकलो भक्तिसुखा ॥२॥**

**नाहीं पळभरी आठविले तुज । कोण माझी लाज राखी आतां ॥३॥**

ज्ञानेश्वरकन्ये तुझा भरंवसा । नको यमफांसा पडो देऊं ॥४॥

(४४५)

**असो नसो भाव आलों तुझें द्वारीं ।**

**आतां नको हरीं दूर लोटूं ॥१॥**

आयकिली कीर्ति तुझी संतमुखीं । अमित पातकी उद्धरिले ॥२॥

असो द्यावा पायीं हा एक पतित । होय वृद्धिंगत यशतरू ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये पतित पावन । तुजचि सज्जन संबोधिती ॥४॥

(४४६)        नाथ परंपरेस नमन

त्रिभुवनीं ऐसी तुमची कीर्ति गाजे । दीनांचिया काजे धांवतसा ॥१॥

दैवें दूर केला सांभाळिला संती । ऐशा कथा कीति जगीं श्रुत ॥२॥

कांहो मजविषीं जाहला उदास । शरण तुम्हांस येवोनियां ॥३॥

*प्रभो आदिनाथा कां नये कणवा । करितो मी धावा केधवाचा ।।४।।*

*मत्स्येंद्रनाथजी धरिले कां मौन । न पहा लोचन उघडोनी ।।५।।*

*गोरक्ष स्वामीया नये का हो कीव । दुर्बळाचा भाव परीक्षितां ।।६।।*

*निष्ठुर कां झाला अद्वयानंदजी । सोडियले आजि ब्रीद काय ।।७।।*

*अहो गैनीनाथा कांहीं करा कृपा । नका अनुतापा पाहूं माझ्या ।।८।।*

*निवृत्ति माउली त्वरे धांव घाली । जन्म तुझे कुळीं घेतलासे ।।९।।*

*आळंदीवल्लभा समाधी सांडोनी । पहा बिलोकुनी कृपादृष्टि ।।१०।।*

*सर्व मिळोनियां ज्ञानेश्वरकन्ये ।*

*सांगा **तुझें तान्हें वाट पाहे** ।।११।।*

*(४४७)*

*बहुता दिसाची पुरविली आळ । चरणकमळ दावोनियां ।।१।।*

*ऐसें वाटें मनीं माझ्या पापा क्षमा । उरली न सीमा करायाची ।।२।।*

*परी मायबापा खराच मी नीच । विसरलो सत्य प्रेमा तुझा ।।३।।*

*तुझ्या पासोनियां धरेलागीं क्षमा । नसे तिच्या सीमा क्षमेलागीं ।।४।।*

*तेथें तुझ्या क्षमें मर्यादा कारण । कोण नीचपण राहोनियां ।।५।।*

*ज्ञानेश्वरकन्ये याचि रूपे सृष्टी । भरोनियां खोटी वारी माया ।।६।।*

*(४४८)*

*काय करुं व्रजराया । तुझे पाय पाहावया ।।१।।*

*नाम सार नाम सार । तेही नये निरंतर ।।२।।*

*घेतो तेवढ्याचि काळीं । निद्रा येवो पाहे भली ।।३।।*

*चढे आळसाचा पूर । वरी झाला गर्व थोर ।।४।।*

*ऐसे माझे शत्रु जाण । करो न देती स्मरण ।।५।।*

*आतां जाऊं कोणापाशीं । कोण घालील पाठीशी ।।६।।*

*ज्ञानेशजे तुजविण । कोण निवारील शीण ।।७।।*

*(४४९)*

नेणे ब्रह्मभाव नेणे भक्ति ठेव । सिद्धान्त सावेव तोही नेणें ।।१।।
आलिया विचार वाटे तुम्ही दिला । म्हणोनी तयाला गोवी काव्यीं ।।२।।
अल्प हो कां शक्ति तीही भवद्दत्त । उणे पुरे तेथ तुम्ही पहा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये द्यावा निज प्रेम । इतराशीं काम नाहीं मज ।।४।।

(४५०)

पचेल तितुके घालील माउली । विसरलो बोली तुमचीहि ।।१।।
वेळींच सावध केले नारायणा । साच कृपाघना कृपाळु तूं ।।२।।
दिधले त्यांतचि न मानूं संतोष । वाढवितो आस नानापरी ।।३।।
ानेश्वरकन्ये तुज माझी चिंता । आला मज आतां प्रत्यय हा ।।४।।

(४५१)

ऐसेचि कां करी माझिये जननी । आळ विचारोनी पुरवावी ।।१।।
प्रेमाचें भातुके देतांना विचार । नको अविचार बरवा तेथें ।।२।।
नको ते द्यावया पाहूं काळवेळ । अखंड विपुल पाठवी कां ।।३।।
पांचाचि वर्षांचा होता ध्रुवबाळ । वळला दयाळ तयासी तूं ।।४।।
जातीचेनि नांवें हीनाहूनि हीन । वरी पशुपण अमंगळ ।।५।।
परी तयालागीं देतां प्रेमदान । विचार बांधून ठेविलासी ।।६।
ज्ञानेशजे तैसे नको मजलागीं । प्रेम द्याया उगी वाट पाहूं ।।७।।

(४५२)

मीचि काय पाप केलें यदुराया । दाविसी न पाया आपुल्या तूं ।।१।।
अनंत अपराधी तारिलेसी बळी । जगीं वाढविली थोर कीर्ति ।।२।।
आतां कां सांडिसी निज ब्रीदावळी । नको वनमाळी भाव पाहूं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये थोरीवेचि लाज । ठेवोनियां काज करी माझे ।।४।।

(४५३)

पहावे न वाटे जरी कृष्णमुख । तरी करी एक मायबाई ।।१।।
हृदय आंगणीं येवोनिया पळ । सांग उतावेळ होऊं नको ।।२।।

एवढ्या वचने होय समाधान । न लगेचि आन मज कांहि ।।३।।

**ज्ञानेश्वरकन्ये तुझा शब्द कानीं ।**

**पडावा साजणी हेंचि इच्छा ।।४।।**

(४५४)

**कंटाळले मन, बोलावे न वाटे ।**

**पाहोनियां खोटे अंतरंग ।।१।।**

**तरी नको माये बोलूं या चांडाळा ।**

**पाठवावे काळा परी त्वरें ।।२।।**

**तुझिये द्वाराशीं सुखे जावो प्राण ।**

**वाचे नाम गान करीतचि ।।३।।**

**ज्ञानेश्वरकन्ये एवढीशी तरी ।**

**दया मजवरी दाखवावी ।।४।।**

(४५५)

लोकापुढे करी प्रेमाचे वर्णन । स्वयें पुच्छहीन पशुतुल्य ।।१।।

नाना वासनेचे घेऊनी गाठोडे । तुजला रोकडे भोग्य करी ।।२।।

**लोकांमाजी दावी एकनिष्ठ दास ।**

**न सुटेचि आस संसाराची ।।३।।**

ज्ञानेश्वरकन्ये इतुकियावरी । असे तुझी थोरी उद्धरिल्या ।।४।।

(४५६)

**तुझा अनुग्रह होय जयावरी ।**

**सर्वस्वा बोहरी तयाचिया ।।१।।**

अझोनी न झाले सर्वस्व हरण । म्हणोनी दारूण शंका वाटे ।।२।।

**वरी दिसेंदिस वाढते ऐश्वर्य ।**

**म्हणोनी हृदय तळमळे ।।३।।**

ज्ञानेश्वरकन्ये मांडिली दुर्दशा । आधीं मज आशा लावोनियां ।।४।।

(४५७)

जगचि हे झाले सांवळे सगुण । तरि पायीं प्राण गुंतलासे ।।१।।

पुरवावी आस सख्या नारायणा । नसेचि कामना आन कांहीं ।।२।।

नसोनियां भाव करितो कल्पना । समर्थें हे मना आणूं नये ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये उणे तुझ्या पदा । पात्रापात्र भेदा पाहतां गे ।।४।।

(४५८)

समर्थाचे पंक्ती सवातें समान । षड्रस भोजन प्राप्त होय ।।१।।

ऐसे तुझे कुळीं गाजतसे ब्रीद । मीचि अपवाद काय तया ।।२।।

समर्थाचे द्वारीं हाकारितो परी । न मिळे भाकरी भक्षावया ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये दैवचि वोखट । म्हणोनी कपाट लाविलेसे ।।४।।

(४५९) **मी महातस्कर जाणतसा तुम्ही मी महातस्कर ।**

**चोरितो अंतर तुम्हापाशीं ।।१।।**

**विश्वीं विश्वाकारे तुझेचि स्वरूप ।**

**लपवितो पाप जनापाशीं ।।२।।**

**विशेष स्वरूप तुझे संत सारे ।**

**तेथें अहंकारे न जायेंचि ।।३।।**

**स्तन्य पाजावया घेसी स्त्रियाकारु ।**

**उठतो विकारु काम तेथे ।।४।।**

**सर्व भावें तूंचि एकला क्रीडसी ।**

**व्यर्थचि आशेसी सावडतो ।।५।।**

**ज्ञानेश्वरकन्ये ऐसा मी चांडाळ ।**

**परी तूं स्नेहाळ क्षमा करी ।।६।।**

(४६०)

आधीच विषयीं धावतसे चित्त । वरी तुम्ही अंत पाहतसा ।।१।।

इच्छेचा उशीर पुरवित भोग । कैसा माझा राग शम पावे ।।२।।

तुमचा प्रसाद हे तो नाहीं खोटे । परी हेंचि मोठे चुंब वर्म ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये तुझे करी नांव । तृप्त निज हांव करावया ।।४।।

(४६१)

नित्य या मनासीं करी उपदेश । गायी आळंदीश आवडीनें ।।१।।

परी ये वढाळ नायकेचि कांहीं । चिंती सर्वदाही विषयातें ।।२।।

आतां नारायणा तूंचि कृपा करी । न चले श्रीहरी यत्न माझा ।।३।।

**ज्ञानेश्वरकन्ये करी निसंतान ।**

**लावोनियां अग्न संसारातें ।।४।।**

(४६२)

उगा वरी दावी डौल साधनांचा । अंतरी प्रेमाचा गंध नाहीं ।।१।।

मनीं वाटे ऐसे शस्त्रधारेहूनि । तिखट साधनीं विनटावे ।।२।।

परी देह त्रासे पुनः मागे फिरे । तेणें नोहे पुरे साधनहि ।।३।।

चित्तीं प्रेमभाव साधनीं कातर । उगा अहंकार वरी एक ।।४।।

कोणेपरी चित्तीं वागवूं मी आशा । तुज गोपवेशा भेटायाची ।।५।।

ज्ञानेश्वरकन्ये करिशील कृपा । तरी मायबापा होय भेटी ।।६।।

(४६३)

काय माझे दैव द्वाड । आलें मार्गामाजीं आड ।।१।।

म्हणोनियां हातीं आला । तो तूं आजि दुरावला ।।२।।

तुझ्या कृपेचें पोसणें । नको करुं भिंगुळवाणें ।।३।।

सखे ज्ञानेशनंदिनी । उपेक्षिता ब्रीदा हानी ।।४।।

(४६४)

माझियापासोनी अपोहन-स्मृती । ऐसी वचनोक्ती तुमचीच ।।१।।

तरी मग तुझ्या पायाची विस्मृती । झाल्या कोणाप्रती दोष सांगा ।।२।।

कां हो नारायणा पुरविली पाठी । झाली मग हिंपुटी प्राणनाथा ।।३।।

**ज्ञानेश्वरकन्ये कांही सांग युक्ति ।**

**हरिपदासक्ति राहावया ॥४॥**

(४६५)

काय बाळकासी कळे निज हित । माऊली ठेवीत चिंता त्याची ॥१॥

धरुं धांवे अग्नी नेणे तो जाळील । परी ते स्नेहाळ सांभाळी त्या ॥२॥

नेणे कोण अन्न होय हितावह । माउलीचा स्नेह सर्व करी ॥३॥

तैसे आम्ही नेणो निज हिताहिता । वागवावी चिंता तुम्ही सर्व ॥४॥

**तुमचिया प्रेमीं अंतर पडेल ।**

**नको पुरवु आळ ऐसी कोणी ॥५॥**

ज्ञानेश्वरकन्ये अविद्या आवर्ती । नको मजप्रती बुडो देऊं ॥६॥

(४६६)

साक्षी राहोनियां पाहतोसी खेळ । परी आम्हां काळ ओढवला ॥१॥

आम्ही भवदु:खे होतसो व्याकुळ । तुम्हा येती डोल स्वसुखाचे ॥२॥

कोरड्या वचनें करा समाधान । परी नोहे न्यून व्यथा माझी ॥३॥

भेदरिल्या बाळ नुसत्या वचनें । केविं आनंदानें खेळो लागें ॥४॥

सांडोनियां काम धावत जननी । पोटाशी धरोनी समजावी ॥५॥

तरीच तयाची दूरी होय भीति । हे कां तुम्हाप्रति ठावे नसे ॥६॥

ज्ञानेश्वरकन्ये असोनियां ठावे । कैसेनि राहावे स्वस्थ तुज ॥७॥

(४६७)

तुझी आज्ञा म्हणोनियां गुरुराजा । चित्तीं ज्ञानराजा आठवितो ॥१॥

परी चित्त ओढी तुझ्या पायाकडे । न सुचे रोकडें काय करुं ॥२॥

आज्ञाभंगभयें आळंदीश्वरासी । हृदयप्रदेशीं नित्य ध्यातो ॥३॥

परी तयापाडे तुझेही स्मरण । न राहेचि मन केल्याविण ॥४॥

तैसेचि थोडकें कृष्णीं ओढी चित्त । एके ठायीं स्थित नाहीं कोठें ॥५॥

ज्ञानेश्वरकन्ये क्षमस्व जननी । नेणते जाणोनी अंगीकारी ॥६॥

(४६८)

**जागृतीं वा स्वप्नीं दावावे चरण ।**

**येईल करुणा ऐसी तुज ।।१।।**

**तरीच गा डोळा पाहो आम्ही रूप ।**

**आमुचा संकल्प निमित्तचि ।।२।।**

घडली पातकें तेव्हां पासोनियां । न देखो सखया पाय तुझे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये वाटते अंतरी । रोष मजवरी आहे तुझा ।।४।

(४६९)

बहुता दिसाचा करिताहे शोक । मारिताहे हांक मायेलागीं ।।१।।

नेणो कैसी झाली इतुकी निष्ठुर । क्षणहि विसर पूर्वी नेणें ।।२।।

माझिया वांचुनी क्षणहि न राहे । नेणो कैसी साहे वियोग हा ।।३।।

ज्ञानेश्वरस्वामी पातलो ये ठायीं । विनवणी पायीं चित्त द्यावे ।।४।।

तुम्ही तरी कांहीं करोनी उपाय ।

ज्ञानेशजा माय भेटवावी ।।५।।

(४७०)

नित्य सप्ताक्षरी याचि एक अर्था । जपतो समर्था मना माजीं ।।१।।

केव्हां तरी तुम्हा येवोनियां कीव । सांगाल उपाव मायभेटी ।।२।।

परी माझा तुम्हा नाही भरंवसा । लबाड सहसा जाणोनियां ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये तुझ्या कृपेविण । आळंदी निधान वळेल ना ।।४।।

(४७१)

होताती प्रमाद माझिये हातोनी । सोडवि यांतुनी माय बापा ।।१।।

न येतां वेदान्त आना उपदेशी । भासवी जनासी ब्रह्मवेत्ता ।।२।।

अनुभवाविण कोरडेचि शब्द । मोही श्रोतृवृंद सांगोनियां ।।३।।

**जयाचे हृदयीं तुमची पाउलें ।**

**न चलती चाळे माझे तेथे ।।४।।**

परी दुजयासी ऐसेचि भासवी । प्रति ज्ञान-रवि उदयला ।।५।।

ज्ञानेश्वरकन्ये तुझे तूंचि जाणे । व्यर्थ अभिमाने जाकळलें ।।६।।

(४७२)

उपास्तिप्रकार नेणों आम्ही देवा । परी सिद्धि न्यावा भोळा भाव ।।१।।

अज-अव्ययातें लावो देहधर्म । मानो भूक तहान तुम्हालागीं ।।२।।

स्वयें भोगावया पाहिजे विषय । उगे तुझे नांव पुढें करी ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये अपराध करी । क्षमा कीजो परी जगदंबे ।।४।।

(४७३)

केलिया पापाची होतां आठवण । कासाविस प्राण होऊं पाहे ।।१।।

परी मायबापा करिशील क्षमा । भरंवसा नामावरी तुझ्या ।।२।।

नामाचिया बळें होईल सद्‌गति । याची नाहीं खंती जीवीं माझ्या ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये तुझा प्रेम उणा । पाहोनियां मना तळमळ ।।४।।

(४७४)

मानवेल मज म्हणशील जरी । भोगुनी तामिस्त्रीं पापभोग ।।१।।

मग दुज्या जन्मीं देईन मी भेटी । मरणा शेवटीं मुक्ति नको ।।२।।

तुझ्या पायविण कैवल्याचा ठेवा । बंधनाचा गोवा तोचि मज ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये सुखें भोगूं दुःख । परी प्रेमसुख द्याल पुढे ।।४।।

(४७५)

याचिसाठीं होतो जीव कासाविस । माझिया दोषांस पाहोनियां ।।१।।

नाम घेवोनियां आचरतो पाप । तरी होवो अपवर्ग यासी ।।२।।

नायके वचन नावरी इंद्रियां । तरी मी न पाया दावी आतां ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये ऐसाचि निश्चय । नेणो केला होय मनामाजी ।।४।।

(४७६)

माझिया पित्याने जाळिला मदन । तुम्ही जीवदान दिलें त्यासी ।।१।।

आतां माझे मनीं उठता कामना । का हो नारायणा दूर जाता ।।२।।

आपुल्या मोहरा करावे तियेसी । चुकता मजसी बोल नाहीं ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये आलों पायापाशीं । न्याया मागायासी बोलिल्याचा ।।४।।
(४७७)
जाळुनियां कर्म भेटसी येऊनी । तरी काय उणी कीर्ति होय ।।१।।
काय माझा भाव न पाहतां येसी । तरी कां ब्रीदासी उणेपण ।।२।।
काय कुंभीपाकी पाहोनियां मज । समाधान तुज वाटेल तैं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये न येसी पाहोनी । फार भय मनीं वाटे माझ्या ।।४।।
(४७८)
मायबाप दोन्ही कुळशीलवंत । कैसा मी पतित जन्मा आलो ।।१।।
प्रसन्न होऊनी जेणें दिली लंका । त्याचा पुत्र लोका भीक मागे ।।२।।
बापाचा जो वैरी पुत्राचा जिव्हाळा । मातृरूपीं चाळा कामनेचा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये तूंहि शिरावरि । असोनी अंतरीं शांति नाहीं ।।४।।
(४७९)
काय नाहीं ठावा माझा अधिकार । सर्वज्ञ उदार दीनबंधो ।।१।।
आंगिकारिलिया त्यागणें समर्था । उचित सर्वथा नाहीं नाहीं ।।२।।
अखिल वृत्तींचा एक तूं चालक । गोपिकानायक मायबापा ।।३।।
अंतरीचा साक्षी असोनी दयाळा । कां माझा सोहळा पाहता जी ।।४।।
पांडुरंगनाथा शोधा माझे चित्त । नाहीं तरी शपथ ज्ञानेशाची ।।५।।
(४८०)
कोणाकडे बोट दावितां अनंता । हाचि तुझा त्राता म्हणोनियां ।।१।।
राजयाचा शत्रु कोण पाठीं घाली । काळ वनमाळी कांपे तुम्हा ।।२।।
मज आश्वासील तुजविण कोणी । नाहीं त्रिभुवनीं बळी ऐसा ।।३।।
तरी काय माझी होईल दुर्गती । होऊनि संगती तुमचीही ।।४।।
ज्ञानेश्वरकन्ये मज दुर्बळासी । धरितां हठासी काय थोरी ।।५।।
(४८१)
होवोनियां भेटी तुझिया पायाची । नोहे या मनाची समाधानी ।।१।।

तुम्ही सर्व लळा पाळतसा माझा । नसे केशीराजा उणें काहि ।।२।।

परी काय करुं न राहेचि जीव । न राहे आठव जननीचा ।।३।।

आळंदीवल्लभा तुझ्या कन्येसाठीं । गुंतलासे भेटी जीव माझा ।।४।।

(४८२)

करुनी पाहिला विषयाचा रोध । तंव काम क्रोध बळावती ।।१।।

बहुत प्रकारें करितों निश्चय । पोखीतो विषय मनामाजी ।।२।।

इंद्रिया अधीन जाहलो सर्वथा । नये माझे हातां मन माझे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये वळवी इंद्रिये । निजरुप सोये दावोनियां ।।४।।

(४८३)

जेणें तेणें कार्य करावे आपुलें । हेचि मानवलें चित्तीं माझ्या ।।१।।

आम्ही सांगितला आपुला विचार । पुढील निर्धार तुम्ही पाहा ।।२।।

माझें हातीं होते भाकावी करुणा । आतां तुम्ही जाणा काय कीजे ।।३।।

समर्थासीं लाज आपुल्या नांवाची । कासया तयाची चिंता चिंत्ता मज ।।४।।

ज्ञानेश्वकरन्ये करी अंगीकार । कासया विचार व्हावा मज ।।५।।

(४८४)

नाहीं तुझा प्रेम नेणें ब्रह्मज्ञान । होय समाधान कोणे परी ।।१।।

समाधानाविण चित्त नोहे स्थिर । धांवे निरंतर विषयींच ।।२।।

आतां नारायणा सांभाळावे मातें । दुर्बळ नेणते जाणोनियां ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये विषयाची आशा । दुर्धर सहसा सोडवेना ।।४।।

**(४८५) पराकाटीची विनम्रता**

**नावडे या मना पुराण श्रवण ।**

**भजन पूजन तेहि नको ।।१।।**

**भजनीं बसतां ग्रंथ वाचूं धांवे ।**

**ज्ञानचर्चे गावे वाटे तुज ।।२।।**

**घडी वाटे सर्व शास्त्रें व्हावी ज्ञात ।**

**घडींत वाटत नाम पुरे ॥३॥**

**घडी वाटे जगीं वाढवावा मान ।**

**घडी सर्वां लीन व्हावे वाटे ॥४॥**

**ज्ञानेश्वरकन्ये ऐसा चित्त खेळ ।**

**कैसी नाममाळ जपूं सांग ॥५॥**

*(४८६)*

*करितो विचार कोणता उपाय । करुनी अपाय चुकवावा ॥१॥*

*सर्वही साधनें दिसती असार । संसार सागर तरावया ॥२॥*

*साराचे ते सार तुमचें चरण । तुमच्या अधीन दावणें ते ॥३॥*

*ज्ञानेश्वरन्ये असे तुझे हातीं । नाहीं दुज्या शक्ति सोडवाया ॥४॥*

*(४८७)*

*माझें मज कळो येती अवगुण । काय करुं मन अनावर ॥१॥*

*समर्थाते ऐसे लागले बोलावे । तरी आम्ही जावे कोण्या कोटीं ॥२॥*

*नावरे हें मन प्रयत्ने करुनी । आलिया वांचुनी दया तुज ॥३॥*

*ज्ञानेश्वरकन्ये हारपला यत्न । तारण मारण तुझे हातीं ॥४॥*

*(४८८)*

*कांहीं येऊं द्यावी कींव । नका पाहुं माझा भाव ॥१॥*

*समर्थाचे आलों दारी । नका घालवूं माघारी ॥२॥*

*कोण ऐसा उद्धरिला । जो कां सर्वगुणी भला ॥३॥*

*वेद आगमीं वाळीला । तोहि माते सरता केला ॥४॥*

*ज्ञानेश्वरकन्ये तुझे । पायीं ऐसे बिरूद गाजे ॥५॥*

*(४८९)*

*वाटे सुटावा संसार । पाहोनियां यम भार ॥१॥*

*परी चित्त नाहीं नामीं । ऐशा पडलों काचणी ॥२॥*

*करुं ब्रह्मविचारातें । पळ चित्त नोहे रिते ॥३॥*

ज्ञानेशजे याचिसाठीं । करिताहे तोंडपिटी ।।४।।

(४९०)

श्वाना लावियेली सवे । तोंड चाटाया ते धांवे ।।१।।

तैसी मज झाली परी । नेणें भावाची कुसरी ।।२।।

हिरा गार एक्या मोलें । लेखियेली म्यां चांडाळे ।।३।।

ज्ञानेशजे नेणें काय । होय कोणता अपाय ।।४।।

(४९१)

न जायेचि क्षण कामने वांचुनी । चित्त रानोमानीं धांवतसे ।।१।।

करितो विचार आठही प्रहर । वाचे निरंतर नाम गावे ।।२।।

विचाराचा क्षण गेलिया मागुती । धावोनियां येती वृत्ति नाना ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये न सुचेचि कांहीं । चित्त तुझे पायीं कैसे राखो ।।४।।

(४९२)

तुझिया नामाचा पडतो विसर । उठती विकार नानापरी ।।१।।

नाहीं ठावा योग नये ब्रह्मज्ञान । पाठीराखा धर्म तोहि नाहीं ।।२।।

आतां कोणेंपरी होये माझे हित । दावा दीनानाथ मार्ग कांही ।।३।।

आळंदीवल्लभकन्ये निजसूता । काय यमहाता द्यावे वाटे ।।४।।

(४९३)

कळलें मजसीं नाहीं जो विरक्ति । तंव तो श्रीपति आया नये ।।१।।

माझें तो अंतर विषयाचे साठीं । नित्य लाळघोटी करितसे ।।२।।

तरी काय आतां नोहेचि उद्धार । निरयीं साचार जावे सुखें ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये तुझिया कां बाळें । यमाचा कृपाळे दंड घ्यावा ।।४।।

(४९४)

कोणापाशीं आम्ही न्यावें हें गाऱ्हाणें । तुम्ही निज तान्हे मोकलितां ।।१।।

सर्व देवावरी चाले तुझी सत्ता । तुजवरी सत्ता ऐसा कोण ।।२।।

तूंचि मोकलितां कोण वो पाठीशीं । घालील दीनासी मग मज ।।३।।

ज्ञानेशजे तुझा म्हणोवोनी दीन । काय संतजन म्हणतील ॥४॥

(४९५)

कपटी कुश्चळ जाणोनियां देवा । न करा कणवा माझा कांहीं ॥१॥

परी काय करुं न चले उपाय । न जाय विषय चित्तांतुनि ॥२॥

**तुमचिया प्रेमाविण भोग आशा ।**

**न होय सहसा क्षीण कधीं ॥३॥**

ज्ञानेश्वरकन्ये देई निजप्रेमा । मग पाहे वामा इच्छितों का ॥४॥

(४९६)

ऐसें वाटे चित्तीं आला माझा वीट । म्हणोनि बोभाट नायकशी ॥१॥

सुखे जावो देसी जातो तया वाटे । न पाहसी कांटे रुपतील ॥२॥

जनीं कृपावंत म्हणवी आपणा । पुत्राच्या कल्याणा न पाहसी ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये दिसती दारूण । यातना कठीण डोळ्यापुढें ॥४॥

(४९७)

होते कांहि पूर्व बरवे संचित । पायीं अवचित झाली भेटी ॥१॥

इया जन्मीचे ते न वर्णवे वाचे । दिसताती खाचे दृष्टिपुढें ॥२॥

कल्पकोटी नोहे निरय सुटका । ऐसा सांठा निका संपादिला ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये येईल मनासी । तरीच पायासी पुनः भेटी ॥४॥

(४९८)

संसारींच होतो मानोनियां सुख । वाटला हरिख तुझ्या सेवे ॥१॥

म्हणोनियां दिले संसारासी पाणी । आलों लोटांगणी पायीं तुझ्या ॥२॥

वाटला भरोसा हारपेल दुःख । वाढतील भीक कृपामूर्ति ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये परी नागविलों । वाया जन्मा आलों दासपणें ॥४॥

(४९९)

लाज वाटे चित्ता भाकितां करुणा । अंतरंग जाणा वेगळेचि ॥१॥

वरी काकुळती येतो तुम्हां लागीं । धांवा लागवेगीं तोंडे म्हणें ॥२॥

परी तुम्हां याया हृदय मंदीर । शुद्धहि साचार केलें नाहीं ।।३।।
ज्ञानेशजा सुत तुम्हासी श्रीहरी । कळलें अंतरीं दंभ नांदे ।।४।।
(५००)
बहुता दिसाची संसारी वासना । तेणें सदा मना चंचलता ।।१।।
परी जीवीं वाटे तुझे पायीं प्राण । वाहोनियां जाण राहावे कीं ।।२।।
परी दुष्टचित्त घडो नेदी तैसे । उपाय सौरसें हारपला ।।३।।
म्हणोनियां तुम्हा आलों काकुळती । धांवा कृपामूर्ति मायबापा ।।४।।
ज्ञानेश्वरकन्ये विनंती पायाशीं । नको दूरदेशी करू मज ।।५।।
(५०१)
वरी वरी प्रेमा । आहे माझा मेघःश्यामा ।।१।।
जीवीं वाटे तुम्ही यावे । चित्त विषयावरी धांवे ।।२।।
नावलंबिता साधन । उगा याचे तुझा प्रेम ।।३।।
ज्ञानेशजे सर्व जाणे । देहासक्तीचे बोलणें ।।४।।
(५०२)
आम्हीं नीचाहोनि नीच । तूंचि साच कृपाळू ।।१।।
भवपुरीं वाहविला । हस्त दिला काढाया ।।२।।
ऐसा अहेतुक कोण । दुजा आन प्रेमाचा ।।३।।
ज्ञानेशजे मायबाई । उतराई नोहेचि ।।४।।
(५०३)
विषयोपभोगीं पडतां अंतर । शेखीं हुरहुर जीवा वाटे ।।१।।
विषयाच्या ध्यानें माते तुझें ध्यान । एक तरी क्षण न घडेचि ।।२।।
कैसा माझा प्रेम जाणसी सकळ । बोलणें केवळ वटवट ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये ऐसा पापी परी । तुझी आशा भारी वाटे जीवीं ।।४।।
(५०४)
नामाचें साधन अत्यंत सुलभ । वत्सले तूं शुद्ध सांगितलें ।।१।।

परी मी आळसी तेही नेघे वाचे । बळेंचि यमाचे हातीं जाया ।।२।।
न धरी आळस भोग संपादनी । दिवस यामिनी आठवेना ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये ऐशा परी द्वाड । नको करुं लाड दुर्गुणाचा ।।४।।

(५०५)

बाळकाच्या मुखीं नेवोनियां घांस । घालिताही त्यास नेघे जरी ।।१।।
ताडन करोनी बळें जेऊ घाली । परी न मोकली जननी त्या ।।२।।
बाळ नेणें हित तरी काय माता । त्याचिया अनर्था साहू शके ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये ताडन लालन । योग्य ते करुन स्वीकारावे ।।४।।

(५०६)

नाहीं विचारिला निज अधिकार । वायां तुजवर रोष माझा ।।१।।
नाहीं तुजसाठीं साधिला मी योग । नाहीं संतसंग आश्रयिला ।।२।।
नाहीं मी पूजिला कैलासीचा राणा । विषय वल्गना सांडोनिया ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये याचिताहे क्षमा । मानवेल मना तेव्हां तारी ।।४।।

(५०७)

नाहीं केली माता पितयाची सेवा । दोष वासुदेवा तुज देतो ।।१।।
नाहीं देह क्षीण तुझिया वियोगें । रूसणें वाऊगें तुजवरी ।।२।।
नाहीं तुझ्या नामीं रंगविली वाणीं । म्हणे चक्रपाणी भेट देई ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये कैसी माझी गती । होईल निगुती उमजेना ।।४।।

(५०८)

ऐकिला मी कानीं तुमचा महिमा । सख्या मेघश्यामा मायबापा ।।१।।
अजामीळ पापी तुवा उद्धरिला । नसोनि भुकेला तुज लागी ।।२।।
गणिका तारिली शुकाचिया संगे ।।मज रमारंगें त्यागिले कां ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये मीच का एकटा । पातकी करंटा निपजलों ।।४।।

(५०९)

**करिता श्वानाचा लाड ।**

***तोंड चाटे ते निर्भींड ।।१।।***

***नीचालागीं बहुमान ।***

***वाटे आढ्यताचि पूर्ण ।।२।।***

*सर्पालागीं दुग्धपान । परिणाम विष जाण ।।३।।*

*तैसा तुम्ही केला प्रेम । तेणें वाटे अभिमान ।।४।।*

*नाहीं केली ऋजु सेवा । आंचवलो प्रेमभावा ।।५।।*

*पांडुरंगनाथा भीड । सोडोनियां द्यावा दंड ।।६।।*

*(५१०)* **पद**

*कांहो कीव नये नारायणा । हृदीं राहोनि चाळवूं या मना ।*

*तुम्ही उपेक्षिता कोण मज दीना । शरण आलो पाजा प्रेम पान्हा ।।१।।*

*नेदी कष्ट मी तुम्हां देवराया । देवादिकीं शिणविली तुझी काया ।*

*नित्य धांवा करिती साह्य व्हाया । निजसुखा देती श्रम वाया ।।२।।*

*क्षीरसागरीं तुझा रहिवास । जाणोनियां संकटी तुम्हा पास ।*

*देव येती म्हणोनि कासावीस । तरी मात्र दीन विनंतीस ।।३।।*

*मायबाप सांडोनि तया ठाया । सुखें निद्रा करा हृन्मंदिरीं या ।*

*येथें नये कोणी त्रास द्याया ।।४।।*

*(५११)*

*कंटाळला माझा जीव । भेटीसाठीं घेत धांव ।*

*करुं कोणता उपाव । यदुवीरा सांगाजी ।।१।।*

*वैरी गांजती हे सहा । करणें तापविती दहा ।*

*मन चंचल हे महा । कोठवरी आवरुं ।।२।।*

*कोण दुष्कर्म आटले । तुझे पाय अंतरले ।*

*चित्त नाहीं भिन्न झाले । कोण प्रेम वाखाणूं ।।३।।*

*नष्ट पापी हीन दीन । पायीं नाहीं शुद्ध प्रेम ।*

*पांडुरंगनाथा कोण । गति आतां होईल ।।४।।*

(५१२)

करुं उपाय कोणता । सांग कैलासिच्या नाथा ।।१।।

काय नि:शंक बैसला । किंवा भक्तें धांवा केला ।।२।।

**एक तुझा भरंवसा ।**

धांव त्वरें फणीभूषा ।।३।।

सख्या पांडुरंगनाथा । तुम्हा असा माझी चिंता ।।४।।

(५१३)

केव्हां तुज दया येईल केशवा । तोडाल हा गोवा भवपाश ।।१।।

बैसलों विश्वास देऊनी अंतरीं । करशील हरी अंगीकार ।।२।।

विपट दासाची न करी उपेक्षा । द्यावी प्रेमभिक्षा मजलागीं ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये तुझे पायीं आस । भासताती ओस दाही दिशा ।।४।।

(५१४)

नेदी तुम्हातें मी श्रम । माझा निवाराया काम ।।१।।

तरी जाऊं कोणापाशीं । कोण धरील पोटाशीं ।।२।।

येर आघवे बाहुले । स्वामी तुवां उभे केले ।।३।।

ज्ञानेशजे तुजविण । नाहीं निवारिता शीण ।।४।।

(५१५)

आपुल्याचे परी । स्वामी माझे काज करी ।।१।।

नको पाहूं गुणदोष । सेवा साधनांची कास ।।२।।

अघासूर मी दुसरा । हस्तें आपुल्या उद्धरा ।।३।।

ज्ञानेशजे मायबाई । पतित मी हात देई ।।४।।

(५१६)

मारुं आलीसे पूतना । काय पाहिलेसी गुणा ।।१।।

कोण सेवा संपादिली । कैसी गजेंद्रा पावली ।।२।।

काय देखिलासी भाव । उद्धरिला भूमिदेव ।।३।।

सखे ज्ञानेश्वरबाळे । धांव घाली  स्नेहाळे ।।४।।

(५१७)

आघवे आयुष्य चालले दयाळा । न सुटेचि चाळा विषयांचा ।।१।।

घडीभरि नोहे विषयांवाचोनी । धांवे नानास्थानीं चित्त माझे ।।२।।

न घडे चिंतन समाधान मनीं । ज्ञान अभिमानी जाकळिले ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये येऊं दे कणवा । दास सांभाळावा कोणे परी ।।४।।

(५१८)

जलसिंचने साचारु । स्वयें वाढविला तरु ।

निजहस्तें उच्छेद करुं । नये विचारुं खलाही ।।१।।

सोसूनियां आटाआटी । गोळा वागविला पोटीं ।

करुनियां स्तन्य तुटीं । माता खोटी मारिता ।।२।।

कोणी शरणागत आला । तया परता सारीला ।

नाहीं ऐसा आयिकिला । गोपीलीला महिमा ।।३।।

निजस्नेहाचें पोसणें । भवदु:खें जरी शीणे ।

सखे ज्ञानेश्वरकन्ये । ब्रीदा उणें तुझिया ।।४।।

(५१९)

दासा जवळी करोनी । आतां देतसा लोटोनी ।।१।।

कोण सांगू मी गाऱ्हाणे । गावूनिया रडगाणें ।।२।।

हरीहरादिक सारे । तुझ्या कृपेची वागुरे ।।३।।

सखे ज्ञानेशनंदिनी । यांत तुझी ब्रीद हानी ।।४।।

(५२०)

चुकलिया माय कोण स्थिती बाळा । विदित स्नेहाळा तुम्हालागी ।।१।।

कोण निवारील माझें हें सांकडें । नेवूं कोणापुढें कृष्ण मुख ।।२।।

न करिती कोणी माझा अंगीकार । पाहोनियां भार पातकांचा ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये तूचि बळवंत । नको पाहूं अंत मायबाई ।।४।।

(५२१)

करिशील कृपा केव्हां नारायणा । कासाविस मना होते बहु ।।१।।

बैसलो विश्वास धरोनी अंतरीं । धरशील करी म्हणोनियां ।।२।।

न घाली मी तुम्हां कोणते सांकडे । कासया रोकडे चिंता करा ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये तुझे कृपाष्टि । दुःखाचिया कोटी वारी माये ।।४।।

(५२२)

लोकीं ऐसें रुढ झालें । तुवां मातें स्वीकारलें ।।१।।

आतां कोणतें सांकडें । रक्षावया मागें पुढें ।।२।।

आंगीं राहे अवगुण । तरी तुम्हातें दूषण ।।३।।

सखे ज्ञानेश्वरकन्ये । निज ब्रीद सांभाळणें ।।४।।

(५२३)

तुमच्या सन्निध राहोनियां देवा । आमुचा कणवा नये तुम्हा ।।१।।

संसाराची व्यथा न सोसवे आतां । उचित तत्वता करावे जी ।।२।।

आम्हा दानालागीं तूंचि वो माउली । बैसावे साउली कवणाच्या ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये तुझेचि पोसणें । तुजविण नेणें दुजा कोणी ।।४।।

(५२४)

तुझिया कृपेचा अंकित दातारा । ऐशिया पामरा लोटितसा ।।१।।

आधीं पासोनियां सेवेसी लाविले । मातेरे ते केले संसाराचे ।।२।।

आतां माझा आला तुम्हासी उबग । गिळोनियां मूग बसलेती ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये तूंचि मोकलितां । फिर्याद ही आतां नेऊं कोठें ।।४।।

(५२५)

स्वप्नीं तरी तुझें न दिसेचि रूप । धरियेला कोप कवण्या काजा ।।१।।

अन्यायी अपराधी असे लक्ष कोटी । कोण घालील पोटीं तुजविण ।।२।।

शीणलो दातारा करोनियां धांवा । कां नये कणवा अजोनियां ।।३।।

**ज्ञानेश्वरकन्ये आसुवे नयनीं ।**

**दाटली साजणी तुजसाठीं ।।४।।**

(५२६)

उसण्या उत्तरे भाकितो करुणा । धांव नारायणा म्हणोनियां ।।१।।

अंतर कोरडे, नसे एक बिंदू । व्याकुलता भोंदु वरी दावी ।।२।।

सर्व व्यवसाय करी सुरळित । पळही न चित्त विषो सांडी ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये ढोंग संपादणी । तुझ्याचि कारणी करितो मी ।।४।।

(५२७)

वाटे नाना भावें आळवावे तुज । नये ती सहज भावस्फूर्ती ।।१।।

उसण्याची भावें करोनी कवन । नामसंकीर्तन करी तुझे ।।२।।

दुजियाचा हठ पाहोनि बालक । तोचि छंद देख माये भाकी ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये ऐसियाचि भावे । गाईन गोडवे सदा तुझे ।।४।।

(५२८)

काय चिंतितोसि माझी अधोगती । म्हणोनियां चित्तीं द्रव नये ।।१।।

अनाथ बालक तुझिये पदरीं । त्याची चिंता हरी नाहीं तुज ।।२।।

सर्व सत्ता तुझे हातीं असोनियां । फिरविसी मायाचक्रामाजीं ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये पदरीं मी दीन ।

**नेई सांभाळून मायबाई ।।४।।**

(५२९)

तुझ्या चित्तीं आल्या काय एक नोहे । संकल्पेचि त्वां हे उभारिले ।।१।।

ऐसिया समर्था पदरीं असोनि । माझी रडगाणी जैसी तैसी ।।२।।

नेदी तुम्हा श्रम काज करावया । इच्छे तुमचिया अति तृप्ती ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये पुरवी मनोरथा । अनाथांच्या नाथा मायबापा ।।४।।

(५३०)

गणगोत कांहीं नसेचि आधारु । तूं एक निर्धारु स्वामी माझा ।।१।।

अनाथाचा नाथ देवाचाही देव । अंतरीचा भावो जाणतसा ।।२।।

*वत्साची माउली पिल्याची पक्षिणी । माझिये जननी धांव वेगी ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये जीव उतावळा । पहावया डोळा पाय तुझे ।।४।।*

*(५३१)*

*एक तुझे पायीं वाहिलासे भाव । आतां तुज सर्व माझी चिंता ।।१।।*

*काय जाणे बाळ निजहित गोष्टी । मातेचिया दिठी पाहणे ते ।।२।।*

*आर्त पाहोनिया पाहातसे वाट । देऊनिया भेट निववावे ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये न धरवे धीर । कासाविस फार जीव माझा ।।४।।*

*(५३२)*

***तुजविण आम्हा कोण असे त्राता ।***

***विचारी अनंता मनामाजीं ।।१।।***

***नेणे सेवाधर्म नेणे गुणगान ।***

***संतांचे चरण वंदूं नेणें ।।२।।***

***कवणाते येऊं सांग काकुळती ।***

***कोण मज हातीं धरी सांगा ।।३।।***

***ज्ञानेश्वरकन्ये पाहे मजकडे ।***

***स्वीकारी वांकुडे बोल माझे ।।४।।***

*(५३३)*

*सांडिला संसार तुझ्या पायासाठीं । व्यर्थचि चावटी बोलणें हें ।।१।।*

*स्त्रियेविण एक क्षण राहवेना । भाकितो करुणा निलाजरा ।।२।।*

*परी माझे दोष न धरोनी चित्ती । उचित समर्थी कृपादान ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये जगाचे जननी । नको धरुं मनीं राग माझा ।।४।।*

*(५३४)*

*आम्ही परदेशी झालों तुजविण । कवणा शरण जावे सांग ।।१।।*

*दुबळे भणंग दीन दुराचारी । नेणों तुझी थोरी कांहीं एक ।।२।*

*चातकासी मेघ रूष्ट झाला जरी । जीवन श्रीहरी होय काय ।।३।।*

ज्ञानेश्वरकन्ये चित्त देई बोला ।

**न तोडावा लळा मायबापा ।।४।।**

(५३५)

कुणा सागर असशी तूं देवा । कळो आले जीवा माझिया हे ।।१।।

निघोट पातकी विप्र अजामीळ । दुर्लभ ते स्थळ तया देसी ।।२।।

तुझिया नामानें पक्षी आळविला । तिये गणिकेला निज ठावो ।।३।।

नेणो कैसे तुझे अंतर कोमळ । करिसी सांभाळ वाटे मनीं ।।४।।

ज्ञानेश्वरकन्ये पातकी मी जरी । नये तुझी सरी कोणालागी ।।५।।

(५३६)

आतां आलो रे शरण तुला । धरी पदरीं निजबाळा ।।१।।

कोठवरी मी धरू धीर । षडरी पीडिती फार ।।२।।

नाहीं कवणाचा आश्रय । तुजविण बापमाय ।।३।।

नाहीं मद्दोषा गणती । परी कृपा असो मजवरूती ।।४।।

ज्ञानेश्वरजे मम हृदयीं । व्रजपतिसह नित राही ।।५।।

(५३७) पद

कोण असे मज नाथ तुजविणा ।।धृ०।।

पापी अजामिळ पुत्रामिषाने । उद्धरिलासी तूं जगजीवना ।।१।।

काळकूट विष भरुनि स्तनामधें । मारुं आली तुजला पुतना ।।२।।

परी धात्रीला उचित अशी गति । देऊनि मेळविले निजचरणा ।।३।।

ज्ञानेश्वरजे मज विषयींच कां । चोरूनि ठेवलासि निज पान्हा ।।४।।

(५३८)

कोण कर्म धर्म वेचूं तुजसाठीं । जेणें पडे दृष्टि पाय तुझे ।।१।।

कृपेनें दर्शन देऊनी दातारा । त्यागिले सुंदरा हीनालागीं ।।२।।

ठावे झाले आतां हीन मी दैवाचा । परी चित्तीं तुझा भरंवसा ।।३।।

पांडुरंगनाथा आपुल्याचि लाज । धरोनिया काज करी माझे ।।४।।

(५३९)

हुर हुर सदा वाटतसे मनीं । कैसा चक्रपाणी भेट देसी ॥१॥

तुझिया दासांचा मनामाजीं हेवा । वाटतो केशवा काय करुं ॥२॥

मजहूनि थोर असती सकल । प्रेमा अविकळ तुझे पायीं ॥३॥

साच मनोवृत्ति केली निवेदन । अंगिकारा दीना जाणोनियां ॥४॥

तुम्ही मोकलिल्या पांडुरंगनाथा । कोण सांभाळिता मजलागीं ॥५॥

(५४०)

कोठवरी धीर धरुं नारायणा । गोपिकारमणा आर्तबंधो ॥१॥

कोणत्या प्रकारें आवरुं या मना । तुझा प्रेम पान्हा पाजी मज ॥२॥

योगयागधर्म आघवे किडाळ । जंव प्रेमजळ नेत्रीं न ये ॥३॥

पांडुरंगनाथा थोडी तरी कींव । दीनाची सावेव येऊं द्यावी ॥४॥

(५४१)

कोणत्या पातकें अंतरले पायां । सांगा यदुराया मायबापा ॥१॥

काय मातृमुखी दिधलें उपस्थ । म्हणोनियां स्वस्थ बैसलासी ॥२॥

काय गुरुद्रोह मजसी घडला । म्हणोनि सांडिला प्रेम माझा ॥३॥

काय धेनुवत्स केली ताडातोडी । शरणागता बेडी घालविली ॥४॥

तुझ्या नामापुढें काय पापराशी । अग्नि तृणराशी झांको शके ॥५॥

पांडुरंगनाथा झालियाची शिक्षा । यापरी उपेक्षा करुं नये ॥६॥

(५४२)

बरें होते देवा न येतो कां जन्मा । सदा विषयकामामाजीं चित्त ॥१॥

नाहीं ठावी सेवा नेणो प्रेमखूण । दगडासमान जीवित हें ॥२॥

सुलभ साधन नाम तेहि वाचे । क्षणही न साचे वाणीवरी ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये जन्मलो चांडाळ । व्यर्थ जातो काळ तुज विण ॥४॥

(५४३)

माझें हें कर्तव्य आठवावे पाय । पुढील ती सोय जाणा तुम्ही ॥१॥

थोरा असे चाड आपुल्या नामाची । शरणागताची वाहे चिंता ।।२।।

न पाहाल गुणदोष कांहीं माझे । दु:ख येतां भोजे धांवाल कीं ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये जाणसी उचित । परी नाहीं येत धीर जीवीं ।।४।।

(५४४)

सुख:दुख संधी अडकलों देवा । सोडवण केव्हां होय नेणो ।।१।।

योगयागधर्म आदिक उपाय । करिती अपाय अधिकचि ।।२।।

न सुचेचि कांहीं कैसा विधि पाळूं । निषेधातें गाळूं कोणे परी ।।३।।

पूर्वकर्में चित्तीं उठती वासना । पाडिती बंधना माजीं मज ।।४।।

ज्ञानेश्वरकन्ये तुझ्याकृपेविण । न दिसेचि आन मार्ग कोणी ।।५।।

(५४५)

बरवे असते जरी पूर्वकर्म । सेवेमाजीं काम उठता कां ।।१।।

कासया वियोग होता चरणाचा । कां न घेती वाचा नाम छंद ।।२।।

ज्ञानेश्वरकन्या कान्त व्रजराया । निरखी सखया दैव माझे ।।४।।

(५४६)

रात्रंदिस चित्तीं स्त्रियेचाचि काम । नये वाचे नाम तुझे जरी ।।१।।

कोणे परी माझे होईल कल्याण । चिंता रोग जाण जीवीं माझ्या ।।२।।

सांडोनियां मौन धांव नारायणा । निवारी वासना डाकिणी हे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या सुताची विनंती । चित्तीं उमापती धरा वेगीं ।।४।।

(५४७)

**संसार सागरीं बुडालों मी देवा ।**

**न होयेचि सेवा तुझी कांहीं ।।१।।**

**विषयीं पडिभर पडला विसर ।**

**विकले अंतर स्त्रियेलागी ।।२।।**

**सेवेमाजी आड येत लोकलाज ।**

**दुरावले मज पाय तुझे ।।३।।**

**ज्ञानेश्वरकन्ये शिणलो मी आतां ।**

**माझी भवव्यथा दूर करी ।।४।।**

*(५४८)*

*कवणिया भाग्यें जोडले हे पाय । दुर्लभ जे होय ब्रह्मादिका ।।१।।*

*अनधिकारें मी दवडिले दुरी । नाडिलो संसारी निजसुखा ।।२।।*

*करंट्या लाधला भाग्यें नीलमणी । सांडी कांचमणी म्हणोनियां ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये ऐसी झाली परी । जाळे हे अंतरीं नित्य मज ।।४।।*

*(५४९)*

*कोणे परी माये घालवूं जीवित । नसतां तूं आप्त साहाकारी ।।१।।*

*न पडती कष्ट कोमल चरण । आयुष्य प्रमाण तेही बहू ।।२।।*

*क्षण कल्पसम जातां तुजविण । तरी समाधान होय मना ।।३।।*

*परी कल्पसम जाय ताता क्षण । विषय चिंतन न घडतां ।।४।।*

*ज्ञानेश्वरकन्ये कोणेपरी हित । साधले हे चित्त नेघे माझे ।।५।।*

*(५५०)*

**देहाचिया कष्टा भेणें ।**

**सेवे नागविलों तेणें ।।१।।**

*आतां दिसे अवघड । आठवितां यमदंड ।।२।।*

*घडी वाटे अनुताप । घडी गेल्या करी पाप ।।३।।*

*कोणे मुखें मागूं क्षमा । निज पापांची खन्त ना ।।४।।*

*ज्ञानेशजे वाटे लाज । आठवितां चित्तीं तुज ।।५।।*

*(५५१)*

*लाज वाटे तरी जाऊं कोणापाशीं । कोण घे पाठीशीं घाली मज ।।१।।*

*तुज अधिष्ठानीं उठताती वृत्ती । तेथचि पावती लय पुनः ।।२।।*

सर्वही वृत्तीसी तुझीचि मोहर । झालों निलाजरा म्हणोनियां ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये बहु मी पापिष्ठ । करशील इष्ट मनीं वाटे ।।४।।

(५५२)

धावाजी मायबापा । नये करुणा कैसी (तुम्हा)।।

दीनबंधु दीनानाथा । किती अंत पाहसी ।।१।।

त्रिविधतापसंगे । तापलों देवराया ।

न दिसे त्राता कोणी । शरण आलों तव पाया ।।२।।

किती तरी जन्म गेले । नाहीं आठविले पाय ।

म्हणोनिया कृपाघना । मौन धरियेले काय? ।।३।।

पुरे पुरे दंड आतां । घाली अन्याय पोटीं ।

**पांडुरंगनाथा तुज- ।**

**विण कोणी ना शेवटीं ।।४।।**

**(५५३)**

नाहीं अधिकार माझा । म्हणावया दास तुझा ।।१।।

सर्व दुर्गुणा आश्रय । झाले माझे हे हृदय ।।२।।

**गेला वायां नरदेह ।**

**वाढविला मिथ्या स्नेह ।।३।।**

ज्ञानेशजे सुचवी कांहीं । ठेवितसे पायीं डोई ।।४।।

(५५४)

काय नामवन्हि माझा पापगिरि । जाळाया मुरारी असमर्थ ।।१।।

असमर्थ म्हणूं तरी तुझे भाट । करिती बोभाट वाउगा कां ।।२।।

जळाले पातक मग कां उशीर । गोपिकामज्वरहारकाजी ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये करी माझी कींव । पतित सावेव तुझें द्वारीं ।।४।।

(५५५)

तुम्ही शुद्धसत्व स्वामी रमापती । स्वरूपच्युति नाहीं कधीं ।।१।।

आम्ही रजस्तमयुत अज्ञ जीव । रागद्वेषा ठाव पूर्ण येथे ।।२।।

आपुले विकार तुमचे पदरीं । लावोनी कुसरी बोलो तुम्हां ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये ऐसे माझे दोष । नाणावे मनास मायबापा ।।४।।

(५५६)

सदा माझा जीव भोगासाठीं कष्टी । द्यावी प्रेमपुष्टि आपुली त्वां ।।१।।

प्रेमाभावामुळे मन हें विषयीं । धांवे शेषशाई निरंतर ।।२।।

काय नये कीव अझोनी तुम्हासी । जातां आयुष्यासी काय होय ।।३।।

माझें समाधान करावयासाठीं । ब्रह्मज्ञानाच्या सांगतसे गोष्टी ।

म्हणे मज पाहसी भिन्न दृष्टि । व्यर्थ काय हरि हरि करिसी ओठी ।।४।।

ज्ञानेश्वरकन्ये मायबाई । बळी देते हा पति तुझे पायीं ।

तेणें तृप्त होवोनि लवलाही । हरि पति मिळो हा वर देई ।।५।।

ज्ञानेश्वरकन्ये झालो मी हिंपुटी । न कळे शेवटीं कोण गति ।।६।।

(५५७)

कीर्ती आयिकिली कानीं । नसे ऐसा दाता कोणी ।।१।।

निज वैरियाही ठाव । देतो प्रेमें रमाधव ।।२।।

शत्रुमित्रा सम पाही । दोघेही घे निजबाही ।।३।।

माझी ज्ञानेशजा माय । स्नेहा जनयित्री होय ।।४।।

## ७

# आत्मवृत्त

(५५८)

आपुल्याहि हातें कोण मियां घात । माझे कानन(त)पुत्र म्हणोनियां ।।१।।

आपुल्याचि हातें लाविलेला फास । निज माहेरा विसरोनी ।।२।।

जरी नच देतो बरळूं इंद्रियें । जरी वाचे गाये हरिनाम ।।३।।

तरी हा चुकता सहज अपाय । धरिली न सोय कांहीं मियां ।।४।।

ज्ञानेश्वरकन्ये लाधोनियां पाय । नाहीं निज-काय झिजविला ।।५।।

(५५९)

जळो हे महंती नरकाचें मूळ । जीव उतावेळ सेवेलागीं ।।१।।

**थोरपणें आंगीं भरलासे ताठा ।**

चुका नेटपाटा होत गेल्या ।।२।।

समजूं लागलों आपणासी ज्ञानी । बंध मुक्ति दोन्ही मिथ्या म्हणे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये ऐसा अहंकारे । आचरलों खरें पापकर्म ।।४।।

(५६०)

वदले समर्थ ज्ञानियांचे कंठीं । अहंकार मिठी बळकट ।।१।।

इतरा हे शब्द मज अनुभव । प्रमादा सावेव मूळ हेचि ।।२।।

आपणासी ज्ञानी समजतां चित्तीं । प्रवृत्ति निवृत्ति सांडियेली ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये विनंती पायासीं । कदा महंतीसी देऊं नको ।।४।।

(५६१)

चित्तीं पापवृत्ती उठतां निरोधी । न दवडी संधी प्राप्त होता ।।१।।

इतरा भासवी पहातो परीक्षा । मनी रागदीक्षा अखंडित ।।२।।

सत्प्रवृत्तिलागी नेदी अवसर । विवेक शेजार शत्रु वाटे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये झालो वाटे सिद्ध । सांडिला निरोध वासनांचा ।।४।।

(५६२)

पढविला शुक बोले बहुसाल । अंतर निर्मळ नेणें कांहीं ।।१।।

**तेवि ब्रह्मज्ञान बोलूं लागे ओठी ।**

**अहंतेचि गांठी ठेवोनियां ।।२।।**

भाविका वाटत तव कृपाफळ । नेणती वढाळ चित्त माझे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये ऐसा नागवलो । जेव्हां जाकळिलो अहंकारें ।।४।।

(५६३)

मनीं ऐसे वाटे तुझा उपदेश । असे साधकास सिद्धा नाहीं ।।१।।

मी तंव भोगितो जीवन्मुक्तिसुख । केविं विधिवाक्य किंकर मी ।।२।।

परा म्हणे तुम्ही संप्रदायनेम । मोडितां परम पातक हे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये नेणे निजकर्म । पातकी अधम मूळ मीचि ।।४।।

(५६४)

लोकां सांगे मीचि जाणतो यथार्थ । वचन भावार्थ श्रीगुरुचा ।।१।।

आणिकाते नाहीं झाली तुझी कृपा । मज सेवे सोपा मायबाप ।।२।।

ऐशापरी निज सेवा फोंकारीत । दावाया जनांत निरहंकार ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये नेणे निजकर्म । पातकी अधम मूळ मीचि ।।४।।

(५६५)

हे तो खरे जया होय तुझी कृपा । महेशहि मापा तुळे ना त्या

।।१।।

परी नसोनीहि आंगीं ती पात्रता । भासवी तत्वता तैशापरी ।।२।।

उणे पुरे बोल टोचिती अंतरा । वाटे मीं इतरा गुरुसम ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये पाखडी पाखर । पोळले अंतर पापभारे ।।४।।

(५६६)

महंतीच्या योगें पावलो जे सुख । पायापाशीं देख निवेदिले ।।१।।

कांपते अंतर आठवितां कर्म । अगाध परम पापसिंधु ।।२।।

जैसा तुज नेणे आपुलाचि पार । पापाचा सागर माझा तैसा ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये दिधलासि दंड । उपेक्षोनि भंड ऐसे वाटे ।।४।।

(५६७)

**दंड द्यावा परी न करा उपेक्षा ।**

मरणा ना शिक्षा माता नेदी ।।१।।

जरि माझे मनीं असेल वासना । भोगावे आपणासम भोग ॥२॥
तरी द्यावा होता दुःखपूर्ण योग । निवारुनि माग पातकांचा ॥३॥
ज्ञानेश्वरकन्ये करोनिया दुरी । करविली भारी पापकर्मे ॥४॥
(५६८)
हे तो वाटे मज करिता उपेक्षा । कणाकटाक्षा आवरोनी ॥१॥
तुमच्या दयेसी न साजे उपमा । कोण करी सीमा उदधीतें ॥२॥
दयेचा सागर म्हणताती तुज । आटला जो आज सर्व कैसा ॥३॥
ज्ञानेश्वरकन्ये दीनावरी शस्त्र । उगारणें शास्त्र कोण म्हणे ॥४॥
(५६९)
**पायिकीचे सुख नयेचि बोलतां** । अंशमात्र ताता पावलो जे ॥१॥
पावलों किंचित त्यातेही कारण । माझे नीचपण त्यांत झाले ॥२॥
झाले नीचपण तुम्हासवें माझे । सेविलें न तुझे पाय प्रेमें ॥३॥
प्रेमें करी सेवा ऐसे दावी वरी । कुटिल अंतरीं ज्ञानेशजे ॥४॥
(५७०)
कुटिल अंतर निवेदितो तुम्हा । तरी दोषग्रामा नातळतो ॥१॥
नातळतो दोष जरी तुजलागीं । करुणा प्रसंगीं विनवितो ॥२॥
विनुवुनि प्रेमें मागताचि क्षमा । न लागते यमा भिणें मज ॥३॥
मज मियां हातें दिधलें यमासी । पाप तुजपाशीं लपविलें ॥४॥
लपविले परी आतां वाटे भय । न सुचे उपाय ज्ञानेशजे ॥५॥
(५७१)
उपाय तो एक वचनानुकारें । सदा प्रेमभरें गावें तुज ॥१॥
गावे तुज हे तो सुलभ साधन । परी ते कठीण भासे मज ॥२॥
भासे माझें मन एक घडीभर । न राहेचि स्थिर म्हणोनियां ॥३॥
म्हणोनियां तुम्ही द्यावे प्रेमदान । नको धरु मौन ज्ञानेशजे ॥४॥
(५७२)

ऐसे वाटे मनीं मन वाणी प्राण । तुझे पायीं लीन व्हावे सदा ।।१।।

**नाठवावी कांहीं भूक कीं तहान ।**

**सदा तुझे ध्यान डोळ्यापुढें ।।२।।**

**क्षणही नसावी विश्रांति वाणीसी ।**

**नानाभावें तुजसी आळवावे ।।३।।**

ज्ञानेश्वरकन्ये कैं तो सुदिन । न कळे देखेन कृपें तुझ्या ।।४।।

(५७३) पद

कितीरे गांजिसि मज भगवंता । धांव रमाकान्ता ।।धृ०।।

का हे निघती ना माझे प्राण । कष्टचि दारूण ।।

जाऊं कोणासी आतां शरण । देईल जीवदान ।।

दया करुनि मज पंढरीनाथा । सोडवि दुःखांतुनिया आता ।।१।।

माझ्याविषयीं कां देवा फार । झालासि निष्ठुर ।।

गजेंद्राचा घेऊनि कैवार । मारिलिया नक्र ।।

या या परि विलाप करुनि ।। ....

(५७४) आर्या

गंगे जगदघभंगे गिरिजा हन्नीर.रूह.मधुप.रमणी ।

घे झडकरी मज पदरीं शिशुकृत अन्याय आणुनि न मनीं ।।

दोहा

विश्वद्रोहकृतपातकी जन्हुकुमरी आधार ।

पावुनि झाले सुकृतमय करिति आन उद्धार ।।

**राधारमणा सांवळिया ।**

**चित्तचोरट्या गोवळिया ।।**

(५७५) आर्या-

स्त्री सुतवित्तादिक हे देती सुख व्याधि देह जो न वरी ।।

वेश्यालिंगनि मिळतां कोण पुनरपि रूचेल हो नवरी ।।

(५७६)

*निर्मळासी मळ लावितो दुर्जन । जावोत झडोन जिव्हा त्यांच्या ।।१।।*

*नेणती तयाचे हळुवार चित्त । कारूण्य वहात भोग देता ।।२।।*

*कर्माचेही फळ देता रमाधव । कारूण्य प्रवाह संकोचिना ।।३।।*

*कर्मपापफळे देतां भगवान । कालत्रयीं जाण मुक्ति नोहे ।।४।।*

*ज्ञानेश्वरकन्या चित्सुख-सागरीं । करूणालहरी जाणा तुम्ही ।।५।।*

(५७७)

*जया पापा नाहीं बोलिली निष्कृती । अमित निगुति कल्प जाता ।।१।।*

*परी एकवेळ चुकलों म्हणोनी । केल्या विनवणी सर्व वाय ।।२।।*

*ऐसा अनुपम कृपाळ श्रीहरी । नये याची सरी दुज्या कोणा ।।३।।*

***ज्ञानेश्वरकन्या घाली जीव प्राण ।***

***जो कोणी शरण आलो म्हणे ।।४।।***

(५७८)

*वरि वरि वाटे तुझ्या संप्रदाया । कलंक सखया लाविला म्यां ।।१।।*

*वाटले सांडावा तुझे पायीं प्राण । किंवा वरदान संपादावे ।।२।।*

*ज्ञानेश्वरकन्ये ऐसे वाटोनियां ।*

***ज्ञानराजपायापाशीं आलो*** *।।३।।*

(५७९)

*न गणुनी माव(ण) जरी खोटा भाव । पाप समुदाव वरी तोही ।।१।।*

*निजसेवेलागी निवेदिले मातें । आळंदीच्या नाथें कृपावंते ।।२।।*

*परी नाहीं केली निर्मल मानसे । सेवाहि उल्हासें करोनियां ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये ऐसा मी चांडाळ । लाज वाटे बाळ म्हणावया ।।४।।*

(५८०)

*आळंदी राहोनी आठवी स्त्रीसुख । सेवेमाजीं मूर्ख त्रास मानी ।।१।।*

***तीर्थी राहोनियां विषय चिंतणें ।***

**त्याहोनि राहणें घरीं बरें ।।२।।**

*ऐसे वाटोनियां परत ग्रामासी । पातलो सेवेसी सांडोनियां ।।३।।*

*ज्ञानराज पायीं प्रतिज्ञा ज्या केल्या । त्याहि म्यां मोडिल्या ज्ञानेशजे ।।४।।*

*(५८१)*

*पाहतो मी वाट चातक होवोनि । येईल वळोनि दयामेघ ।।१।।*

*निरभ्र आकाश दिसते नयनीं । न दे हर्ष मनीं मेघाविण ।।२।।*

*पिपासा लागली जाऊं पाहे प्राण । न जाये तहान सिद्ध जळे ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये चातकाची आर्ति । निवविसी कीर्ति ऐसी लोका ।।४।।*

*(५८२)*

*चातका पाहोनी वाचलो माधवा । नाहीं तरी जीवा सांडितो मी ।।१।।*

*निववील आर्त पूर्ण भरवंसा । चातकमानसालागी होय ।।२।।*

*म्हणोनिया आर्तदृष्टि विलोकत । चातक तिष्ठत मेघासाठीं ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये दाखवाल पाय । आशातंतु होय मनीं माझ्या ।।४।।*

*(५८३)*

*नोहे उतराई तुझ्या उपकारा । निगम डांगोरा ऐसा गाजे ।।१।।*

*स्वानुभवें सांगें हेंचि माझें चित्त । नोहे उपकृत्त तुम्हालागीं ।।२।।*

*ऐसें म्हणावया लाजे माझे चित्त । सर्व विपरीत आचरलों ।।३।।*

*उपकृत नोहे परी अपकारा । केलें म्या दातारा तुम्हालागीं ।।४।।*

*ज्ञानेशजे मज पाहोनी यमासी । वाटे देऊं यासी कोण दंड ।।५।।*

*(५८४)*

*कोणतें पातक सांगूं नाहीं केलें । काय तूं स्नेहाळे जाणसी ना ।।१।।*

*जनासी दावाया वरी मातृबुद्धि । अंतरीं कुबुद्धि काम नांदे ।।२।।*

*मनीं लोकमान धरुनी ग्रंथाचे । अवलोकन साचे करीतसे ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्ये काय माझ्याविषीं । धरोनी मौनासी बैसलीस ।।४।।*

*(५८५)*

तुझिया भक्ताने मानावे मजला । मनीं या भावाला नित्य वाहे ।।१।।

दुजियाची कीर्ति पाहोनियां जनीं । मत्सरहि मनीं वृद्धि पावे ।।२।।

अल्पहि न साहे कोणाचाहि बोल । क्रोध तो सबळ धांवतसे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये कोमळ अंतर । आतांचि निष्ठुर कैसे झाले ।।४।।

## ८

# विनवणी

५८६)

सर्व मी जाणतो माझें आचरण । साक्ष असे मन तया लागीं ।।१।।

तुम्हीही ते जाणा सख्यामायबापा । दाखवावा सोपा मार्ग कांहीं ।।२।।

समर्थाचे पंक्ती दीनातें मिष्टान्न । सहज भोजन मिळतसे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये पंक्तीस घेऊन । उपाशी उठोन देऊं नका ।।४।।

(५८७)

लेकुराचा लळा ठाऊका मायेसी । तया बालकासी काय चोज ।।१।।

तुमचिये कृपे वाढलो दातारा । लावा परतीरा भवाब्धीच्या ।।२।।

बोबडिया बोले विनवितो तुम्हा । सर्व मेघश्यामा उपसाहा ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये चातक मी खरा । प्रेमवृष्टि करा मजवरी ।।४।।

(५८८)

नाहीं तुझे अंगीं गुण । दावी म्हणसी चरण ।।

तरी निगमवचन । वृथा जाण होईल ।।१।।

मज येत विषमता । इच्छेनेचि उद्धरितां ।।

सर्व जगाचा नियंता । सम ताता मी राहे ।।२।।

मायबापा पूतनारी । मिथ्या आपुली वैखरी ।।
अधमांही निजपुरीं । सुखी करी देवो ।।३।।
म्हणोनियां नांगीकारा । पायीं निघोनि तारा ।।
ज्ञानेशजे दोष खरा । तैं पदरा तुझिया ।।४।।

(५८९)

प्रेम भातुके देऊन । करा स्वामी बोळवण ।।१।।
भूक लागलीसे फार । देवा न करा उशीर ।।२।।
प्राण गेल्या मग काय । दाखवाल निजपाय ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये आतां । पोटाशीं घे भवभीता ।।४।।

(५९०)

**नाहीं मज आतां लोकासवे काज ।**
**तुझें पदरज लाधलिया ।।१।।**
**निःसंग होवोनि करीन स्मरण ।**
**करावे कल्याण इच्छा तरी ।।२।।**
जरी वाटे कष्ट माझ्या उद्धरणी । तरी द्या लोटोनी नरकामाजीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये परी एक करी । राहे नाम उरीं सदा तुझे ।।४।।

(५९१) पद

सादर ऐका ऐका हो व्रजराया । पतित मी शरण आलो पाया ।।
सांडोनिया स्वजन बंधुमाया । चित्त झुरे रुप पहावया ।।१।।
पायीं पैंजण नुपुरें वाजती । वेणुनादें पेटवी कामज्योति ।।
कृष्णा नीराची कुंठलीसे गती । डोळा पाहो वाटे तेचि मूर्ति ।।२।।
नका पाहूं माझा कुडा भाव । नाहीं आंगीं सदगुणासीं ठाव ।।
धरी पाय पाहायाची हाव । माउली तूं माझी करी कीव वो ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये तुझी कृपा । झालियाचि हरी होय सोपा ।।
म्हणोनिया विनवी मायबापा । चुकवी माते माझ्या जन्मखेपा ।।४।।

(५९२) पद

पोळला देह माझा या त्वरें नारायणा ।

चातका जलद होसी वर्षुनि निववी काया ।।धृ०।।

कांपरे भरे आंगी पाहतां कर्म ठेवा ।

लेशही नाहीं केले पुण्य जे वारी गोवा ।।

निशिदिनीं मनीं वाहे कामिनी संग व्हावा ।

योजुनि युक्ती नाना पुरविले मनोभावा ।।१।।

ऊठता कामवृत्ती पत्नि कीं मायबहिण ।

अल्पही चित्ति नाणी नाठवी वेदवचन ।।

भासवी तया ज्ञानी शुकमुनि परिस जाण ।

अनुताप वरी दावी आचरी मागुतेन ।।२।।

रविसुता सदनीं नाहीं यातना कोणी ऐसी ।

भोगिता नाश पावे आघवी पापराशी ।।

नाकळे पुढें माझी होईल गती कैशी ।

लागला मायबाप ध्यास हा दिवसनीशीं ।।३।।

भरंवसा धरुनि येथे पातलो तुझे द्वारीं ।

येऊं द्या दया कांहीं मजविषीं पूतनारी ।।

आळंदीपतीकन्ये निपट मी अंगीकारी ।

सर्वही संत मुखी गातील तुझी थोरी ।।४।।

(५९३) पद

तुम्ही संत मायबाप बंध तोडावा कोणी ।

काकुळती फार आलों तुमचिया पायवणी ।।धृ०।।

त्रैलोक्यपती एक असे थोर साहुकार ।

उदीम करावया झालो त्याचा ऋणदार ।।

नियम त्याशीं केला जना राखीन दार ।

**उद्यमीं थोडें सुख होतां वाढे अहंकार ।।१।।**

उदीम करुं गेलो मेळवूनि भागी कांहीं ।

तिहीं मज भुलविले सांगुनियां कांहीं बाही ।।

आमुचिया योगें तुम्हां सुख होतसे पाही ।

बंधमुक्त करुं आम्ही भाग घ्या निज दाही ।।२।।

क्षणिक सुखासाठीं भ्रष्ट झालों वचनीं ।

नाहीं कधीं जाऊनियां लागलों साहू चरणीं ।।

कर्म पाहोनियां साहू बोलला कोपोनी ।

घाला यासी बहू वेळा लक्ष चौऱ्याशीं योनी ।।३।।

ऐसा महाबंध गाढा गेले कल्प तुटेना ।

शीणलो बाप हो मी कोणी करा करूणा ।।

नेवोनि मज दावा तया साहू चरणा ।

ज्ञानेश्वरकन्ये नाहीं तुजविण कोणी दीना ।।४।।

(५९४)

माता पुरवील बाळकाची आळी । तरी दुज्याजवळी न जाय तो ।।१।।

जंव न मिळे मज पोटभरी अन्न । तंव भिक्षा जाण चुके केविं ।।२।।

माता करी दूर मागो नेदी भीक । जिवीत सम्यक केविं होय ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये असे अभिमान । तरी प्रेमदान द्यावे मज ।।४।।

(५९५)

नाहीं आंगीं ऐसे सदगुणाचे बळ । चित्तीं तळमळ तेही नाहीं ।।१।।

दुज्याचे पाहोनी तैसेचि आपण । कंठी आला प्राण धांव म्हणे ।।२।।

ऐसिया रीतीने कोटी जन्म गेले । तरी कां पाउलें दिसतील ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये वचन सोपारें । चित्तीं प्रेम थारे ऐसे करी ।।४।।

(५९६)

फासावरी देता चोराची जी दशा । तैसा जगदीशा भाव देई ।।१।।

*क्षणभरी चित्त सांडोनी विषय । आठवील पाय कधीं तुझें ॥२॥*

*मनीं वाटे दुजा घेऊनिया जन्म । प्रेमाचे आंदण द्यावे मज ॥३॥*

***ज्ञानेश्वरकन्ये तुजवांचोनियां ।***

***जीवित हे वायां जात आहे ॥४॥***

*(५९७)*

*आणिक साधन न लगेचि कांहीं । एक शेषशाई आठवितां ॥१॥*

*परी जिव्हेलागीं नाना रस स्वाद । नेदी काम क्रोध नाम वदो ॥२॥*

*जे जे डोळा पाहो ते ते व्हावे वाटे । वासनेचे काटे अनावर ॥३॥*

*ज्ञानेश्वरकन्ये उबग संसारा । वाटेल ते करा मजसाठीं ॥४॥*

*(५९८)*

*देसी मज जरी मानवाचा जन्म । तुझें पायीं प्रेम राहो माझा ॥१॥*

*घालशील जरी वृक्षादिक योनी । परी वृंदावनीं ठेवा मज ॥२॥*

*ज्या ज्या योनीमाजीं जाईन मी दैवें । तेथ तेथें द्यावें निज प्रेम ॥३॥*

*ज्ञानेश्वरकन्ये तुझे पायीं चित्त । असलिया योत दुःख कोटी ॥४॥*

*(५९९)*

***ज्याचें मुखीं तुझें नाम ।***

***त्याचें चुरीन चरण ॥१॥***

***ज्याचें चित्तीं तुझा वास ।***

***जन्मोजन्मीं त्याचा दास ॥२॥***

*तुझे पायीं जीवभाव । तोचि माझा रमाधव ॥३॥*

*ज्ञानेश्वरकन्ये ठेवी । निजदासाचे पल्लवीं ॥४॥*

.................................................................................................................

## ९.

## *विरहपर*

(६००)

नाहीं कोण बोल माझेंचि दुर्दैवें । सखे या माधवे त्यागिले वो ।।१।।

सर्वही भोगिती सुखाचा सोहळा । माझ्याचि कपाळा दुःख बाई ।।२।।

जावूनिया सये विनवी राजसा । किती दिन ऐसा अबोला जी ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या जननी प्रेमळ । रडे मुळमुळ हरिलागीं ।।४।।

(६०१)

न देतां देहासी अणुमात्र कष्ट । सेवा ती अचाट संपादिली ।।१।।

मेळविले धन स्वार्थींच वेचिलें । येणें पाडें केलें दास्य तुझें ।।२।।

आम्हाहूनि थोर जया धन बळ । तया रजधूळ प्राप्त नाहीं ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये नव्हता जिव्हाळा । म्हणोनियां डोळां आड झाली ।।४।।

(६०२)

दीन मायबाप तुम्हीच सज्जन । करा काज पूर्ण इतुके माझें ।।१।।

नित्य हरिदिनीं जाणेसे तुम्हासी । आळंदीरायासी भेटावया ।।२।।

माझिया मायेचे असे ते माहेर । गेली जे साचार क्षेम द्याया ।।३।।

बहु दिन झाले नये परतोन । निरोप लिहून आला नाहीं ।।४।।

तेथें जावोनियां सांगावा निरोप । लेकुरांचा ताप वाटे जरी ।।५।।

तरी निजहस्तें वधूनि तयासी । सुखे माहेरासी राहे मग ।।६।।

ज्ञानेश्वरकन्ये तुझ्या पायासाठीं । झालीत हिंपुटी सर्व बाळें ।।७।।

(६०३)

कष्टी झालो फार तुज पाहावया । उबग सखया न करावा ।।१।।

आम्ही दीन दास तुमचें पोसणें । तया नारायणें नुपक्षावे ।।२।।

कृपेचा कोंवळा दीन दयानिधी । माझीच कां सुधी नाहीं तुम्हां ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये तुजवाचोनियां । कवणाच्या पाया विनवावे ।।४।।

(६०४)

भिरभिरि पाहे दिशा विलोकून । येईल धांवोन माय माझी ॥१॥
वाटे केव्हां केशीं झाडीन चरण । दुःख मी सांगेन अंतरीचे ॥२॥
ओसंगा घेऊनी फिरवील हात । बैसेल सांगत गुजगोष्टी ॥३॥
ज्ञानेश्वरकन्ये तुझाचि आधार । जाणोनि निर्धार धांव घेई ॥४॥

(६०५)

धरोनियां आस राहिलोसे पोटीं । मोजितो मी बोटे दिन अंबे ॥१॥
येईल धांवोनि सखे जीवलगे । म्हणोनियां उगे चित्तीं वाटे ॥२॥
वाट पाहोनियां शीणले लोचन । केलेसे कठीण मन तुवां ॥३॥
ज्ञानेश्वरकन्यें न लवतां पाती । यावे रातोराती मायबाई ॥४॥

(६०६)

झणीं वाटे आतां येईल जननी । म्हणोनियां कानीं चहाळ घे ॥१॥
पाउलाचा शब्द पडतां श्रवणीं । दारासी येवोनि नित्य पाहे ॥२॥
निराशा होऊनी येत परतोनी । रडे आठवोनी मुळूमुळू ॥३॥
ज्ञानेश्वरकन्ये रडोनी रडोनी । सुजले साजणी नेत्र माझे ॥४॥

(६०७) पद - श्रीकृष्णाचा वियोग

नेणो केव्हांचि टाकोनिया गेले । विरहानळें मज जाकळीले ॥
प्राण नाहीं निघोनियां गेले । हरिपायीं चित्त अडकले ॥१॥
हरिवियोग दुःख साहावेना । चारि वाचा नेणती बाई खुणा ॥
चौघाच्याही नयेचि आयण्या । कोण डोळा दावील सगुणा ॥२॥
हरिरुपी जडलेसे मन । विसरले देह गेह जाण ॥
कंठ सद्गद वाचा ठेली मौन । नये बोलता सुख का दुःख पूर्ण ॥३॥
बाई कोणी जावुनिया वेगे । ज्ञानेश्वरकन्ये विनवा गे ॥
भाका करूणापूर्ण अनुरागें । मग हरी आलिंगील आंगें ॥४॥

(६०८) पद - श्रीकृष्णाचा वियोग

कोण्या सवतीने दावा साधियेला । मशीं हरीनें धरिला अबोला ॥

बाई मी भोळी अबलेचि जाती । रांडा कुटिल माझिया सवती ।।
पतिसंगे मी पहुडले राती । सुख वर्णवेना माझिये हातीं ।।१।।
पतिसुखाची आंगावरी पुष्टी । न साहती रांडा निजष्टी ।।
बाई मी भोळी ग पहिलेचि मोठी । यांच्यासवें करीत सुख गोठी ।।२।।
बाई मी असोनि मुळी पतिव्रता । यांच्या संगें फजित झाले आतां ।।
परपुरुषाचा संग मज नसतां । कुंटिणीया करविती अवचिता ।।३।।
पतिसुख भोग पावोनिया । नाठवीच कधीं हरिपाया ।।
मानी स्वयें पराचीच जाया । हरि गृहीं न येती तेथूनियां ।।४।।
आतां बाई मी कोणा शरण जाऊं । कासयानें हरिसी समजावूं ।।
ज्ञानेश्वरकन्याचरण सेवू । तरीच घेतील कडिये व्रजरावू ।।५।।

..........................................................................................................

# १०

# भक्ति

..........................................................................................................

(६०९)

नाहीं नारायण कशाचा भुकेला । एक प्रेम त्याला अर्पावा कीं ।।१।।
मग सर्व भावें होय त्याचा ऋणी । सादर वचनीं राहे सदा ।।२।।
इतर साधनें फळकट सारी । आकळाया हरी असमर्थ ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या वळलिया पाठीं । नाचे पाठीं पोटीं श्यामरूप ।।४।।

(६१०)

भक्तप्रेमाची आवडी । म्हणोनियां घाली उडी ।।१।।
क्षणी वाजे देहाहंता । माझें सुख अंतरता ।।२।।
याचि मिषें प्रेमपेटी । घाली हृदयकपाटीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या नित्य । भक्तचिंतेतें वाहत ।।४।।

(६११)

सर्वीहि समृद्धि जयाचिया कृपें । सांडोनि साक्षेपे भ्रमताती ।।१।।

दिठिवेची दिठी सुखाचेही सुख । गुरुपाय देख श्रुति सांगे ।।२।।

जरी तुम्हां चाड सुख मेळवाया । तरी गुरुकृपा सांडो नका ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या सुत करुं वांछी । कांचोळी प्रेमाची गुरुपाया ।।४।।

(६१२)

भक्तिचिया केणें । मायबापाचें धांवणें ।।१।।

नसे आन प्रयोजन । कर्म धर्म आणि ज्ञान ।।२।।

विश्ववंद्य जगजेठी । भक्ता रक्षी पाठी पोटीं ।।३।।

आई ज्ञानेश्वरकन्ये । निजदासां सांभाळणें ।।४।।

(६१३)

योगयागश्रम अचिंत्य ते भोग । यांचा नसे लाग तुझे ठायीं ।।१।।

एका प्रेमाविण आघवी उपाधी । नयेसी आंगभेदी साधनांच्या ।।२।।

नव्हे हे तुमचे बोल अनारिसें । अनुभव ठसे मायबापा ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये लटकिया प्रेमा । पाहोनिही आम्हा सांडिसी ।।४।।

(६१४)

कासयासी वहावी चिंता । प्रेमे गातां भगवंता ।।१।।

बंधमोक्ष होती वाव । प्रेमे गातां रमाधव ।।२।।

नको आणिकांची आशा । आश्रयिल्या जगदीशा ।।३।।

ज्ञानेशजा सुत म्हणे ।

**प्रेमीं रंगोनि पाहणें ।।४।।**

(६१५)

भक्ता होतां कष्ट सोसवेना देवा । अंगें करी सेवा सर्व त्यांची ।।१।।

नामयाचे संगें खाये दही भात । निजभक्त हेत पुरवाया ।।२।।

चोरव्यामेळ्यासंगे ओढीतसे ढोरें । धुंडितसे घरें गौळियांची ।।३।।

जनाबाई सवें वेचूं लागे शेणी । भोळा भाव मनीं जाणोनियां ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या भक्तांची कैवारी । हृदयमंदिरी भावें धरा ।।५।।
(६१६)
आवडीच्या बळें होतसा सगुण । मनुष्यासमान मृत्युलोकीं ।।१।।
परी माझा भाव लटिकाचि जाणा । नेणें प्रेमखुणा तुझ्या कांहीं ।।२।।
म्हणोनियां काय न दिससी डोळा । कैसे अजामीळा उद्धरिले ।।३।।
लटिक्याचि भावें विप्रें आठविले । तरी चुकविले गर्भवास ।।४।।
ज्ञानेशजे तुझा लटिका मी दास । परी तूं थोरीस सांडूं नको ।।५।।
(६१७)
पतिसेवेविण नारी । जग थुंके तोंडावरी ।।१।।
वैद्याविण चिकित्सक । रोग वृद्धिकरी देख ।।२।।
गुरूविण सर्व विद्या । बांधितातीं स्वसंवेद्या ।।३।।
एक पांडुरंगनाथ । भवव्यथा निवारीत ।।४।।
(६१८)
सकार्य आटली जयाची उपाधि । तेही या गोविंदीं विनटले ।।१।।
संसाराच्या दुःखें शीणले जे कोणी । तिहीं चक्रपाणी सखा केला ।।२।।
सदा ज्यांचे चित्तीं वासना डाकिणी । तेही गुणागानीं रिझताती ।।३।।
ऐसिया स्वामीचे सांडोनियां पाय । आत्मघाती होय अन्याश्रमी ।।४।।
ज्ञानेशजाकान्त साधनीं अकळ । एक भावबळ आकळी त्या ।।५।।
(६१९)
कवणिया तोंडें म्हणूं मज पाव । विषयाची हांव जैसी तैसी ।।१।।
फुकाचें तें नाम नये माझ्या तोंडा । रिकामे होंदाडा हालविती ।।२।।
पुढें यमदंड दिसे अवघड । म्हणोनी सांकड घातलेसे ।।३।।
रक्षण शिक्षण तुवांचि करावे । शेखीं न लोटावे कोणीकडे ।।४।।
पांडुरंगनाथ कोण्याही प्रकारें । शोधावे साचारें मन माझे ।।५।।

(६२०)

थोर भाग्य उदयेंले । मायबाप देखियेले ॥१॥

न देखतां अधिकार । माझा केला अंगीकार ॥२॥

आतां नाहीं भवचिंता । गुरुकृपा हस्त माथा ॥३॥

पांडुरंगनाथ बाप । शरण गेल्या वारी ताप ॥४॥

(६२१)

नाहीं नारायण कशाचा भुकेला । एक प्रेम त्याला अर्पावा कीं ॥१॥

मग सर्व भावें होय त्याचा ऋणी । सादर वचनीं राहे सदा ॥२॥

इतर साधनें फळकट सारी । आकळाया हरी असमर्थ ॥३॥

ज्ञानेश्वरकन्या वळलिया पाठी ।

**नाचे पाठीपोटीं श्यामरुप ॥४॥**

(६२२)

राजयाची पोर जरी कां कुश्चळ । तरी कां चांडाळ वरी तीसी ॥१॥

गुरूकुळा योग्य एक हरिकुळ । येर अमंगळ नये सरी ॥२॥

तुझे पोटीं जन्म घेतला जननी । हरीचि म्हणोनि योग्य वर ॥३॥

अहंकारादिक नीच हे चांडाळ । हरोनिया खेळ नेऊं पाहे ॥४॥

ज्ञानेशजे माये व्हावया बहिणी । अर्पी चक्रपाणी लागी मज ॥५॥

(६२३)

जरी तुज वाटे भेटावा गोपाळ । तरी ठेवी भाळ शिव पायीं ॥१॥

जरी कां असेल शंकरीं आवडी । तरी घडी घडी हरि स्मरे ॥२॥

शिवाचे हृदयीं बैसला केशव । हरीहृदयीं शिव अडकला ॥३॥

म्हणोनियां शिवकृपें घेई हरी । तैसा पूतनारीकृपें शिव ॥४॥

ज्ञानेश्वरकृपें दोघे **सो।** आण तुझी जगदीशा ॥३॥

ज्ञानेशजे मायबाई । कृपाकर ठेवी  डोई ॥४॥

(६२५)

आजि जिवित सफळ । दृष्टि पाहो घननीळ ।।१।।

जो कां सर्वांच्या हृदयीं । अंतर्यामी श्रुति ग्वाही ।।२।।

भला नवलावो जाहला । द्रष्टा दृश्यरूपा आला ।।३।।

ज्ञानेशजा भक्तवाट । पाहे व्हावया प्रगट ।।४।।

(६२६)

पतिव्रता नेणें आणिकाची स्तुती । चिंती दिनराती पतिपाय ।।१।।

अल्पहि सोहळा मानीतसे थोर । आळस अव्हेर न करी कदा ।।२।।

तुम्हा तो उपास्य आळंदीचा रावो । पालखी उत्सवो न पाहवे ।।३।।

स्कंददास म्हणे आगळाचि प्रेमा । तुझा मेघःशामा पायीं बापा ।।४।।

(६२७) पद

तो हरि भक्तालागीं सोपा ।।धृ०।।

विदुरा घरच्या कण्या भक्षी । सुयोधनाचा न चढे सोपा ।।१।।

यत्पद ब्रह्मादिक ऋषि दुर्लभ । तो भक्ताघरीं घाली खेपा ।।२।।

योगी शिणती दहरस्मरणीं । तो घेऊनियां खेळत गोपा ।।३।।

स्कंददासप्रभु निज दासातें । सुख देऊनियां साहे तापा ।।४।।

(६२८)

द्विविध उपाय बोलिलासे संतीं । संसारीं श्रीपती मेळवाया ।।१।।

मर्कटाचे न्याये स्वयें सर्वभावें । शरण त्या जावें श्रीहरीसी ।।२।।

नातरी सांडोनी भोगमोक्षयत्न । करावे चिंतन अहर्निशी ।।३।।

स्कंददास म्हणे एकविध प्रेम । दोहोंठायीं वर्म चुकूं नये ।।४।।

(६२९)

गर्भामाजीं कोण करितो उद्यम । पाळी पुरुषोत्तम सर्वांलागीं ।।१।।

तैसी त्याची चिंता करणे लागे देवा । जेणें सर्वभावा समर्पिले ।।२।।

एक नारायण केलासे विषय । नाहीं अन्य ठाय ज्यांच्या प्रेमा ।।३।।

स्कंददास म्हणे प्रेमें चक्रपाणी । करिती ते ऋणी सर्वकाळ ।।४।।

(६३०)

काय तुजसाठीं करावें हरीने । नायकतां वचनें सांगताही ।।१।।

न होसी तूं तैसा जडाचियेपरी । सर्वस्वें श्रीहरी-परतंत्र ।।२।।

सर्व तयावरी टाकोनियां भार । निश्चल अंतर करुनी राही ।।३।।

स्कंददास म्हणे मग तुझी चिंता । सर्वहि अनंता करणें लागे ।।४।।

(६३१)

पुत्राठायीं जैसी प्रीति स्वाभाविक । नसे ती दांभिक लोकाचारि ।।१।।

तैसी हरिपायीं जडतां साचार । होसी भवपार क्षणमात्रें ।।२।।

निष्कंचन प्रिय माझा व्रजराया । उपचार वायां प्रेमाविण ।।३।।

ज्ञानेशजा माय करुणाकल्लोळीं । पहात वाटुली स्वदासाची ।।४।।

(६३२)

**आज्ञापरतंत्रे नाशे रागद्वेष ।**

**जाणावें मानस शुद्ध झालें ।।१।।**

**देवाविण गोड न वाटे आणिक ।**

**जाणा परिपाक उपास्तीचा ।।२।।**

**ज्ञानें सर्वाभूतीं पहावे उपास्य ।**

**तेणें साधे दास्य निरभिमान ।।३।।**

**वियोगाची भीति वागवोनि पोटीं ।**

**पराभक्त्या घोटी ब्रह्मसुख ।।४।।**

**ज्ञानेशजा माय पाजी स्तनपान ।**

**गलिताभिमान पाहोनियां ।।५।।**

(६३३)

एका प्रेमाचीच देवालागीं चाड । न पाहे तो गोड सूर कीति ।।१।।

नाहीं कोणी गुण न्यून तयापाशीं । होईल संतोषी तुझ्या गुणें ।।२।।

*चतुर्दश विद्या चौसष्ट कळा । हरीचि एकला स्वामी त्यांचा ॥३॥*

*ज्ञानेश्वरकन्या प्रेमाची भुकेली । न जाय विकली गुणालागीं ॥४॥*

*(६३४)*

***क्षुधार्थी बाळका न लगे सांगावे ।***

***माते आळवावे आक्रंदोनी ॥१॥***

***असा हरिप्रेमा उपजतां चित्तीं ।***

***लज्जादि पळती रानोमाळ ॥२॥***

***मग दिनराती विरहाची ज्वाळा ।***

***अखंड उमाळा उठे चित्तीं ॥३॥***

***सर्व शब्दार्थांची हारपोनी सत्ता ।***

***ज्ञानेशजा माता होय एक ॥४॥***

***ज्ञानेशजामाय सापराधा ताडी ।***

***निरपराधा कडी घेऊनि खेळे ॥५॥***

*(६३५)* ***डोळियाचें सुख***

***डोळियाचें सुख पाहतां अंतरीं ।***

***सांवळी गोजिरी श्यामतनू ॥१॥***

***श्रोत्रद्वारें प्रेमें करावें श्रवण ।***

***निशिदिनि गुण गोविंदाचे ॥२॥***

***नामाचे चिंतनें करितां उन्मन ।***

***भासे जन वन कृष्णमय ॥३॥***

***ज्ञानेशजा सांगे येथिलिया गोडी ।***

***सनकादिक वेडी पिसी झाली ॥४॥***

*(६३६)*

*पाहुनी भक्ताचा तुझा प्रेमभाव । चित्तीं उठे हांव तैसीच ती ॥१॥*

*कैं प्रेमसुख होईन भोगिता । लाधले जे संता थोरथोरा ॥२॥*

*अधिकारेविण करीतसे आस । समर्थाची कास पाहोनियां ॥३॥*

*ज्ञानेश्वरकन्ये कायसे कठीण । दिधलिया मन तुवां बोला ॥४॥*

(६३७)

*ज्यांची जया लागे गोडी । जडे अंग गुणें खोडी ॥१॥*

*पतिचिया पायाविणें । पतिव्रता आनु नेणें ॥२॥*

*तैसे भक्त हरिविण । आन नेणती साधन ॥३॥*

***स्कंददास म्हणे प्रेमा ।***

***नेदी गुणासी गरीमा ॥४॥***

(६३८)

*भावेविण सेवा । तुम्हां नावडेचि देवा ॥१॥*

*आम्ही दुर्दैवी करंटे । नेणो प्रेमाचिया वाटे ॥२॥*

*कर्मवासनेचा गोवा । बद्धमूल तो केशवा ॥३॥*

*ज्ञानेशजे उगा शीण ।*

***नाहीं उजळ दर्पण ॥४॥***

(६३९)

***दुर्लभ तो लाभ झाला आम्हा तुम्हां ।***

***निगम महिमा गाती ज्याचा ॥१॥***

***आतां वायाविण नका दवडूं काळ ।***

***चाला घननीळ वश करुं ॥२॥***

***सदां एकमेकां सांगूं ऐशा गोष्टी ।***

***हृदयीं संपुटी हरी राहे ॥३॥***

***परस्परा करुं सुखें सावधान ।***

***कराया पालन गुरु आज्ञा ॥४॥***

***ज्ञानेशजामाय येईल धांवोनी ।***

*ऐशा कडसणी वागलिया ॥५॥*

(६४०)

**नको ऐसा संग ।**

**होय भंग चित्तासी ।।१।।**

वाटे तुझे पायीं गोडी । ऐसी जोडी द्या कांहीं ।।२।।

संतपायीच्या पैजारा । माथां भारा वाहावा ।।३।।

स्कंददास म्हणे करा । मज किंकरा सेवक ।।४।।

(६४१)

आज भाग्याची उजरी । दृष्टि देखो पूतनारी ।।१।।

अनंत ब्रह्मांडाचा पिता । देवि लक्ष्मीयेचा भर्ता ।।२।।

**कोटी लावण्याची शोभा ।**

ज्याची पदनखप्रभा ।।३।।

ज्ञानेशजा कृपाफळ । ब्रह्म झालें पोटीचें बाळ ।।४।।

(६४२)

नाहीं आयिकिला । शरणागत मोकलिला ।।१।।

ऐसी कृपेची साऊली । माझी ज्ञानराज माऊली ।।२।।

न पाहेचि यातिकुळ । भावा भुलला दयाळ ।।३।।

ज्ञानेशजीं दृढपण । दासां होऊं नेदी शीण ।।४।।

(६४३)

कृपणासी एक धनाची आवडी । न वेची कवडी भोगासाठी ।।१।।

धनाचिया प्रेमें देहा कष्ट होती । परि ते वाटे सुखरूप ।।२।।

**अभक्त तो एक निजभोगासाठीं ।**

**जो कां जगजेठी शिणवितो ।।३।।**

स्कंददास म्हणे राहे हरीस्मृती । भक्त ते विपत्ती गोड मानी ।।४।।

(६४४)

पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । तैसें राहो मन पायीं तुझ्या ।।१।।

बालकासी जैसी मातेची आवडी । तैसी लागो गोडी तुझी मज ।।२।।

विषयलंपटा विषयाची प्रीति । तैसी माझी वृत्ति राहो पायी ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या पुरवी वासना । जन्मोजन्मीं मना हाचि छंद ।।४।।

(६४५)

लोकां दावावया करिसी कविता । तरी तो अनंता मानेल ना ।।१।।

अबद्ध कुबद्ध सर्वसुबद्ध । हरी करी शुद्ध प्रेमबळे ।।२।।

जंव प्रेमें पिसी नाही झाली वृत्ति । तंव शास्त्ररीति सोडूं नयें ।।३।।

**सुबद्ध रचोनी गद्यपद्य छंद ।**

**गावा तो गोविंद आनंदाने ।।४।।**

ज्ञानेशजा माय न करी सहन । होतां अभिमान तयाचाहि ।।५।।

(६४६)

समर्थे वर्णिलें अभंगीं जे भाव । नाहीं तैसी ठेव वृत्तिलागीं ।।१।।

तरी जैसा भाव तैसाचि गोविंद । रचोनिया छंद आळवावा ।।२।।

परी नको चित्तीं काव्य अहंकृती । बोलवी श्रीपती म्हणोनियां ।।३।।

ज्ञानेशजामाय भजनाचा चाळा । लागे तो जिव्हाळा ठेवी चित्ती ।।४।।

(६४७) पद

निष्काम योगयागी । झाल्या माय । हरीवरी श्रुती रागी ।।१।।

करुं जातां हरि शोध । म्हणती त्या । नेती न चले शब्द ।।२।।

अन्वयव्यतिरेके । घेती माय । सन्मात्र ब्रह्मसुखें ।।३।।

तो हरी गोवळ्याघरीं । झाला माय । भावेचि देहधारी ।।४।।

प्रेमचि करुनि मूस । ओतिला । चित्सुख ब्रह्मरस ।।५।।

ज्ञानेशजा कृपाफळ । आम्हाही । आवडे गोपाळ ।।६।।

(६४८) पद

द्रष्ट्याचाहि द्रष्टा । यशोदे ।

निगमगदित निजसूक्ष्मगतीची जननी हाचि प्रतिष्ठा ।।१।।

प्राणाचाहि प्राण । यशोदे ।
निजजनममता बंध हराया गोचर झाला जाण ।।२।।
चैतन्याची कळा । यशोदे ।
भक्तबळे त्या नामरूपाची । खोळ घातली गळा ।।३।।
स्कंददासप्रभु खरा । यशोदे ।
पाठी पोटीं भक्त रक्षिता । उसंत नेघे जरा ।।४।।
(६४९) पद
अकळ अकळ हा सकळ जीवाप्रति न कळे याची स्थिति ।
भुलली भल्या भल्यांची मति ।।धृ०।।
अगुण असुनि हा सगुण नाटकी लीलातनु सावडे ।
जयाला भक्तीसुख आवडे ।
निजसुख गोडी देऊनि उघडी ओढी आपणाकडे ।
फेडी भक्ताचे सांकडे ।।चाल।।
जशी गाय वोरसे निजवत्सा पाहुनी ।
हरि तसा येतसे भक्तकाजीं धावुनि ।
कां ब्रह्मानंदीं गोडी कमी याहुनि ।।चाल पूर्व ।।
सुरवरकार्या नटवर वपु घे केवल सुखसंविती ।
वारि दासांची भवभीति ।।१।।
अनन्य पाहुनि वदान्य गुरू तो कदान्न भक्ता घरी ।
प्रेमें सेवी कण्या भाकरी ।
अष्टसिद्धि नवनिधी राबती दारीं दासीपरी ।
तो करी भक्ताघरीं चाकरी ।।चाल।।
हरि पंडुसुतारथिं बैसुनि वाजि वळी ।
करी द्वारपाळ त्या भक्तप्रतापी बळी ।।
सवे दासि जनीच्या राहुनि कांडी दळी ।।चाल पाहिली ।।

मुनिजनमानसरंजन वंदन करिती ज्या सुरपती ।
म्हणती नेति नेति त्या श्रुती ।।२।।
भक्तिसाठीं मुक्ति न घेती प्राण करिती घाबरा ।
प्रिय जो नारदादि मुनिवरा ।
आलिंगाया मुनिपण सांडुनि व्रजीं झाल्या सुंदरा ।
भोगि ज्या हृदयकमळीं इंदिरा ।। चाल ।।
मज भक्तजनीं हा दिधला मोठेपणा ।
वरि दास्य करिती ते दवडुनिया जीवपणा ।
हरी स्वमुखें सांगें भक्तिसुखाच्या खुणा ।।३।।....

(६५०)

क्रियायोगें हेचि लागे रे स्वभावें ।
श्रद्धेंत नाणावे विकल्पातें ।।१।।
विकल्प निमाल्या सहज समाधी ।
हरि कृपानिधी हृदीं भेटे ।।२।।
दृढ विश्वासिया सुलभ हें फळ ।
नलगे किडाळ योगादींचे ।।३।।
स्कंददास म्हणे देई निजचिंता ।
टाकोनी अनंतावरी सर्व ।।४।।

(६५१)

सांडिली ती वृत्ति भासे देवाधीन ।
आठवी वचन माउलीचे ।।१।।
जही घालसिल देवावरी भार ।
तेव्हांचि उदार धांवतसे ।।२।।

परी नित्य द्यावा देवासी आठव ।

अहंकारा वाव ठेवूं नये ॥३॥

स्कंददास म्हणे **सर्वभूतीं तया ।**

**पहावे सखया विठ्ठलासी ॥४॥**

.......................................................................................................

# ११. वेदान्त

.......................................................................................................

(६५२)

जळो तुझें ब्रह्मज्ञान । अवघा वाचेचा तो शीण ॥१॥

वरी लटिकें वैराग्य । मनीं चिंतिसी विषय ॥२॥

बक बैसलासे ध्यानीं । भाव वेगळाचि मनीं ॥३॥

स्कंददास प्रभु म्हणे ।

**ज्ञानबंध भक्तीविणें ॥४॥**

**(६५३) सत् व चित् चा विसर = भक्ती**

**प्रकाश्य तें सत्ता, प्रकाश तें चित्ता ।**

**दोन्ही विसरतां ब्रह्मानंदू ॥१॥**

**भास्य सुखभोग सुखी मी तो भोक्ता ।**

**दोन्ही विसरता कृष्ण भेटी ॥२॥**

**ब्रह्मानंदयोगीं कृष्णीं तळमळ ।**

**जाणा पदकमळ गोपिकांचे ॥३॥**

**स्कंददास म्हणे गुरुकृपा योग । होतां भोक्ता भोग कृष्णनाथू ॥४॥**

(६५४)

**कल्पनेच्या पोटीं ।**

**बंधमोक्षाचिया गांठी ॥१॥**

**वेगळे ते हरिपाय ।**

**नोहे वाचेचा विषय ॥२॥**

**एक भावचि कारण ।**

**आकळाया नारायण ॥३॥**

**ज्ञानेशजा माय माझी ।**

**स्वरूपींच भासे दुजी ॥४॥**

*(६५५)*

*अहंतादी सर्व मायिक पसारा । नाहीं निर्विकारा स्पर्श त्याचा ॥१॥*

*अहंता निमाल्या सहज समाधी । म्हणोनियां बुद्धि ऐसी व्हावी ॥२॥*

*सर्वांभूतीं सम वसे सर्वेश्वर । धरुं अहंकार कोणापुढें ॥३॥*

*ज्ञानेशजामाय एकटीच मना । पूर्ण सर्व गुणा अधिष्ठान ॥४॥*

*(६५६)*

*धरूनियां वायां अभिमान ताठा । मानूं नको मोठा आपणातें ॥१॥*

*सर्वौठायीं तूंचि असशी व्यापक । भेदबुद्धि विख घेऊं नको ॥२॥*

*अन्वयें तूं करी अनुकूल वृत्ती । सर्वत्र संकेतीं एकपणें ॥३॥*

*ज्ञानेशजा माय घेईल कडिये । प्रतीति तूं पाहे एकी वेळां ॥४॥*

*(६५७)*

*नसलिया गुण नये कोणालागीं । अभिमान अंगीं तिळमात्र ॥१॥*

*परी कां असला अल्पगुण ठेवा । तरी पाडी गोवा अभिमानीं ॥२॥*

*ऐसिया प्रसंगीं सावध राहोनी । मना करी धुनी अहंतेची ॥३॥*

*ज्ञानेशजा माय आंगीचिया गुणीं । कल्पा पूर्णपणीं अधिष्ठान ॥४॥*

*(६५८)*

*आंधळिया पांख काय सुख देती । क्षणोक्षणीं प्राप्ति दुःखाचीच ॥१॥*

*तैसी वायाविण दुःखाची शिराणीं । होय अभिमानी जाणिवेच्या ॥२॥*

*रोगिया न कळे सुखाचा निवाड । अभिमानें वाढ रोगाचीच ॥३॥*

स्कंददास म्हणे जाणिवाभिमान । संसारबंधन ढ करी ।।४।।

(६५९)

सांडोनियां लोहबेडी । प्रेमें सोनियाची घडी ।।१।।

जळाहूनि भासे भिन्न । जळीं असे तें लवण ।।२।।

तैसा देह अभिमान । टाकोनि घे ब्रह्मपण ।।३।।

स्कंददास म्हणे दोन्ही । नाहीं अज्ञानावांचुनी ।।४।।

(६६०)

नुसुध्या विचारें होय हरि प्राप्ती । ऐसे कोणे ग्रंथीं सांगितले ।।१।।

केलिया विचारें रज्जुसर्प बाध । दृढ रज्जुबोध करणें लागे ।।२।।

तैसा ज्ञानें झाला जरी जगद्बाध । तरी हा गोविंद आठवावा ।।३।।

स्कंददास म्हणे सगुण निर्गुण । नाहीं हरिविण दुजे कांहीं ।।४।।

(६६१)

साधोरिनयां हातवटी । ब्रह्मज्ञान बोले ओठी ।।१।।

परी विषय सांडोन । ब्रह्माकार नोहे मन ।।२।।

केली वरी वरी । सोंग संपादणी बरी ।।३।।

सखे ज्ञानेश्वरबाळे । काय लाविलेसी डोळे ।।४।।

(६६२)

त्रिकालाबाधित असे आत्मसत्ता । परि तिचा ज्ञाता होऊं नको ।।१।।

सर्वहि जाणता शुद्ध साक्षीरूप । सांभाळ स्वरुप प्रमात्याचे ।।२।।

आनंद म्हणोनि नको होऊं भोक्ता । विपरीत अर्थौ सांडा वेगीं ।।३।।

स्कंददासीं खूण वृतिसरूपता । निमाल्या तत्त्वतां ब्रह्म होय ।।४।।

(६६३)

प्रेमाचा स्वभाव करी ते अधीन । आंगीं भोक्तेपण उरो नेदी ।।१।।

भोक्ता नारायण येर सारे भोग्य । साधे ते वैराग्यपर तेणें ।।२।।

सर्वभूतीं सम भासे वासुदेव । नाशे अहंभाव समूळचि ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या वचनावाचुनि । मन स्वैरपणीं राहाटो नेणें ।।४।।

(६६४)

ब्रह्म सत्तारुप माया अहंकार । वेगळे साचार न होती ।।१।।

यत्नें करुं जातां वेगळे तयासी । माया ये हातासी ब्रह्म गळे ।।२।।

तरी सांडोनियां प्रयत्नाचा गोवा । शरण जातां तेचि भले ।।३।।

स्कंददास म्हणे होताती हिंपुटी । शब्दाचे कचाटीं पडोनियां ।।४।।

(६६५)

कैसे तुझें ब्रह्मज्ञान । पाहसी भिन्न भूतांसी ।।१।।

स्वेच्छा तुज झाला विधि । तरी उपाधि कोणासी ।।२।।

कामक्रोध कोठोनियां । उठती वायां स्वभोगी ।।३।।

ज्ञानेशजा अधिष्ठानी । उभारणी विश्वाची ।।४।।

(६६६)

**उघडली ज्ञानदृष्टि ।**

**नित्य जागे गर्व पोटीं ।।१।।**

ब्रह्मज्ञाने जावा राग । तंव तो वाढला चांग ।।२।।

**ज्ञातृत्वाचा अभिमान ।**

**दुज्या लेखितसे हीन ।।३।।**

ज्ञानेशजे ऐसे फार । दुःखे पोळलें अंतर ।।४।।

(६६७)

वारियाचे झळे । दीप लागला मावळे ।।१।।

अग्नी काष्ठीं प्रगटतां । होय गांवातें जाळितां ।।२।।

**तैसा असतां मंदबोध ।**

**वृत्ति उठतां साक्षी बाध ।।३।।**

**स्कंददास म्हणे तरी ।**

**वृत्तीं सांठवावा हरी ।।४।।**

## (६६८)वृत्तिसंधी

*गगनावांचुनि नसे अवकाश । व्यापक वस्तूस सर्वाठायीं ।।१।।*
*तैसे सर्व देहीं व्यापक स्वरूप । साक्षी गृहीं दीप जया परीं ।।२।।*
*परी वस्तू घेतां न कळे आकाश । वस्तूचा अध्यास म्हणोनियां ।।३।।*
*वस्तु व्यतिरेकें अथवा संधींत । अनुभवा येत स्पष्टरूपें ।।४।।*
*तैसा ज्ञानेशजा सांडोनि उपाधी । किंवा वृत्तिसंधीमाजी पाही ।।५।।*

*(६६९)*

*जागृतीं जीवंत, स्वप्नीं पाहे मृत । स्फुंदोनी रडत पुत्रालागीं ।।१।।*
*मागुता चेईला पाहे अवचिता । म्हणे झाला होता थोर भ्रम ।।२।।*
*विपरींत होता स्वप्नीं वाटे सुख । सर्वहि सम्यक मनोमात्र ।।३।।*
***जो जो भाव वाटे मनालागीं सत्य ।***
***तैसेचि तें देत सुख दुःख ।।४।।***
*ज्ञानेशजा खूण मनेंचि कल्पिला । संसार नाथिला वासनेने ।।५।।*

*(६७०)*

*सांख्य परिणाम, आरंभ न्यायास । मान्य वेदान्तास विवेक तो ।।१।।*
*सांख्यादि लाविती विषयासी दोष । वेदान्त मनास दुष्ट म्हणे ।।२।।*
*सांख्याद्यनुरोधें विवेक करितां । न चुके तत्त्वता दुःख बेडी ।।३।।*
*वेदान्तविचारीं म्हणें स्कंददास । कारण दुःखास तुझ्या तूंचि ।।४।।*

*(६७१)*

*वैषम्य तो आहे प्रकृतिस्वभाव । नाहीं त्याचा भाव आत्म्याठायीं ।।१।।*
*मिथ्या प्रकृतीते करो पाहसी दूरी । खटपट सारी व्यर्थ तुझी ।।२।।*
***सर्वा ठायीं एक शुद्ध आत्मवस्तु ।***
***करिसी द्वेष तूं कवणाचा ।।३।।***
*वायां प्रकृतीचा लाविसी संबंध । निजरूप शुद्ध वोळखिता ।।४।।*

*स्कंददास म्हणे सर्व त्याची लीला ।*

***पाही तूं वेगळा होवोनियां ।।५।।***

*(६७२)*

*निमालिया स्वप्न । कोण चिंती लाभ हान ।।१।।*

*तुज होवोनियां ज्ञान । परी भोगीं धांवे मन ।।२।।*

*कांरे वैषम्य दिसते । जग सत्यचि भासते ।।३।।*

*स्कंददास म्हणे वरी । मिथ्याबुद्धि दृढ करी ।।४।।*

*(६७३)*

*काय ब्रह्मज्ञान बोलतोसी ओठी । वागविसी पोटीं समाधान ।।१।।*

*प्रवृत्ति निवृत्ति नाहीं माझे ठायीं । साक्षीरूप पाही म्हणसी मी ।।२।।*

*परी समाधानापोटी भोक्तृपण । मग साक्षीपण कैसे राहे ।।३।।*

*ज्ञानेशजासुत म्हणे हे चावटी । अहंकारा मिठी देसी मूढ ।।४।।*

*(६७४)*

*सच्चित्सुखघन आत्मा हा मुळीचा । कल्पनेनें साचा बद्ध होय ।।१।।*

*संकल्प-विकल्प निमालियाविण । कदा ब्रह्मपण आंगीं न ये ।।२।।*

*वृत्ति निग्रहिता तैसी उठविता । संकल्पाची वार्ता दोहो ठायीं ।।३।।*

*पांडुरंगनाथ कृपा संपादितां । सुलभ सर्वथा मार्ग होय ।।४।।*

*(६७५)*

*सदंश कळल्या जग मिथ्या भासे । चिदाभासे सत्य पुनः ।।१।।*

*भेदाभेदासम सत्पद जाणावे । निर्गुण बोलावे याचि लागीं ।।२।।*

*जग सविकल्प म्हणोनियां नाश । निर्गुण सदंश केविं करी ।।३।।*

***सगुणाचा नाश सगुणेंचि होय ।***

***सगुण चिदंश वृत्त्यवच्छिन्नें ।।४।।***

*प्रारब्धचपेटें भोगितां विकल । विवेक सोज्वळ दीन होय ।।५।।*

***सदंश चिदंश रक्षक सगुण ।***

**करुणानिधान व्रजराणा ॥६॥**

ज्ञानेशजा म्हणे भोळ्या प्रेमळासी । हरि इतरासी गर्भवास ॥७॥

(६७६)

कळला संसार रज्जुसर्पाभास । गंधर्वनगरास कोण इच्छी ॥१॥

मृगजळ पीता कोण तृप्त झाला । कोणाचा निमाला वंध्या सुत ॥२॥

तैसा ब्रह्मज्ञानें कळला संसार । परी मन स्थिर नोहेचि की ॥३॥

योग करुं जातां प्रारब्धे व्युत्थान । न चुकेचि जाण कांहीं केल्या ॥४॥

पांडुरंगनाथा तुझ्या प्रेमाविण । कष्टचि दारूण अन्यमार्गी ॥५॥

(६७७)

सामान्या अधिष्ठान विरोध आधार । कैसा भाव पार होय जीव ॥१॥

कार्योपाधि जीव कार्य तें साकार । कैसे निराकार नाशील त्या ॥२॥

म्हणोनियां तुम्ही झालाती साकार । पडला विसर वाटे तुम्हां ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये आडविल्या डोळा । कोण अंतर्मळा निवारील ॥४॥

(६७८)

एक सत्ता सिद्ध असतां कां मना । द्वैताची कल्पना करितोसी ॥१॥

उठता कल्पना देऊनियां सत्ता । स्वयें तूं प्रमाता होसी तेथें ॥२॥

**सर्वहि संसार कल्पना तरंग ।**

**सुख दुःख भोग कल्पितचि ॥३॥**

**कान्तापुत्रधन तुझेचि कल्पिले ।**

**मानितोसि भले सुख तेथें ॥४॥**

प्रमाता प्रमेय भासक सविता ।

**ज्ञानेशजा माता सुखसिंधु ॥५॥**

(६७९) समाधि-व्युत्थान

वासनेच्या योगें तुझेंचि अंतर ।

**पाहे विश्वाकार हरिलागीं ॥१॥**

वासना निमाल्या होसी हरिरूप । आटला संकल्प म्हणोनीया ।।२।।
ज्ञानें हरिरूप झाल्या अभिमान । उठे अहंब्रह्म म्हणोनियां ।।३।।
तोचि ये व्युत्थानीं सोहंवृत्तिपणा । पाहत आपणा विश्वमय ।।४।।
तेणें विकाराचा होवोनी उदय । गोविती विषय दृढतर ।।५।।
म्हणोनियां प्रेमें तेंचि सोहंपण । करावें अर्पण हरिपायीं ।।६।।
**तेव्हा ज्ञानेशजा दिसें वृत्तिअग्रीं ।**
**व्युत्थान सामुग्री नाशताचि ।।७।।**
(६८०)
मुळीं नाहीं त्याची करिसी कल्पना । आणसी न ध्याना सत्य वस्तु ।।१।।
नसता संसार मानोनियां खरा । मिथ्या गोपीवरा पाहतोसी ।।२।।
प्रतिबिंबा तुज हरी बिंबरूप । करी हा संकल्प दृढ चित्तीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या बिंब सर्वा ठायीं । भोग्यरूपें पाही दिसे मना ।।४।।
(६८१)
**विरक्ति वांचुनि बोले ब्रह्मस्थिति ।**
**चावटी** श्रीपती करीतसे ।।१।।
तुझ्या प्रेमाविण वांझ ब्रह्मज्ञान । कोरडे बंधन मज वाटे ।।२।।
उगा ब्रह्मपणें अंगीं चढे ताठा । दुरावे वैकुंठा पाय तुझें ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये तेचि ब्रह्मज्ञान । जीव समर्पण तुझें पायीं ।।४।।
(६८२)
वृक्षाचिया मुळीं घालितां जीवन । शाखे आंगीं पूर्ण दिसो लागे ।।१।।
भिंगाचिया आड ठेवितां प्रदीप । प्रकाश साक्षेप बाहेरी दे ।।२।।
उत्तम कुळीचा जाणो ये आचारें । तैसींच अंकुरें भूमि ओल ।।३।।
स्कंददास म्हणे तैसे
**ब्रह्मज्ञान । बाणल्याची खूण गुरुसेवा ।।४।।**
(६८३)

**इंद्रियाचे लाड पुरवील ज्ञानी ।**

**नियतचि हानि आत्मसुखा ॥१॥**

विषयविक्षेप सुखासी विरोधी । न थारेचि संधिवृत्ति तेव्हां ॥२॥

म्हणोनियां एक करावा निरोध । किंवा व्रजचंद आठवावा ॥३॥

ज्ञानेशजा माय सांगे निजखूण । सुलभ सोपान हरीनाम ॥४॥

(६८४) समन्वय

**भक्त्यभिमानें इतर मार्गांचा ।**

**उच्छेद तो साचा करुं नये ॥१॥**

कर्मे चित्तशुद्धि उपास्त्या एकाग्र । योगाने समग्र वृत्तिरोध ॥२॥

ज्ञानें भेदभाव समूळ नासावा । अभेदें भजावा गोपीनाथ ॥३॥

पांडुरंगनाथें केला उपदेश । वैकुंठनिवास आकळाया ॥४॥

oooooooooooooooooooooooooooooooooooooooooooo

## १२. उपदेशपर

oooooooooooooooooooooooooooooooooooooooooooo

(६८५) पद मंत्र - सप्ताक्षरी

ज्ञानराज माउली सदोदित मनु हा जप मनुजा ।

पावुनि मानुष तनुही अजुनी चिंतिसि धन तनुजा ॥धृ०॥

ज्ञानासम भवरुख छेदाया असी नसे दुसरी ।

यमनियमादिक सर्वहि साधन करिति न याचि सरी ।

नरक तराया राया वदला मुनिवर युक्ति खरी ।

हरिनामाविण अघनिधि तरला नाहि पुराणांतरी ॥१॥

रात्रंदिन मनिं पैका जपसी खपसी त्यासाठीं ।

सांडुनि श्रीहरि भजना कुजना स्तविसी निज ओठीं ।

जनमानाच्या मागें नाचुनि नेसी व्यर्थ घडी ।
कान्ते बुगडी घेउनि लुगडी घालिसि भविं फुगडी ।।२।।
माझा म्हणुनि घेसी बोझा ज्याचा तूं स्वशिरीं ।
पैका तोवरि करिती वरिवरि सरल्यावरि वैरी ।
उलट फुकाचा शब्द सुखाचा देति न जन्म भरी ।
मेल्यावरती कोणि न येती दृढ चित्तीं धरी ।।३।।
लीन होउनी अलकावतिपतिकन्येच्या पायीं ।
सप्ताक्षरि मनु घेउनि बापा अक्षय सुखी होई ।
गंगासागरसंगममिळणीं भक्तिसुखा घेई ।
मिति नसे वा कितीक तरती कलियुगी या सोयी ।।४।।

(६८६)

**पोटाचिया पुरते मिळवावे धन ।**
**व्यर्थ हांव जाण दुःखमूळ ।।१।।**
नको ठेवूं मना कोठेंचि वासना ।
एका नारायणा वांचोनिया ।।२।।
वाया वायकुटी सांडुनी सगळी ।
चित्तीं वनमाळी ध्यावा एक ।।३।।
**ज्ञानेश्वरकन्ये हेचि आवडते ।**
**सांडावे परते सर्व कांहीं ।।४।।**

(६८७) माउली पूजनाचा अधिकार

विषयाचे प्रेमें झळंबेल चित्त । आत्मसुखच्युत होशील कीं ।।१।।
सर्वही विषय हरिमय होता । राहील ब्रह्मता अखंडित ।।२।।
याचि एकालागीं दाविला उपाय । ज्ञानराजपाय पूजनाचा ।।३।।
परी अझोनियां जडाचा प्रत्यय । नाहींच सावेव निमाला कीं ।।४।।

ज्ञानेश्वरकन्ये हे तो प्रेमाधीन । असे प्रेमदान तुझे हातीं ।।५।।

(६८८) कोरे बोल

कासया वाऊंगी करितोसी चिंता । कोणरे पोषिता जगासी या ।।१।।

**वाचे बोलतोसी ईश्वर चालक ।**

**कां न वाटे धाक मनीं त्याचा ।।२।।**

**न बैसे कां श्रद्धा तयाचे वचनीं ।**

**कां न रंगे वाणी नामीं त्याच्या ।।३।।**

**ज्ञानेश्वरकन्यासुत म्हणे सारे ।**

**बोल तुझे कोरे नटासम ।।४।।**

(६८९) पद **सावध हो**

निशिदिनि हरिगुण गाई ।।धृ०।।

कालपाश जंव पडला नाहीं । तोचि **सावध होय** रे ।।१।।

सेवुनिया नित विषयविषाला । केविं चुकेल अपाय रे ।।२।।

**जे जे दिसते दृष्टिपुढे तुज ।**

**पाही यादवराय रे ।।३।।**

अस्ति **भाति प्रिय या वांचुनि ।**

**येर सर्वही वाय रे ।।४।।**

खूण कळे तुज प्रेमें भजतां । ज्ञानेश्वरजा माय रे ।।५।।

(६९०)

**चित्तीं तळमळ सुखामाजीं नाम ।**

**तेव्हां मेघश्याम भेटी होय ।।१।।**

**निःशेष ती जावी इतरांची आशा ।**

**एका हृषीकेशा वांचोनिया ।।२।।**

**इंद्रियें विषय विसरती सारे ।**

**चित्त जेव्हां भरे हरिप्रेमे ।।३।।**

पांडुरंगनाथ कृपा जैं लाहिजे ।

तरीच पाविजे ऐशी दशा ॥४॥

(६९१)

परमार्थाची चाड वागविसी पोटीं ।

नये कधीं ओठीं हरिनाम ॥१॥

बाह्य उपचारे न तोषती साधु ।

प्रेमाचा संबधु नसलिया ॥२॥

भावाचे भूकेले असती सज्जन ।

येर धनमान विषासम ॥३॥

ज्ञानेश्वरकन्या कृपा तैंचि वळे ।

चित्त तळमळे पायासाठीं ॥४॥

(६९२)

जंव निजमन नोहेचि निष्काम ।

तों देवदर्शन घातुकचि ॥१॥

भस्मासुरालागीं शिवें दिला वरु । तयाचा तो करुं धांवे घात ॥२॥

षोडश सहस्त्र श्रीकृष्ण कामिनी । सांबासीं पाहोनि कामातुर ॥३॥

पांडुरंगनाथ संग जंव नाहीं । कोण्याहि उपायीं शुद्धि नोहे ॥४॥

(६९३) पद

अरे गड्या समज धरी कांहि । कांहीं तरी बापा ।

चुकवी कां जन्ममरण खेपा ।।धृ०।।
अरे गड्या विषय हे सारे । सारेचि क्षणिक ।
कोण कोणाचा बापलेक । बंधु सोयरे ।
सोयरे धनासाठीं । धन तोवरी करिती गोष्टि ।
होति ना भागी । भागि तुझ्या पापा ।। चुकवी कां० ।।१।।
अरे गड्या श्रमसि दिन रजनीं । रजनि विषयसंगीं ।
परी ते शेवटि तुजलागीं । टाकुनी जाती ।
जाति पुण्य सरता । वियोगें दु:ख होत चित्ता ।
विवेका धरुनी ।धरूनि वारी तापा ।। चुकवी कां० ।।२।।
अरे गड्या सर्व भोगाचें । भोगाचें अधिष्ठान ।
तुझें हें शरीर पाहे पूर्ण । परि ते पडले ।
पडले काळतोंडीं । कळेना केव्हां गिळिल उंडी ।
म्हणुनि सांगतों । सांगतों मार्ग सोपा ।। चुकवी कां० ।।३।।
**अरे गड्या अलकावती ।**
**वतीपतीदुहिता ।**
**प्रेमें धांवुनि ये स्मरतां ।**
**उपेक्षा कधी ।**
**कधीं न करी जननी ।**
**होतां सादर तदभजनीं ।**
आन साधनें । साधनें नये बापा ।। चुकवी कां० ।।४।।
(६९४)
संकल्प आटणीं हारपतो काम । क्रोधाचा उगम लया जाय ।।१।।
धनादि विषय अनर्थासी मूळ । जाणोनि सकळ लोभ सांडी ।।२।।
एक नारायण द्रुढ धरा मनीं । क्षण न देऊनी विषयासी ।।३।।
आकळे हा मार्ग एक्याचि उपाये । ज्ञानेशजा पाये वंदिलिया ।।४।।

(६९५)

यत्पादपंकज गोडी द्राक्षा सिकता सुधादिका विटवी ।।

उत्कंठित रविकन्या ध्याया सेविति यदर्थ मुनि अटवी ।।

(६९६)

स्वप्नामाजीं देव गुरूचें दर्शन । यथार्थ म्हणून बोलताती ।।१।।

जागृतीं दर्शन झालिया यथार्थ । नोहे संशयित चित्त कदा ।।२।।

स्वाप्निक पदार्थ वाटताती मिथ्या । तैसा देह मिथ्या गुरुचाहि ।।३।।

वाटेल म्हणोनि ज्ञानेशजा बोले । न जाय निर्मिलें स्वप्नीं गुरु ।।४।।

(६९७)

देवहि न शके करु गुरुसरी । असो शिवहरी ब्रह्मादिक ।।१।।

अन्यायानुसार देव देतो दंड । गुरुलीला बंड वेगळेंचि ।।२।।

शिष्याचें कल्याण प्रतिबंधकारी । ऐसा थोर जरी घडे दोष ।।३।।

तरी शिष्य हिता देवोनियां

द्रुष्टि । कळवळोनी पोटीं गुरुमाय ।।४।।

क्षमेची याचना नसता उघड । वारी यमदंड कृपाबळें ।।५।।

परी पापबुद्धि करावया शुद्ध । अल्प अपराध न साहेचि ।।६।।

याचिल्याहि क्षमा होतसे सक्रोध । व्हावी मति शुद्ध हेचि इच्छा ।।७।।

ज्ञानेश्वरकन्ये नोहे तुझा प्रेमा । उतराई प्राणा वाहोनीहि ।।८।।

(६९८)

मना हरी प्राप्ति इच्छिसी अंतरीं । साधनें परोपरी सावडसी ।।१।।

बोलिल्या साधनीं न बैसे विश्वास । भलते सायास करितोसी ।।२।।

तुज वाटे ऐसे असावे साधन । क्षणें नारायण हातीं यावा ।।३।।

तरी बापा हेचि चुके तुझें वर्म । मानितोसी कर्मफळ हरी ।।४।।

**प्रेमाविण अन्य कोण्याही उपाया ।**

**ज्ञानेशजा आया नये कधीं ।।५।।**

(६९९)

सांगितल्या मार्गी ठेवोनी विश्वास । द्रुढ धरी कास श्रीगुरुची ।।१।।

तयांचे वचनीं प्रगटतो हरी । नलगे कुसरी साधनाची ।।२।।

परी अंतरीचा पहावया भाव । साधन सावेव देती गुरु ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या वचन प्रमाण । तया कृष्णपण तात्काळचि ।।४।।

(७००)

सांगितल्या वाटा न जासी गबाळा । आपुलाचि चाळा चालो देसी ।।१।।

तरी कोणे रीती व्हावी हरी प्राप्ति । हेंच आम्हा प्रति कळेना गा ।।२।।

असते गाठोडे तरी देतो हातीं । परी हरी स्थिती तैसी नाहीं ।।३।।

प्रेमें कृष्णमय करोनियां मन । स्वयें कृष्णपण भोगावे त्वां ।।४।।

ज्ञानेशजासुत म्हणे रे गव्हारा । वायाचि देव्हारा माजविसी ।।५।।

(७०१) स्वानुभवें सांगती.....

सर्व श्रुतिसंत कलिजनाप्रति । उपाव सांगती हरिनाम ।।१।।

परी तुज वाटे हरिप्रेमें कर्म । सुटतां मेघश्याम प्राप्ति केविं ।।२।।

धर्मामाजीं जरी जाहले वैगुण्य । तरी झाले पुण्य मानतोसी ।।३।।

कलिमाजीं नोहे सांग यथाकर्म । सांगसी परम विचारितां ।।४।।

परी स्वानुभवें सांगती जे संत । विश्वास न तेथ बैसे तुझा ।।५।।

ज्ञानेशजासुत म्हणे रे चांडाळा । यमफांस गळा लावितोसी ।।६।।

*(७०२) सांडोनी विषयसंग ...*

*कधीं ऐसें वाटेल तुजसी मना । पुरे झाली हे विषय वासना ।।*

*गेली वेळा ते हातीं नये पुन्हा । नेणो केव्हां मृत्यु ये आपणा ।।१।।*

*किती जन्मापासुनि हे विषय । भोगिसी तरी अझोनी तृप्ती नोहे ।।*

*नित्य नूतन घेवोनिया देह । तनु जाण काळखाद्य होय ।।२।।*

*किती जरी केली त्वां खटपट । भोगें वासनांचा नोहेचि शेवट ।*

*वासना तंव हा जन्ममरण वाट । खंडेनाचि हें जाण मनी स्पष्ट ।।३।।*

*म्हणोनीयां सांडोनी विषयसंग । आवडी धरी सज्जनांचा संग ।।*

*ज्यांच्या सेवे झिजवी निजअंग । हरीपायीं ठेवोनी अनुराग ।।४।।*

*(७०३) कुटुंबाचा भार शिरावर ...*

*कुटुंबाचा भार घेसी शिरावरी । नियंता तूं तरी काय त्यांचा ।।१।।*

*काय तूंचि तया घातले जन्मासी । अंतीं काय नेशी तूंचि तया ।।२।।*

*सर्व सूत्र दोरी असे हरि हातीं । व्यर्थ अहंमती भुललासी ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्यासुत म्हणे सर्व । कर्मबद्ध जीव संसारीं या ।।४।।*

*(७०४)*

*सदा उतावेळ राही माझे मना । द्याया आलिंगना हरिलागीं ।।१।।*

*आरुढोनी वाणी हरिनाम गायी । रात्रंदिन कांहीं न पाहतां ।।२।।*

***हरिगुणलीला श्रवणांवाचोनी ।***

***नको अन्य कानीं शब्द ऐकूं ।।३।।***

*करें नित्य घासी शितळ चंदन । कराया उटण हरि अंगा ।।४।।*

***नेत्रद्वारीं भरी श्रीकृष्ण रुपडें ।***

***हृदय पलोडे झांकी वरी ।।५।।***

***मग सर्व द्वारें करोनियां बंद ।***

***अंतरीं गोविंद गाढालिंगी ।।६।।***

*ज्ञानेश्वरकन्या पाय आधीं बंदी ।*

श्रीकृष्ण सुखाब्धि मेळवाया ।।७।।

(७०५)

नको उगा शीण करोनियां घेऊं । मारतील बहु यमदूत ।।१।।

मग तेथें कांहीं न चले उपाय । हाणिताती घाय तीव्र शस्त्रें ।।२।।

न साहवे दुःख असह्य दारूण । न जायेचि प्राण तोहि तेथें ।।३।।

म्हणोनियां मना वेळींच सावध । होऊनी गोविंद गायी वाचे ।।४।।

ज्ञानेश्वरकन्या कृपा होता मना । लोळेल चरणावरी यम ।।५।।

(७०६) पद

व्यर्थ आयुष्याचा करितोसी नाश । रात्रंदिन निजसी सावकाश ।।

पळभरी जावोनी एकान्तास । नाठविशी अंतरीं हृषीकेश ।।१।।

काय भुललासी यमाजीचा दंड । श्रुतिसंत सांगती उदंड ।।

जनामाजीं मांडिले भक्तिबंड । चित्तांतून न जायेचि रांड ।।२।।

आग लागो तुझ्या दासपणा । अभिमानें चित्त वोस जाणा ।।

हरिनामीं जाग रे जाग मना । प्रेमसुमनें पूजी यादवराणा ।।३।।

आन साधनांच्या न को पडूं भरी । वाचे गायी रे रामकृष्णहरी ।।

याचि एक्या साधनें तुजवरी । ज्ञानेशजा माय कृपा करी ।।४।।

(७०७)

कासया करिती आनाचा आश्रय । समर्थाचे पाय सांडोनियां ।।१।।

कोण आहे सांगे तयाहूनि बळी । कां न घेसी रळी पायीं त्याच्या ।।२।।

त्याचा होवोनियां राहे जो कां नर । न दे त्या अंतर कोणे काळीं ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या आपुल्याचिसाठीं । साकार गोमटी जाहलीसे ।।४।।

(७०८) पद (हिंदी)

काहेको सोच करे मनमाही ।।धृ०।।

दीनदयाल भगत आरतिहर शरण करहुं जदुराई ।।१।।

सन्मुख होई त्यागि नहि कबहु छमि है सकल बुराई ।।२।।

शरणागत भय हारणकारन आये श्रीहरी गोकुलमाही ।।३।।
ज्ञानेश्वरजापद नितसे बहु कान्त मिले फणीशाई ।।४।।
(७०९)
जयासाठीं शिणताती योगी । कामादींचे साहुनि घाव आंगी ।।
हाणानोयां लाथा विषयभोगी । तोचि हरी सुलभ भजनमार्गी ।।१।।
योगी जाती साधाया शमदम । नावरती इंद्रियें होती श्रम ।।
दमाविण साधितां नये शम । तैसा शमावांचुनि वायां दम ।।२।।
जावोनियां योगी येणें मार्गें । होती हिंपुटी बापुडे वाऊगे ।।
प्राप्तिविण व्यर्थचि ही सोंगें । भक्ता साध्य सहज अनुरागें ।।३।।
न रोधितां इंद्रियप्रवृत्ति । सर्व भोग हरिसी समर्पिती ।।
हरिसुखें आपण सुखी होती । भोक्तेपण हारपे येणें रीती ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या कृपाफळ । आम्हा झाला सुलभ घननीळ ।।
शांति सवत जाणवी तळमळ । तेणें हरि हृदयीं सर्वकाळ ।।५।।
(७१०) पद - लावणी वृत्त
सगुण सांवळी मूर्ति कोवळी अखंड हृदयीं वसे ।
देव तो भक्तापाशीं असे ।।धृ०।।
नावडती त्या तपी, तामसी, कर्मठ, मठी, कोरडे ।
पाठिं ज्या रविसुत दे कोरडे ।
धार्मिक धर्मा, तपी तपातें भोगसुखा सावडे ।
म्हणोनी हरि न लक्षी त्याकडे ।।चाल ।।
या मानुषदेहीं येऊनियां क्षणभरी ।
कधिं विचार करिति न मूढ असा अंतरीं ।
मी कोण कोठुनि आलो या भवपुरी ।।चाल पहिली ।।
अशा पिशांना हरि कळेना जात्यंधा रूप जसे ।।
असोनी जवळिच, तो भ्रमवशें ।।१।।

असार हा संसार सार ते आत्मरूप जाणुनी ।
योगि तो चित्त लावि निर्गुणीं ।
निर्विकल्प ते रूप राहिना सविकल्पा सोडुनी ।
तयासी आधारचि पहा मनीं ।। चाल ।।
यास्तव त्यांना द्रुश्य परी मार्जनीं ।
यमनियमादिक योगाची कडसणी ।
करुनि ~~घस~~ मिळविणें निर्विकल्पता जुनी ।। चाल पहिली ।।
परि मन उन्मन प्रेमावांचुन होईना तनुवशें ।
होती ते दुःखविभागी पिसे ।।२।।
सच्चित्स्वरुपें स्थिरचर व्यापुनि अवघा भरला असे ।
त्याविण ठावचि दुसरा नसे ।
अखंड आम्ही ब्रह्म म्हणोनी बडबडती जे पिसे ।
भोगिती प्रारब्धाचे ठसे ।।चाल ।।
अभिमान मिरवुनि ब्रह्मपणाचा उगा ।
आवडी न भजती मदनदहन प्रियसगा ।
जो स्वरूप सुवर्णी शोभतसे समनगा ।। चाल पहली ।।
**अकळ खरा परी विकळ झालिया हृदयामाजीं दिसे ।**
तया जो संत कृपेतळीं वसे ।।३।।
हरिगुणकीर्तन श्रवण मनन हे व्यर्थ न जातां घडी ।
करोनी भक्तिरसा सावडी ।
वैष्णव पाहोनि वैभव सोडुनि पायिं घाली जो उडी ।
तया हरि प्रेमें घेतो उडी ।। चाल ।।
निजभक्ता पाहुनि धेनू वत्सापरी ।
हरि धांवत येतो सांडुनिया निजपुरी ।
निजभाव धरुनियां साक्ष घ्यावी अंतरीं ।। चाल पहिली ।।

ज्ञानेश्वरजा चरणरजा शिरी वाहसील भरंवसे ।

तरी हरि जनिं वनिं अवघा दिसे ।।४।।

(७११) पद

मानस इच्छिसि जरी गोपाळ ।।धृ०।।

विषयविषातें दूर सारुनी हरिपदीं ठेवी भाळ ।।१।।

कनककामिनी मनि नच आणि जाणुनियां सुख काळ ।।२।।

उसंत न घेतां संतचरणरज सावडि होऊनि बाळ ।।३।।

ज्ञानेश्वरजा पायीं बाही प्रेम फुलांची माळ ।।४।।

(७१२)

जरी तुम्हा करणें हित कांहीं । तरी मुखें गात जा शेषशाई ।

कलियुगीं याविण मार्ग नाहीं । ऐशा देती श्रुतिस्मृति ग्वाही ।।१।।

नका धरुं कवणाची मनीं आस । रात्रंदिन आठवा ऋषीकेश ।

भक्तासाठीं सोशी जो गर्भवास । तोचि कैसा उपेक्षी तुम्हास ।।२।।

मन करा धर्माधर्मी ग्वाही ।

**आल्या गेल्याची सेचि नको देहीं ।**

ऐशा रीती विनटा हरिपायीं । मग पहा प्रत्यय लवलाही ।।३।।

माय माझी ज्ञानेशनंदिनी । दास चित्ता वाहत नित्य मनीं ।

म्हणोनियां जाहली सगुणी । नका भिवूं या भवभया लागुनी ।।४।।

(७१३)

पुढलिये जन्मीं परमार्थ साधीन । केविं हें वचन सत्य मानूं ।।१।।

आतांचि विषय सोडवेना तुज । मना पुढें काज केवि होय ।।२।।

करिसील इये जन्मींच अभ्यास । तरी पुढें खास हित तुझें ।।३।।

न होयेचि कधीं दुर्गति कल्याण-कारिया वचन देवाजीचे ।।४।।

तुजसाठीं व्यर्थ सख्या मायबापा । जन्म जन्म खेपा करणें पडे ।।५।।

ज्ञानेश्वरकन्ये व्यर्थ शिणविसी । येऊं दे तुजसी दया कांहीं ।।६।।

(७१४) अहंब्रह्मवृत्ति सोंग

नको ब्रह्मज्ञानीं विश्वासोनी राहूं । अहित ते बहू लाभ थोडा ।।१।।
विषयाच्या प्रेमें सुटे ना आसक्ति । अहंब्रह्मवृत्ति सोंग सारे ।।२।।
जंव मना तुज विषय विरक्ति । नाहीं तैसी रति हरिपायीं ।।३।।
तोवरी हे सारे व्यर्थ ज्ञान । शिकला बोलणं शुक जेविं ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या पाय द्रुढ धरी । मग येरझारी येणें नाही ।।५।।

(७१५)

जरी तुज वाटे भेटावा माधव । तरी पायीं भाव धरी त्याच्या ।।१।।
प्रतिबिंब प्रतिबिंबा खेव देणें । तरी बिंबवणें ठाके केवि ।।२।।
**स्त्रियापुत्रादिक तुजसम सारे ।**
**प्रतिबिंब वारे हरिबिंबा ।।३।।**
ज्ञानेशजासुत सांगे निजमना । मिथ्या नारायणाविण सारे ।।४।।

(७१६)

काय तुजसाठीं करावे देवाने । देऊनि साधनें नाना हाती ।।१।।
त्यांतहि सुलभ नामसंकीर्तन । तेहि नोहे पूर्ण वाचे कधीं ।।२।।
आठहि प्रहर करिसी संसार । नाम घडीभर नेघे कधीं ।।३।।
**ज्ञानेश्वरकन्या येईल धांवोनी ।**
**जासील रंगोनी जरी नामीं ।।४।।**

(७१७)

तूं जरी मेलासी तरी काय बा रे । मरतील सारे तुजपाठीं ।।१।।
ज्याचे त्याचे कर्म असे त्याचे सवे । मीपण कां यावे वाऊगेचि ।।२।।
अनंत ब्रह्मांडे नाचवी नाचणी । तोचि चक्रपाणी रक्षी सर्वा ।।३।।
ज्ञानेशजा सुत मना उपदेशी । व्यर्थ मायापाशीं गुंतलासी ।।४।।

(७१८) पद

वाचे हरिगुण प्रेमें गारे । नातरीं सु-दगारे धृ०।।

नामावांचुनियां सोपा नाहीं । हरि आन उपायीं ।
देती श्रुतिपुराणादिक ग्वाही । ऐसीच लवलाही ।
अजामिळ अति पापी तरला । पुत्रमिषें हरि करुनि सगारे ।।१।।
नाहीं भावाची तेथें चाड । ध्यानादिक बंड ।
गर्जे हरिद्वारीं होऊनि भांड । लागो हरि वेडा ।
छंद लागता गणिका तरली ठेवुनियां प्रभु नाम खगारे ।।२।।
नामा इतुकी त्या आन न गोडी । साधनीं शत कोडी ।
कानीं पडतांचि धांवा ऊडी । घाली तोचि घडी ।
ज्ञानेश्वररजा माय कृपाळु सांडुनि भवि कां श्रमसि उगारे ।।३।।
(७१९)
**कां न कंटाळसी करितां संसार ।**
**आठहि प्रहर श्रमतोसी ।।१।।**
**घडीभरी नाम घेतां ये दुखण ।**
**अंतीं तुज कोण सांभाळील ।।२।।**
दुज्याचे पाहोनी न होसी शहाणा । निश्चिंत सुजाणा बैसलासी ।।३।।
ज्ञानेशजासुत म्हणे रे चांडाळा । निज हातें गळा कापितोसी ।।४।।
(७२०)
तिळभरी तुज न वाटे रे चिंता । कोण माझा त्राता अंतकाळीं ।।१।।
कोण रे येईल तुझिये सांगाती । विचार निश्चिती करी कांहीं ।।२।।
सर्वहि पाहती निजसुख डाव । मोहिती सावेव तुजलागीं ।।३।।
ज्ञानेशजासूत म्हणे एक करी । शरण श्रीहरी रिघे वेगीं ।।४।।
(७२१)
न करी तूं चिंता आंगींच्या दोषाची । धरी समर्थाची द्रुढ कास ।।१।।
आयित्याचि वेळीं पुत्राचिया मिषें । पाचारिता पिसे चित्त झालें ।।२।।
कोण ऐसा तुज सांपडे कृपाळु । चित्त अळुमाळु नाम घेतां ।।३।।

ज्ञानेशजासुत म्हणे बापापरीं । गर्वाते शेजारी ठेवूं नको ।।४।।

(७२२)

अस्ता जातो आयुष्यभानू । कांही करारे साधनू ।

जेणें जोडे नारायणू । जो कां प्राणू जगाचा ।।१।।

सांडा आपपरभाव । सर्वांभूतीं महादेव ।

नको आणीक उपाव । जरी हांव देवाची ।।२।।

**नका सांडूं नामजप ।**

**नका माडूं योगतप ।**

व्यर्थ जाणा खटाटोप । पुण्यपाप गोविती ।।३।।

पिंडब्रह्मांड विचार । न लगे तुज करणें फार ।

नामें एक्या मिळे सारें । श्रुति पार नेणे ।।४।।

ज्ञानेशजासुत भला । एक्या नामीं विश्वासा ।

हानिलाभ तो जाहला । अलबेला नंदाचा ।।५।।

(७२३)

जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं ईश्वर । ऐसा हा निर्धार शास्त्रीं असे ।।१।।

परी तुज नाहीं भावनेचे बळ । म्हणोनी गोपाळ

भावें ।।३।।

ज्ञानेशजा माय आम्हां सांगे खूण । जग नारायण निरहंकारे ।।४।।

(७२४)

**घडी वाटे तुज साधावे स्वहित ।**

**घडी मनोरथ संसाराचा ।।१।।**

**घडींत विरक्ति घडींत आसक्ति ।**

**नाहीं एकस्थिति क्षणभर ।।२।।**

कवणिया योगे साधावा परमार्थ । संशय ग्रसित मन सदा ।।३।।

ज्ञानेशजामाय वचनीं विश्वास । घे प्रत्ययास ठेवोनियां ।।४।।

(७२५)

माकड हें मन नाकळे मजसी । निजप्रेमपाशीं बांधी तया ।।१।।

नेदी क्षणभरी भोगूं निजसुख । अखंड उपख नाना छंदीं ।।२।।

सांगा मायबापा कवण्या उपायीं । राहे तंव पायीं मन माझें ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये भक्तीचा जिव्हाळा । अल्पहि कपाळा नाही माझ्या ।।४।।

(७२६)

नका चालूं भलत्या रीति । पुढें खंतीं पावाल ।।१।।

काळ नाहीं आला जंव । हित तंव साधारे ।।२।।

आज उद्या करिता जाती । हातोहातीं दिवस ।।३।।

एक ज्ञानेशजा संग । फेडी पांग भवाचा ।।४।।

(७२७)

काय नाहीं आली अझोनी प्रतीति । पाहता निश्चिती अनुक्षण ।।१।।

कोण रे राहिला संसारीं या स्थिर । पाहोनी जोजार वाढविसी ।।२।।

देखतां देखतां मामा काका गेले । जाणार राहिले यथाकाळें ।।३।।

एक घननीळ सर्वकाळीं सम । करी सर्व प्रेम तयावरी ।।४।।

ज्ञानेश्वरकन्या पाय धरी ढ । संसार काबाड डावलोनी ।।५।।

(७२८)

नको पडूं मना विषयाचे भरी । तेथें आहे थोरी नागवण ।।१।।

अनंत जन्म त्वां भोगिले विषय । परी झाली काय तृप्ति सांगे ।।२।।

पुढेहि आणखी भोगिलेती भोग । तरी नोहे चांग तृप्ति कदा ।।३।।

म्हणोनियां आतां कांहीं धरी सोय । ज्ञानेशजा पाय आकळाया ।।४।।

(७२९)

नका भरुं रागें सांगतों स्वहित । आळवा अनंत वेळोवेळा ।।१।।

विषयाचे सुखीं नको देऊं चित्त । पुरे ही फजीत झाली आतां ।।२।।

विचारा मानसीं कोण येती कामा । सोडवाया यमापासोनिया ।।३।।

स्कंददास म्हणे व्यर्थ गुंततोसी । शुकनलिकेसी तयापरी ।।४।।

(७३०)

**जरी तुज वाटे जाहलों मी मुक्त ।**

**तरी कां भोगांत चित्त देसी ।।१।।**

**हरिनाम घेतां येतसे दुखणें ।**

**चित्त अभिमानें जाकळलें ।।२।।**

अंतरीं वाहसी विषयाचा ध्यास । शिणविशी वाचेस शब्दज्ञाने ।।३।।

स्कंददास म्हणे आग लागो ज्ञाना । यमाचा पाहुणा होसी मूर्खा ।।४।।

(७३१)

तिळहि न तुज वाटे ऐसी खंती । होईल श्रीपति माझे कैसे ।।१।।

घडला न मज संतसमागम । नाहीं नेमधर्म आचरिलों ।।२।।

मोलाचें आयुष्य वेचिती विषयीं । नाहीं शेषशाई आठवीत ।।३।।

स्कंददास म्हणे होईरे सावध । मना काळ व्याध दुरी जंव ।।४।।(७३२)

आतां तरी चाला सोयी । आडबाही टाकोनी ।।१।।

**मागील ते नका पाहूं ।**

धरा भावू सुद्रुढ ।।२।।

करा एक द्रुढ नेम । जीवें नाम न सोडी ।।३।।

स्कंददास म्हणे बापा । हरि सोपा होईल ।।४।।

(७३३)

देखत देखत एका मागें एक । जाती सर्व लोक आप्तबंधु ।।१।।

परी नये कांहीं विचार तो मनीं । कोण माझी हानि होत आहे ।।२।।

विषयाचे सुखें भुलला पामर । विकले जिव्हार स्त्रिया पुत्रा ।।३।।

स्कंददास म्हणे करितो ठेवण । नरक दारुण भोगावया ।।४।।

(७३४)

सावधान नित्य राही माझ्या मना । नको या दुर्गुणा आतळूं तूं ।।१।।

भूतीं भगवंत असे समस्थिति । ऐसी ज्यांची वृत्ति झाली आहे ।।२।।
नाहीं पापपुण्य धर्माधर्म बंध । अवघा गोविंद असे जया ।।३।।

ज्ञानेशजा माय तुझ्याचि करितां । उपाधि ते ताता अंगीकारी ।।४।।
(७३५)
कारे भुललासी विषयाचे सुखा । कां न भक्तसखा आठविसी ।।१।।
नेतील बांधोनी जेव्हां यमदूत । कोण तुज तेथ सोडविल ।।२।।
नानापरी तुझे करतील हाल । तेव्हां न येतील कोणी कामा ।।३।।
स्कंददास म्हणे निदानीचा सखा । वैकुंठ नायकविण नाहीं ।।४।।
(७३६)
सुलभ साधन सांगितलें कलीं । घ्यावे वेळोवेळीं हरिनाम ।।१।।
कलियुगामाजीं अल्पायुषी नर । प्राणहि साचार अन्नमय ।।२।।
तेणें तपव्रत सायास न होती । नोहे चित्तवृत्ति स्थीर कदा ।।३।।
पापाचा संसर्ग टाळणें कठीण । तेणें धर्माचरण नोहे शुद्ध ।।४।।
स्कंददास प्रभु ठेवि नामतरी । संसारसागरीं तरावया ।।५।।
(७३७)
भुलला भुलला विषयीं भुलला । नेणें पडेल घाला यमाजीचा ।।१।।
स्त्रियापुत्रादिका विकले जीवित । नागविले चित्त क्रोधादिकीं ।।२।।
नाहीं संचिताची बांधिली गाठोडी । चुकवाया बेडी जन्मदुःख ।।३।।
स्कंददास म्हणे येईल कळोनी । नेतील धरोनी जेव्हां दूत ।।४।।
(७३८)
कारे भुललासी पामरा । नाठविसी हरिहरा ।।१।।
काय पाहिली निश्चिंती । म्हणोनियां स्वस्थ चित्तीं ।।२।।
सुखें पाळितोसी पिंड । विसरोनी यमदंड ।।३।।
स्कंददास म्हणे कोण । सोडविल हरीविण ।।४।।

(७३९)

हरिभजनाविण काय जिणे ।।धृ०।।

कर्मधर्म करितां हरिवांचुनि । होत न भवभय किमपि उणें ।।१।।

आत्मारामहि रतले भजनीं । व्यर्थचि अभिमानं फुगणें ।।२।।

मिथ्या भवभय मानुनि साचे । कासया धांवे ब्रह्मपणें ।।३।।

स्कंददासप्रभु स्मरतां वाचे । गोष्पदवत रे भवतरणें ।।४।।

**(७४०)**

**मन हे पायीं वसो ।।धृ०।।**

**भेदभास हा सर्वहि जाऊनि ।**

**त्वद्रूप विश्व दिसो ।।१।।**

**तवगुण गाणीं रंगो वाणी ।**

**चित्तीं रूप ठसो ।।२।।**

**स्कंददासप्रभु शरणागत तुज ।**

**चिंता त्याचि असो ।।३।।**

(७४१)

म्हणविती ब्रह्मज्ञानी । वृत्ति द्रुढ भोगस्थानीं ।।१।।

ज्ञानें नेली कर्मस्थीति । सगुणीं तो नाहीं मती ।।२।।

काय जाळावें तें ज्ञान । विषयासाठीं धांवे मन ।।३।।

श्वानासम लाजिरवाणें । स्कंददास म्हणे जिणे ।।४।।

(७४२)

निशिदिनीं हरिचें भजन करा । कलियुगीं हाचि मार्ग खरा ।।धृ०।।

मृत्युलोकि नाहीं सुखाचा । दुःखाविण क्षण तो साचा ।

अंतीं कोण कामाचा । जाणुनिया निजपथ सुधरा ।।१।।

पैसा पाहुनियां मिळती । सखे सोयरे भलभलती ।

वेळीं टाकोनियां जाती । उमजुनि श्रीहरी चित्तीं धरा ।।२।।

वादविवादी पडू नका । हरिवाचुनी नाही सुटका ।

शास्त्रपुराणी घोष निका । जप तप साधन हा न खरा ।।३।।

ज्ञानेश्वरजा पदकमळी । प्रेमे जडु द्या सुमनअलि ।

**पाहुनि चराम्बुज केलि ।**

**परमानंदे भरेल धरा ।।४।।**

(७४३)

तरूणापरीस करी व्यवहार । भजनीं सादर न होववे ।।१।।

निज कुटुंबाचे कराया पालन । ऋणापाठी ऋण करीतसे ।।२।।

परी संतकाजीं न वेचवे पैका । म्हणविसी निका परमार्थी ।।३।।

स्कंददास म्हणे ऐसे कलियुगीं । झाले ज्ञानयोगी बहुसाल ।।४।।

(७४४)

चोज वाटे आम्हा ऐकोनियां गोठी । म्हणविती ओठी ब्रह्मज्ञानी ।।१।।

परी ब्रह्मसुखें न होता वासना । क्षीण अणु जाणा वृद्धि पावे ।।२।।

**मूर्तिचिया ठायीं भोळ्या भक्ताप्रती ।**

**भाव नाठविती पाषाणादि ।।३।।**

**तुम्हासी तो तेथें त्याविण दुसरें ।**

**कांहींच न स्फुरे नवल हें ।।४।।**

(७४५)

स्त्रियापुत्राठायीं करितोसी प्रीति । तरी त्यांची उक्ति न मोडवे ।।१।।

परी गुरुठायीं दाखवोनी प्रेमा । तुज गुरुनेमा न पाळवे ।।२।।

शठ तुझी बुद्धि शठ तुझें ज्ञान । दांभिकाचरण वरी वरी ।।३।।

स्कंददास म्हणे सचैल रे स्नान । होतांचि दर्शन करुं तुझे ।।४।।

(७४६)

मिरवावे वाटे जगीं भलेपण । लोकतंत्रे पूर्ण वागतसे ।।१।।

*करणीया आंत जोडेल कीं देव । नेणेंचि आठव याचा कांहीं ।।२।।*

***श्रीगुरुवचनीं न बैसे विश्वास ।***

***स्वेच्छे साधनास करु धांवे ।।३।।***

*स्कंददास म्हणे जाणिवेचा ताठा । तरी यमसोटा केविं चुके ।।४।।*

*(७४७)*

*स्वयें बोले देव मी संता अधीन । जोडे कृपे पूर्ण तयाचिया ।।१।।*

*गुरुकृपें देव पाहे भावबळ । वचनीं प्रबळ कितिसे ते ।।२।।*

*नातरी श्रीहरी काय कर्मफळ । म्हणोनी जोडेल कर्मयोगें ।।३।।*

*स्कंददास म्हणे वाऊगेचि शीणा । सांडुनि वचना संताचिया ।।४।।*

*(७४८)*

***मन मानेल ते करणें अविद्या ।***

***जाणावी सुविद्या गुरुवाक्य ।।१।।***

*चित्त पारतंत्र्यें जीवासी बंधन । तरी संताधीन व्हावें सुखें ।।२।।*

*संत साह्याविण नको जाऊं पुढें । आड येती धेंडे अहंतेचे ।।३।।*

*स्कंददास म्हणे श्रीगुरु गोसावी । दृढ प्रेमदावी बद्ध करा ।।४।।*

*(७४९)*

*मानासाठीं करिसी खटपट । कार्याकार्य नेणोनिया नीट ।*

*विषयसुखाचा आला नाहीं वीट । कैसी तुज देईल हरि भेट ।।१।।*

***पाहोनियां आधीं निजदोष ।***

***सांडी संसारीं राहोनि उदास ।***

***गुरुवाक्याची धरुनिया कास ।***

***मनीं विचारी नित्य वेदान्तास ।।२।।***

***गुरुवाक्यावीण शिवूं नको कांहीं ।***

***बोलिल्याचा प्रत्यय घेत जाई ।***

*निजठायीं तूं सुखरूप होई । मग आनातेहि तेचि सुखें देई ।।३।।*

स्कंददास म्हणें अर्ध घडी । स्वयें नाहीं चाखिली ब्रह्म गोडी ।
ज्ञानाहंतेची घालोनियां बेडी । शब्दज्ञानें वायाचि बडबडी ।।४।।

(७५०)

म्हणती करा विद्या दान । हेंचि परमार्थाची खूण ।।१।।
देवभजनें किडाळ । आळसी तो नेई काळ ।।२।।
नेणें आपण गवार । दुज्या सांगे दुराचार ।।३।।
स्कंददास म्हणे फुडा । अंतीं होईल निवाडा ।।४।।

(७५१)

नका वायफळ करुं ज्ञान गोठीं । स्मरा जगजेठीं निरंतर ।।१।।
कोरडिया ज्ञानें नोहे समाधान । व्यर्थ अभिमान वाढावतो ।।२।।
निरभिमानेसी आळवावे देवा । संतचरणसेवा करोनियां ।।३।।
स्कंददास म्हणे भोळ्या देवा । केला हरिसखा बहुतांनी ।।४।।

(७५२)

आपणचि झाला आपणासी वैरी । कोशकीटापरी स्वयें प्राणी ।।१।।
नाथिला कल्पोनि देहादिक भाव । धरी अहंभाव तो मी ऐसा ।।२।।
म्हणोनियां स्वयें विचारोनी सांडी । अभिमान बेडी नसतीच ।।३।।
स्कंददास म्हणे स्वयत्नावांचोनी । समर्थ न कोणी सोडवाया ।।४।।

(७५३)

लीन होई संतापायीं । आन कांहीं न करी ।।१।।
जाऊं नको आड वाटा । यमसोटा चुकवी ।।२।।
त्रैलोक्याचे प्रतिपाळी । तो वनमाळी चिंती कां ।।३।।
स्कंददासा आन गोवा । एका देवांवाचोनि ।।४।।

(७५४)

मातेवरी सर्व घालोनिया भार । बाळ बिदीवर सुखें खेळे ।।१।।
घातलिया भार वागविती चिंता । अपाय तत्त्वतां होवो नेदी ।।२।।

तैसी नको करुं कांहीं मनीं चिंता । राहे त्या अनंता आठवोनी ।।३।।

स्कंददास म्हणे तुझा सर्व शीण । स्वयें नारायण निवारील ।।४।।

(७५५)

आंगीं नसोनी सदगुण । वायां मिरवी थोरपण ।।१।।

काय जाळावी ते थोरी । अजागलस्तनापरी ।।२।।

बाह्यात्कारीं दावी सोंग । वेगळेचि अंतरंग ।।३।।

स्कंददास म्हणे जोडी । करा जेणें तुटे बेडी ।।४।।

(७५६) पद

पावुनि दुर्लभ नरतनु बापा करिसी मातीमोल रे ।

हरिभक्तिविण सर्वहि साधनें असती नुसती फोल रे ।।१।।

हरिगुणगानीं वाणी न वेचुनि वाया बोलसि बोलरे ।

सज्जन वचना श्रवणि न धरुनि घेसी व्यर्थचि झोल रे ।।२।।

ब्रह्मविचारें समता बाणुनि सुखदु:खीं समतोल रे ।

दुर्घट बापा चित्ता नसता हरिप्रेमाची ओल रे ।।३।।

प्रारब्धें जे येती दु:खें देऊनि त्यांना टोल रे ।

**यत्न करी परमार्थी न ठेवी प्रारब्धावरि बोल रे ।।४।।**

सत्संगाविण सहज कळेना भक्तितत्त्व हें खोल रे ।

ज्ञानेश्वरजा चरणस्मरणीं **स्वानंदाचे डोल रे ।।५।।**

(७५७) देव मि

**जंव नाहीं गेला आपपर भाव ।**

**तंववरी देव सोपा नाहीं ।।१।।**

**जंव नाहीं गेली नि:शेष अहंता ।**

**तंव कृष्णनाथा भेटी नोहे ।।२।।**

**जंव नाहीं नामीं पडला विश्वास ।**

**तंव भवपाश न सुटती ।।३।।**

**स्कंददास म्हणे भजनीं आळस ।**

**तंव गर्भवास न चुकेचि ॥४॥**

(७५८)

आतां माझ्या मना होई सावधान । आठवी चरण देवाजींचे ॥१॥

द्रढ वेदान्ताची धरुनियां कास । पाही जगन्निवास सर्वभूतीं ॥२॥

नको वायां कल्पूं आपपर भाव । नाहीं जया ठाव ब्रह्मरूपीं ॥३॥

स्कंददास म्हणे नको करुं घात । सांडोनी स्वहित जनासंगें ॥४॥

(७५९) **लोकरंजनार्थी**

सागरमेळणीं साधीं जनहित । निववी तृषार्त जलदानें ॥१॥

तैसा गुरुमार्गे साधोनी स्वहित । निववावें आर्त उपदेशें ॥२॥

परी तयामाजीं नसावी प्रवृत्ति । लोकरंजनार्थी तिळमात्र ॥३॥

ज्ञानेशजामाय आंगिचिया गुणी । देत निवडोनी खरा खोटा ॥४॥

(७६०)

नोहे समाधान । मेळवोनि शब्दज्ञान ॥१॥

चित्ता पाहिजे तो लळा । हरिप्रेमाचा जिव्हाळा ॥२॥

भक्ति वैराग्या वांचोन । केवि थोर ब्रह्मज्ञान ॥३॥

स्कंददास म्हणे करा । देव भक्तीचा फुलवरा ॥४॥

(७६१)

कपाळीं नसतां सौभाग्यतिलक । अलंकारें सुख नव्हे कधीं ॥१॥

पोटीं आलियाचे नेदी प्रेमसुख । घेतांहि दत्तक पुत्रालागीं ॥२॥

तैसे **संप्रदाय उपासिल्याविण ।**

**शब्दें ब्रह्मपण नये आंगीं ॥३॥**

स्कंददास म्हणे पाहा विचारोनी । गुरूवाक्य मनीं आणोनिया ॥४॥

(७६२)

लटका संसार मृगजळ भ्रांती । नको रे आसक्ती ठेवूं तेथें ॥१॥

महापुरें येती वाहोनी लांकडें । संयोग तो घडे कांहीं काळ ।।२।।

तैसा कर्मयोगें भूतांचा मेळावा । वाऊगाचि गोवा पाडितोसी ।।३।।

स्कंददास म्हणे अंतकाळ येतां । जासी यमपंथा एकटाचि ।।४।।

(७६३)

आलिया जन्मासी करा कांहीं हित । चुके यातायात गर्भवास ।।१।।

करावी ते चिंता पुढलिया ओढी । कैसी तुटे बेडी संसाराची ।।२।।

सांठविलें धन येती सांवडाया । बंधु पुत्र जाया धांवोनिया ।।३।।

भोग देतेवेळीं न येती ते कोणी । यमाचें सदनीं तुजसवें ।।४।।

ज्ञानेशजा माय पाहवेना पोटीं । वायांविण कष्टी होती जीव ।।५।।

(७६४)

संसारीं तो एक जाणावा करंटा । नये ज्याच्या ओठा हरिनाम ।।१।।

प्रपंची सायास करी नानापरी । वाचे नेघे हरी दुर्भागिया ।।२।।

व्रततीर्थाटणीं धरितो हव्यास । हरिविणें ओस चित्त सदा ।।३।।

ज्ञानेशजा माय म्हणे तो सगळा । जात असे काळामुखीं अंती ।।४।।

(७६५)

पेरणी ये साटोवाटीं । फळ बीजाचिये पोटीं ।।१।।

**भोग वासना वेचतां ।**

**फळ संसार ये हातां ।।२।।**

विषयासी तिलांजुली । होय सखा वनमाळी ।।३।।

ज्ञानेशजा माये, करा । लाहो पाय चित्तीं धरा ।।४।।

(७६६)

लाजेचे प्रसंग असती वेगळे । लाजूं नये वेळे भजनाच्या ।।१।।

निज दुर्गुणाची वाटो द्यावी लाज । चुकेल सहज यमजाच ।।२।।

नित्य तृप्तालागीं विषयाची गोडी । तुटे भवबेडी धरितां लाज ।।३।।

गावोनि नाचोनि आळवावा हरी । चिरा लाजेवरी घालोनियां ।।४।।

ज्ञानेश्वरकन्या प्रेमीं अंतराय । चुके तो उपाय करा वेगीं ॥५॥

(७६७)

तीर्थतप आटाआटी । नोहे भेटी हरीची ॥१॥

नाम सुलभ साधन । रात्रंदिन उच्चारी ॥२॥

भोळा भाव धरी चित्तीं । पायीं प्रीति संतांच्या ॥३॥

ज्ञानेशजामाय तुझे । भव ओझें वारील ॥४॥

(७६८)

पळ नाहीं भरंवसा । केव्हां फांसा पडेल ॥१॥

वायां वाढविसी हांव । जीवभाव देऊनि ॥२॥

ऐसी करावी ते जोडी। पायी वेडी न पडे ॥३॥

स्कंददास म्हणे मना । नारायणा आठवी ॥४॥

(७६९)

आलिया जन्मासी करा एकवेळ । सखा घननीळ आपुलासा ॥१॥

नका करुं चिंता अन्न आच्छादन । प्रारब्धा अधीन आहे सर्व ॥२॥

संयोगवियोगें सुखदुःख पेटे । पूर्वेकर्मे नेटे नेमियेले ॥३॥

ज्ञानेशजा माय चरण दुर्मिळ । त्याची तळमळ धरा चित्तीं ॥४॥

(७७०)

पालथ्या घागरी घालितां जीवन । नोहे सांठवण कोणे काळीं ॥१॥

कल्पवरी जळीं ठेविला पाषाण । आंत ओलेपण केविं शिरे ॥२॥

**दुर्जनासी केला बहु उपदेश ।**

**सद्‌बुद्धीची आस धरुं नये ॥३॥**

तैसें माझें मन नेघेचि पालट । वरी वाहे धीट ज्ञानगर्व ॥४॥

ज्ञानेशजे माये कवण्या उपायीं । जीव तुझे पायीं राहिल हा ॥५॥

(७७१)

आयुष्य हें वायां जाय । तुमच्या पायावांचुनी ॥१॥

*धरुं विश्वास अंतरीं । ऐसी परी नव्हेचि ।।२।।*

*आंत बाहेरिया काळे । विषयव्याळे वेढिले ।।३।।*

*ज्ञानेशजा कोण चित्तीं । त्वां निश्चिंती पाहिली ।।४।।*

*(७७२)*

***विप्र अवमानीं मिळें तीव्र दंड ।*** *होय धर्म लंड म्हणोनियां ।।१।।*

*धर्मानें वागोनि विप्रा क्रोध येतां । नाहीं आम्हां ताता शापभय ।।२।।*

*भारतीं प्रमाण पतिव्रतेवरी । विप्र क्रोध करी भिक्षेसाठीं ।।३।।*

*दुर्वासें पिडिला अंबरीष राय । परिणाम काय झाला त्याचा ।।४।।*

*ज्ञानेशजामाय सापराधा ताडी । निरपराधा कडीं घेऊनि खेळे ।।५।।*

*(७७३)*

*थिल्लरोदकातें पाहुनि भुलला । पळत सुटला रानोमाळ ।।१।।*

*ऐशा मृगापरी भुललासे प्राणी । सुखाभास मनीं नेणोनियां ।।२।।*

*गळ्यामाजीं मणी जाहली विस्मृति - । पुसे लोकाप्रति आल्या गेल्या ।।३।।*

*सुखाचें तें सुख ज्ञानेशजा पाय । नेणोनि अपाय भोगिताती ।।४।।*

*(७७४)*

***दुजियाचे दोष पहाता नयनीं ।***

***काय ते शिराणी फिटे तुझी ।।१।।***

***कोण होय सुख करिता परनिंदा ।***

***मिथ्यालाप छंदा घेता वाणी ।।२।।***

***काय हित साधे विषय चिंतनीं ।***

***वासना डाकिणी आलिंगिता ।।३।।***

*स्कंददास म्हणे सावध हो मना । काळाची ही सेना वेढी तुज ।।४।।*

*(७७५)*

*अवघा संसार मायिक पसारा । वांझेचिया पोरा सम जाणे ।।१।।*

*आघवेचि जाती काळाचिये दाढे । नाहीं तुज पुढें सोडवितां ।।२।।*

आशाबद्ध जन गोविताती तुज । साधो नेदी निज स्वहिताते ।।३।।
स्कंददास म्हणे मना सांडी आशा । एका जगदीशा चिंतोनियां ।।४।।
(७७६)
केलियाहि यत्न नोहेचि संसार । सुखाचा साचार कोणे काळीं ।।१।।
अंधा भोजनासी केले पाचारण । सवे दोघे जण येती तेथें ।।२।।
तैसें सुख घेतां तयासवें चाले । दु:खाचेहि घाले आपोआप ।।३।।
म्हणोनियां सर्व सांडोनियां गोवा । एका वासुदेवा आठवावे ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या भजनाचे वाटा । सर्व सुख सांठा पावशील ।।५।।
(७७७)
दाखवा रे ऐसा कोणी । झाला प्राणी अमर ।।१।।
अवघे काळाचिया दाढे । होता वेडे जाणोनि ।।२।।
**हरि नाहीं ज्याचे चित्तीं ।**
**अधोगती चुकेना ।।३।।**
**ज्ञानेशजा सांगे खूण ।**
**सोपें नाम तारक ।।४।।**
(७७८)
आपुले संचित लागेल भोगावे । कोणी नये सवे वाटा घ्याया ।।१।।
भोग देतेवेळे जाईल कठीण । सखा नारायण न सोडवितां ।।२।।
म्हणोनिया चित्तीं करोनि विचार । शरण साचार रिघे संतां ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये पाय ते निर्भय । काळासी जे होय काळरूप ।।४।।
(७७९)
आपुलें उचित जाणोनियां आधीं । करी स्थिर बुद्धि तये ठायीं ।।१।।
मनाचिये चाली न घालावी उडी । धरोनियां गोडी संतवाक्यीं ।।२।।
गुरुमार्गाहूनि नको चळू अणू । जंववरी कान्हू हातीं नये ।।३।।
ज्ञानेशजा पायीं द्रढ ज्या विश्वास । तया उपदेश न लगे कांहीं ।।४।।

(७८०)

***सांडी जाणीव आघवी ।***

***भाव धरोनियां जीवीं ।।१।।***

***सर्व अभिमान गेला ।***

***देव स्वयें तोचि झाला ।।२।।***

***एका नारायणाविण ।***

***मिथ्या सर्व अकारण ।।३।।***

***स्कंददास म्हणे शीण ।***

***भावेविण ब्रह्मज्ञान ।।४।।***

*(७८१)*

*वासनेच्या बळें निर्वाहा पुरतें । भोगी विषयातें कंटाळोनी ।।१।।*

*तयाचिये चित्तीं वसे नारायण । न होय जो दीन विषय नाशीं ।।२।।*

*सुखदु:खघालीं राहोनी निराळा । साहत उमाळा षडरींचा ।।३।।*

*ज्ञानेशजासुत तोचि एक खरा । येर तो पसारा शब्द जाल ।।४।।*

*(७८२)*

*संसारीं दु:खाचे न होते आघात । तरी कां परमार्थ आतुडता ।।१।।*

*पुत्राचिया काजा करी ते ताडन । मृदु अंतकरण माऊलीचे ।।२।।*

*विषय वल्गना सांडुनियां जीवे । ब्रह्मरुपीं व्हावें समरस ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्या देत दु:खबेडी । व्हाया घडी घडी अनुताप ।।४।।*

*(७८३)*

*होणार त्यासम ठाकतसे बुद्धि । परी कृपानिधि जागवितो ।।१।।*

*फलभोग द्याया झालिया प्रमाद । न देचि गोविंद दंड तेथें ।।२।।*

***वासनेच्या बळें करी आज्ञा भंग ।***

**तरी रमारंग न साहे ते ॥३॥**

**ज्ञानेश्वरकन्ये याचिताचि क्षमा ।**

**अनावर प्रेमा हृदयी दाटे ॥४॥**

(७८४)

आयुष्याचा क्षण जाईल तो वाया । करावा कासया ऐसा धंदा ॥१॥

बैसलिया ठायीं जोडे नारायण । कां न तें चिंतन करू ऐसें ॥२॥

**लटिका प्रपंच कळलियावरी ।**

**काय त्याची थोरी वागवावी ॥३॥**

स्कंददास म्हणे सुखाचा होशील । मना राहशील हरिपायीं ॥४॥

(७८५)

शरीर तोवरी करावा तो लाहो । हरिपायीं भावो ठेवोनियां ॥१॥

पाडुनियां मोह करविती सेवा । तयासाठीं जीवा देऊं नको ॥२॥

अंतकाळीं सर्व होती पाठीमोरे । संबंधी सोयरे जीवलग ॥३॥

स्कंददास म्हणे एक नारायण । सखा करी आन डावलोनी ॥४॥

(७८६)

**होवोनिया पुंड लाथाळिसी धर्म ।**

**इंद्रियासी नेम न ठेवोनी ॥१॥**

**शिष्ट वचनांचा करिसी अवमान ।**

**स्त्रियेच्या अधीन होवोनिया ॥२॥**

**जाब देतां पुढें येईल कळोनी ।**

**सोडविना कोणी यमगृहीं ॥३॥**

**स्कंददास म्हणे मायिक पसारा ।**

***पाहोनी गव्हारा भुललासी ।।४।।***

*(७८७)*

***आतां पुढें कोण गती ।***

***नये विचार हा चित्तीं ।।१।।***

***कैसा नाशिवंतासाठीं ।***

***रात्रंदिन होसी कष्टी ।।२।।***

***काळें ग्रासिलें सकळ ।***

***याची खंती नये तीळ ।।३।।***

*स्कंददासीं अवघे वाव ।*

*-विण हरिपायीं भाव ।।४।।*

*(७८८)*

***परमार्थाचा भार घाली देवावरी ।***

***संसारी तो करी नाना श्रम ।।१।।***

*ऐसा प्राणी झाला यमाचा पाहुणा । नये नारायणा कींव त्याची ।।२।।*

***परमार्थी यत्न करावा म्हणून । प्रारब्ध नेमून ठेवी हरी ।।३।।***

*स्कंददास म्हणे चुकूं नये वाट । दुरावें वैकुंठ जया योगें ।।४।।*

*(७८९)*

*वरी वरी दावी परमार्थाचें सोंग । चित्तीं अनुराग संसाराचा ।।१।।*

*सर्वभूतीं सम व्हावे म्हणोनियां । करीतसे दया स्त्रियापुत्रीं ।।२।।*

*प्रारब्धाच्या नांवें नाना भोग भोगीं । दुजा होता भागी क्रोध येत ।।३।।*

*स्कंददास म्हणे कळे फसगत । ठाकलिया अंतकाळ जवळीं ।।४।।*

*(७९०)*

*साचभावें वाटे व्हावी हरी भेटी । तरी धरी पोटीं संत बोध ।।१।।*

*प्रमाण प्रामाण्य सारुनियां दूरी । जाणिवेते हरी बुद्धिचिया ।।२।।*

*डोळे लावोनियां चालावे मारगीं । दाविला जो जगीं संत जनीं ।।३।।*

स्कंददास म्हणे कळो येता निष्ठा । सोडोनि वैकुंठा पावे हरी ।।४।।

(७९१)

जैसा जैसा कर्म ठेवा । तैसा भोगणें ये दैवा ।।१।।

सारे निमित्ताचे धनी । सुखदुःख धनमानीं ।।२।।

न लगे कोपावे कोणासी । वांचुनियां संचितासी ।।३।।

स्कंददास न करी शीण । सर्व प्रारब्धा अधीन ।।४।।

(७९२)

किती वेळ झाला । संसारीं तुम्हांला ।।१।।

तरी काहीं नव्हा जागे । जातां विषयाचे मागे ।।२।।

खरी टेको नेदी खरा । झोडी लाथाडोनी बरा ।।३।।

विषय ना मोक्षसुख । वायां भोगणें तें दुःख ।।४।।

स्कंददास म्हणे रया । किती जन्म धाडिसी वाया ।।५।।

(७९३)

आधीं साधोनी स्वहित । द्यावा हात दुजिया ।।१।।

स्वयें नाहीं झाली तृप्ती । चिंता चित्तीं पराची ।।२।।

वायां वाढवी उपाधी । मंदबुद्धि मूढ तो ।।३।।

धांवे सांडोनियां देवा । करुं सेवा भूतांची ।।४।।

स्कंददास म्हणे करी । जोडी पुरी निरयाची ।।५।।

(७९४)

**माझे माझे करिता जातसे आयुष्य ।**

बुडत्याची कास धरुनि बूड ।।१।।

नये हा विचार पुढें कैसीं गती । कैशा जन्मपंक्ति चुकतील ।।२।।

धरुं नये त्यांची धरोनियां कास । होती कासाविस तयासाठीं ।।३।।

स्कंददास म्हणे सज्जन सोयरा । माझ्या आळंदीवरा विसरती ।।४।।

(७९५)

भुक्तिमुक्ति पायापाशीं । राबताती जैशा दासी ।।१।।
वेगीं धरा त्याचे पाय । चुकेल सकळ अपाय ।।२।।
ब्रह्मादिक पायवणी । जाती येरा कोण गणी ।।३।।
स्कंददास म्हणे मज । करा देवासी अर्पण ।।४।।
(७९६)
सोडवीना गोडी विषयाची जरी । तयामाजीं हरी आठवी कां ।।१।।
धर्म अविरोधी सेवावे विषय । हरी बापमाय करूनि भोक्ता ।।२।।
चहुं पायीं मन सोडितां मोकळे । सकळेचि काळें गिळीजेल ।।३।।
स्कंददास म्हणे जंव काळ दूरी । तंव वारावारी करी कांहीं ।।४।।
(७९७)
नरदेहा ऐसी जोडी । वाया नको दवडूं घडी ।।१।।
**कान्ता पुत्र बंधु जन ।**
**अवघे करिती बंधन ।।२।।**
विश्वसखा कमलापती । करी सोयरा सांगाती ।।३।।
स्कंददास म्हणे मना । ध्यायी आळंदीचा राणा ।।४।।
(७९८)
भय नाहीं तया । शरण गेला पंढरीराया ।।१।।
देह गेह भ्रांति । सांडोनिया वरिलीं शांति ।।२।।
नाम निशाण ते भले । रात्रंदिन फडकावलें ।।३।।
स्कंददास म्हणे गेला । चुकवोनी यमघाला ।।४।।
(७९९)
चारी मुक्ति ज्याचे पायीं । तया धरा रे हृदयीं ।।१।।
वायां करितोसी शीण । मना साधनीं भ्रमोन ।।२।।
एका नामाचिया साठीं । धांव घाली जगजेठी ।।३।।
सर्व साही अडदर । निजभक्तांचा कैवार ।।४।।

*स्कंददास म्हणे धनी । करा एक चक्रपाणी ।।५।।*

*(८००)*

*वरी दाव भाव अंतरीं कपट । तयासी वैकुंठ दुरावला ।।१।।*

*अंतरीं बाहेरीं निर्मळ जीवन । तैसे व्हावे मन गुरूपायीं ।।२।।*

*क्षुधे तृषेसम व्हावी तळमळ । तेव्हां घननीळ धांवत ये ।।३।।*

*ज्ञानेशजासुता याविण तो सारा । परमार्थ पसारा शीण वाटे ।।४।।*

*(८०१)*

*विषयाचे संगे लाडले बहुत । विचारिता हित नाहीं तेथें ।।१।।*

***पराधीन भोग आपुले म्हणूनी ।***

***गुंततातो प्राणी वायांवीण ।।२।।***

*सुखाचे सांगाती आघवेचि जन । करिती जतन स्वहितातें ।।३।।*

*स्कंददास म्हणे एक नारायण । निदानीचा खूण मनीं धरी ।।४।।*

*(८०२)*

*जरी तुज वाटे सांपडावा हरी । तरी एक करी काया वाचा ।।१।।*

*डोळे लावूनियां जाई तया वाटे । जया दावी बोटें स्वयें गुरु ।।२।।*

***सांडोनियां सर्व लौकिकाची लाज ।***

*साधी निजकाज अविलंबें ।।३।।*

*स्कंददास म्हणे जन्मजाती वाया । गुरूकृपा ठाया न पवता ।।४।।*

*(८०३)*

*शेजारियापाशीं ठेविला पैका । उपजला देखा मोह त्याचा ।।१।।*

*मागो जातां धनी स्वयें दुःख करी । तैसी आहे परी संसाराची ।।२।।*

***देवाचा संसार निमित्ताचा प्राणी ।***

**अभिलाष मनीं धरी जीव ।।३।।**

*स्कंददास म्हणे वायांचि शिणती । चौऱ्याशीचे घेती फेरे नित्य ।।४।।*

*(८०४)*

**संसार करोनी साधू परमार्थ ।**

**ऐसे म्हणे शत मूर्ख तोचि ।।१।।**

*इंगळाच्या सेजं आली सुखनिद्रा । न घडे हे कदा कोणे काळीं ।।२।।*

*मृगजळभानें होय तृषा शांती । तरी कां श्रमती मृग तेथें ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्या पाय ते वेगळे । न चलती चाळे इंद्रियांचे ।।४।।*

*(८०५)*

**परमार्थवाट चूकला तो मूढ ।**

**मानी जो दगड देवालागीं ।।१।।**

**गुरूलागीं मानी सामान्य मानव ।**

**आंगी भरला गर्व ताठा भारी ।।२।।**

*संपत्तींच्या मदें करितो अवज्ञा । आपुलीच प्रज्ञा मानोनियां ।।३।।*

*स्कंददास म्हणे वायांचि व्यापार । नरक अघोर भोगावया ।।४।।*

*(८०६)*

**क्षणिक सुखाची सांडोनिया हांव ।**

**करीता उपाय जोडे हरी ।।१।।**

**नाशिवंत देह जाणारचि आहे ।**

**करिताहि पाहे जोपासना ।।२।।**

**स्त्रियापुत्रबंधु जातील सोडोनी ।**

**अंतकाळीं कोणी कामा नये ।।३।।**

*स्कंददास म्हणे पाहे विचारोनी । होईल मरणीं कोण गती ।।४।।*

*(८०७)*

*सांडी सांडी मना विषयाची गोडी । पाडील ते बेडी अंतीं तुज ।।१।।*

अभ्राची साऊली आयुष्याची गाठी ।

**होईल देह तुटी क्षण मात्रें ।।२।।**

मृगजलापाठीं धांवे रानोरान । शेवटीं मरण न चुकेचि ।।३।।

स्कंददास म्हणे करोनी तांतडी । ज्ञानेशजा गडी करी बापा ।।४।।

(८०८)

काय राहोनियां काया । तुझ्या प्रेमाविण वाया ।।१।।

करी पिंडाचें पाळण । मधुरान्नहें रात्रंदिन ।।२।।

फावलिया वेळी । करी ज्ञानाची टवाळी ।।३।।

ज्ञानेशजे पुरे जन्म । मिथ्याचारी तो अधम ।।४।।

(८०९)

पुरे करी मना विषयाची हांव । आळंदीचा राव स्मरे वेगीं ।।१।।

न कळे घालील केव्हां काळ उडी । द्यावी लागे कुडी सांडोनिया ।।२।।

केला तो सायास जाईल बा वाया । न करील दया यमधर्म ।।३।।

स्कंददास म्हणे वेळींच सावध । होऊनी गोविंद चित्तीं धरी ।।४।।

(८१०)

सांगोनियां शब्द ज्ञान । भोंदी भाविक सज्जन ।।१।।

मेघ वर्षे जलधारी । तेथें पालथी घागरी ।।२।।

वरी वरी स्पर्शे नीर । परी कोरडे अंतर ।।३।।

ज्ञानेशजे तैशापरी । प्रेमसुख नेणें उरी ।।४।।

(८११)

न होय म्हणुनी न बैसेचि ठायीं । ओझें वाहे डोई संसाराचे ।।१।।

विषयाचे छंदें श्रमे नानापरी । आठविता हरी शीण वाटे ।।२।।

सोयरे संबंधी व्याही जावयासी । भाव मान्यतेसी गौरवितो ।।३।।

स्कंददास म्हणे संताचिया नांवें । पैका न देववे तुज लागीं ।।४।।

(८१२)

काय तुम्हांलागीं बोलू मी पामर । कळे तो विचार सर्व कांहीं ।।१।।
जाणोनियां आत्मनिदिध्यास क्रिया । तयासी साचाया करणे लागे ।।२।।
नुसुधिया शब्दें नोहे फल सिद्धी । प्रमाण प्रसिद्धी गुरूवाक्य ।।३।।
स्कंददास म्हणे नका आडमार्गें । जाणोनि वाऊगे श्रमी होऊं ।।४।।

(८१३)

म्हणती आम्ही आतां करितो परमार्थ । वाचिती ते ग्रंथ वेदान्ताचे ।।१।।
स्वयें देहगेहीं ठेवोनी आसक्ति । करिती फजिती भाविकांची ।।२।।
कामक्रोधादिंची घेऊनि सांगात । निघे परमार्थ करावया ।।३।।
स्कंददास म्हणे नेणेचि गव्हार । आहे तो विचार वेगळाचि ।।४।।

(८१४)

माहेरीच्या सुखा दिली तिलांजली । तैचि भोगी बाळी पतिसुख ।।१।।
जाणे वडिलांच्या पूर्ण मनोभावा । तोचि पुत्र ठेवा पावो शके।।२।।
तैसी सर्वस्वाची केली ओवाळणी । प्रेमें पायाहूनी गुरूदेवा ।।३।।
स्कंददास म्हणे तया एकाविण । अनुभवखूण नेणे कोणी ।।४।।

(८१५)

**लोकीं वाढे मान मानावी ते खंती ।**
**जेणें देहासक्ति द्रढ होय ।।१।।**
संप्रदायधर्में लावोनी कांचणी । इंद्रियां चोरोनी ठेवी मना ।।२।।
एक एकाचिये मिसळल्या संगीं । विपरीत रंगीं रंग चढे ।।३।।
स्कंददास म्हणे व्हावी एकद्रष्टी । कैसा जगजेठी आकळेल ।।४।।

(८१६)

**नका करुं वायां शाब्दिक चावटी ।**
**अहंतेची गांठी ठेवोनियां ।।१।।**
शब्दे मिळे देव तरी संप्रदाया । सेवावे कां वाया सांगितले ।।२।।
तेणें होय मन इंद्रियां आटणी । देसी ते सांडोनी फोल म्हूण ।।३।।

स्कंददास म्हणे जोडी नारायण । करुनी प्रमाण गुरूवाक्य ।।४।।

(८१७)

क्रोध मांग दूर करी । शांति सुंदरीसी वरी ।।१।।

लोभ काम कपटी चांग । सोडी त्वरें यांचा संग ।।२।।

सर्वभूतीं क्षमा दया । जोडी भावंडे सखया ।।३।।

स्कंददास म्हणे मना । भूतीं पाही नारायणा ।।४।।

(८१८)

**वाचे घेतां हरीनाम ।**

**समूळ आटे भवभ्रम ।।१।।**

**द्रष्टी न्याहाळिता पाय ।**

**संसारचि मोक्षमय ।।२।।**

चित्तीं येतो प्रेमडोल । तया सुखा नाही मोल ।।३।।

स्कंददास म्हणे करा । धनी विठ्ठल दातारा ।।४।।

(८१९)

आगीचिया संगीं असावे सावध । नातरी संन्निध अपाय तो ।।१।।

परस्त्रीचे ठायीं नसावी सलगी । बाधक वाऊगी परिणामी ।।२।।

संताचिये ठायी दोष वरकरणी । निंदा ते पतनीं कारण कीं ।।३।।

श्रीगुरूवचन मानी जो कां लीला । तरी नागवला सर्वस्वेचि ।।४।।

ज्ञानेशजा माय स्नेहाळचि पोटीं । अन्याया थापटी सांडीचिना ।।५।।

००००००००००००

१३.

श्रीकृष्णलीला

०००००००००००००

(८२०) आर्या

मही गायकाय धरुनीं निघतीं झाली विधीस तैं शरण ।

मुनिजन देवादिकही तिजसंगे पावले विधिस्थान ।

(८२१) दिंडी

प्रभो आम्ही सर्वही तवाधीन । कर्ममार्गीं वर्ततो हेतूविण ।।१।।

परि दैत्य सांप्रत यज्ञ पाही । विध्वंसूनि भक्षिती आम्हांलाही ।।२।।

स्वर्गवासी सर्वही देव आम्ही । गिरिकुहरीं जावोनि वसो स्वामी ।।३।।

त्वरें यांतुनि सोडवा दयासिंधू । भक्तकाज कैवारी दीनबंधू ।।४।।

(८२२) इंद्रव्रजा

बोले विधी तैं विबुधादिकांसी । पाहो चला तात पयोब्धिवासी ।।

जो कां स्वलीलेचि शरीरधारी । होवोनियां भक्तजनासी तारी ।।१।।

(८२३) कामदा

जाऊनी तदा क्षीरसागरीं । सर्वही मुखें विनविती हरी ।।

दैत्य मातले पीडिती महा । भो कृपानिधे वारि ताप हा ।।

(८२४)

चुकलिया माय बालके रडती । तैसे आम्हाप्रती झाले आतां ।।१।।

आम्हा तूंचि गति असशी गोविंदा । चुकवी आपदा नारायणा ।।२।।

कोठवरी आतां पाहतां जी अंत । ज्ञानेशजाकांत धांवा वेगीं ।।३।।

(८२५) गीति

नाभी नाभी देवकी उदरीं येवोनि कार्य साधीन ।

सुरवर सकळहि यदुकुळि साह्य करायास घ्या तुम्ही जनन ।।

मजशीं सुरतालिंगन मुनिजन इच्छिति राम अवतारीं ।

तदेकपत्निव्रतास्तव होइल तत्पूर्ति कृष्ण अवतारीं ।।

(८२६) पद (श्रीज्ञानेश्वरकन्या कृत)

वदुनि असे ब्रह्मादिदेव ते अपुल्या गृहीं गेले ।

शुक सांगे नरपाला हरिनें पुढें काय केलें ।।धृ०।।

शूरसेन भूपति पुत्र वसुदेव एक होता ।
निखिल सगुण संपन्न द्विजवर भक्त महा होता ।
मथुरापुरि उग्रसेन त्याला कंस पुत्र होता ।
बहिण त्याची देवकी करीत लग योग्य होता ।
दिधली ते वसुदेवालागीं उत्सव बहु केंलें ।। शुक सांगे० ।।१।।
दिधले आंदण दास दासि रथ उचित जे कीं थोरा ।
भगिनिरथा चालवी कंस तो धरुनि वाजिदोरा ।
परि आनंदामध्यें ऐकिले सुरवचना थोरा ।
देवकीचा आठवा तनय तुज मारिल रे पोरा ।
तैं शठ तत्कच आकळुनीयां म्हणे उत्तर गेले ।।२।।

(८२७) साकी

इसबिधि अशरिरी बाणी सुनकर ताडित अहिसम होवे ।
भगिनी शिरछेदन कारन तब खडग हातमें लेवे ।।

(८२८) दिंडी

देखोनियां कंसास शस्त्रपाणी । त्यासि बोले वसुदेव मधुर वाणी ।।१।।
सोडी वेल्हाळा देवकी सुकुमारा । भाक घेई देईन स्वकुमारा ।।२।।
योग्य कालीं देवकी प्रसुत झाली । पुत्ररत्न देखूनि सुखें धाली ।।३।।
आठवी ती मनि करुं भाकदान । शोकदाव्यानें गेली आहाळोन ।।४।।

(८२९) ओवी

मग वसुदेव बोले वचन । बाळा तुजला आले रे मरण ।
देवकीचे आसुवे नयन । भरले तेव्हां सदगद ।।
वसुदेव म्हणे प्रमाण । कंसासी दिधले भाकदान ।
देवकी म्हणे नेवून । अवश्य द्यावा स्वामिया ।।

(८३०) गीति

बालक सुंदर पाहुनि कंस म्हणे काय यापुढें काम ।

न्या वसुदेवा यासी अष्टम पुत्रासवें अम्हा काम ।।
तेव्हां सुरर्षि येऊनि बोले कंसा तु भुललासी ।
समविषम मोजतांना सर्वही शत्रूच हे न कळलासी ।।
(८३१) ओवी
कंस क्रोधें धाविन्नला । बंदीशाळेमाजीं आला ।
देवकीसी काळचि भासला । बाळ आच्छादिला निजपल्लवें ।।
(८३२) दिंडी
देखोनियां कंसास शस्त्रपाणी । वदे तेव्हां वसुदेव मधुरवाणी ।।
नको मारुं देईन तुला बाळ । म्हणसि ज्याला आपुला स्वयें काळ ।।
(८३३) पद
अझुनि कां सांगे नवतरसि ।।धृ०।।
कितिक दु:ख सोसावे दयाळा । भेटि न कां देसी ।।१।।
साच करावें वचन आपुलें । मारूनि असुरासी ।।२।।
ज्ञानेश्वरजा कान्त तुम्ही प्रभु । भक्त हृदवासी ।।३।।
(८३४) पद
अवतरला यदुनाथ ।।धृ०।।
अष्ट वरूपाची मूर्ति साजिरी । शंखचक्रयुत हात ।।१।।
ज्या रूपानें इंद्रिय दमुनि । देवकी निजमनीं ध्यात ।।२।।
सान रूप प्रभु धरी निजलीले । असत ते पहात ।।३।।
(८३५) पद
अवतरला व्रजराणा ।।धृ०।।
आनंदाचा पूर नंदमनीं । पाहुनियां तान्हा ।।१।।
नंदघरीं पुत्रोत्सव पाहुनि । तोषती व्रजललना ।।२।।
सगुण सांवळी मूर्ति पहाया । धावती व्रजललना ।।३।।
हैमवतीतें चित्तीं ध्यावुनि । अर्पिली जिवप्राणा ।।४।।

द्रष्टि होईल म्हणुनि यशोदा । उतरी निंबलोणा ।।५।।

ज्ञानेश्वरजाकान्त बाईंनो । भक्तीचा पाहुणा ।।६।।

(८३६) आर्या

रेरे कंसा मूढा काळ तुझा वाढतो महीवरूती ।

ऐकुनि वाणी ऐसी कंस गृहा जात लाजूनि चित्तीं ।।

(८३७) दिंडी . गर्गाचार्य जातक कथन

धन्य धन्य यशोदे तंव भाग्य ।

पोटीं आला तुझ्या रमारंग ।।
हैमवती प्रिय आत्मलिंग । शेषशायी भक्तभवभंग ।।१।।
जरी आला तुझिये उदरीं । याचे यश त्रिभुवनभरी ।।
नाना संकटे येतिल याचेवरी । द्रष्टिमात्रें निवारील सारी ।।२।।
काळकूट भरोनिनां स्तनीं । मारुं येईल एक कामिनी ।।
मुखीं स्तन घालोनि चक्रपाणी । तिसी नेईल सायुज्य सदनीं ।।३।।
आंगावरी पडेल याच्या गाडा । परी त्याचाहि होईल चुराडा ।।
कुरुबीर करतील होडा । लीलामात्रें करिल हरी रगडा ।।४।।
गोपिकांचे हरिल माते चित्त । दही दूध चोरिल हा बहुत ।।
नानापरी क्रीडल गोकुळांत । सुखी करील तुम्हा सर्वांप्रत ।।५।।
यासी भय यमुनाजीवनीं । यासी सर्प गिळील येवोनि ।।
द्वादश गांवें गिळिल हा अग्नी । नखीं पर्वत धरील उचलोनी ।।६।।
निर्दाळिल समस्त दैत्यकुळें । गोकुळीं हा राखील वत्सपाळें ।।
मारोनियां कंसासि निजबळें । वाढविल भक्ति संतमेळें ।।७।।
शरण रिघेल गुरूसंदीपना । मृतपुत्र आणोनिया जाणा ।।
सागरांत बसविल पट्टणा । परणील बहुत अंगना ।।८।।
पुत्रगुण ऐकोनि श्रवणीं । आनंद न माये यशोदेच्या मनीं ।।
ज्ञानेश्वरकान्त संतोषुनी । गर्गमुखा पाहे परतोनी ।।९।।
(८३८)
सांडा सांडा बाई कामधंदा । वेगें वेगें चला पाहाया मुकुंदा ।

पतिसूत आड येतां चेंदा । नका भींवूं कांहीं जनपदा ।।१।।
वेणुरव कानीं विकळ साजणी । सर्व संसारावरी पडले पाणी ।।२।।
धीर धरवेना जाऊं पाहे प्राण । वाटे केव्हां हरिसी आलिंगीन ।
पंचप्राण सांडीन ओवाळून । मेला तमारि हा विरहाकारण ।।३।।
केव्हां संपेल दुर्दैवाचा दिन । सुखनिशा कैं उदयील पूर्ण ।
ज्ञानेश्वरकन्यानुग्रहाविण । आम्हा कैचे प्राप्त ते चरण ।।४।।
(८३९)
फिटला माझा पांग । माया ममता दांग ।।१।।
गुरूराया दयाळा । माझ्या जिवीचा जिव्हाळा ।।२।।
मोतियाची माळा । हरिपायीं लोळा ।।३।।
ज्ञानेशजा मायबाई । हातीं देत शेषशाई ।।४।।
(८४०) पद
मजला सोडुनि गेला श्याम ।।धृ०।।
दहिदूध जैसे तैसे संचले । कांहीं सुचेना काम ।।१।।
मुलें येऊनि म्हणती मजला । दाखवि आत्माराम ।।२।।
विकल सर्वही गोकुळी नारी । इच्छिति त्यागू प्राण ।।३।।
ज्ञानेश्वरजाकान्त उद्धवा । भेटवी मंगलधाम ।।४।।
(८४१) प्रभाती - पद
जागिये कृपानिधान नंदके दुल्हारे ।।धृ०।।
रैन सबहि बीत गई । अरूणप्रभा प्रगट भई ।
ग्वालन हरिगीत गाई । मथन करत प्यारे ।।१।।
ग्वालबाल आय रहे । श्याम श्याम मुखसे कहे ।
नयन प्रेमनीर बहे । दरसन को ठारे ।।२।।
भगवतजन ध्यान धरे । सुरवरमुनि कर्म करे ।
स्कंददास चरण धरे । जनममरण टारे ।।३।।

(८४२)

कानडे म्हणोनि श्रुती डाहारिले । तेचि हे सांवळे गोपीगृही ॥१॥

योगी जयासाठीं श्रमही साहोन । करिती दमन इंद्रियांचे ॥२॥

भक्तकाज केणें आलासे गोकुळीं । गोपासंगें खेळी आवडीनें ॥३॥

ज्ञानेश्वरकन्या भुलली प्रेमासी । साडोनी मिरासी थोरपण ॥४॥

(८४३) वेणुगीत

केधवां पाहीन सांवळे सगुण । गोपिकारमण स्वामी माझा ॥१॥

नयन उत्सुक प्यावया श्रीमुख । वेणूरव देख चित्ता जाळी ॥२॥

न पाहतां दृष्टि नंदाचे सानुले । प्राण हे वांचले व्यर्थ सये ॥३॥

ज्ञानेश्वरकन्ये कोण दृष्टिफळ । जंव न दावाल कांत पाय ॥४॥

(८४४)

श्रुति अगोचर गोपी मनोहर । पाहतां अंतर स्थिरावलें ॥१॥

कटी पीतांबर कंठीं वनमाळा । शोभत सांवळा गोपसभे ॥२॥

कोण पुण्य सखे आचरली वेणू । अधरामृतपानू नित्य करी ॥३॥

ज्ञानेश्वर कन्ये सुता उपवर । हरिपायावर वाही वेगीं ॥४॥

(८४५)

सदा दामोदर अधर सुधापान । धन्य या जीवन मुरलीचे ॥१॥

पाहूनि मुरलीवरी हरिप्रेमा । अत्यानंद मना वृक्षांचिया ॥२॥

सखे माझे चित्तीं वाटतो मत्सर । झुरतें अंतर प्रेमासाठीं ॥३॥

ज्ञानेश्वरकन्या मुरलीची सेवा । केल्याविण दैवा पात्र नोहे ।।४।।

(८४६)

धन्य हे गोकुळ धन्य वृंदावन । जेथें नारायण नित्य खेळे ।।१।।

प्रत्यक्ष वैकुंठ भुवीं वृंदावन । स्वर्गाचा तो कोण पाड येथें ।।२।।

इंद्र चंद्र ब्रह्मा नेणती जे सुख । गुल्मलता देख भोगिती ते ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या कान्तपदांकित । मिळो धुळी आंत देह तया ।।४।।

(८४७)

धन्य हे जीवित बाई या मृगीचे । दृष्टिपुढें नाचे श्यामरूप ।।१।।

दुर्लभ म्हणती मानवाचा जन्म । परी प्रेतसम हरिविणें ।।२।।

मूढयोनी परी थोर ते भाग्याचे । सांवळे सुखाचे विलोकिती ।।३।।

पतिसह नित्य नंदाचा नंदन । पहाती दृष्टीनं स्नेहबद्ध ।।४।।

आमुचे ते पती निष्ठुर अंतरी । न सहाती हरी दृष्टिपुढें ।।५।।

**ज्ञानेश्वरकन्ये येवो तोचि जन्म ।**

**तेथें कां सुगम पाय तुझें ।।६।।**

(८४८)

लांचावलें मन पहावया रूप । व्यथित कंदर्पशरघाये ।।१।।

आम्ही वचनासी भाळलो हरीसी । नाहीं नवलासी काज कांहीं ।।२।।

परी देवस्त्रिया विमानीं बैसोनी । मुरलीचा ध्वनी आयकती ।।३।।

हरिसीं देखतां जाती भुलोनियां । कामानळें काया दग्ध होय ।।४।।

तोवरीच सर्व पातिव्रत्य गोष्टी । जंव नोहे भेटी कृष्णपाया ।।५।।

ज्ञानेशजा सुता भाळली गोपाळा । जीव उतावळा भेटीसाठीं ।।६।।

(८४९)

आयिकतां कृष्णमुखवेणूगीत । गाई विसरत क्षुधा तृषा ।।१।।

वत्स विसरती धेनूस्तनपान । मोहियलें मन वेणूरवें ।।२।।

लागलीसे दृष्टि कृष्ण मुखाकडे । पिताती रूपडें नेत्रद्वारें ।।३।।

ज्ञानेशजाकान्त लावण्याची खाणी । कधीं मी साजणी पाहीन डोळा ।।४।।

(८५०)

आयकतां कानीं कल वेणूगीत । जाहले तटस्थ पक्षीगण ।।१।।

नेणती फलाशे पातलो या वृक्षी । होऊनिया साक्षी मुनिसम ।।२।।

धन्य बाई यांचे वाटतें जीवित । वृत्ति समर्पित कृष्णपायीं ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये निजकांतगीत । पडो श्रुतिपथ आमुचिया ।।४।।

(८५१)

आम्हा चेतनाची कोण बाई कथा । जेथें कामव्यथा जडातेंही ।।१।।

वेणूरव कानीं पडतांचि क्षणीं । यमुनेचे पाणी स्थिर झाले ।।२।।

वाटे निज ऊर्मी बाहु आलिंगनी । प्रेमें चक्रपाणी भोगीतसे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये आमुचे दुर्दैव । विरह सावेव भोगीतसो ।।४।।

(८५२)

निजपतीलागीं द्याया आलिंगन । जात आनंदानं सूर्यकन्या ।।१।।

ऐकतांचि बाई मुकुंदाचे गीत । विसरली हेत मानसींचा ।।२।।

कामवेगें झाला जीव उतावेळ । हृदयीं गोपाळ गाढ भोगी ।।३।।

ज्ञानेशजाकृपा यमुने फळली । सखा वनमाळी भोगीतसे ।।४।।

(८५३)

सर्वांस हा बाई आवडतो कान्हां । मेघही त्या उन्हा लागो नेदी ।।१।।

नेणो निजकन्या सांडोनिया पति । भोगीत श्रीपति गूढभावें ।।२।।

म्हणोनियां तीव्र आतपें माधवा । भास्कर जेधवां पीडीतसे ।।३।।

ज्ञानेशजाकान्त सखा हा अंबुद । वर्षे मंद मंद हरीवरी ।।४।।

(८५४)

व्रजरमणींच्या कुंकुममंडित । स्तनावरी देत हरी पाय ।।१।।

गायी चारावया जातां वनांतरी । पडे तृणांकुरी हरिपद ।।२।।
पद रातोत्पल सौरभें मंडित । कुंकुम लागत तृणांकुरीं ।।३।।
तेचि पाहोनियां विव्हळ अंतरीं । कामशरें नारि पुलिंदाच्या ।।४।।
न सुचेचि कांहीं घेऊनियां करें । लिंपिती स्तनाग्रें कुंकुमानें ।।५।।
येणें रीती कैसी तरी स्मरव्यथा । सांडूनी कृतार्था होती त्याही ।।६।।
ज्ञानेशजे तेही नाहीं आम्हा सुख । पति सुतादिक रोधिताती ।।७।।

(वेणुगीत समाप्त)

**गोप्यः ऊचुः**

(८५५)
त्यागोनि सकळ गृहादि विषया । आम्ही तुझे पाया पातलोजी ।।१।।
शरण आलिया निष्ठुर दयाळा । होणें नंदबाळा योग्य नव्हे ।।२।।
सकळ जगाचा तूंच एक भर्ता । स्वामी रमाकान्ता दीनबंधू ।।३।।
मुमुक्षु जनासी गुरू ज्ञानदाता । आम्हा दीननाथा कांतमूर्ति ।।४।।
ज्ञानेश्वरकन्यासुता ही जाणोनी । करूणाजीवनीं जीववावे ।।५।।
(८५६)
स्त्रियांचा तो धर्म स्वपतीची सेवा । पायीं जीवभावा वाहोनियां ।।१।।
केला उपदेश आयिकला कानीं । वाहिला चरणीं तोचि तुझ्या ।।२।।
सकळ सुश्रुषापदा तूं आधार । साधन साचार धर्म तेथें ।।३।।
सकळांचा आत्मा परम प्रेमास्पद । पतिपुत्रवृंद शेषभूत ।।४।।
**ज्ञानेश्वरकन्या कान्त मिळालिया ।**
**धर्म ढोंग वायां आम्ही म्हणो ।।५।।**

(८५७)

देव जोडे तरी करावा अधर्म । स्वामी तुकाराम बोलियेले ।।१।।

समर्थ ज्या वाटे गेले देवराया । त्याची वाटे जाया, दोष काय ।।२।।

सर्वत्र तुझीच कथिली भावना ।

**पावलो चरणा प्रत्यक्षचि ।।३।।**

ज्ञानेशजाकांत माझा आशातरु । वाढवी साचारु प्रेमजळें ।।४।।

(८५८)

**आजवरी सुखें केला मी संसार ।**

**स्त्रिया वित्त फार आराधिले ।।१।।**

वळवितां मन विषयापासोनी । पुन: परतोनी विषयीं घे ।।२।।

ते हे निजलीले तुवां नारायणा । सुखें दयाघना हरियेले ।।३।।

विसरले हस्त सर्वगृहकृत्य । न चालती पंथ पाय माझे ।।४।।

सांडोनियां तुझ्या सुकुमार पाया । इच्छा यदुराया दुजी नाहीं ।।५।।

ज्ञानेश्वरकन्यासुता निजदासी । करा हृषिकेशी दीनबंधो ।।६।।

(८५९)

अधरामृताच्या घेऊनिया स्वादा । शांतवी गोविंदा मम तनू ।।१।।

सुहास्य सुनीळ वदन पाहतां । कामानळ चित्ता जाळीतसे ।।२।।

ऐकोनी मंजुळ मुरलीचा रव । चित्त घेत धांव आलिंगाया ।।३।।

प्रेम कटाक्षादि कामानळ ज्वाळा । वाढवी गोपाळा वेळोवेळा ।।४।।

याहीवरी स्वामी जरी न स्वीकारा । विरहाग्नीं सारा देह जाळूं ।।५।।

मनीं चिंतोनियां तुझे मृदु पाया । तुम्हा यदुराया प्राप्त होऊं ।।६।।

ज्ञानेश्वरकन्या कांता तुम्हासाठीं । दु:खाचिया कोटी सुखे सोसू ।।७।।

(८६०) **पद**

ऐका ऐका कमलनयना । अरण्यवासी आम्ही दीनजना ।

**निजकृपे दावोनि चरणा ।**

**आता काय त्यागिसी नारायणा ॥१॥**

तुझ्या पायाची चाखावया गोडी । स्वयें रमाही जाहलीसे वेडी ।

परि तिसीहि नोहे त्याची जोडी । तो तूं आम्हासवें करिसी खोडी ॥२॥

वेदें सांडियेला जाणिवाभिमान । शंभुचेहि न पुरे तप जाण ।

देखावया तुमचें चरण । आम्हां तेचि लाधलें अयत्न ॥३॥

वरी आम्हां लावला अंगसंग । नावडेचि तैहूनि अन्य संग ।

दृष्टि तेहि न पाहवति भोग । तुच्छ वाटतो जेवि देहा रोग ॥४॥

रमेहुनी दिसतो आम्हाठायीं । तुझा प्रेम यशोदांकशायी ।

म्हणोनियां भेटला ऐशा सोयी । ज्ञानेशजा कृपाहस्त डोई ॥५॥

(८६१)

संपन्नपणें जी तुळिता ये ऐसी । लक्षुमी सरसी दुजी कोण ॥१॥

श्रिये सारखिया जिचे घरी दासी । ब्रह्मादि तापसी जिच्या साठीं ॥२॥

एकवेळ तरी पाहो आम्हांकडे । वांछिती रोकडे देवादिक ॥३॥

जियेते श्रीहरी वाहे वक्षस्थळीं । वंदी रजधुळी तुलसीसह ॥४॥

ज्ञानेशजाकान्ता तेचि पदरज । दीनभावे आज याचितसो ॥५॥

(८६२)

गृहादिक आशा सांडुनि सकळ । तंव पादमूळ सेवा इच्छू ॥१॥

सुंदर सुहास्य कटाक्षनिक्षेपे । मानसीं उद्दीपे कामानळ ॥२॥

तीव्र कामानळें पोळलें अंतर । निववी अधर सुधादानें ॥३॥

ज्ञानेशजाकान्ता सर्व दुःखहंता । विरहाची व्यथा आम्हासी कां ॥४॥

(८६३)

निजपतिसंगे करा निजशांति । बोलणें श्रीपति अनुचित ॥१॥

त्र्वांगसुंदर पूर्ण रतिसुख । कोण स्त्री कामुक सांडी तुम्हा ।।२।।
रतिसुखासम दुजे आम्हां प्रिय । साक्ष तुझे पाय सत्य वदो ।।३।।
रतिस्थायि भावा जरी तुज सम । मिळे आलंबन कृष्णनाथा ।।४।।
तरी रसपुष्टि होत नित्य नवी । ज्ञानेशजा चवी भोगी ज्याची ।।५।।

(८६४)

कामनेच्या बळें कुरूप सुरूप । न देखेंचि पाप किंवा पुण्य ।।१।।
भास्य आलंबनीं मिळे जे कां सुख । प्रताप सम्पर्क तयाचा हा ।।२।।
सौंदर्याची मूस तुम्ही आलंबन । तरी सुख कोण वर्णवेल ।।३।।
ज्ञानेशजा स्वयें करुनि गोपाळा । घाला नंदबाळा माळा म्हणे ।।४।।

(८६५)

कुटिल कुंतल सुहास्यवदन । साजिरे सगुण श्यामरूप ।।१।।
गंडस्थलभागीं कुंडलें रत्नाची । शोभा अधराची न वर्णवे ।।२।।
शरणागतासी अभयें जीववी । त्याचि करें देई आलिंगन ।।३।।
ज्ञानेशजाकान्ता तुम्ही आलंबन । विभावोद्दीपन सौंदर्य हें ।।४।।

(८६६)

ऐसे तुझे स्वामी पाहोनि सौंदर्य । उद्दीपित होय रतिस्थायी ।।१।।
विषयीं निर्वेद प्रारब्धें दीनता । विरहें जडता इंद्रियातें ।।२।।
तुमचें सौंदर्य पाहोनि गोपाळा । जीव उतावळा आलिंगाया ।।३।।
ज्ञानेशजा स्वामी निर्वेदादि चारी । भाव व्यभिचारी साह्य झाले ।।४।।

(८६७)

येणें रीती रतिस्थायी पुष्ट होता । अवश्य रसता प्राप्त होय ।।१।।
येथें रतिस्थायी आम्ही गोपीबाळा । यशोदावेल्हाळा रस तुम्ही ।।२।।
जेवि स्थायीभावा रसाचीच ओढ । तेविं आम्ही दृढ पायीं तुझ्या ।।३।।
ज्ञानेशजाकान्ता आमुचा तूं प्राण । झालोत म्हणोन तुझ्या दासी ।।४।।

(८६८)

पतिव्रतेलागीं पतिच दैवत । निंद्य औपपत्य तुमचें हें ।।१।।
ऐसें न म्हणावे, पतिचिया संगें । पातिव्रत्य भंगे आम्ही म्हणों ।।२।।
वेणुरव कानीं पडतांचि क्षणीं । कामानळ उर्मी अनावर ।।३।।
ज्ञानोजाकान्ता तुम्हासी संगत । विप्रलंभे नित्य असो आम्हां ।।४।।

(८६९) **धर्माधर्म आणि प्रेम**

**धर्माधर्म सर्व देहाचिये माथां ।**
**आम्ही विरहिता तयाहूनि ।।१।।**
**तुझ्या कथेठायीं जंव नाहीं प्रेम ।**
**तंवचि स्वधर्म आचरावा ।।२।।**
**प्रेम उपजल्या तोचि वाढवावा ।**
**सर्व निवारावा प्रतिबंध ।।३।।**
**ज्ञानेश्वरकन्याकान्ता पतिसंग ।**
**अधर्म प्रसंग तोचि आम्हां ।।४।।**

(८७०)

**तुझ्या पायासाठीं धर्माचा पसारा ।**
**भव येरझारा चुकवाया ।।१।।**
फळ प्राप्तिवरी साधनांचा भर । कोण निरंतर साधनेच्छी ।।२।।
पातिव्रत्यधर्म फळला आम्हासीं । तिन्ही अवस्थेसी तुम्हां देखी ।।३।।
ज्ञानेशनंदिनी हृदयरमणा । आम्हा दासी म्हणा निर्भयत्वें ।।४।।

(८७१)

तत्त्वमस्यादि वाक्य श्रवण करोनी । जाणिला जयांनीं संदर्शचि ।।१।।
विषयीं निर्वेद बाणला जयासी । तोही न धर्मासी अधिकारी ।।२।।
तया तंव राहे अभानावरण । म्हणोनि व्युत्थान होत तया ।।३।।
व्युत्थानीं धर्माचा न सोडावा संग । विषयांचा दांग वाजे तेणें ।।४।।
आम्ही तंव नित्य देखो डोळ्यापुढे । सगुण रुपडे प्रेममय ।।५।।

ज्ञानेशजाकान्ता नाहींच व्युत्थान । तरि कैसा धर्म सांभाळावा ।।६।।

(८७२)

आम्हां ऐसें वाटे इये अवतारीं । शिकवितां नारी औपपत्य ।।१।।

माझिये प्राप्तीचे साधन जो धर्म । त्यासीचि परम मानिताती ।।२।।

ऐसे पाहोनियां धरिला हा वेश । पातिव्रत्य नाश करावया ।।३।।

ज्ञानेशजाकान्ता औपपत्य धर्म । तुजसी संगम केल्या होय ।।४।।

(८७३)

कोण तिहीं लोकी ऐसी पतिव्रता । तुम्हासीं पाहतां अविकारी ।।१।।

कोण नारी वेणू रव ऐकोनियां । आलिंगन द्याया धांव नेघे ।।२।।

त्रैलोक्य सुंदर तुमचें स्वरूप । पहातां कंदर्प दर्प गळे ।।३।।

गायी विप्र तरू मृगादिक प्राणी । तुम्हांसी पाहोनि पुलकांकित ।।४।।

ज्ञानेशजाकान्ता आम्ही वनवासी । आमुची कायसी गोठी तेथे ।।५।।

(८७४)

सुरलोककार्या माझा अवतार । जनां सदाचार दावावया ।।१।।

मीचि शास्त्रलागीं सोडोनी वर्तता । कोण वेदपथा स्वीकारील ।।२।।

कैसा भवसिंधु तरतील जीव । सदाचार नाव फुटलिया ।।३।।

ज्ञानेशजाकान्त म्हणे लोकस्थिति । कैसी निजहातीं उच्छेदूं मी ।।४।।

(८७५)

आम्हा दीनालागीं तर्काच्या आभासें । काय हृषिकेशें झकवावे ।।१।।

तुझियाचि कृपा दाऊ हेत्वाभास । क्षमा कीजो दास जाणोनियां ।।२।।

ब्रह्माचिया ठायीं नाहींच संसार । तेथें सुरासुर मात कैंची ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये आम्हा निवेदिले । ब्रह्म हें संचलें भेदातीत ।।४।।

(८७६)

मायावृत्त्याश्रयें सृष्टिस्थितिलय । संकल्पेंचि कार्य करीतसा ॥१॥
सर्वज्ञ म्हणोनी सर्व वर्तमान । सर्वशक्ति जाण तैसे तुम्ही ॥२॥
कंसजन्ममृत्यु एकें कालीं ज्ञात । तरी घेंणें व्यर्थ अवतारु ॥३॥
ज्ञानेशजाकान्ता सर्वशक्ती म्हणू । नसे काज पूर्ण अवतारा ॥४॥

(८७७)

संकल्पेचि पूर्वी मारील असूर । तेव्हांचि निर्जर सुखी झाले ॥१॥
आतां अवतार घ्याया कोण काज । काय कंसराज सत्य तुम्हां ॥२॥
काय कंसवध करावा म्हणून । संकल्प नूतन करणें आहे ॥३॥
ज्ञानेशजाकान्ता लटिकें बोलणें । सुरकार्या न येणें तुम्हालागीं ॥४॥

(८७८)

मेलियासी मारावया अवतार । सांगती विचार शास्त्रवेत्ते ॥१॥
पाहोनियां आम्ही हांसो त्या विचारा । मानेना अंतरा संताचिया ॥२॥
सत्वोत्कर्षकाली सात्विका उदय । राजसा तो होय रजोत्कर्षी ॥३॥
ज्ञानेशजाकांता गुणव्यतिकर । पालन संहार करीतसे ॥४॥

(८७९)

म्हणोनियां तुम्ही सुरकार्यालागीं । होतां तनुसंगी मानवेना ॥१॥
असदाचरणें दृढ देहबुद्धि । निवृत्त उपाधि नोहे जीव ॥२॥
नाहीं जंव झाला उपाधिवेगळा । तो मज गोपाळा प्राप्त नाहीं ॥३॥
**ज्ञानेशजाकान्त म्हणे सदाचार ।**
**मलीन अंतर शुद्ध करी ॥४॥**

(८८०)

अनुकरणशील जीवाचा स्वभाव । जाणुनी सावेव वर्तावे कीं ॥१॥

भल्यांचा आचार पाहती घ्यावया । वागा म्हणोनियां सदाचारें ।।२।।

परी देवराया वैषयिका साधु । मनामाजी भोंदू वाटतसे ।।३।।

ज्ञानेशजाकान्ता साधूचि साधूसी । विषयी मूर्खासी भला वाटे ।।४।।

(८८१)

साधु अनुकरी साधु आचरण । असदाचरण घेत मूर्ख ।।१।।

कैसा सदाचार शिकविता जना । न कळे हें मना आचरोनी ।।२।।

जो कां वेदशब्दें केला उपदेश । पुरे सज्जनास तितुकाचि ।।३।

तुझी कृपा होत उपजे विरक्ति । अवतार स्थिति न लगे तेथें ।।४।।

ज्ञानेशजाकान्ता उपदेश वायां । मूढ वळवाया दंडाविण ।।५।।

(८८२)

आघवे ते पक्ष तुम्हां तनु घ्याया । कारण सखया न होती कीं ।।१।।

आम्हां दिसे घार फिरत आकाशीं । परी पिल्यापाशीं लक्ष तिचे ।।२।।

मूढा वाटे तुम्ही देवाचिया काजा । घेऊनिया भुजा धांवतसा ।।३।।

परी भक्तलळा पुरवायासाठीं । स्नेहाचिया दिठी धांवतोसी ।।४।।

माझ्या भक्तावरी झणी काळदृष्टि । म्हणोनियां पोटीं कळवळा ।।५।।

**तुझा एक प्रेम भक्ताचें भूषण ।**

**नेईल चोरोन कामशत्रु ।।६।।**

ज्ञानेशजाकान्ता म्हणोनियां येणें । आमुच्या कारणें झालें तुम्हां ।।७।।

(८८३)

किंवा सुरकार्य साधावयासाठीं । घेणें जगजेठी अवतारु ।।१।।

तरी तो असेल याहूनि निराळा । यशोदा वेल्हाळा दुजा कोणी ।।२।।

आयिकले कानीं अनंत अवतार । क्षीराब्धिजावर घेऊनी ये ।।३।।

ज्ञानेशजामाता सृष्टीचें पालन । विष्णु शरीरान करीतसा ।।४।।

(८८४)

विष्णुचि हा घेऊनीं शरीर । ऐसाहि निर्धार करवेना ।।१।।

जरी विष्णु येतां सुरकार्यालागीं । दिसते ना आंगीं पुर्णैश्वर्य ।।२।।

कार्याचि पुरता शक्ति आर्विभावो दिसता सावेवी आम्हालागीं ।।३।।

ज्ञानेशजाकान्ता कासया विंदन । जे कां आलंबन सर्व रसा ।।४।।

(८८५)

आणखी विशेष पोषक । अवतार देख तुमचा हा ।।१।।

म्हणोनियां म्हणो निजपददासी । कराया आम्हासी झाले येणें ।।२।।

तरी मग आतां पाहता कां अंत । काया ही संतप्त कामानळें ।।३।।

कुचकमंडलु धरुनियां हातीं । निववा श्रीपती आलिंगने ।।४।।

ज्ञानेशजाकान्ता तुम्ही आर्तबंधु । दुःखाचा संबंधु आम्हासी कां ।।५।।

**(भागवत अ २९**

**समालोचना**

**समाप्त)**

○○○○○○○○○○○○○○○○

○○○○○○○

oooooooooooooooooo

(८८६)

*पूर्णब्रह्म परमात्मा शेषशाई । बाप माझा क्षीरसिंधु जांवाई ।*

*प्रेमे गोकुळी हा राखितसे गायी । नानापरी क्रीडत मानुषदेहीं ।।१।।*

*ज्यासी नामरूपादिक नाहीं । निर्विकारी व्यापक सर्वाठायीं ।*

*नंदशोदे म्हणत बाप आई । कटीं खांदी वाहत सर्वदांही ।।२।।*

*जो कां नाना साधने नये आया । यशोदा त्या पाहे बांधावया ।*

*जग कटाक्षपाते नेत लया । तोचि रंजवी नाचोनि गवळिया ।।३।।*

*व्यास वाल्मिक आदि कविवर । ज्याच्या गुणकीर्तनीं सादर ।*

*तोचि मातेचा ओढितो पदर । थोरपणा ठेवोनियां दूर ।।४।।*

*तोचि माझा पांडुरंगनाथ । ब्रह्मानंदें लीला दाखवीत ।*

*आपण रंजोनि भक्तां रंजवीत । आळंदिये एकत्वे तिष्ठत ।।५।।*

(८८७) पद

*धावत ये कृष्णा । तान्हुल्या ।।धृ०।।*

*ऐकुनि गाऱ्हाणें गौळणीचे । पाठविले तुज वना ।।१।।*

*काय काय गुण आठवु सखया । बारे मनमोहना ।।२।।*

*न राहावेचि तुजविण आतां । सोडिन मी प्राणा ।।३।।*

*काळ जाहली यमुना आजचि । हरिले गा प्राणा ।।४।।*

*ज्ञानेश्वरजा कान्त कोणीतरी । दावा गे नयना ।।५।।*

(८८८)

*आज माझें भाग्य उदेलें साजणी । देखिलें लोचणीं परब्रह्म ।।१।।*

*हारपली आतां मानसिक व्यथा । दृष्टि भगवंता पाहूनियां ।।२।।*

***अनंत जन्मांचें विसरलें दुःख ।***

***नाहीं भय शोक आतां कांही ।।३।।***

*ज्ञानेशजाकान्ता आतां नको तुटी । हृदयीं संपुटीं राहे सदा ।।४।।*

(८८९)

कोण हा सुदीन सांगूं मी जननी । आला चक्रपाणी पोटीं तुझ्या ॥१॥

इतरासारिखा नोहे तुझा सुत । ब्रह्मांडें वसत याच्या पोटीं ॥२॥

ब्रह्मादिक देव करिती नमन । अधिकार पूर्ण ऐसा याचा ॥३॥

तुझ्या प्रेमास्तव साकार जाहला । अलंकार त्याला बालपण ॥४॥

तुझ्या कृपें आम्हा ज्ञानेशजाकान्त । भेटलासे तात विश्वाचा हा ॥५॥

(८९०)

जनि स्थिति लय याचियापासुनी । होताती जननी विश्वाचे या ॥१॥

याचिये मायेनें मोहित जे झाले । तिहींच कल्पिलें नानात्व या ॥२॥

विवेकानें जे कां ययाते जाणती । पुन: न पडती भवीं कधीं ॥३॥

ज्ञानेश्वरकन्याकान्त जैसी मति । तैसा तयाप्रति भासतसे ॥४॥

(८९१)

सुष्टांच्या पालना दुष्टांच्या संहारा । प्रगट दातारा होणे लागे ॥१॥

मत्स्य कच्छपादि नाना अवतार । धरिले साचार तुझ्या सुते ॥२॥

पालन संहार हे तो मायाकृत । परी भक्त हेत पुरवाया ॥३॥

ज्ञानेश्वरकन्याकान्त लीलाधारी । साकार गोजिरी मूर्ति दावी ॥४॥

(८९२)

प्रसवली पुत्र यशोदा सुंदर । आनंदाचा पूर नंद मनी ॥१॥

करोनिया स्नान बोलावी ब्राह्मणा । कराया नंदना जातकर्म ॥२॥

विधिवत्सारोनि पुण्याहवाचन । दिले गोप्रदान द्विजालागीं ॥३॥

ज्ञानेशजाकान्त असो माझा सुखी । म्हणे द्विजा द्या की आशीर्वाद ॥४॥

(८९३)

सर्व सुखी केले भट बंदीजन । आनंदले जन व्रजवासी ॥१॥

गुढिया तोरणे जन उभारिती । प्रेमे गुण गाती श्रीहरीचे ॥२॥

व्रजनारी मनीं सुखाचा सोहळा । कंठी स्वर्णमाळा घालिताती ॥३॥

ज्ञानेशजासुत म्हणे व्रजनारी । उताविळ हरी पाहावया ।।४।।

(८९४)

गाईवत्सालागी हरिद्रातेलाचे । न्हाणुनी आभरणे लेववितो ।।१।।

व्रजवासियांचे निघती तैं मेळे । सगुण सांवळे पाहावया ।।२।।

जाऊनियां नंदआंगणी बाळक । पाहताती देख प्रेमभरे ।।३।।

आमुचे आयुष्य होवो सुकुमारा । प्रार्थिती सुंदरा विधातिया ।।४।।

ज्ञानेशजासुत म्हणे हा निगम । अकळचि प्रेमा गोपिकांचा ।।५।।

(८९५)

नंदाचे नंदाचे भाग्य मोठे । पोटी आला रमारंग ग ।

सुंदर सुंदर श्यामतनु । प्राणाच्या माझ्या प्राणू ग ।।

(८९६)

नमो गिरिकन्या शिवकृपाघन । सद्भावे वंदन गोपीकांता ।।१।।

नमो त्या गोपिका श्रुती अवतार । प्रेमेचि साकार जाहल्या ज्या ।।२।।

आळंदी वल्लभ संप्रदाय मणी । तया लोटांगणी शतवार ।।३।।

सर्वही सोडोनि अभेदे वंदाया । धरियेली काया सुकुमार ।।४।।

तयां ज्ञानेश्वरकन्या गुरूपायी । ठेवियेली डोई अखंडचि ।।५।।

(८९७)

धन्य गोवर्धन धन्य त्याचा जन्म । श्रीहरी चरण दृष्टी पडे ।।१।।

जळो नरजन्म हरी भेटीविण । वियोग दारूण साहतसो ।।२।।

नित्य हरिलागीं पूजी प्रेमभावें । अर्पोनी स्वभावें कंदमुळे ।।३।।

गायी गोपाळांची तया घडे सेवा । जे कां वासुदेवा आवडते ।।४।।

ज्ञानेश्वरकन्ये सखये साजणी । माझ्या जीवीं कोणी नाही सुख ।।५।।

(८९८)

गार्‍हाणे सांगावया । आल्या गोकुळीच्या स्त्रिया ।।१।।

मौनें यशोदा ऐकत । पळे तेथोनि भगवंत ।।२।।

एक म्हणे माझे लोणी । भक्षितसे चक्रपाणी ।।३।।
रिते फोडितसे भांडे । वर्जिलिया म्हणे रांडे ।।४।।
ज्ञानेशजा सुत म्हणे । हरि पहावया येणें ।।५।।
(८९९)
शुद्धभूमी सारवोनी । वरी मुते चक्रपाणी ।।१।।
घेवोनिया येतो अग । म्हणे घरासी लावीन ।।२।।
देईन म्हणतां तोंडावर । म्हणे बापाचे का घर ।।३।।
माता ऐकोनी गाऱ्हाणे । चुंबी वदन प्रेमाने ।।४।।
(९००)
एके दिनीं कृष्णे घेतलीसे आळी । नयन बाहुली देई म्हणे ।।१।।
किंवा आणोनियां देई मज चांदू । बोलत मुकुंद मातेलागीं ।।२।।
माता म्हणे कृष्णा नये ते काढिता । आन लक्ष्मीकांता माग काही ।।३।।
ज्ञानेशजासुत म्हणे धन्य प्रेम । नेदी वृत्तीपण भासे कधी ।।४।।
(९०१)
नको आन काही म्हणोनियां अंग । टाकी स्मारंग धरणीसी ।।१।।
नानापरी तया पोटाशी धरोनी । समजावी जननी यशोदा ती ।।२।।
न राहेचि उगा कांही केल्या हरी । जाण तंव द्वारी राधा उभी ।।३।।
ज्ञानेशजासूत म्हणे राधेसाठी । करी जगजेठी शोक वाटे ।।४।।
(९०२)
देखोनिया राधे उगा राहे हरी । यशोदा सुंदरी बोले तेव्हां ।।१।।
म्हणे फार रडी घेतो हा मुकुंद । न राहेचि स्तब्ध क्षणभरी ।।२।।
उगा राहिलासे तुजसी पाहोनी । सदना घेवोनी जाई यासी ।।३।।
ज्ञानेशजासुत म्हणे आनुपूर्वी । वचन तत्कार्यी मावळले ।।४।।
(९०३)
न वर्णवे वाचा **भक्तिभाग्यप्रेमा ।**

एका पुरूषोत्तमा ठावे असे ।।१।।

सोडुनी कैलास स्मशानी धूर्जटी । एका प्रेमासाठी वास करी ।।२।।

वीतराग ऐसे शुकादिक मुनी । हरिगुण गानी सुखावले ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या प्रेमाची भुकेली । जाहली सानुली प्रेमालागी ।।४।।

(९०४)

प्रेमाचा स्वभाव प्रेमी प्रत्यवाय । चित्तावेश होय वाढविता ।।१।।

तैसे संयोगात न राहेचि चित्त । तृप्ति भासवित अनुगुणें ।।२।।

हेचि भक्तिमाजी रसास्वाद विघ्न । वारि नारायण वियोगाने ।।३।।

क्रीडोनिया नानापरी रमारंग । संयोगी वियोग वाढविता ।।४।।

ज्ञानेश्वरकन्या सांगे निजसुता । मोक्षाची ती वार्ता तेथे कैची ।।५।।

(९०५)

गोमुत्रें घालोनी हरिलागीं स्नान । फिरवी वरुन गोपुच्छातें ।।१।।

गोरज गोमय घेऊनी गोपिका । करिता बालका रक्षाबंध ।।२।।

हरिचिया नामें हरिलागी रक्षा । प्रेमाची परीक्षा प्रेम जाणे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये माझा भाग्यसिंधु । केव्हा आर्तबंधु उल्हसेल ।।४।।

(९०६)

धावत येऊनी सांगे बळीराम । माते पुरुषोत्तम माती खाये ।।१।।

येरी होऊनियां सक्रोध यशोदा । धरत गोविंदा निजहस्तें ।।२।।

मातेचिये भेणें शरीर कांपत । सम्लान पाहत मातेकडे ।।३।।

दटावुनि पुसे श्रीकृष्णालागुनी । कारे चक्रपाणी माती खासी ।।४।।

सांगताती तुझे गडी आणि भाऊ । दावि मुख पाहू खरे खोटें ।।५।।

मुख पाहूं जातां लागली समाधी । विरे देहबुद्धि कृष्णरूपी ।।६।।

ज्ञानेशजासुत पित्याचें वदनीं । अविलोकी जननी कोटी कृष्ण ।।७।।

(९०७)

एकदां यशोदा करीत मंथन । गात प्रेमे गुण स्वपुत्राचे ।।१।।

पाहोनिया हरि धांवे मातेकडे । म्हणे मज कडे घेई माते ।।२।।
लागलीसे भूक उत्संगा घेऊन । देई मज स्तन झडकरीं ।।३।।
ज्ञानेशजासुत बाप आप्तकाम । मागे स्तनपान यशोदेसी ।।४।।
(९०८)
सोडोनी मंथन घेतले हरीसी । न्याहाळी मुखासी प्रेमभरें ।।१।।
हृदीं पुत्रप्रेमा दाटलासे भारी । चुंबीत सुंदरी हरिमुख ।।२।।
येरू म्हणे कृष्णा थोडें दूध पीई । घुसळीते दही तुजसाठीं ।।३।।
ज्ञानेशजासुत बाप तैं भूमिसी । ठेवोनी कार्यासी गेली माता ।।४।।
(९०९)
येरी कडे गृहीं होते अग्निवरी । दुग्धपात्र हरी गेला तेथें ।।१।।
जाऊनियां स्वयें खादलीसे साय । भाजन मृण्मय उलंडिले ।।२।।
नाद ऐकोनियां धांवली यशोदा । म्हणे रे मुकुंदा कोठे आहे ।।३।।
ज्ञानेशजासुत बाप मायभेणे । अट्टाहासपणें रडो लागे ।।४।।
(९१०)
जाऊनियां पाहे यशोदासुंदरी । रडे पूतनारी स्फुंदोनियां ।।१।।
सर्वही माखले गोरसें शरीर । घेत कडेवर हरिलागी ।।२।।
म्हणे रे हे कोणी लोटिले भाजन । वदे नारायण मातेलागी ।।३।।
मिनी येवोनियां दिले हे लोटोनी । भाजले निर्वाणी अंग माझे ।।४।।
ज्ञानेशजासुत बापवाक्य कानीं । ऐकतां जननी कासाविस ।।५।।
(९११)
म्हणे आग लागो यया संसारासी । घडिहि जीवासी सुख नाहीं ।।१।।
सदा दिवानिशी चाले कामधंदा । पळहि गोविंदा घेणे नोहे ।।२।।
दुखावला माझा प्राणाचाहि प्राण । सदा येती विघ्न कोणी तरी ।।३।।
ज्ञानेशजासुत बाप नंदराणी । पोटासी धरोनी समजावी ।।४।।
(९१२)

माझ्याचि जीवाचा मजसी कंटाळा । दुजियाचा लळा कोठें पाहूं ।।१।।
सर्वही वांछिती संसारी पूर्णता । कैसे मनोगता पुरवावे ।।२।।
म्हणोनियां मियां सांडिला विचार । एक शाङर्गधर जीवीं आतां ।।३।।
ज्ञानेशजासुत अंतरी श्रीहरी । न करीच दूरी क्षणहि त्या ।।४।।
(९१३)
उभ्या राहागे चालल्याती कोठें । घरदार विसरोनियां नेटे ।
नेणो जातो वाटे की आडवाटे । कार्य सर्वहि प्यालाति भांगघोटे ।।१।।
बाई कृष्णवेणूरव कानीं । आयिकीला आम्ही स्वसदनीं ।
विसरलो सर्वहि त्याचक्षणीं । आलिंगाया चालिलो चक्रपाणी ।।२।।
आम्हा मागे संसाराचे कांहीं । होवो आतां आम्ही भीत नाही ।
मनीं एक बैसला शेषशाई । सांडिताहि दुरी जात नाहीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यासंमतीतें । मेळेवोनी मीही संगें येते ।
बहुत दिसांपासोनी मनीं होते । रतिदानें तोषवूं कृष्णजीतें ।।४।।
(९१४) पद
काहो आज दुश्चिंत साजणी । काय नाहीं आलेत चक्रपाणी ।
निरोपासी धाडुनी सदनीं । म्हणोनियां विव्हळ होसी मनी ।।१।।
काय सांगू बाई दैवफेरां । गुरुकृपे श्रीहरी आले घरा ।
अभिमानें झकविलें अंतरा । वाटे । हरी न सोडीच माझ्या दारा ।।२।।
ज्याच्या कृपें हरिनें स्वीकारिले । मायबापा त्याचि दुःखविले ।
पदोपदीं वचन अव्हेरिले । सासरमाहेर दोन्ही अंतरले ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या गुरू आई । कृपा हस्त कैं ठेवितील डोई ।
अर्पोनियां श्रीहरीचे पायीं । चिंता रोग लागला हृदयीं ।।४।।
(९१५) हिंदी पद
सखि विरहानल कैसी सहोरी ।।धृ।।
मुरलीरव ते जानहु सजणी । यमुनातीर हरि रास रचोरी ।।१।।

गोकुल म्याने सबहिग्वालन छांडी । पतिसुत आणि गयोरी ।।२।।
मैहि अकेली विरहणी नारी । कीन्ह कर्मफल नाही ठरेरी ।।३।।
ज्ञानेश्वरनंदिनी पग मोरी । इतनी बिनती जाइ कहोरी ।।४।।
(९१६) पद
सांडोनियां सर्वहि कामधंदा । निशदिनी लागले हरिछंदा ।
परी कीव नयेचि गोविंदा । कैसा निवटेल षडरिचा धांदा ।।१।।
आतां कोणी सांगाबाई वाट । जेणे सुटेल विषय कचाट ।
हरिपाय दिसोनिया स्पष्ट । हृदयी राहतील बाई बळकट ।।२।।
ध्यान करूं तो नाही चित्त स्थिर । अहंकार हा पति दावेदार ।
क्षणक्षण ओढितो पदर । मेला उगा करितो हरिसी वैर ।।३।।
माझे समाधान करावयासाठी । ब्रह्मज्ञानाच्या सांगतसे गोष्टी ।
म्हणे मज पाहसी भिन्न दृष्टि । व्यर्थ काय हरि हरि करीसी ओठीं ।।
ज्ञानेश्वरकन्ये मायबाई । बळी दे हा पति तुझे पायी ।
तेणे तृप्त होवोनि लवलाही । हरिपति मिळो हा वर देई ।।५।।
(९१७)
कुलवंता मन टाकोनियां धरीं । कां हो परद्वारीं हिंडतसा ।।१।।
जरि त्या अवती थोर पतिव्रता । व्यभिचार चित्ता माझियाचि ।।२।।
परी तुजलागीं समर्पिली तनु । भोगिला न आनु तै पासोनी ।।३।।
तुझ्या अंगसंगे निवाल्या अंतर । होईल हा स्थिर जीव पायी ।।४।।
ज्ञानेशजासुता सरळ अंतरी । नका पुतनारी व्यर्थ टाकूं ।।५।।
(९१८)
तुम्हीं न या घरीं एकटी पाहोनी । नसतांहि मनीं भोगी मेला ।।१।।
मी तंव अबला नेणें कांहीं करूं । केसरीचा हरुं पाहे भाग ।।२।।
वाचे तंव मिया वरिले तुम्हासी । आतां हृषीकेशी सांभाळावे ।।३।।
तुम्ही येवोनियां काय मन दोन्ही । स्वाधीन करोनी घ्यावे देवा ।।४।।

अखंड वसावे हृदयमंदिरीं । शत्रुं येता घरीं ठार करा ।।५।।

ज्ञानेशजे माझा नाशिला संसार । मेला दावेदार अहंकारु ।।६।।

(९१९) पद

धन्य तुझें भाग्य नंदराणि उदयलें । पूर्ण ब्रह्म शेषशायी उदरि जन्मले ।।धृ।।

नामरूपरहित असूनि घेतली तनु । प्रेमभरें गाति जया ब्रह्मनंदनू ।।१।।

भक्तिप्रेम देऊनियां वारितो भवा । वंद्य सकल सुरवरासि प्रिय भवा ।

स्कंददास विनवि पायी श्यामसुंदरा । येऊनि प्रभू पावन करी हृदय मंदिरा ।।२।।

(९२०) पद

नका ही वरवर करुं, उद्धवा ।

सगुणस्वरूपीं जडलें मानस न शको आम्हि आवरुं ।।१।।

काय घेऊनी करुं, निर्गुणा ।

वृत्याश्रय श्रुति म्हणुनि सांगती केवि शके भव हरुं ।।२।।

भजती ज्या विधि हरु, उद्धवा ।

त्या सगुणाविण अगुण कोणते सांगति तुमचा गुरू ।।३।।

हाचि हेत मनीं धरुं, उद्धवा ।

या नाहितरी अन्य जन्मिं आम्हि पति हरिलाचि वरुं ।।४।।

स्कंददास भयहरु । उद्धवा ।

म्हणति गोपिका मरणसमयिं तरी आठवु हा द्या वरु ।।५।।

(९२१) हिंदी पद

नाहिन बिसर पडे उधो ।।धृ।।

मोर मुकुट शिर गले बनमाला । नित मन ध्यान धरे ।।१।।

हासललित मुखकमल सुमरनु । उर तब काम भरे ।।२।।

लीला ललित बिलासि रास रचि । पुनि सब चित्त हरे ।।३।।

स्कंददास प्रभु चरणकमल बिनु । ग्यान न सोच हरे ।।४।।

(९२२)

आनंदें खेळतां पाहत जननी । तटस्थ राहोनी बाळक्रीडा ।।१।।
ने घे उचलोनि स्वयें कडेवरो । जंव तो न करी रूदनातें ।।२।।
करितां रूदन कडे उचलोनी । देतसे वदनी स्तन प्रेमें ।।३।।
तैसा जंव जीव विषयीं आसक्त । व रमानाथ साक्षीरुप ।।४।।
होता तयासाठीं कासाविस जीव । सगुण सावेव पुढें ठाके ।।५।।
स्कंददास म्हणे मारा हांक देवा । अट्टहासें धांवा करोनियां ।।६।।
(९२३)
प्रभु अब मुरल से क्या काम ।।धृ०।।
रातदीन अधरामृ चाखे । पल हम दीजो दाम ।।१।।
तुमरे कारण नित जपतहुं । ज्ञानराजप्रभु नाम ।।२।।
ज्ञानेश्वरजा सुत करे बिनती । हिय आवो घनश्याम ।।३।।
(९२४)
शतजन्म केली तप कडसणी । परी नारायणी नोहे भेटी ।।१।।
ब्रह्मादिक देव घोटताती लाळ । तरी रजधूळ प्राप्त नोहे ।।२।।
तोचि हरी तुझिये उदरीं । भाग्याची तो थोरी कोण वानुं ।।३।।
ज्ञानेशजा माय प्रेमाची भुकेली । लागवेगे घाली उडी तेथें ।।४।।
(९२५)
कल्प जाता कोट्यानुकोटी । ब्रह्मादिका महाग भेटी ।।१।।
तो हा यशोदे उदरीं । बाळ झालास श्रीहरी ।।२।।
थोर नवलावो झाला । ब्रह्मीं अबोला फिटला ।।३।।
ज्ञानेश्वरजा कृपा फळ । प्रेमा भुलला गोपाळ ।।४।।
(९२६) पद
अवतरला भगवान माते ।।धृ०।।
ब्रह्मादिक सुर हृदयीं ज्याचे । संकटीं करिती ध्यान ।।१।।
मायाजलची माजीं भक्ता । यत्पद नौका जाण ।।२।।

ज्ञानेशरजा करूणें आम्हां । विश्वचि मेघ:श्याम ।।३।।

(९२७)

नमो विघ्नराज माउली शारदा । वारिती आपदा स्वभक्तांच्या ।।१।।

नाममात्रें विघ्नें पळती देशधडी । सांडुनियां फुडी भक्तवृंदे ।।२।।

श्रीकृष्णकथेचा वाटतो हव्यास । माझिया वाणीस प्रेरा तुम्ही ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये होउनी कृपाळ । वदवी प्रेमळ कृष्णलीला ।।४।।

(९२८)

नमो जी दयाळा संप्रदायेश्वरा । अलकावती वरा ज्ञाननाथा ।।१।।

वाणी मन तुम्हा कराया अर्पण । कृष्णलीला गान करो वाटे ।।२।।

बालकाचे चीज पुरवावे कोडें । पाजोनी रोकडे प्रेमदुग्ध ।।३।।

स्कंददासा तुम्ही घेतले पदरीं । आतां उणे परी सरते करा ।।४।।

(९२९)

श्रीआदिनाथ पायीं । वेळोवेहां ठेवि डोई ।।१।।

कुळी जन्म त्याचा देवा । अभिमान असे द्यावा ।।२।।

मज करोनियां साह्य । वदवावे वेदगुह्य ।।३।।

स्कंददास म्हणे करा । संतपायीची पैजारा ।।४।।

०००

१४ हंस दंपति आख्यान

(९३०)

हरिदासाचिया नांवें । भयें देशधडी जावें ।।१।।

सर्वांभूतीं झाले सम । कृष्णरुप भासे यम ।।२।।

म्हणोनियां त्याचे काळ । वंदी चरणकमल ।।३।।

काळ खाये इतरासी । स्वयें आपणा का ग्रासी ।।४।।

ज्ञानेश्वरकन्या दासा । काय करील यम फांसा ।।५।।

(९३१)

निभर्य अंतरी सदा विष्णुदास । आपपर भास गेला ज्यांचा ।।१।।
सदा नारायण उभा राहोनियां । चहूं भुजा तया रक्षितसे ।।२।।
विष्णुदासा नाहीं कुळयातिवर्ण । सर्वहि समान हरिरुप ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या भरतां हृदयीं । जगचि सर्वहि ब्रह्मरुप ।।४।।
(९३२)
जेथे नांदे त्रिपुरारी । उमा माता मांडीवर ।
सांडोनियां कैलासगिरि । भूमिवरी पातला ।।१।।
हरिभक्तांचा महिमा । बोलायाची झाली सीमा ।
जयासाठीं मेघःश्यामा । येणें रमा सोडोनी ।।२।।
माझ्या भक्ता प्रलयांतीं । नाश नसेचि निश्चिती ।
हेचि प्रतिज्ञा पूरती । करी मूर्ति मेळावा ।।३।।
माझी ज्ञानेशनंदिनी । महाकालेश होऊनी ।
नित्य राहिली येऊनी । अवंतीभुवनीं सादर ।।४।।
(९३३)
तया पुण्यक्षेत्रीं कोणी एक राय । पाळी प्रजा न्यायनी तिबळे ।।१।।
दुष्काळ अवर्षण गेले देशांतुनि । केला प्रजाजनीं धर्मसखा ।।२।।
कुबेरासमान जयाची संपत्ति । दानीं गाजे कीर्ति कर्णासम ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या कृपे तया राया । नव्हते कासयाचेहि उणे ।।४।।
(९३४)
पूर्वार्जित कर्म न चुके सर्वथा । सान थोरा संता कोणातेंहि ।।१।।
संतातें रक्षिता सदा नारायण । प्रारब्धविंदान म्हणुनी लीला ।।२।।
येरा सुखदुःख भोगिल्यावांचोनी । उपाय निर्वाणीं नाही नाहीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या असे ज्याचा वाली । तया दुःखें झालीं सुखरुप ।।४।।
(९३५)
पूर्वकर्मे राया उद्भवलें श्वित्र । तळमळे रात्रंदिन दुःखें ।।१।।

बरे न वाटती कोणी राज्यभोग । करुं पाहे त्याग जीविताचा ।।२।।
कंटाळला दु:खें चालला उठोनी । आला मंदाकिनीतटीं तेव्हां ।।३।।
विकारें त्यागितां जीव गंगाजळीं । न चुकेचि पाळी गर्भवौस ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या विकारावेगळी । प्रेमाच्या जिव्हाळी भेटी होय ।।५।।
(९३६)
आपुलाचि भोग जंव नाही क्षीण । नेदी तंव गुण औषधहि ।।१।।
सरलिया भोग साधनें धांवती । खादलिया माती गुण करी ।।२।।
पावला समय त्याचा भाग्योदय । जंव धांवे काय टाकावया ।।४।।
ज्ञानेशजा देता पापपुण्यफळ । विषमता मळ स्पर्शों नेदी ।।५।।
(९३७)
महद्भाग्यें तूं लाधलासी तनु । तेथें चिंतोनि सखा नारायणु ।
हित साधणें सांडुनि देसि प्राणु । यासी काय म्हणावे शहाणपणु ।।१।।
देह आहे तोंवरी कांहीं । गुणगानी रिझवी शेषशाई ।
चुकवी जन्ममरण दु:ादायी । देह गेल्यावरी न घडे कांहीं ।।२।।
हाचि सर्व पुरूषार्थों साधन । हरिसेवे वेचशील प्राण ।
तरी दु:खमुळचि नाशे जाण । हरिप्राप्तिवाचुन अवघा शीण ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या मंदाकिनी । दर्शनमात्रें विकारा झाली धुनी ।
भिषग्वरा साष्टांग प्रणमोनी । विनवि राव जोडोनी द्वय पाणी ।।४।।
(९३८)
म्हणे स्वामी रोगें त्रासोनियां भारी । आलों गंगातिरीं प्राण द्याया ।।१।।
सोसवेना व्यथा जनीं व्यंग दिसे । उपाय सौरसें केले बहु ।।२।।
परी तिळभरी नोहे रोग शांती । कंटाळोनी चित्तीं आलों येथे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या करील पावन । झाल्या गंगार्पण देह माझा ।।४।।
(९३९)
तेव्हां वैद्य बोले वाणी । नको करुं शोक मनीं ।।१।।

असे मजलागीं एक । ठावा उपाय सम्यक ।।२।।

परी तयालागीं व्हावा । हंस एक तरी नवा ।।३।।

म्हणे ऐकोनी वचन । ज्ञानेशजा कृपा पूर्ण ।।४।।

(९४०)

सवें घेवोनियां तया वैद्यालागीं । आला लागवेगीं नृप ग्रामीं ।।१।।

पाठवुनी दूत बोलावी व्याधासी । आज्ञापी तयासी राव तेव्हां ।।२।।

म्हणें व्याधा मज जीवंत धरोनी । देई गा आणोनी हंस एक ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या सन्ताराया ठायीं । बंदी आज्ञा तंही व्याध माथा ।।४।।

(९४१)

शोधिलीं व्याधानें वनें उपवनें । देखिला न त्यानें हंस ष्टीं ।।१।।

झाले दिन चारि न मिळे म्हणोनी । सांगे तो येवोनी रायालागीं ।।२।।

ऐकोनियां ऐसें व्याधाचें उत्तर । क्रोधे थरथर कापे नृप ।।३।।

गर्जोनियां बोले व्याधालागीं तेव्हां । जरी हंस तुवा नाणिलांसीं ।।४।।

आज पासोनियां चवथिये दिनीं । यमाचे सदनीं पाठवींन ।।५।।

आणिकहि कांहीं व्याध होते दुजे । तयाहि भुभुजें आज्ञापिलें ।।६।।

ज्ञानेश्वरकन्याकृपा जंव नाहीं । देहासक्ति पाही ढ तंव ।।७।।

(९४२)

प्राणभयें अवघे व्याध । करिती देशोदेशी शोध ।।१।।

ऐसे शोधत असतां । व्याध देखे अवचिता ।।२।।

रम्य एक सरोवर । हंस क्रीडेचे बिढार ।।३।।

जया पाहतांचि मन । होय वैराग्यसंपन्न ।।४।।

जनाचिया पायरवें । रूळेना जे शांतिभये ।।५।।

ज्ञानेशजा दासा प्रिय । ऐसा रम्य ठाव होय ।।६।।

(९४३)

तय ठायीं एक हंसाचे दंपत्य । हरिसी चिंतीत नांदे सुखें ।।१।।

एकान्त पाहोनी नित्य साधुजन । येतीं हरिध्यान करावया ।।२।।

करोनिया स्नान तये सरोवरीं । आठविती हरिपाय चित्तीं ।।३।।

कोणी प्रेमें मुखी हरीनाम गुण । गावोन नाचोन वर्णितातो ।।४।।

ज्ञानेश्वरकन्या ऐसिया आवडी । आठविता उडी घाली वेगें ।।५।।

(९४४)

ऐसा नित्य तेथें होतसे सोहळा । परमानंद डोळा हंसाचिया ।।१।।

होतांचि आरंभ हरिकथेलागीं । दंपत्य सवेगीं धांवत ये ।।२।।

समीप बैसोनीं प्रेमें हरिगुण । करीत श्रवण अत्यादरें ।।३।।

नाठवती तया देहादिक भाव । हृदयाची ठेव हरी झाला ।।४।।

ज्ञानेशजा नित्य सांभाळित दीना । असो कां शहाणा नेणताहि ।।५।।

(९४५)

व्याध संचरला वनीं । ऱ्हद देखिले लोचनीं ।।१।।

हंसा शोधोनी भागला । देशदर्शने निवाला ।।२।।

पाहे तये ठायीं एक । कोणी बैसला भाविक ।।३।।

सरोनियां स्नान संध्या । प्रेमे आठवी गोविंदा ।।४।।

पाशीं बैसले दंपत्य । होवोनियां निर्भय चित्त ।।५।।

व्याध मनीं आनंदला । वाटे प्राण परतला ।।६।।

व्याध भावित मानसी । विष्णुदासा न भी पक्षी ।।७।।

ज्ञानेशजा कृपा त्यासी । नेणें व्याध हें मानसीं ।।८।।

(९४६)

व्याध चिंती मनी वैष्णवाचें सोंग । घेवोनि प्रसंग साधू आजि ।।१।।

येथोनि गेलिया निघोनी हा मुनी । स्नान आचरोनी बैसूं येथे ।।२।।

लटिक्याचि भावें आळवूं हरीसी । लावोनी नेत्रासी ध्यान मग ।।३।।

भजन ऐकोनी येईल दंपत्य । होतांचि प्रेमांत तल्लिन ते ।।४।।

सावध राहोनी धरीन तयासी । साधीन कार्यासी आपुलिया ।।५।।

ज्ञानेशजा म्हणे दिवस बरवा । आजि भक्तसेवा होय कांहि ।।६।।

(९४७)

हरिप्रेमें सुखावले । भवभय ते आटलें ।।१।।

परी खंडेनाचि झरा । आलिंगिता प्रियकरा ।।२।।

ऐशा प्रेमा उतराई । व्हाया संधि हरि पाही ।।३।।

हरिदास ते निर्भय । देवा वाटे कष्ट होय ।।४।।

बाळ खेळे आनंदानें । माय म्हणे भूकेले तान्हे ।।५।।

म्हणूनियां करुं धांवे । स्तनपान ते स्वभावें ।।६।।

ऐसी प्रेमाची ती जाती । देवभक्तचि जाणती ।।७।।

ज्ञानेशजा उडी घाली । कष्ट शंकेची उगली ।।८।।

(९४८)

इतुक्यांत पंथ लक्षिला वैष्णवें । व्याधासी बरवे झाले वाटे ।।१।।

करोनियां स्नान बैसला तटाकीं । मुखें नाम घोकी रामकृष्ण ।।२।।

द्वादश टिळे रेखिले सर्वांगीं । परी अंतरंगी भाव दुजा ।।३।।

सावध लक्षोनीं पाहे तो पक्षिया । पाशीं बैसावया आला काय ।।४।।

ज्ञानेश्वरकन्या तयाचें अंतरीं । जाणती आसुरी माया त्याची ।।५।।

(९४९)

हंस म्हणे प्रिये जाणसी अंतरीं । कोण येथें तिरीं बैसलासे ।।१।।

वैष्णवाचें सोंग घेवोनिया व्याध । करो पाहे बद्ध आपणासी ।।२।।

आपुला तो नेम करावे श्रवण । श्रीहरीचे गुण सर्वकाळ ।।३।।

तेथें जावोनियां बैसतां आम्हासी । करील नेमेसी बद्ध प्रिये ।।४।।

देहाचिये आशे सांडावें श्रवण । अनुचित जाण दासपणा ।।५।।

हो कां दंभेंपरी घेतो स्वामीनांव । जाहला वैष्णव आम्हालागीं ।।६।।

तरी तयापायीं वाहोनियां जीव । स्वामी रमाधव तोषविन ।।७।।

संताचिया काजा येता हे शरीर । कोण लाभ थोर याहोनिया ।।८।।

ज्ञानेश्वरकन्या दास उठाउठी । घाली तेव्हां मिठी व्याधापायीं ।।९।।
(९५०)
हंसी पाहोनियां पतिचिया मागें । घाली लागवेगें उडी तेव्हां ।।१।।
आनंदला व्याध घेऊनी तयासी । परत ग्रामासी आला तेव्हां ।।२।।
नेवोनियां दिले रायालागीं पक्षी । बाप सर्वसाक्षी चिंतातुर ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या व्याकुळ अंतरीं । भक्तांचा कैवारि दीनबंधु ।।४।।
(९५१)
याचि समयासी द्वारके माझारीं । बैसले श्रीहरि भोजनासी ।।१।।
कळलें अंतरीं माझ्या नांवासाठी । दिला व्याधावोटी निजप्राण ।।२।।
ढळढळा अश्रु वाहती नयनीं । न बोलवे वाणी शब्द कांहीं ।।३।।
अनिवार शोक करी यदुनाथ । ज्ञानेशजासुत कैवारी जो ।।४।।
(९५२)
देव म्हणे माझे निष्ठुर हृदय । म्हणवितो माय जगाची या ।।१।।
आपुलिया हातें मियां निजबाळा । दिधलें चांडाळा व्याधालागीं ।।२।।
तेव्हांचि त्या व्याधा टाकितो मारुन । प्रसंग हा दारूण न येता हा ।।३।।
बहुकाळें बाळ वियाली वांझोटी । होता बाळतुटी कासाविस ।।४।।
ज्ञानेशजासुत बाप दासासाठीं । धरणीये लोटी आंग तेव्हां ।।५।।
(९५३)
प्रेमाचिया भरें विसरला हरी । निज पुतनारी सामर्थ्यौंहि ।।१।।
उद्धवें पाहोनी करीत नमन । बोलत वचन हरिलागीं ।।२।।
कावो मायबाई व्याकुळ अंतरीं । काय कोणी हरिभक्त कष्टी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या प्रेमाचा उबाळा । नेणो तिच्या बाळा वाचोनिया ।।४।।
(९५४)
हरि म्हणे काय पुससी उद्धवा । लाज वाटे जोवा सांगावया ।।१।।
असोनियां माझे शरीर धाकट । सोसिताती कष्ट भक्त माझे ।।२।।

काय असोनियां माझें हें जीवित । भूमिभारभूत झालों वाटे ।।३।।
भक्त माझ्यासाठीं सांडे जीविताशा । मी तंव अल्पसा त्रास नेघे ।।४।।
जनीं म्हणवितो भक्तांचा कैवारी । केवढी शरीरीं आसक्ति ही ।।५।।
शंख चक्र गदा आयुधें वागवी । व्यर्थचि मिरवी चहुंभुजा ।।६।।
ज्ञानेश्वरकन्या चित्त पाहोनियां । वाहे सर्वांचियां अश्रु नेत्रीं ।।७।।

(९५५)

साष्टांग प्रणाम करोनी उद्धव । म्हणे कां हे भाव करिसी हरी ।।१।।
भक्ताचिया काजा धरोनी अवतार । येसी महीवर मागयबापा ।।२।।
कोण तुजविण सांग बळिवंत । पाडशील दांत काळाचेही ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये तूंचि सांभाळितां । न चालेचि सत्ता कोणाचीहि ।।४।।

(९५६)

योगनिद्रेंतूनि जागविसी श्रुति । जग कार्यों स्तुति करोनियां ।।१।।
तैसा भक्तप्रेमें समाधिस्थ हरी । आणी देहावरी उद्धव तो ।।२।।
उद्धव वचनें कारूण्याचे पोटीं । उघडली पेटी वात्सल्याची ।।३।।
आवरोनी शोक काय करी हरी । स्वरुप ते धरी सुवैद्याचे ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या उत्तम वाईट । भक्तप्रेमापुढें नेणें कांहीं ।।५।।

(९५७)

येऊनिया ग्रामीं जनीं करी श्रुत । आला असे येथ एक वैद्य ।।१।।
कृपाष्टिमात्रें जाती सर्व रोग । सर्वांग सुंदर होवोनियां ।।२।।
कर्णी कर्णी होतां राजयाचे कानीं । घातली दुतांनी मात तेव्हां ।।३।।
राजा म्हणे तया यावे घेऊनियां । ओवाळीन काया तयाहूनि ।।४।।
दूत येवोनियां सांगती देवासी । स्वामिये तुम्हासी पाचारिले ।।५।।
ज्ञानेश्वरकन्याकान्त राजद्वारीं । येताचि सामोरी जाय नृप ।।६।।

(९५८)

देखतांचि ष्टि घाली लोटांगण । म्हणें प्राणदान द्यावे मज ।।१।।

देव म्हणे काय असे सांग व्यथा । सांडोनियां चिंता सर्व कांहीं ।।२।।
राजा म्हणे स्वामी सर्वहि शरीरीं । उद्भवले भारी शिवत्र माझ्या ।।३।।
ज्ञानेश्वरकन्याकान्त म्हणे काय । योजिले उपाय तयासी त्वां ।।४।।
(९५९)
म्हणे महाराजा आजवरी नाना । औषध योजना केल्या मियां ।।१।।
परी तिळभरी उणा नव्हे रोग । वृद्धि पावे भोग अधिकचि ।।२।।
कोणी एक वैद्य आला इये ग्रामीं । आणविले स्वामी हंस दोन ।।३।।
म्हणतो तयाचे घेऊनी शोणित । सिद्ध देतो घृत करोनियां ।।४।।
तयाचे सेवनें जाईल हा रोग । वचन सुरंग असे त्याचे ।।५।।
ज्ञानेश्वरकन्यें पोटीं समाधान । म्हणे माझा प्राण जीवंतचि ।।६।।
(९६०)
देव म्हणे हा तो कर्मजन्य व्याधी । करील औषधी काय तेथे ।।१।।
दैविकउपाय साध्य असे जाणा । नको घेऊं प्राण पक्षीयांचा ।।२।।
क्षणमात्रें तुला लया नेतो व्याधी । परी आणी आधीं पक्षी येथें ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या इतुके बोलोनी । विलोकी जननी कृपाष्टि ।।४।।
(९६१)
ज्याच्या कृपें भव उडे । तेथें श्वित्र का बापुडें ।।१।।
कृपाष्टि विलोकितां । काल राव तो सरता ।।२।।
दिसे मदन दुसरा । नृप जोडी दोन्ही करा ।।३।।
कैसा होऊं उतराई । म्हणोनियां लागे पायीं ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या म्हणे । हंस जोडपे ते देणें ।।५।।
(९६२)
घेऊनी जोडपे लाविले पोटासी । न्हाणिले प्रेमेसी अश्रुजळें ।।१।।
देव भावी मनीं निज वैरियासी । नेतो वैकुंठासी आपुलिया ।।२।।
माझिया भक्तांचा झाला समागम । व्याधा वैद्यासम दोघालागीं ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या दासाचें दर्शन । विफल ते जाण नोहे कधीं ।।४।।

(९६३)

ऐसा देवो मनीं करोन विचार । बोलत उत्तर रायालागीं ।।१।।

म्हणे राया माझे पूर्वीचे हे गुरू । लाधलो साचारु विद्या येथे ।।२।।

लोटतांचि काळ जाहली विस्मृति । परी माझी प्रीति पायीं यांच्या ।।३।।

ज्ञानेशजाकान्ता म्हणे यांसी कांहीं । देवोनियां पाही बोळवावे ।।४।।

(९६४)

म्हणे देव तैसा व्याध गौरवावा । देखिला बरवा स्वामीभक्त ।।१।।

ऐसी करोनियां लीला सूत्रधारी । निघाले श्रीहरी तेथोनियां ।।२।।

लागवेगीं गांवाबाहेर येऊन । दिधले सोडून पक्षिराज ।।३।।

न लगतां क्षण पातले द्वारके । मग सारी सुखें भोजनादिक ।।४।।

(९६५)

विष्णुदास कीर्ति करी जो श्रवण । पठण कीर्तन प्रेमभावें ।।१।।

तया सर्वभावें सांभाळितो हरि । संशय अंतरीं घेऊं नये ।।२।।

आपुल्या दासाचें पडो नेदी उणें । सर्व नारायणें संपादीजें ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या संतवायबळें । हृदयीं सांवळे प्रगटत ।।४।।

हंसदंपत्याख्यान समाप्त

## संकीर्ण मकर संक्रांत

(९६६)

आजि संक्रांतीचा असे शुभ दीन । परस्परां दान द्यावे तीळ ।।१।।

मनोरुप तीळ निवडी साचार । वासना कंकर काढोनियां ।।२।।

गुरूकृपा सीता मेळवोनी त्यांत । मर्दिले बहुत भाव बळें ।।३।।
घेंवोनियां तीळ वीसरा मागिले । अपराध केले सर्व कांहीं ।।४।।
बटीक ही देवा असो द्यावी पायीं । सेवे शेषशाई आपुलिया ।।५।।
जळाविण मीन हरिणी पाडसा । विण झुरे तैसा द्यावा प्रेम ।।६।।
ज्ञानेश्वरकन्यासुता प्रेमतीळ । द्यावा घननीळ विनंति ही ।।७।।

(९६७)

गोड घेऊनिया तीळ । वारी मळ चित्ताचा ।।१।।
नको मज आन कांहीं । वाटे पायीं राहावें ।।२।।
तुम्ही मज द्यावे तीळ । तळमळ आपुली ।।३।।
ज्ञानेशजे शुभकाळ । आतां वेळ न लावी ।।४।।

०००

……………………पुरवणी अभंग……………………
……………………

९७२.

जरी वाटे तुज व्हावे नित्य सुख । तरी नित्य घोक रामकृष्ण ।।१।।
नसे नामाविण साधन अन्यथा । जेणें रमाकान्ता आकळशी ।।२।।
आगम निगम सार एक नाम । साधनीं संभ्रम करिसी कां ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या म्हणे एक्या नामें । अयोध्या श्रीरामें उद्धरिली ।।४।।

(९७३)

सर्वही उपाय विनाशाचें मूळ । तूं एक गोपाळ अंतरल्या ।।१।।

ओखद जीववी एकादिया वेळीं । तरी काय गेली मृत्युभीति ।।२।।

बाळपणीं माता पिता सांभाळिती । परी यमाहातीं जाणें घडे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये एक तूं समर्थ । तुझा कृपा ठसा तारी जगा ।।४।।

(९७४)

नका कोठें जाऊं स्वामी शूलपाणी । माझ्या हृदभुवनीं राहे सदा ।।१।।

माझें हें हृदय दुस्तर कानन । वसति दारूण मृग येथें ।।२।।

कामक्रोधादिक सावज येथीची । वधावी ती साची उमावरा ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या सुत मी दयाळा । करावे सांभाळा दीनबंधू ।।४।।

(९७५)

आनंदाचा दीन आजिचा साजणी । देखिले लोचनीं मायबाप ।।१।।

आतां मागें पुढें नाहीं मज कोणी । कैवल्याचा धनी लाधलिया ।।२।।

फिटलें पारणें माझिया नेत्राचे । शामरुप साचे देखोनियां ।।३।।

हारपली सारी मानसिक व्यथा । पांडुरंगनाथा कृपें तुझ्या ।।४।।

(९७६)

उशीर लागला नयेसी धांवोनि । म्हणोनियां मनीं भय वाटे ।।१।।

इतुका निष्ठुर जाहला कोणासी । नाहीं औषधासी आयिकिला ।।२।।

नाहीं झाला कोणी माझ्यासम वीर । ज्याच्या पापा पार नाहीं नाहीं ।।३।।

ज्ञानेशजे काय होईल समर्थ । दावावया व्यर्थ नामकीर्ति ।।४।।

(९७७)

आपुल्याचा क्षमा करा । देवा सारा अपराध ।।१।।

पाहूं जाल माझे गुण । तरी शीण होईल ।।२।।

अवघाचि कृष्णमय । अंतर्बाह्य सारिखा ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये परी । दीनद्वारीं तिष्ठतो ।।४।।

(९७८)

कोठोनियां आणूं रसिक अक्षरें । सज्जन अंतरे निववाया ।।१।।

परी तुझे नामीं लाचावलें मन । करितो ग्रथन कांहीं बाही ।।२।।

हीच दुर्बळाची मानोनिया सेवा । प्रसाद तो द्यावा प्रेमदान ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या मातृपद गोडी । निज परवडी चाखावया ।।४।।

(९७९)

तुजविण कोण सुखाचा सांगाती । अवघेचि हातीं काळाचिया ।।१।।

समर्थांचे पायीं घातलीसे मीठी । आतां कृपाष्टि सांभाळावे ।।२।।

संपादिली कीर्ती रक्षावी दयाळा । सोडवी या काळापासोनियां ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये असतां समर्थ । माझी नोहे शान्त मळमळ ।।४।।

(९८०)

धष्ट पुष्ट काया । वागवितो देवराया ।।१।।

कैसा आहे प्रेम । कळो येतो तो उत्तम ।।२।।

पुरल्यावांचोनी । इच्छा जावो नेदी कोणी ।।३।।

ज्ञानेशजे माये । कोणे परी कृपा होये ।।४।।

(९८१)

तुजविण माझा जीव कासाविस । वाटती उदास दिशा दाही ।।१।।

आलो पायवणी न टाकावे दुरी । बैसलोसे द्वारीं समर्थांच्या ।।२।।

झालिया दोषाची मागताहे क्षमा । मायबाप आम्हां तूंचि एक ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये न जाय एथोनी । जाणोनी निर्वाणी धांव घाली ।।४।।

(९८२)

सुखें पायापशीं पडोनिया राहूं । आनांनें गावूं नाम तुझे ।।१।।

सुखदुःखभार न घालूं तुम्हासी । न जातां अन्यासी शरणही ।।२।।

येईल मनासी करावे कल्याण । तेव्हां प्रेमदान द्यावे दासा ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये जाणे मी अंतरीं । नाहीं अधिकारी कृपेलागीं ।।४।।

(९८३)

कोणे परी देवा भाकूं मी कणवा । तुमचा केशवा नेणो कांहीं ।।१।।

मनीं वाटे तुझें सगुण रुपडें । नित्य ष्टिपुढें असावें तें ।।२।।

परी कोणे रीति माझी ही कामना । होय नारायणा पूर्ण नेणो ।।३।।

दिवस रजनी आयुष्याची घडी । संसार कावडी वाहता जाय ।।४।।

ज्ञानेश्वरकन्ये वाया जातो जन्म । दावावा सुगम मार्ग कांहीं ।।५।।

(९८४)

नामाविण नाहीं सुलभ साधन । जननी वचन साच तुझे ।।१।।

परी काय करुं सांगितल्या परी । न रंगे वैखरी नाम गानीं ।।२।।

आठा प्रहरामाजीं एकादिये वेळे । दंभार्थ सेहाळे चिंती तुज ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये तेही सापराध । नेणे मतिमंद हित कांहीं ।।४।।

(९८५)

अगा नारायणा पतितपावना । येऊं दे करूणा कांहीं माझी ।।१।।

अगा रमापति राजीवनयना । येऊं दे करूणा माझी कांहीं ।।२।।

अगा दीनबंधु गोपिकारमणा । येऊं दे करूणा माझी कांहीं ।।३।।

ज्ञानेश्वरकन्ये चोरुं नको पान्हा । येऊं दे करूणा माझी कांहीं ।।४।।

(९८६)

बाळ निजभूक तहान ते नेणें । निकें तें करणें माऊलीसी ।।१।।

पंख न फुटता पिलीयांची चिंता । पक्षिणी तत्त्वतां जीवे करी ।।२।।

तैसा भोग मोक्ष सांडोनी प्रयत्न । एक नारायण जीवीं धरी ।।३।।

स्कंददास म्हणे त्याची सर्व चिंता । तया भगवंता करणें लागे ।।

(९८७)

विषापरी सर्व विषय घातकी । कोणी नोहे सुखी तया संगे ।।१।।

परी वोकिल्याची सेवितोसी ओका । काय तुज लेंका म्हणो आतां ।।२।।

जाणोनिया जासी जळत बिऱ्हाडा । वस्तीकर मूढा होवोनिया ।।३।।

स्कंददास म्हणे विषयव्याळासी । मना कांरे देसी आलींगन ।।४।।

(९८८)

करता संसार नये तुज शीण । बा रे रात्रंदीन श्रमतोसी ।।१।।

घडीभरी स्वस्थ बैसोनी एकान्तीं । नाठविसी पती वैकुंठीचा ।।२।।

आलिया जन्माचे होईल सार्थक । पावशील सुख अलभ्य ते ।।३।।

स्कंददास म्हणे रामकृष्णहरी । स्मरतां कैवारी नारायण ।।४।।

(९८९)

सावध हो माझ्या मना । दूर ठेवी अभिमाना ।।१।।

अंतरोनि कृष्णनाथ । पडे येऊनि आघात ।।२।।

संत होती पाठमोरे । तुज पाहतां सामोरे ।।३।।

मग ज्ञानेशजा आई । तुज दुरावली पाही ।।४।।

(९९०)

विषयाची प्रीति राहिलीया पोटीं । काय ब्रह्मगोठी बोलोनियां ।।१।।

अंतरीं राहतां विषयाचें ध्यान । काय शब्दज्ञान करी तेथें ।।२।।

शब्दाची सरिसी जंव नोहे वृत्ति । उघड फजिती मुक्तपणा ।।३।।

ज्ञानेशजामाय कृपेवांचोनिया । ब्रह्मपण वायां बंधनचि ।।४।।

(९९१)

भवनदी चाले पूर । नाहीं कोठेही उतार ।।१।।

माया विवशी ऐलाडी । विद्या वागुरी त्या थडी ।।२।।

निजबळें पोहूं जाया । धीर नव्हेचि जीवा या ।।३।।

ज्ञानेशजे घेऊनि कडी । मज नेई पैलथडी ।।४।।

(९९२)

एको सांगतो विचार । चित्तीं धरितां लाभ थोर ।

सोडा प्रपंचाचा भार । मोह अनिवार विषयांचा ।।१।।

जग जेणें निर्मियेले । तेणें पोटालागीं दिलें ।

तेथें वायां गुंतले । काय केले सार्थक ।।२।।
लक्ष चौऱ्याशी या योनी । निजकर्में भोगिती प्राणी ।
भाग्यें नरदेहालागुनी । येणें म्हणुनी विचारु ।।३।।
तुटे संसारबंधन । ऐसे करावे साधन ।
सोपे हरिनाम कीर्तन । झाले पावन महादोषी ।।४।।
एक्या हरिनामकीर्तनें । चारी पुरूषार्थांचे केणे ।
स्कंददास म्हणे होणें । हरीकीर्तनें हरिरुप ।।५।।
(९९३)
समर्थे केलिया तुझा अंगीकार । कासया विचार लौकिकाचा ।।१।।
कासयाचे उणे असे तयापाशीं । राबताती दासी चारी मुक्ति ।।२।।
राजयाची कांता परजे सेवका । तैसा विषयसुखा भुललासी ।।३।।
स्कंददास म्हणे सोडोनि संशय । ज्ञानेशजा पाय ढ धरी ।।४।।
(९९४)
परमार्थमार्ग नाकळे बुद्धीसी । शरण गुरुसी गेल्याविण ।।१।।
गुरू तो जाणावा तोडोनी संशय । लावी व्रजराय प्रेमगोडी ।।२।।
तनमनधन तेथें समर्पोनी । करावे त्या ऋणी दास्यभावें ।।३।।
ज्ञानेशजा माय कृपाळु सज्जन । लेववील लेण उन्मनीचे ।।४।।
(९९५)
करावया काव्य वाटतो हव्यास । तरी हृषिकेश गायी सुखें ।।१।।
नको वायाविण वेचूं निजवाणी । इतर स्तवनीं नरांचिया ।।२।।
आशाबद्ध सर्व करिती बंधन । स्तवनेंचि कोण तोष पावे ।।३।।
एक नारायण दिनांचा दयाळ । स्वार्थ अमंगळ नाहीं जया ।।४।।
स्कंददास म्हणे सांडोनी उदारा । कासया नखरा उपासिसी ।।५।।
(९९६)
इंद्रायणी इंद्रायणी वाचे गातां पापधुनी ।।१।।

स्नानमात्रें महादोषी । होती वैकुंठनिवासी ।।२।।

नित्य घडे जया स्नान । देहींच तो नारायण ।।३।।

स्कंददास विश्वासला । नित्य जपे नाममाला ।।४।।

(९९७)

कांरे नाशीवंतासाठीं । करितोसी आटा आटी ।।१।।

देह केला पांचजणी । अंतीं मिळेल कारणीं ।।२।।

केले श्रम जाती वाया । वरी जाशील निरया ।।३।।

स्कंददास म्हणे हित । ज्ञानेशजा पायीं चित्त ।।४।।

(९९८)

विष्ठामूत्राचे दाथरी । कढे नवमासवरी ।।१।।

बाळपणींच्या यातना । वाचे किती वर्णवेना ।।२।।

नाना दु:खाचे पर्वत । पुढें येती अकस्मात ।।३।।

पुढें यमाची यातना । भोग देतेवेळीं जाणा ।।४।।

स्कंददास म्हणे करा । सखा कृष्णजी सोयरा ।।५।।

(९९९)

कां हो मायबापा पतितपावना । दूर नारायणा धरितां मज ।।१।।

वाटे तयावरी करा अनुग्रह । परी आम्हां मोह पाडूं नये ।।२।।

तुझिया भक्ताचा न हो अनादर । हेचि निरंतर मागतसे ।।३।।

ज्ञानेशजे मी तो बालक अज्ञान । सांभाळी राहोन मागे पुढें ।।४।।

(१०००)

साचपण धरा पोटीं । हरिभेट व्हावया ।।१।।

नको दंभमानासाठीं । वाया तुटी देवासी ।।२।।

अंतरीचा कळवळा । साक्षी सकळा जाणे तो ।।३।।

स्कंददास म्हणे अट । बळकट विश्वासु ।।४।।

:::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::

## दसरा

## पालखी उत्सवात म्हणावयाची श्रीरामपर ४ पदे

१००१ पद

विजयी व्हा रघुवीर ॥धृ०॥

दशमुखादिक शतमुखरिपुना । मारुनियां रणधीर ॥१॥

दास्यांतुनियां सोडुनीं सुरवर । धर्म करा सुस्थिर ॥२॥

सकल संपदा जानकिदेवि । नेलीसे परतीर ॥३॥

स्कंददासप्रभु जिंकुनि आणा । लंकापति दशशीर ॥४॥ (९६८)

१००२

सर्व सत्ता ज्याचे हातीं । तो हा स्वामी सीतापती ॥१॥

निर्मी अनंत ब्रह्मांडे । रावणा काय धेंडे ॥२॥

शरणागत कैवारी । हो कां भक्त अथवा वैरी ॥३॥

ज्ञानेशजाकृपाफळ । संता सुख पर्वकाळ ॥४॥ (९६९)

१००३ पद

विजयी हा श्रीराम माझा ॥धृ०॥

भक्तासाठीं अजही जन्में । पुरवाया तत्काम ॥१॥

वैरियाही निजपद दे जो । सकल सुखाचें धाम ॥२॥

श्रीज्ञानेश्वरजा कृपें सुलभ तो । मोल न देतां दाम ॥३॥ (९७०)

१००४ पद

झाला विजयी हा रघुवीर ॥धृ०॥

दानवकुलावतंस सुररिपु । मारूनिया दशशीर ॥१॥

प्रणतकामकल्पद्रुम जो । मुनिजनमानस धीर ॥२॥

ज्ञानेश्वरजा सुत तत्पायीं । चरणां वाहुनि शीर ॥३॥ (९७१)

०००

॥श्रीसदगुरू पांडुरंगनाथार्पणमस्तु ॥

०००

# पत्र १ ले

*रा. रा. नारायणराव बालटे (हिरपूर-मूर्तिजापूर) यांस*

*(१)*

*तुमचे लिखित पावलो ये काळीं । आनंदाश्रु डोळीं वाचोनिया ।।१।।*

*वाचोनि गौरव चित्तीं वाटे खेद । जाणे मतिमंद अभागी मी ।।२।।*

*तुम्हीं संतजनीं द्यावी शिकवण । आंगीं अभिमान नये जेणें ।।३।।*

*ज्ञानेश्वरकन्या चरणासी सेवा । घडो हाचि द्यावा आशीर्वाद ।।४।।*

*(२)*

*आळंदीवल्लभ ज्ञानेश्वर प्रभु । आलो जी स्वयंभु पाहोनियां ।।१।।*

*एक मासवरी नव्हतोचि ग्रामीं । येऊनियां धामीं पक्ष झाला ।।२।।*

*मागील लिखितें नाहीं आली हाता । उत्तर सार्थका केविं देऊं ।।३।।*

*घडला अन्याय करोनियां क्षमा । ज्ञानेशजा प्रेमा द्यावा मज ।।४।।*

*(३)*

*स्तुती करा ऐसा नाहीं अधिकार । दीन मी पामर संतदास ।।१।।*

*स्त्रियापुत्रादिकीं पडला आदर । तुमचा उद्धार केविं करुं ।।२।।*

*नाहीं धर्मज्ञान भक्तीचा जिव्हाळा । शुद्ध पेंडवळा मिथ्याभिमानी ।।३।।*

*ज्ञानश्वरकन्याजननीचे द्वारीं । बैसलों भिकारी होवोनिया ।।४।।*

*(४)*

*बाळ विसरे माऊली । कृपाष्टि ती न्याहाळीं ।।१।।*

*तैसी झाली माझी परी । तुम्ही कृपा केली बरी ।।२।।*

*हेचि आतां विनवणी । माझी न करावी सांडणी ।।३।।*

ज्ञानेशजा पायीं करा । मज अर्पण दातारा ॥४॥

०००

# पत्र २ रे

(१)

उदाराचा राणा ऐसी जगीं किर्ती । वंदन त्याप्रति ज्ञानराजा ॥१॥

गळला अंबुद नेले भवतापा । गुरूमायबापा नमस्कारु ॥२॥

साष्टांग करोनी तुम्हा नमस्कार । पाठवी उत्तर लिखीताचे ॥३॥

ज्ञानेशजामाय दाखवी सुपंथ । आशीर्वौद तेथ वोपियेला ॥४॥

(२)

आघवी लिखीते पावली मजसी । नेदी उत्तरासी आळसानें ॥१॥

लिखीत वाचोनी वाटे समाधान । जे कीं नारायण प्रेम चित्तीं ॥२॥

तोचि एक म्हणो कुळीं भाग्यवंत । जया भगवंत आवडला ॥३॥

ज्ञानेशजामाये धाडियेला मित्र । निजकृपापात्र करावया ॥४॥

(३)

बिकट हा मार्ग नाकळे मजसी । नाहीं विरक्तीसी म्हणूनिया ॥१॥

तुम्हासम मित्र जोडला विरक्त । तेणें भाग्यवंत झालों आतां ॥२॥

शिष्य होवोनियां आपुला उद्धार । करोनी उद्धार करा माझा ॥३॥

गोरक्षें रक्षिला मच्छेंद्र सदगुरू । तैसे साहाकारु व्हावे मज ॥४॥

ज्ञानेशजा माय ठेवोनी प्रमाण । नोहे हें वचन उपरोधी ॥५॥

(४)

संसारीं राहोनी अलिप्त विषयीं । वाचे शेषशायी नाम सदा ॥१॥

विषयाचे जरी विधीनें सेवन । त्यागाचें समान जाणावें ते ॥२॥

भूतीं समष्टि दीनावरी दया । तरी त्या कासया जप तप ॥३॥

कलीयुगामाजीं करावे कीर्तन । ज्ञानेशजे खूण सांगितली ॥४॥

(५)

न लगे सोडूनी जावे मायबापा । जरी नोहे तापा हरिनामीं ।।१।।

घरींच राहोनी करा एक चित्त । आवडी अनंत आठवावा ।।२।।

हरिनामाविण कोठेंचि सखया । आग्रह तो वायां असूं नये ।।३।।

बळकट धरी उपास्याची कास । चित्तीं नको आस कशाचीहि ।।४।।

ज्ञानेशजा माय न टळे नेमासी । धरी त्या पोटासी भावबळें ।।५।।

(६)

नामेविण पळ नसे रिति वाणी । तरी मोक्षदानी आकळतो ।।१।।

नामसंकीर्तनीं तल्लीन मानस । रात्री न दिवस नेणे काहीं ।।२।।

नेणे क्षुधा तृषा केऊती निमाली । निंदकांच्या बोलीं चित्त नाहीं ।।३।।

ज्ञानेशजामाय नामाचाचि छंद । लागतां गोविंद उडी घाली ।।४।।

(७)

मार्ग क्रमिल्या वाचोनी । गांवा कैसा जाय कोणी ।।१।।

केव्हां पावेन मी गांवीं । ऐसा चित्ता वाहे जीवीं ।।२।।

तरी नोहे फळसिद्धि । विण तोडिल्या उपाधी ।।३।।

गुरू दावी मोक्षवाट । शिष्याकडे खटपट ।।४।।

आले दुःखाचे डोंगर । तरी सांडूं नये धीर ।।५।।

आत्मपिंड जेणें दिला । ज्ञानेशजे प्रिय झाला ।।६।।

(८)

देहाची आसक्ति न सुटे विषय । तांतडी ते काय करोनियां ।।१।।

घेववेना जरी सतीचे वायण । उताविळपण करुं नये ।।२।।

मातापितयाची करोनिया सेवा । विषय सेवावा यथाविधि ।।३।।

सर्वहि करिता संसाराचा धंदा । चित्तीं त्या गोविंदा आठवावे ।।४।।

दिसेंदिस ढ धरोनिया कास । ठेवावा विश्वास हरिपायीं ।।५।।

विश्वासेसी भक्ती मागावी देवासी । अभक्त संगासी टाकोनियां ।।६।।

रात्रंदिस होतां नामसंकीर्तन । ठसे हरिध्यान आपेआप ।।७।।

ग्रंथ ज्ञानेश्वरी नाथ भागवत ।। विवरावे अर्थ यांचे चित्तीं ।।८।।

श्रवण केलिया अर्थौंचे चिंतन । तेचि रात्रंदिन मनन पैं ।।९।।

मोक्षाचे गाठोडे नाहीं कोणापाशीं । उदास देहासी तोचि पावे ।।१०।।

केलियावाचोनि देतां नये कोणा । अधिकारीपणा सामर्थ्यौनें ।।११।।

ज्ञानेशजापायीं ठेविल्या विश्वास । मग संदेहास शिवूं नये ।।१२।।

(९)

न मिळो खावया न वाढो संतान । परी नारायण कृपा करो ।।१।।

ऐसी तीव्र जीवीं धरोनी आवडी । करावा तो घडी घडी लाहो ।।२।।

होईल ते होवो हरिचिया नांवें । म्हणोनी राहावे स्वस्थ चित्तीं ।।३।।

ज्ञानेशजा माय येईल धांवोनी । निर्वौण मांडोनी आठविल्या ।।४।।

(१०)

चालत्या मारगीं वाहूं नये शंका । पावेन मी निका गांवीं केव्हां ।।१।।

क्रमियेला पंथ आतां किती दूरी । असतां हे उरी धीर नये ।।२।।

धरिलिया वाटे आनंदें चालावे । तरीच पावावे निजस्थळ ।।३।।

ज्ञानेशजापायीं घालोनियां भार । धरोनियां धीर रहा सुखें ।।४।।

(११)

कळे तैसें तुम्हां केलें निवेदन । घ्यावे समाधान होय तरी ।।१।।

विषयीं लंपट अभ्वासीं निचाड । नाहीं कोणी धड क्रिया एक ।।२।।

ऐसा सर्वांपरी कमाईचा हीन । नाहीं कोणी उन पाप एक ।।३।।

ज्ञानेशजा माय करील सांभाळ । कंठीतसे काळ विश्वासें या ।।४।।

०००